# राधा
## पौराणिक कादंबरी

आपण सांगितल्याप्रमाणे बऱ्याच ठिकाणी ई हा शब्द उ झाला होता. त्यासाठी मी परत नव्याने परत जुन्या फाईलमधून प्रत्येक प्रकरण पेस्ट केले. त्यानंतर आपल्या म्हणण्याप्रमाणे ल हा शब्द 'गोदरेज की बोर्ड' घेऊन मास्टरला बदलण्याचा प्रयत्न केला. तो 'ल' सर्व ठिकाणी झाला पण 'होईल' ऐवजी परत 'होउल' असे होत आहे.  यावर काय करता येईल ते पहा.

# राधा

## पौराणिक कादंबरी

**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

पद्मगंधा
प्रकाशन

Radha
Dr. Anil Sahastrabuddhe

**प्रकाशक ।** भारती जाखडे
पद्मगंधा प्रकाशन
३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था,
पांडुरंग कॉलनी, एरंडवन,
पुणे - ४११०३८
फोन : (०२०) २५४४२४५५
मो. : ७३५०८३९१७६
p.padmagandha@gmail.com
www.padmagandha.com

© डॉ. अनिल सहस्रबुद्धे

**मुखपृष्ठ ।** .....

**प्रथमावृत्ती ।** .....२०२४

**मुद्रक ।** अभिनुजा मुद्रण सुविधा
कर्वेनगर, पुणे - ४११०५२

**मूल्य ।** ₹ ०००

ISBN 978-81-952850-0-0

https://www.facecook.com/pages/Padmagandha-Prakashan

राधे राधे !
राधा शरणम् !

# कुंजवनीचे गुज

बाजार, जत्रायात्रा यांच्या निमित्ताने, लोकमनोरंजनार्थ उभे राहिलेले, तमाशांचे खेळ अगदी बालवयापासून पाहातोय. तमाशा, खेळ, गंमत, खडीगंमत या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तमाशांचे, लोकनाट्य, वगनाट्य आलेले असे स्वरूप, प्रबोधनासाठीच्या, प्रयोगांच्या निमित्ताने, पाहात आलोय. ग्रामीण, आदिवासी भागातच लहानचा मोठा होत गेलो. जत्रायात्रांतील, विधिनाट्य स्वरूपात, गावगन्ना हौशी तमाशा मंडळांनी, नवस फेडण्यासाठी, हजेरी लावण्यासाठी, सादर केलेले तमाशाखेळ देखील अनुभवले.

एकाच वेळी दोन–दोन मंडळ्यांपासून दहा–दहा, बारा–बारा मंडळ्यांपर्यंतचे प्रयोगही पाहिले. या सगळ्या प्रयोगांत, सर्व जातीजमातींचे लोक परंपरेने सहभागी असलेले पाहिलेत. या प्रयोगांत दोन गोष्टी अटळपणे, अपरिहार्यपणे, विधिनाट्यपरंपरा म्हणून पाहात आलो. त्या दोन गोष्टी म्हणजे, गण अर्थात गणेशवंदना आणि गवळण तथा राधाकृष्ण वंदना!

तमाशा म्हटलं की गवळण होणारच! गावाच्या वेशीवर सवंगड्यांसह श्रीकृष्ण, मथुरेला बाजारहाट करायला जाणाऱ्या गवळणींना अडवणारच! त्यातली म्हातारी गवळण, अर्थात मावशी, श्रीकृष्णाशी वितंड करून; अखेर शरणागती पत्करून; राधेला गवळण गीत सादर करायला लावणारच! राधेच्या गवळण सादरीकरणानेच मथुरेच्या बाजारचा मार्ग, गवळणींसाठी मोकळा होणार!

बाजारहाटीत, व्यवहार करण्यासाठी जाणाऱ्यांची अडवणूक करणाऱ्या, सर्व अधिकारी, गुंड, शोषक, शास्ते यांची रूपके श्रीकृष्ण आणि त्यांच्या सवंगड्यांच्या निमित्ताने वर्तमान संबंधाने उजळली जातात. राधेने सादर केलेल्या गवळणीने, श्रीकृष्ण प्रसन्न होऊन; श्रीकृष्ण सर्वथा शोषणमुक्तपणाने, गवळणींना

बाजाराला जाऊ देतो. लौकिक आणि पारलौकिकातील प्रेमाचे रूपक राधेच्या रूपाने लोकरंगभूमीवर, लौकिकातून पारलौकिकाकडे जाण्यासाठीचा भक्तिमार्ग; शृंगारिक तरी भक्तियोगाने प्रशस्त होतो.

जागरण, गोंधळादि विधिनाट्यांतून, शिवशक्तीविषयक कलगी-तुऱ्यांच्या सामना प्रसंगीही, राधाकृष्ण रूपकातूनच, श्रद्धेने मंगलाचरणात्मकतेने प्रकृतिपुरुष समावेशनविषयक लोकबंध दृढ होतो.

या अनुभवांतूनच 'राधा' या विभूतिमत्त्वाच्या अस्तित्वाविषयी, कुतुहल वाढत गेले. राधा ही अनया गवळ्याची पत्नी, श्रीकृष्णाची प्रेयसी म्हणून रंगवतांना; आंबटशौकिनांना विवाहबाह्य अनैतिक संबंधांच्या रसभरीत वर्णनांची मेजवानी, रसरंजन करणाऱ्या तमाशा कलावंतांनी कितीतरी वेळा दिली असेल! राधा हा प्रेमकाव्याचा कणा झाला तर नवल नव्हतेच! मधुराभक्तीच्या मार्गाने राधाभावाला, अध्यात्मिकतेचे आवरण देतांनाही संभोगशृंगारिक गीतेच लिहिली गेली. राधेला लौकिकात असे बंधनमुक्त प्रेमिकेचे रूप मिळाल्याने 'राधा' प्रेमरूपा म्हणूनच प्रकट झाली! राधा भजनाने श्रीकृष्ण परमात्म्याशी अद्वैत सिद्धी प्राप्त होते; या कल्पनेचे गूढ वाढतच राहिले!

राधेविषयीच्या अनेक गूढकथा लोकगंगेतून किंवा उपपुराणांतून परंपरेने वाहात आल्या. उदा. राधा जन्मतः अंध होती. श्रीकृष्णांची दृष्टी पडताच राधा डोळस झाली. राधाकृष्णांचे प्रेम बालवयातच यमुनीतीरी बहरले. राधाकृष्ण, गोपीकृष्ण यांच्या, खोडकर, खेळकर, रंजक, व्यभिचारी प्रेमाच्या अनेक कथा कानावर येतच राहिल्या. संतांच्या गवळणीतूनही, राधाकृष्ण, गोपीकृष्ण, यांच्या संबंधीच्या प्रेमकथा, संभोगशृंगारिक स्वरूपात सूचित आणि उल्लेखितही झाल्या. बाराव्या शतकातील, उत्तरपूर्वेकडील, जयदेव कवीने 'गीतगोविंदा'मधून तर राधाकृष्ण संभोगशृंगारिक वर्णनांचा, संगीतबद्ध स्फोटच घडविला. हे सारे पाहतांना, प्रवचनकार, कीर्तनकार, त्यातही विशेषतः उत्तरेकडील कीर्तनकार, राधाराणीला, वृंदावनातील राधाकृष्ण अद्वैताचे प्रतीक म्हणून आळवितांना दिसतात. 'राधा'मंत्र जपाने कृष्णाद्वैत साधता येते हे परोपरीने, शृंगभोग वर्णनासह कथन करीत, 'राधे राधे' भजनात श्रोतृवृंदाला, स्त्रीपुरुषांना, भक्तिरंगात रंगवितात! या सर्व उदाहरणांचा परिणाम, राधाविषयक गूढ, कुतुहल, जिज्ञासा उत्कट करण्यात झाला.

यमुनेच्या तीरावर गोकुळात बालकृष्णांचं दर्शन घेण्यासाठी रांगत गेलो. बालकृष्णांचे सवंगडी झाल्यासारखं वाटलं! दूध, दही, लोणी आणि दुग्धमिठाईचा

आस्वाद घेतांना, गोकुळच्या चोरानं मनात भरपूर बाललीलांचा संचार करविला. यमुनेच्या तीरीच्या वृक्षांवर, मोठ्या श्रद्धेने वस्त्र बांधून राधाकृष्णांच स्मरण केलं. यमुनेच्या कृष्णसावळ्या पाण्यानं, श्रीकृष्णांचे बालक्रीडा आणि बालपराक्रम डोळ्यासमोर साक्षात केले. अवघ्या गोकुळात राधाकृष्ण! गोपालकृष्ण! या जागरानं, मन राधाकृष्णमय झालं! कृष्णांच्या दर्शनप्रसंगी 'राधे राधे!' मंत्र, भजन, घोष, मनात राधेची संवेदना जागृत करीत होता. कृष्ण चिंतन करतांना प्रारंभी राधेचं चिंतन करावं म्हणजे श्रीकृष्णांचं आपसुक दर्शन घडतं; या भक्तिसाधनेचा बोध होत राहिला. राधा गोकुळात कोणत्या प्रकारानं लीला करीत असेल; याची कल्पनाचित्रे थेट कृष्णविजय, कृष्णलीला, अशा ग्रंथांच्या पानापानात, तसेच संतांच्या राधाकृष्ण लीला दर्शन घडविणाऱ्या अभंग, पदे, गवळणीमध्ये एव्हढेच नव्हे तर नाटक, चित्रपट यांतील प्रसंगचित्रणांमध्ये अनुभवली. गोकुळातून मथुरेत परततांना राधाकृष्णांना सोबत घेऊनच, रसरंजनमग्नतेने परतलो.

मथुरेपेक्षा वृंदावनात जाण्याची ओढ तीव्र झाली. 'राधे राधे' जयघोषांनी ही तीव्रता वृद्ध केली. वृंदावनी आलो. सर्वत्र चैतन्यमयी राधेचा संचार! राधामय कृष्ण! वृंदावनात रासप्रिया, राससम्राज्ञी, रासेश्वरी राधेमध्ये श्रीकृष्ण राधारंगात रंगलेला! या कृष्णांचे दर्शन घेण्यासाठी आपणही 'राधे राधे' जप करीत, राधामयी होऊन; चित्शक्तीसाधना करायची! मन कृष्ण होते! वृंदावनीच्या राधाकृष्ण मंदिरात आरती प्रसंगीच्या गर्दीत स्वतःला हरवून; राधाकृष्ण ध्यानात दंग झालो! वृंदावनात म्हणे नित्य रासमंडल साक्ष होतं! राधेच्या आभेत, शामरंग मावळतो आणि कर्पूरगौर, शीतल चंद्रप्रकाशात, मन तरल होऊन रासरंगात सामावून जातं. पूर्णावतार श्रीकृष्ण, सच्चिदानंदस्वरूपाचं दर्शन राधारंगातच अनुभूत होतं! राधामहतीनं मन भारून गेलं!

या भारल्या मनानंच गोवर्धनदर्शनार्थ गेलो. श्रीकृष्णाच्या करांगुलीतून ठायीची चित्कला राधा शक्ती गोवर्धन पेलते आहे. अवघ्या बरसाना तथा ब्रज प्रदेशाचे तथा गोकुळ तथा गोलोकाचे, महाप्रलयातही संरक्षण करते आहे; याचा साक्षात्कार घडत होता! राधा विश्वमयी! राधारूपाने विश्वातील चैतन्यशक्तीची अर्थात कृष्णशक्तीच्या आविष्काराची साक्ष घडली. राधाकृष्ण! राधे राधे! भजन मनोमनी करीत; कृष्णद्वैतासाठी, राधा होऊन विहरावे, या विचाराचे चिंतन करीत मथुरेत परतलो.

गोकुळ, वृंदावन, गोवर्धन आणि अवघा बरसाना प्रदेश, यमुनातीर अर्थात

ब्रजप्रदेश, असा वंशीस्वर प्रदेश होऊन, मुरली माधव धाम स्वरूपात राधाकृष्ण प्रेमाने भारलेला आहे! मथुरानगरी ही श्रीकृष्णांची धर्मरक्षणार्थ कर्मलीला भूमी होय! राधाकृष्ण मंदिरात, श्रीकृष्णांचं दर्शन झालंच! मंदिराला लागून; कंसाच्या बंदिशाळेतील, श्रीकृष्णजन्मभूमी म्हणूनचे दालन म्हणजे, परात्पराच्या करुणेच्या, विश्वव्यापक वर्षावाचे; इहजीवनातील कर्मनिष्ठेने, आविष्कार दर्शन घडविणारी भूमी! एकप्रकारे श्रीकृष्णाठायीच्या चैतन्यमयी राधाविष्काराचे सपुरुषार्थ संस्थापनात्मक, कर्मलीलेचे दर्शन घडविणारी भूमी! राधाभाव म्हणजेच, माणसाच्या ठायीचा समत्वदृष्टीपूर्ण धर्मसारणी होय. धर्माला आलेली ग्लानी फेडण्यासाठी बंदिशाळेतील प्राकट्यलीला! धर्माचे अभ्युत्थान करण्यासाठीची कर्मलीला! अवघ्या श्रीकृष्ण चरित्रासह महाभारत, भागवत यांची चित्रशाळा उभारून; मनात दर्शन घडविणारी ही भूमी! 'परित्राणाय साधूनाम । विनाशाय च दुष्कृताम । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।' या अभिवचनाचे स्मरण घडविणारी ही भूमी! राधाकृष्ण युगुलातील राधेविषयी जिज्ञासा पराकोटीला नेणारे हे स्थळ!

ब्रजभूमीने राधारहस्य समजून घेण्यासाठी मनाठायीच्या कुतुहल आणि जिज्ञासेला प्रवृत्त केले. ऐहिक जीवनामध्ये रमलेल्या, संसारप्रपंचात गुंतलेल्या माझ्या मनाला राधारहस्य काही केल्या उमगेना! राधेला पाहाण्यासाठी, अनुभवण्यासाठी उत्कंठित झालो. अनयाशी विवाहित राधेचे, राधाकृष्ण संबंधाविषयी रहस्य वाढतच गेले. कृष्णभक्तीने ओतप्रोत भक्तगण तर 'राधे राधे' मंत्र, जप करीत होते. त्यांच्या मनात कोठेही लौकिकातील, विवाहबाह्य संबंधाविषयी पुसटशी शंकाही प्रकट होत नव्हती! माझ्या मनाभोवती मात्र राधाकृष्ण प्रणयकथांनी फेर धरला होता. विधिनाट्यांमध्ये भेटलेली राधा, ब्रजभूमीत मनामनात प्रकटलेली राधा, मनातून तीव्र गतीने रा..धा – होऊन श्रीकृष्णाकडे झेपावत होती.

नेहमीच्या सवयीप्रमाणे शोध घेत निघालो. गोलोकीची, वैकुंठीची आणि लौकिकातील राधा शोधण्याचा प्रयास सुरू झाला!

श्रीमद् भागवत महापुराणात गोपींचा, गोपांचा उल्लेख असला तरी; श्री राधेचा स्पष्ट उल्लेख नाही! महाभारतात तर राधेचा उल्लेखही नाही! देवीभागवत ग्रंथामध्ये मात्र श्री राधेचा विस्तृत उल्लेख आहे. ब्रह्मवैवर्त पुराण, पद्मपुराण, ब्रह्माण्डपुराण, स्कंदपुराण या पुराणांत राधेची चर्चा आहे. शिवपुराणात शिवपार्वती संवादातून राधेचे रहस्य पार्वतींना अवगत झाले आहे. पुराणांतर्गत राधा ही

श्रीकृष्णांच्या ठायीची शक्ती असल्याची चर्चा असून; श्रीकृष्णाचा सृष्टीस्वरूप आविष्कार म्हणजेच राधास्वरूप होय; ही तात्त्विक चर्चा, अद्वैत तत्त्वज्ञानाच्या संदर्भानेच विचारात घ्यावी लागते. लौकिकात मात्र, राधा ही शक्तीस्वरूपिणी, स्त्रीरूपा असल्याचे अनुभूत होते. सृष्टीचे सृष्ट होणे, ही राधाकृष्ण रासलीला होय; असे मानूनच विचार करावा लागतो. मात्र हा विचार अध्यात्मनिष्ठेने करावयास हवा! वृंदावनधामात असा अध्यात्मनिष्ठ विचार रोमरोमांत भिनलेला दिसतो.

बाराव्या शतकातील कवी जयदेवांच्या 'गीत गोविंद' काव्यात राधेच्या प्रेमी नायिका रूपाचे, लौकिकतः वर्णन घडले आहे. त्यातून राधाकृष्ण प्रेमीयुगुलाच्या शृंगारवर्णनाला प्राधान्य मिळाले. रंजक तथा भावनाप्रधान साहित्यात या वर्णनाला अग्रक्रम मिळाला! संतांनी तात्त्विक आणि शृंगारप्रधान अशा दोन्ही रूपात, भक्तिसाधना ध्येयाने, राधेचे अभंग आणि गवळणींचे गायन केले. राधाभाव म्हणजेच भक्तिभाव हे सिद्धांतसूत्र पुढे आले. राधा रहस्यमयी, गूढ तरी दैवी असे विभूतिमत्त्व प्रकाशले! मधुराभक्तिमार्गात या विभूतिमत्त्वाचे अध्यात्मिक लावण्यमयी रूप प्रकटले.

राधारहस्य समजावून घेण्यासाठीच 'राधा' हा कादंबरी लेखनप्रपंच! या लेखनप्रसंगी पुराणातील आणि साहित्यातील संदर्भ मुक्तपणे उल्लेखित केले आहेत. गीत गोविंद आणि संतवचने यांचे संदर्भ ओघानेच आले आहेत. लोकनाट्यातील राधा मात्र कादंबरीत रंगविली नाही. अर्थातच राधेचे रहस्य पावित्र्यपूर्वक उलगडावे असा स्पष्ट हेतू मनात ठेवून; कादंबरी वाङ्मयप्रकाराचा आविष्कार, साधन म्हणून उपयोजित करायचा विचार केला आहे. कादंबरी हा कल्पनाविलासात्मक, आशयसूत्रांच्या, बहुपेडी गुंफणीसह, जीवनव्यापी आशयघनतेने, स्वैरभाषावकाशात, आविष्कृत होणारा वाङ्मयप्रकार असल्याचे लक्षात घेऊनच; पौराणिक तथ्यांना कल्पनाविलासाचे आणि शक्य तेव्हढ्या रंजकतेचे अवगुंठन देत, कादंबरी आकारण्याचा प्रयत्न केला आहे!

'अगस्त्य', 'नारद' या पौराणिक कादंबऱ्या आणि 'अनंत' या तत्त्वज्ञानात्मक कादंबरी लेखनानंतर 'राधा' या कादंबरी लेखनाचे धाडस! रसिकांकडून आणि भाविकांकडून या कादंबरीचे स्वागत होईल; असा विश्वास आणि अपेक्षा!

●●●

**– डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

'आई', प्लॉट नं. ९, समर्थनगर, पाईपलाईन रोड,

श्रीराम चौक, अहमदनगर - ४१४००३
भ्रमणध्वनी : ९८८१५००९४२/०९८५०७३१६४०
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७

बारा

# अनुक्रम

राधा रहस्य । १५
वैवर्त । २३
धारा । ३२
राधाकृष्ण विवाह । ३८
ब्रह्मांडगोलकातील सृष्टीलीला । ४४
राधा पंचविधा । ४९
व्याकूळ राधा । ६३
रासलीला मणिपुरी । ७२
भूमीकन्या । ८०
भक्तिरुपिणी राधा । ८६
परिणय लीला । ९४
चाहूल कृष्णसख्याची । १०५
राधेचा कृष्ण प्रकटला । १११
राधाकृष्ण! गोपाळकृष्ण! । ११९
आतूर मिलना । १२५
समावेशन योग । १३१
गर्गसंहिता । १३७
शोधा शोधा राधा । १४३
शोधित राधा अनया । १५१
राधे राधे ! । १५९
संदर्भ सूची । १६६

। १ ।

# राधा रहस्य

मानसाच्या तीरावर, एका विशाल पर्वतखंडावर, कैलासाच्या उजव्या बाजूला, अष्टपादांच्या साक्षीने, कैलासपती शिवध्यानमग्नावस्थेत, गेले सप्तदिन, विराजमान होते. मानसींचे राजहंस, विहरता विहरता, मधूनच कैलासपतींचे दर्शन घेत आणि पुन्हा आपल्या विहारात रमून जात. मेघांनी दाटून यावे आणि हिमगिरी कैलासासह अवघा कैलासमानस पुन्हा पुन्हा सुस्नात करावा. हिमवर्षाव घडवावा. सूर्यचंद्रांनी चंद्रमौलीश्वरांना प्रदक्षिणा करीत; शिवांच्या समाधीमग्नतेचे पूजन करावे. कैलासाने तेव्हढ्याच साभिमान कौतुकाने शिवध्यान आपल्या ठायी साठवावे. इंद्रधनूंनी कधी शिवध्यानाला मखरांकितपणे सुशोभित करावे. शिवगणांनी गणेश आणि कार्तिकेयांसह शिवांच्या ध्यानमग्नतेला बाधा पोहचणार नाही याची दक्षता घेत विचरावे. सात दिवस उलटले; तरी समाधीमग्न शिवांची समाधीविसर्जनाची चाहूल पार्वती मातांना लागेना. कैलासासह समस्त सृष्टीचलनाचे अवघे नियोजन, अबाधितपणे सांभाळत पार्वतीमाता शिवस्मरणात काळ व्यतीत करीत होत्या.

शिवांचे अनंतापासून अनंतापर्यंत सुरू असलेले श्रीकृष्ण जप व्रत, आदिमायेला ज्ञात होते. गेल्या सप्ताहभर शिवांचा चाललेला जप काहीसा वेगळा आणि विस्मयकारक होता. शिव 'ॐ राधाकृष्ण' असा पंचाक्षरी मंत्राचा जप करीत होते. परमात्मा कृष्ण हे शिवशिवांचे आराध्य होते. दोघेही श्रीकृष्णपूजन जोडीने करीत ''सच्चिदानंद रुपाय विश्वोत्पत्यादिहेतवे । तापत्रय विमोक्षाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।।'' या मंत्राने शिवशिवा नेहमीच अवघ्या प्रकृतीच्या कल्याणार्थ श्रीकृष्णाची प्रार्थना करीत. कृष्ण हेच परमतत्त्व होय, याची प्रचिती

उभयता शिवशिवा समावेशन प्रसंगी नेहमीच घेत.

असे असतांना 'ॐ राधाकृष्ण' या मंत्रजपाचे अनुष्ठान शिव का करीत असावेत; या विषयीच्या जिज्ञासेने माता पार्वती काहीशा अस्वस्थ झाल्या. कैलासावरील नित्य व्यवहारात त्यांचे लक्ष लागेना. शिवांची अनुष्ठानमग्नता काही थांबेना. उत्कंठा शिगेला पोहोचली. माता पार्वतीने हे रहस्य ज्ञात करून घेण्याचा निश्चय केला. त्यांनी ब्रह्मर्षी नारदांचे स्मरण केले.

''नारायण नारायण!'' नारदमुनी तात्काळ प्रकट झाले. विनम्रपणे अभिवादन करून; त्यांनी मातेला स्मरणाचे कारण विचारले.

''वत्सा, गेले सात दिवस 'ॐ राधाकृष्ण' मंत्र जप ध्यान लावून श्री महादेव समाधीमग्न आहेत. त्यांच्या मंत्रजपाविषयी जाणून घेण्यास मी अतीव उत्सुक आहे. ध्यान विसर्जित होण्याचे चिन्ह दिसत नाही. तूच या जपाचे रहस्य मला विदित करावेस!'' पार्वतीमाता म्हणाल्या.

''नारायण नारायण!'' माते क्षमस्व. मला हे रहस्य माहीत असूनही; ते षटकर्णी करण्याची आज्ञा मला नाही! माते हे रहस्य कदाचित जगत्पिता शिवच आपणास सांगू शकतील. आपण त्यांनाच विचारावे. आपणास काय बरे अशक्य आहे?'' नारदांनी आपली असमर्थता व्यक्त केली.

''हे नारदमुने, मी रहस्य जाणून घेण्यास उत्कंठित आहे. परंतु त्यांची ध्यानमग्नता...?'' पार्वतीदेवींनी समस्या मांडली.

''हे माते, यात मी काय करावे? आपण आज्ञा करावी.'' नारदांनी मोठ्या खुबीने विचारले.

''वत्सा, तुझा सर्वत्र संचार असतो. तुला स्थलकालपरिस्थितीचे बंधन नाही. तू शिवांसमोर उपस्थित झालास तर; त्यांची ध्यानमग्नता आपसुकच विसर्जित होईल!'' पार्वतीदेवी म्हणाल्या.

''परंतु...'' नारदांनी, अकारण उपस्थिती नको म्हणून शंका व्यक्त केली.

''तूच तर मला आज्ञा करावी अशी विनंती केलीस!'' पार्वतीदेवींनी नारदांना अडकवले.

''माते, मी आपल्या आज्ञेबाहेर कसा बरे असेन? परंतु...'' नारद म्हणाले.

''वत्सा, तुझ्याशिवाय मला अन्य पर्याय दिसत नाही!'' पार्वतीमाता निर्वाणीने म्हणाल्या. जसजसा वेळ जात होता तसतशी त्यांची उत्कंठा वाढतच होती. त्या अधीर झाल्या होत्या.

''ठीक आहे. चलावे.'' नारदांनी रूकार दिला. खरेतर शिवपार्वती संवादातून

राधाकृष्ण रहस्य अवघ्या विश्वाला ज्ञात व्हावे. भक्तिपरंपरा दृढ व्हावी यासाठीच नारदांनी रूकार दिला होता.

नारदांसवे पार्वतीमाता शिवांसमीप आल्या.

''नारायण नारायण! नारायण नारायण!'' चिपळ्यांच्या ठेक्यासह नारदांनी नारायण मंत्र घोषित केला. समाधिमग्नता विसर्जित करून शिवांनी विस्मयाने नारदांकडे पाहिले.

''नारदा?'' शिवांनी विचारले.

''हे महेश्वरा, आपणास त्रिवार वंदन असो. आपली ध्यानस्थिती भंग झाली. क्षमस्व.'' नारदांनी क्षमायाचना केली.

''वत्स नारदा, आपणास सदासर्वदा, कोणत्याही स्थलकालपरिस्थितीत, संचार करण्याचे वरदान आम्हीच प्रदान केले आहे. आपण उमेसह तपोस्थलास येणे केलेत; याचे रहस्य नाही उमगले.'' शिवांनी विचारले.

''रहस्य कसले देवा. मातेने माझे स्मरण केले म्हणून प्रत्यक्ष भेटण्यास आलो. त्यांच्याच समवेत आपल्या दर्शनाला सादर झालो. इतकेच!'' नारदांनी हेतू लपवित सांगितले. पुन्हा त्रिवार वंदन करीत; नारदांनी निरोप घेण्यासाठी हात जोडले.

''नारदा आपले कौशल्य सर्वांना ज्ञात आहे. मातेला मोठ्या खुबीने आपण सहाय्य केलेत.'' शिवांनी नारदांचे कौतुक केले.

''नारायण, नारायण, हे देवाधिदेवा आपणापासून काही अज्ञात राहाणे कसे बरें शक्य आहे? आपले दर्शन घडले. आम्ही धन्य झालो! आम्हास प्रयाणाची आज्ञा असावी!'' नारदांनी प्रणाम करीत, काढता पाय घेतला.

नारदमुनींची स्वारी अंतर्धान पावली. उमादेवींनी मोठ्या लाघवाने महेश्वरांकडे कटाक्ष टाकला.

''माहेश्वरी, आपण अतीव सुंदर दिसत आहात! हे प्राणेश्वरी तुझ्या प्रसन्नतेचे नेमके कारण तरी कोणते?'' शिवांनी पार्वतीदेवींचा सुप्त हेतू लक्षात घेऊन विचारले.

''म्हणजे एरवी मी प्रसन्न नि सुंदर दिसत नाही वाटतं?'' देवी लटक्या रागाने म्हणाल्या.

''नव्हे नव्हे तू तर नेहमीच प्रसन्न असतेस. म्हणून तर मी नेहमी तुझ्याच हृदयी विराजमान असतो. हे माहेश्वरी, तूच तर माझे खरे अस्तित्व आहेस.'' शिवांनी गुज केले.

''काही सांगू नका! आपले माझ्याकडे मुळी लक्षच नसते! जगताचा प्रपंच सांभाळीत मी व्यग्र व्हायचे नि आपण सदैव कृष्णभजनात तल्लीन व्हायचे हाच नित्य क्रम आहे!'' पार्वती लोभसपणे आणखी लटक्या रागाने फुरंगटून म्हणाल्या.

''प्रिये, मी तर नेहमी तुझेच चिंतन करीत असतो. आज एवढे रुसणे का बरे होते आहे? आमचे काही चुकले का? प्रिये, तुझा रुसवा असह्य होतो. हलाहल पचविणाऱ्या मला, तुझ्या रुसण्याचा दाह मात्र सहन करण्याची क्षमता नाही! प्रिये रुसवा सोडून सांग बरे. तू नारदांसवे येऊन आमची ध्यानमग्नता का भंग केलीस?'' शिवांनी मूळास हात घातला.

''पहा बाई, म्हणजे मीच ध्यानभंग केला, असेच ना? मी जातेच कशी. चालू द्या आपले कृष्णध्यान!'' पार्वती लटक्या फणकाऱ्याने म्हणाली. तसे महेश्वर खळखळून हसत पार्वती मातांना अगदी शरण गेले.

''काही नका बोलू! आता तर काय म्हणे. केवळ कृष्णध्यान नव्हेच. राधाकृष्ण जपध्यान सुरू केले. आतातर आमचा आठवही होणार नाही!''

''नाही नाही प्रिये, मी जसा तुझ्याविना शून्य आहे तसा कृष्णही राधेविना शून्य आहे. म्हणूनच राधाकृष्ण जपध्यान करण्याची परमसद्‌गुरुंची सांगी आहे.'' महेश्वरांनी पार्वतीदेवींना जवळ घेण्याचा प्रयत्न करीत गुज केले.

''हे महेश्वरा, म्हणजे राधाकृष्ण हे अनिवार्य युगुल आहे! या जपाशिवाय श्रीकृष्णस्वरूप होताच येणार नाही? माझी कृष्णतपश्चर्या व्यर्थच गेली म्हणायची! म्हणून तर आपण दिवसेंदिवस माझ्यापासून आणि कैलासापासून दूर येऊन समाधीमग्नतेने 'राधाकृष्ण' जपध्यान करीत आहात; असेच ना?'' महाकालीने राधाकृष्ण रहस्य जाणून घेण्याचा निश्चय सूचित केला.

''हे प्रिये, यात रहस्य असे काहीच नाही. केवळ सद्‌गुरुंची आज्ञा एवढेच!'' महादेवांनी सद्‌गुरुंवर सारे ढकलून देण्याचा प्रयत्न केला.

''हे प्रिया, का बरे माझ्यापासून अशी लपवाछपवी? आपण उभयता, विष्णूलक्ष्मी ब्रह्ममाया सारे एकाच कृष्णतत्त्वाचे ध्यान करतो. तेच परमतत्त्व, भागवत आहे, हे जाणतो. विष्णूस्वरूप हे कृष्णतत्त्वाचेच पूर्णस्वरूप आहे तसेच आपण आणि ब्रह्महही कृष्णतत्त्वाचेच पूर्ण स्वरूप आहात. महाकाली, महालक्ष्मी, महामाया ह्या आपल्या त्रिदेवांच्या ठायीच्याच शक्ती आहेत. आपण त्यामुळेच परस्परांचे ध्यान करतो ना? विष्णू आपले आराध्य तर विष्णूंचे शिव आराध्य. ब्रह्मा तर आपणा उभयतांत सामावलेले. आपण सर्वांचे पुरुषस्वरूप आहात. म्हणजे कृष्णतत्त्वाचीच ही समस्त आविष्काररूपे आहेत! असे असतांनाही आपण

'राधाकृष्ण' असे जपध्यान का बरे आरंभिले आहे? हे राधेचे रहस्य आपण मला सांगावे. ते रहस्य जाणून घेण्याचा माझा हट्ट आहे!'' पार्वतीने ज्ञात ज्ञानाचे पुनर्स्मरण, चिंतन घडविले.

''हे प्रिये, आपले सद्‌गुरु श्रीकृष्ण आहेत. त्यांनीच मला राधा रहस्य सांगण्यास प्रतिबंध केला आहे. श्रीमद् नारदांनीदेखील हे रहस्य सांगण्याची असमर्थता प्रकट केली नव्हे का? तेव्हा आपण हे रहस्य जाणून घेण्याचा हट्ट करू नये.'' शिवांनी मोठ्या काकुळतीने सांगितले.

''हे महेश्वरा, मी ते काही ऐकणार नाही! पत्नीसाठी पती हाच सद्‌गुरु असतो. तुम्ही मला हे रहस्य कथन करावेच. हे तुमचे कर्तव्य आणि माझा हक्क आहे!'' पार्वतीमाता निकराने म्हणाल्या. आता मात्र शिवांचा नेहमीप्रमाणेच नाईलाज झाला. शिवपार्वतींच्या सारीपाट क्रीडेत शिवांना शक्तीपुढे नेहमीच माघार घ्यावी लागली आहे.

''प्रिये, प्राणेश्वरी, अशी रागावू नकोस. तुझा हट्ट मी पुरविला नाही असे कधीतरी झाले आहे का? परंतु...'' शिवांनी अखेरची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

''ते मला काही ठावूक नाही. मला हे गूढ जाणून घ्यायची उत्कंठा आता मर्यादा ओलांडत आहे. मला मी अपूर्ण असल्याचे वाटू लागले आहे! मीच सृष्टीविश्वंभर असे सांगून; मी आता भुलायची नाही! हे विश्वंभरा, तुम्ही जर खरोखरीच परिपूर्ण श्रीकृष्णस्वरूप आहात; तर तुमच्या या अर्धांगापासून हे कसेबरे गुप्त ठेवू शकता? ते मला काही माहीत नाही. मी अधीर झाले आहे. आता जर मला हे रहस्य उमगले नाही; तर मी माझे सृष्टीस्वरूप सांडून आपणात समावेशित होईन! माझ्यापुढे हे रहस्य समजून घेण्यासाठी दुसरा उपायच दिसत नाही!'' विश्वस्वामिनी, उमा म्हणाली.

''हे परमेश्वरी, तू तर माझं अर्ध अंग आहेस. तू माझ्याहून भिन्न नाहीस. मनोमनी मी सद्‌गुरुंना तुला रहस्य सांगण्याची अनुमती मागत होतो. हे प्रिये, सद्‌गुरु परमतत्त्व श्रीकृष्णांनी मला अनुमती देऊन; वचनातून मुक्त केले आहे!'' शिवांनी पार्वतीमातांना जवळ घेत म्हटले.

''खरंच! की; पुन्हा रहस्य सांगणे टाळण्यासाठी काही व्यंजना?'' पार्वतीने रोखून पाहात विचारले.

''हे देवी, आगमआख्यानाचा आरंभ करतांना; राधेचा प्रसंग सांगण्यास भगवान श्रीकृष्णांनी प्रतिबंध केला होता...''

''म्हणजे, पुन्हा वळसे नि वेलांट्या...!'' पार्वती दूर होत म्हणाल्या.

''प्रिये ऐक तरी, राधेविषयीचे रहस्य कोणासही ज्ञात नाही. काय झालं, एकदा रासेश्वरी, श्री राधा शामसुंदर कृष्णांना भेटण्यासाठी उत्सुक बनली. त्यावेळी रासप्रिया राधा रत्नजडित सिंहासनावर, रत्नाभरणांनी आलंकृत स्वरूपात विराजमान होती. अग्निशुद्ध असे तिचे दिव्य वस्त्र तिच्या अंगाची शोभा वाढवित होते. तिची मनोहारी अंगकांती कोट्यावधी चंद्रांनाही लज्जित करीत होती. दंतपंक्ती आणि मुखारविंद शरत्कालीन चांद्रविकासी कमलांप्रमाणे विश्वाला आकर्षित करीत होते. मालती सुमनमालांनी तिचा केशकलापही तेजस्वी झाला होता. गळ्यातील रत्नमाला मात्र ग्रीष्मातील ज्वाळांसह, झगझगीत दाहकता प्रकाशित करीत होती. तरी तिच्या कंठातील शुभ्रहार गंगाजलाप्रमाणे धवल नि गतिमान तरी शीतल धारावाही वाटत होता. हे प्राणेश्वरी, ही राधा म्हणजे श्रीकृष्णांच्या ठायीची चित्शक्तीच! चैतन्यमयी होऊन त्यांच्याच हृदय सिंहासनी जणू स्वसंवेत्ती, संवेदित होत होती!

आपलेच सारसर्वस्व साक्षात आपल्यालाच संवेदित होत आहे हे जाणून; रसिकशेखर शामसुंदर कृष्णांनी मंद मंद हसणाऱ्या आपल्या हृदयास्वामिनीकडे पाहिले. हे प्रिये, कृष्णाच्या ठायीच सृष्टीस्वरूप प्रकटण्यासाठी महाशक्ती महत्तत्त्वातून प्रकट झाली होती. त्या आपल्याच चित्शक्तीशी मिलनासाठी विश्वकांत श्रीकृष्ण उत्सुक झाले. त्यांची ती उत्कटता पाहून ठायीची हृदयस्वामिनी महाशक्ती आपल्या चित्त्व, प्राणवल्लभाशी एकरूप होण्यासाठी धावतच निघाली. म्हणूनच तिचे नाव 'राधा' झाले. अशी तत्त्वमयी महत्शक्ती राधा कृष्णाचीच आराधना करते. तर श्रीकृष्ण या आपल्याच तत्त्वमयी राधेची आराधना करतात. तत्त्व आणि तत्त्वशक्ती कृष्ण आणि राधा दोघेही परस्परांचे आराधक आहेत. त्यांच्या ठायी सर्व दृष्टीने परिपूर्णता आहे. प्रत्यक्ष कृष्णांनी हे रहस्य मला विदित केले. ह्या तत्त्वाचे ज्ञान झाल्याशिवाय परिपूर्ण ज्ञानमयता प्राप्त होत नाही. हे प्रिये, हे राधा रहस्य श्रीकृष्णांच्या अनुमतीने मी तुला सांगितले आहे. ज्ञानासाठीच्या तपस्येने, हे ज्ञान प्राप्त झाले; की परमहंस पद प्राप्त होते.'' शिवांनी राधारहस्य सांगितले.

''हे प्राणवल्लभा, हे ज्ञान झाल्यावरही आपण राधा स्मरण करीत कृष्णांचे ध्यान करीत आहात ते का बरे?'' जगन्मातेने प्रश्न विचारला.

''हे प्रिये, चित्शक्ती, महत्शक्ती राधा ही श्रीकृष्णाचे प्रकट सगुण असे सृष्टीस्वरूप आहे. म्हणूनच सृष्टीस्वरूपातील सर्व जडचेतन, चराचर हे राधास्वरूपच

आहे. या राधास्वरूपाला पुन्हा कृष्णस्वरूप व्हायचे असते. तेच त्या सृष्टीस्वरूपाचे शाश्वत पूर्णस्वरूप असे, श्रीकृष्णस्वरूप असते! हेच अद्वैत ज्ञान होय! म्हणूनच तो शाश्वत पूर्ण ज्ञानमयी सच्चिदानंदस्वरूप ठायी अनुभवण्यासाठी, राधास्वरूपात तीव्र आवेग, अनन्यभक्ति आवश्यक आहे. राधा झाल्याशिवाय कृष्ण कसे बरे होता येईल? कृष्णज्ञान झाल्याशिवाय राधास्वरूप सृष्टीच्या सगुणरूपाचा आनंदोत्सव कसा बरे अनुभवता येईल? म्हणूनच हे प्राणेश्वरी, मी राधाकृष्ण या मंत्राचा जप करून; कृष्णस्वरूपात म्हणजे सच्चिदानंदस्वरूपात मग्न होण्याचा अभ्यास करीत होतो. हेच आगमशास्त्र होय. राधाभावे भक्तीने श्रीकृष्णस्वरूप ठायी अनुभवत श्रीकृष्ण होता येते. शिव, विष्णू, ब्रह्मा हेही ठायीच्या शक्ती, लक्ष्मी, माया या राधारूपांचेच सतत ध्यान करीत; शिव, विष्णू, ब्रह्म, लीला सृष्टीत मांडतात. तू तर या क्रीडेतील साक्षात राधाच आहेस. हे बघ मी राधाकृष्ण ध्यानमग्न होतो म्हणजे खरे तर तुझेच चिंतन करीत होतो. तत्त्व आणि तत्त्वशक्ती किंवा तत्त्वमयी या स्वरूपात पुरुष आणि स्त्रीतत्त्व, सृष्टीचलनाचा शाश्वत भाग आहेत, हे आगमशास्त्र ज्ञानी जाणतात.'' हेच शास्त्र साक्षात श्रीकृष्णांनी निवेदित करीत होते.

*राधा भजति श्रीकृष्णं स च तां च परस्परम ।*
*हेच कैवल्याच्या राधाकृष्ण लीलेचे रहस्य होय.*

शिवांनी शक्तींना राधारहस्य सांगितले. शक्ती अनुरक्त झाल्या आणि शिवशक्ती समावेशनातून राधाकृष्ण अद्वैत प्रकटले. चराचराच्या ठायी वस्तुमात्र, जीवमात्र, मनुष्यमात्र यांच्या ठायी हे राधाकृष्ण अद्वैत ज्ञान प्रकटण्यासाठीच आगमाख्यान लीला श्रीकृष्णांनी मांडली होती. युगे रासलीला रंगत राहिली! दर्पणलाही पिसे भरण्याचा प्रसंग–

*दर्पणी भरले पिसे – सखे ग!*
*दर्पणी भरले पिसे*
*राधा पाही कृष्ण सख्याला*
*कृष्ण तसा राधे ।।धृ।।*

*सृष्टीमधल्या रहस्यातले*
*रहस्य कुंठित झाले*
*ज्ञान दर्शने विज्ञानाचे*
*डोळे दीपून गेले ।।१।।*

*निळ्या सागरा भरते आले*
*गगनचि सागर झाले*
*प्रियुचि होउॅ प्राणेश्वरी अन्*
*कृष्णचि राधा झाले ।।२।।*

*तत्त्वमयीची  तत्त्वसाधना*
*राधा होऊन जाते*
*कृष्णसख्याच्या मिठीत जेव्हां*
*धारा भक्ती होते ।।३।।*

*देव कोणता भक्त कोण तो*
*भक्तिस्वरूप दोघे*
*अद्वैताचे गुह्य असे जे*
*दर्पण हसतचि बैसे ।।४।।*

n

। २ ।

# वैवर्त

कृष्ण, कृष्ण, कृष्ण आणि कृष्णच! खाली, वर, आजूबाजूला, दशदिशांना कृष्णच भरून! आर नाही, पार नाही! केवळ कृष्णच! अवघ्या काल आणि अवकाशात, अनंतपणे व्यापून कृष्ण! अनादि अनंत कृष्ण! कृष्णच सत्य! कृष्णच चैतन्य आणि कृष्णच आनंद, अनंतपणाने! अतर्क्य, अकल्पनीय, परात्पर, कृष्णच केवळ! आकार कृष्ण, निराकार कृष्ण, संवेद्य कृष्ण, निर्विकार कृष्ण. महाशून्य कृष्ण. काल आणि अवकाशाच्या अस्तित्वाला व्यापून कृष्ण! अनंतपणे, अनंत काळ कृष्ण, असा अनंत, साक्षी, कर्ता, भोक्ता, अनुभोक्ता, आनंदमग्न, चैतन्यपूर्ण ठायीच सत्यपणे!

अवघ्या कृष्ण स्वरूपाठायी, आनंद मग्न, चैतन्यपूर्ण सत्य अस्तित्वात, अकारण, स्वाभाविक, अंतरबाह्य, अकल्पितपणे, अनंतव्याळपणाने स्वरनाद निनादला ॐ, ॐ, ॐ, ॐ, ॐ ऽ ऽ ऽ ऽ ऽ – सृष्टी उत्पत्ती हेतवे! अवघा कृष्ण काल आणि आकाशव्यापी अगणित चैतन्यपुंजांनी, उर्जामयतेने प्रकाशित झाला. सत्य, चैतन्य, आनंदमग्नतेने लावण्यपूर्ण झाले! संमोहनाला संमोहित करणारे संमोहन प्रकटले! काल आणि अवकाशभर असंख्य उर्जामय चैतन्याविष्कारांनी बहरलेले हे स्वरूप कृष्णस्वरूपाला संवेदित होतांना कृष्णस्वरूपातून, अतिव आनंदाने, प्रेमभराने, ॐकार स्वरांच्या असंख्य तरंगासह अवघ्या कृष्णभरात संबोधन घुमले, राधा! राधा! राधा! राधा! राधा! सच्चिदानंद स्वरूप राधा!

काल आणि अवकाशव्यापी कृष्णाच्या ठायी, प्रेम, आनंद, चैतन्य, उर्जा, लावण्य, यश, समृद्धी, सोलीव सुख स्वरूप सृष्टी अनुभूत होत होती. कृष्णस्वरूपातून पुन्हा संबोधन कृष्णभर झाले. राधा! राधा! राधा! राधा! राधा! कृष्ण जणू ह्या उर्जामय अस्तित्वाला आवेगाने बाहू पसरून, मिठीत सामावून

घेण्यासाठी आतूर झाले आहेत!

काल आणि अवकाशव्यापी सच्चिदानंदस्वरूप लावण्यपूर्ण, आनंदस्वरूप उर्जामयतेतून ॐकारस्वरूपातून ध्वनी निनादले श्रीकृष्ण! श्रीकृष्ण! श्रीकृष्ण! श्रीकृष्ण! श्रीकृष्ण!

''हे प्रेमस्वरूप राधा, चैतन्यपूर्ण राधा, आनंदमग्न राधा, कोण आहेस तू? या काल आणि अवकाशव्यापी कृष्णाला कोण बरे हाकारते आहे!'' कृष्णाने अंतर्मनी हुंकारले.

''सच्चिदानंदस्वरूप कृष्णा, मी तर कृष्णच आहे! कोण म्हणून; का बरें पृच्छा करीत आहात? आपल्या अस्तित्वाचे रूपच आपण अनुभवता आहात. पहा बरें मी पुन्हा आपल्या ठायीच सामावते! आपल्याशिवाय माझे अस्तित्वच नाही!'' राधा घोषित झाली.

''म्हणजे मीच राधा आहे! मग काल आणि अवकाशव्यापी कृष्ण कोठे आहे?'' कृष्ण पुन्हा अंतर्मुख झाले.

''हे सखया आपणच तर कृष्ण आहात. आपण सत्य आहात आणि मी सत्यमयी आहे. आपण चैतन्य आहात आणि मी चैतन्यमयी आहे. आपण आनंद आहात आणि मी आनंदमयी आहे! आपणासच आपले स्वरूप पाहण्याची संवेदना झाली होती. ॐ च्या स्फुरणाने आपणच आपली संवेद्यता प्रकट केलीत. मी आपल्याशिवाय असणे कसे शक्य आहे? मला तर, आपण कोण आहेस तू; असे विचारण्याच्या कालावधीचाही विरह सहन होत नाही. मीच कृष्णस्वरूपा आहे, हे क्षणभरही विसंबणे कठीण आहे!''

''राधे, म्हणजे, मीच राधा आणि मीच कृष्ण! केव्हढा आनंद योग!'' श्रीकृष्णांनी स्मित केले.

''होय मीच कृष्ण आणि मीच राधा! कृष्णच राधा आणि राधाच कृष्ण! हेच सत्य!'' राधा स्फुट झाली.

पाहाता पाहाता काल आणि अवकाशव्यापी सृष्ट राधास्वरूप, ॐकार स्वराची गर्जना करीत कृष्णस्वरूप झाले!

काल आणि अवकाश कृष्ण झाले! ठायीची स्वसंवेद्यता कृष्णस्वरूपाला विकारित करू लागली. राधा... राधा... राधा... राऽधा... राऽधा ऽऽ कुठे आहेस तू? व्यापक कृष्णाच्या मध्य विवरातून शब्द स्फुट होऊ लागले. कृष्णरूप, राधेसाठी व्याकूळ झाले. आर्त झाले! ''राधे... राधे... राधेऽऽ मी शून्य आहे तुझ्याशिवाय! माझे असणेच तू आहेस. कुठे आहेस तू?'' विकारवश कृष्ण

मुखातून विरहार्त शब्द स्फुट होत राहिले.

''कृष्णा तूच तर आहेस राधा! तुझ्याखेरीज राधेचं असणं कसं बरं शक्य आहे? तू तूच राधा, सर्वव्यापी कृष्ण!'' कृष्णस्वरूपातून काल आणि अवकाशव्यापी शब्द घुमले.

''नाही नाही राधे मीच राधा हे आनंदमयी नाही! आनंदमयी, चैतन्यमयी, सर्वव्यापी प्रकाशमय राधा मीच असेल तर हे काल आणि अवकाशमय कृष्णस्वरूप कसे?'' मला राधा हवी आहे. माझं अस्तित्व, माझं व्यापकत्व म्हणजे कालस्वरूप, अवकाशस्वरूप, तेजोमयी राधा. राधेशिवाय मी राहू शकत नाही! राधेऽ राऽधेऽ, राऽधेऽ राऽधे राऽधे कृष्ण तुझ्यासाठी व्याकूळ आहे!'' बेभानपणे सर्वव्यापी कृष्णस्वरूपातून आर्त आवाहन होत राहिले.

काही अवधीतच काल आणि अवकाशव्यापी कृष्णस्वरूप सर्वव्यापी चैतन्यमयी तेजोमयी झाले. अगणित तेजोगोल एकाचवेळी झगझगीत तेजाने प्रकाशावेत तसे. कृष्णस्वरूप त्या तेजोमयतेने पांडुरंग झाले!

कृष्णस्वरूपाने, आवेगाने दशदिशांतून अगणित बाहू पसरले. ते तेजोमयी अस्तित्व श्रीकृष्ण, श्रीकृष्ण, श्रीकृष्ण, कृष्णाऽऽ, कृष्णाऽऽ चा शब्दब्रह्मी निनाद करीत, श्रीकृष्णस्वरूपात झेपावले. जणू त्या स्वरलहरीतूनच सर्वव्यापी प्रकाशरूप प्रकटले होते. कृष्णाच्या ठायी, राधास्वरूप झाली! अवघे व्यापकत्व आनंदमग्न झाले. राधाकृष्णस्वरूपाचे हे द्वैत अस्तित्व प्रकाशरूपात अद्वैत झाले. कृष्णच राधारूपाने ठायीच संवेदित झाले होते, तर राधेच्या ठायीच राधाव्यापी कृष्ण संवेदित होत होते.

''कृष्णाऽ, कृष्णाऽ, कृष्णाऽ, कृष्णाऽ हे श्रीकृष्णा, तूच तर माझ्या सर्वव्यापी प्रकाशमयतेचा स्रोत आहेस. तूच उर्जा आणि मी उर्जामयी! मला असे पुन्हा पुन्हा आवाहित करून; का बरे स्वतःच विवश होत आहेस?'' राधेने श्रीकृष्णाकडे पृच्छा केली. ''मला क्षणभरही तुझ्याविना भासमान होणे सहन होत नाही! हे कृष्णा तू अस्तित्व आहेस आणि मी त्या अस्तित्वाची अस्तित्वमयी आहे. तू सुगंध आहेस नि मी सुगंधमयी म्हणजे सुगंधाचा दरवळ आहे! मी तुझ्यापासून विलग कसे राहू?'' राधेने अधीरतेने विचारले.

''राधे, मी अनंतपणे काल आणि अवकाशस्वरूपात, कृष्णस्वरूप भोगतो आहे. ठायीच्या स्वसंवेद्यतेला ठायीची आनंदमग्नता तुझ्या स्वरूपदर्शनाने घडली. मी माझे कृष्णस्वरूपच तुझ्यात विसर्जित केले. आता मी त्या राधास्वरूप दर्शनाची आनंदमग्नता भोगल्याशिवाय राहू शकत नाही!'' श्रीकृष्णाच्या ठायी

आनंदलहरीतून भावव्याकुळता असंख्य लहरींत व्यापली. राधा ही व्याकूळ झाली. ठायीची तेजोमयता तेजस्वरूप भोगण्यास आतूर झाली. काल आणि अवकाशात पुन्हा व्याकूळ कृष्णस्वरूप आर्त झाले.

''राऽधे, राऽधे, राऽधे कुठे आहेस तू? की मीच तुझ्यात सामावलो आहे? राऽधे अशी अंतर्धान होऊ नकोस. मला तू हवी आहेस. तुझे रूप, तुझे लावण्य, तुझे प्रकाशमयी रूप, तुझे स्वरमयी रूप, अनुभवतांना, मीच हरवतो. ते हरवणे किती आनंदमयी आहे? तेच तेच अनुभवण्यासाठी मी पिसा झालो आहे. राधा तू माझा प्राण आहेस, चैतन्य आहेस, सत्त्व आहेस, आनंद आहेस. माझे माझेपण तूच आहेस. असे प्रेममय अनुभवन भोगण्यासाठी माझे अवघेपण केवळ आर्त झाले आहे. माझे अस्तित्व जर सत्य आहे; तर तू त्या सत्याचा विलास आहेस. तो विलास मला आनंदमग्न करतो आहे. राऽधे तू अशी मला साक्ष हो!''

कृष्णमयी राधा अवघ्या व्यापकत्वातून उसळली. शब्दब्रह्म, स्वरस्वरूप, वायूस्वरूप, प्रकाशमान झाले. त्या तीव्र ओजस्वितेतून धारा उसळी मारून सर्वव्यापकतेने प्रवाहित झाली. कृष्ण झेपावला. अवघा कृष्ण प्रवाहातून, सर्वव्यापी प्रकटलेल्या नीररूपात नारायण झाला! अवघेपण जलमयी आहे. कृष्णाठायीचे अवघे सत्य, चैतन्यस्वरूप आनंदविभोर होत प्रेममयतेने प्रकटले. राधा नीरमयी झाली तर कृष्ण नारायण झाले. काल आणि अवकाशव्यापी कृष्ण ठायीच जलक्रीडेत आनंदस्वरूप होत राधामय झाले.

'राधेऽ हेच माझे सत्य, तुझ्या रूपाने जीवनमयी खळाळते आहे. तरंगरूप होते आहे. काल आणि अवकाशस्वरूपात माझ्या कृष्णस्वरूपाला प्रवाही अस्तित्व तुझ्यामुळे लाभले आहे.'' कृष्ण राधामय होऊन नारायणमुखाने राधेशी गुज करीत होते.

''कृष्णा तूच तर वायवी झालास, तूच तर तेजस्वी प्रकाशलास, तूच तर नारायणपणे प्रवाहित झालास. मी केवळ प्राणमयी, तेजोमयी, धारावाही झाले. तुझाच अवघा स्त्रोत, ममरूपाने कृष्णमयी झाला आहे.'' राधा लाघवाने कृष्णसख्याच्या अवघेपणात, अवघी विरून जात कृष्णमयी झाली.

''राधे ही तव क्रीडा केवळ आनंदमयी आहे. काल आणि अवकाशव्यापी कृष्ण तुझ्यामुळेच तर आनंदस्वरूप झाला आहे.'' कृष्ण राधेला सामावून घेत ठायीच स्फुट झाला.

''कृष्णा ही क्रीडा तर जीवघेणी; तरी तेजोमयी आणि आनंदमग्न करणारी

आहे. पण सत्यमयी होण्याची अंतरीची आर्त संवेदना मला तुझ्या सर्वव्यापकणात उत्कटतेने खेचते आहे. अवघ्या सत्य संवदनेने प्रेममय होऊन; तुझ्या अवघेपणाच्या कारुण्यात मी झेपावते. हे दूर होऊन प्रकटणे, विरहार्ततेचा आनंदमयी दाह प्रकटविते. वायूचा संचार, चैतन्याचा उत्साह आणि नीरधारेचा प्रवाहीपणा आनंदमग्न करून तुझ्यात नृत्य करू लागतो. संगीतस्वरूप होऊन; राधा कृष्णरूप होते! राधाकृष्ण होते! कृष्णा, नकोरे असा पुन्हा पुन्हा दुरावा, कितीही हवासा वाटला तरी! स्वसंवेद्यतेला या विरहार्ततेने आनंदपूर्ण क्षते पडतात. ती हळूवार जपत कृष्णमयी असावेसे वाटते!'' राधेचा स्वर घोगरा झाला होता. राधा कृष्णरूपात सामावत होती.

''राधे, राधे, राधे, ही क्रीडा अविनाशीपणे खेळण्याची उर्मी तुझ्या आलिंगनाने तीव्र होते आहे. या क्रीडेने सत्याच्या ठायीचे चैतन्य आनंदस्वरूप होऊन; तुझ्या लावण्यपूर्ण लाघवी आलिंगनाची संवेदना कृष्णरूपाला जाणवते. हेच तर या कृष्णस्वरूपाचे काल आणि अवकाशव्यापी अस्तित्व नव्हे का? राधे, हे तुझे आनंदस्वरूप लावण्य चिरव्यापकपणे कृष्णाठायी असावे! होय ना राधे?'' श्रीकृष्ण अधीर, आवेगपूर्णतेने राधेच्या रोमरोमात कुजबुजत होता. राधा, कृष्णाच्या या सृष्टीइच्छेने पुन्हा अनावर झाली.

ॐकार शब्दब्रह्म उत्स्फूर्त झाले. अवकाशभर पसरले. अगणित झंजावाती वादळे अतिभीषणतेने घोंघावली. वादळांमधून अवकाशात अगणित तेजोमेघ विक्राळपणाने उर्जा उत्सर्जित करू लागते. त्या तेजोमेघांमधून अवकाशव्यापी राधास्वरूप जलधारांनी ती वर्षाव करू लागते. जलधारांची, निरमयी वरुणालये काल आणि अवकाशात झेपावून; कृष्णरूपात सामावण्यासाठी, महाकाय लाटांनी उसळू लागली. त्या अवकाशभराच्या सागरातून अगणित पार्थिव अस्तित्वे प्रकटली. या ब्रह्मांडांच्या गर्दीने, अवघे अवकाश कृष्णस्वरूपाला अगणित प्रकाशपुंजांनी विलोभनीय करीत आहे, असे वाटत होते. राधा अवघ्या सृष्टीरूपाने कृष्णव्यापी झाली!

''राऽधे! राधे, राधे हे असे व्यापकपणाने तू मलाच जखडून टाकले आहेस!'' अवकाशव्यापी तेजोमयी, वायवी, धाराप्रवाही, पार्थिव लावण्यमयी राधेला श्रीकृष्णाने आपल्या मिठीत अतितीव्र आवेगाने आलिंगन दिले. ''राधे, हे तुझे अस्तित्वच सच्चिदानंदमयी आहे! या सच्चिदानंदरूपात अविनाशीपणे मग्न असावे हेच या कृष्णस्वरूपाचे श्रेय!'' श्रीकृष्ण आनंदसमाधीमग्नतेने राधेला स्वतःत आलिंगन देत, गुज करीत होते.

''कृष्णा, तव कामना सच्चिदानंदस्वरूपाचे सगुण साकार रूप वांछिते आहे. ते केवळ सत्यस्वरूप, श्रीकृष्ण बीजाने, चैतन्यपूर्ण आनंदस्वरूप अशा राधारूपाने, अविनाशीपणे सृष्ट होण्यानेच घडेल. पण श्रीकृष्ण मला त्याकरिता बीजातून पुन्हा पुन्हा प्रसवावे लागेल. वायूरूप, तेजोरूप, जलरूप, पार्थिवरूप होऊन; मलाच कृष्णसख्याच्या बीजत्वात सामावण्यासाठी सगुण साकार होऊन झेपावे लागेल. ही गर्भक्रीडा, कृष्णा तुझ्याशिवाय कशी बरे साधेल?'' राधा विरहवेदनेचे संवेदन कृष्णाठायी घडविण्याचा प्रयास करीत होती.

''राधेऽ मी तुला कसाबरे विसंबणार? मीच राधा असे तुझेच ना अनुभवन? मग विरहवेदनेला अवसर कसा?'' श्रीकृष्णाने राधेच्या सर्वांगात सामावत पृच्छा केली.

''कृष्णा मला सत्यमयी होऊन प्रेममयतेने पुन्हा बीजव्यापी होईपर्यंत तुझा दुरावा कसा बरे सहावा? कृष्णा मी क्षणभरही तुला विसंबू शकत नाही.'' राधा व्याकूळ होऊन म्हणाली. ''राधे बीजपणाने प्रवासताना तुझे असलेपण संवेदित होऊनही, साक्ष व्हावे म्हणून मी तळमळत होतो. राधे तुझ्या स्त्रोतमयी होण्याने बीजाचा अर्थ सिद्ध होत आहे. हे कृष्णस्वरूप काल आणि अवकाशव्यापीपणे प्रेमपूर्ण आनंदमग्न, पूर्णत्व अनुभवत आहे! राधे तुझ्या लीलाविग्रहाने सत्य, चैतन्यपूर्ण आणि आनंदमयी उत्सव साधणार आहेस. राधा तुझ्याशिवाय कृष्ण, कृष्णच नाही!'' श्रीकृष्णाच्या या प्रियगुजाने राधा संगीतमयी झाली. राधेने कृष्णसख्याभोवती आणि स्वतःभोवती गिरकी घेत प्रदक्षिणा केली. कृष्णही नृत्यमग्न झाला. राधाकृष्णाचे हे सच्चिदानंदरूप लीला लाघव, अवघ्या काल आणि अवकाशात व्यापले. अवघे अवकाश अनंतपणे आनंदमग्न झाले!

अनंतपणे चाललेल्या या रासलीलेने अवघे अवकाश आनंदमग्न होऊन, राधाकृष्ण विलास अनुभवत प्रकाशमान होत राहिले.

राधाकृष्ण, गर्भानृत्यभाव समाधीतून सत्य, चैतन्यमयी होऊन; आनंदपूर्णतेने स्वयंप्रकाशी होत विलसत होते.

राधाकृष्णाठायी आत्मसंवाद होत होता. ''हे कृष्ण, तुला स्वत्व स्वरूपाने वायू, तेज, नीरस्वरूप होऊन; माझ्या पार्थिव अस्तित्वाची सगुण साकार सविकार लीला अनुभवतांना बीजविलास करावा लागेल? होय ना?'' राधेने कृष्णाला आपल्या प्रेमपाशात बंदिस्त करीत लडिवाळ गुज केले.

''होय राधे, वायूस्वरूप शिव, तेजस्वरूप विष्णू आणि निरस्वरूप ब्रह्म असे त्रिविधत्व स्वीकारून; मी तुझ्या सवे या सृष्टीलीलेत रासक्रीडा मांडणार

आहे, परंतु मला तुझ्याशिवाय ही रासक्रीडा आणि गर्भानृत्य कसे बरे शक्य होईल? तुला शिवमयी शिवा, विष्णूमयी वैष्णवी, तर ब्रह्ममयी ब्रह्ममाया होऊन; पार्थिवस्वरूप सगुण साकार, सविकार व्हावे लागेल. सृष्टीस्वरूपा स्त्रीरूप होऊन; ही क्रीडा करावी लागेल. बीजस्वरूप शिव, विष्णू, ब्रह्मा असा पुरुषरूपाने, सृष्टीस्वरूप स्त्रीशी रासक्रीडा करण्यास मी नेहमीच उत्सुक असेल! हे राधे तू राधा होऊन, या कृष्णाची प्रेमपूर्णतेने ही कामना पूर्ती करावीस असे वचन मला हवे आहे.'' श्रीकृष्णांनी दृढ आलिंगन देत राधेकडून वचन मागितले. या राधाकृष्ण संवादाने ॐकार शब्दब्रह्मातून परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी चतुर्विध वाणीरूपाने स्वर अवकाशभर झाले. राधाकृष्ण, पुरुषप्रकृती, शिवशिवा, विष्णूवैष्णवी, ब्रह्मब्रह्मा अवकाशात अविनाशीपणे रासलीला सुरू झाली.

काल आणि अवकाशव्यापी कृष्ण, राधारूपाने अवकाशव्यापीपणाने, अविनाशीपणे सृष्टीस्वरूप झाले! सृष्टीस्वरूप राधेच्या ठायी, कृष्णस्वरूप होण्यासाठी चिरंतन प्रेमपूर्ण आवेग संवेदित झाला. सृष्टीरूपातून ॐकार निनादले राधे, राधे, राधे राधे, राधे! राधेठायी कृष्णसख्यासाठी आवेग प्रवृत्त झाला. अवकाशात ध्वनी घुमत राहिले राधाकृष्ण, राधाकृष्ण, राधाकृष्ण!

अवघ्या अवकाशातील तेजोमेघ आकाशगंगा, सूर्यमाला, तारे, नक्षत्रे पार्थिवपणाने त्यांच्या चराचर स्वरूपातील अणुरेणुंमध्ये राधाकृष्णस्वरूप स्त्रीपुरुषरूपात रासलीला अनुभवू लागले. 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्, पुनरपि जननी जठरे शयनम्' असे सृष्टीचक्र आनंदमग्न रासलीलेने कृष्णस्वरूप होण्यासाठी सनातन झाले.

काल आणि अवकाशात सनातनपणे परावाणी स्फुट झाली–

*प्रेम स्वरूप राधा कैवल्यरूप राधा*
*घनःशाम वर्षताना ही सृष्टी होय राधा*

कृष्णस्वरूपाच्या राधाकृष्ण लीलाविग्रहाचे काल आणि अवकाशव्यापी अतिभीषण तरी अतिविलोभनीय संमोहक रूपाचे चिंतन करतांना ऋषीप्रतिभेला जीवनमयी आणि मृत्यूमयी असे दर्शन घडले असेल का? सच्चिदानंदस्वरूप केवळ आनंदमग्न जीवनचिंतन असे एक रूप तर दुसरे मृत्यूमयी भीषण रूप मृत्यूचिंतन घडविणारे झाले असेल का? खरेतर अवघे अस्तित्व आनंदपूर्णतेने अनुभवणे हे श्रेयस्कर नव्हे काय? राधाकृष्ण युगुलाने सच्चिदानंद अनुभूतीचेच संवेदन घडते. उपनिषदकार ऋषींनी शांतीमंत्र स्वरूपात सकारात्मक आनंदमग्न चिंतन केले. तसेच वास्तव जीवनातील संघर्ष आणि क्षणभंगुरता या अनुभूतींनी

नकारात्मक चिंतनही केले असावे.

*ॐ पूर्णमदः पूणमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय*
*पूर्णमेवावशिष्यते ।। ॐ शांन्तिः शान्तिः शान्तिः ।।*

हा शांतीमंत्र आनंदमग्न चिंतन करतो आणि बृहदारण्यकोपनिषत् या उपनिषदातील–

*नैवेह किंचनाग्र आसीन्मृत्युनैवेदमावृतमासीत ।*
*अशनाययाशनाया हि मृत्युस्तन्मनो ऽ कुरुतात्मन्वी स्यामिति ।।*
*सोऽर्चन्नस्तस्यार्चते वै मेकमभूदिति तदेवार्कस्यर्कत्वम् क ँ ह वा अस्मै*
*भवति य एवमेतदर्कस्यार्कत्वं वेद ।।१।।*

अर्थात, (सृष्टीच्या) आरंभी कांहीही नव्हते. हे सर्व अशनायारूपी मृत्यूने आवृत्त होते. मृत्यू म्हणजे अशनाया (भक्षण करण्याची इच्छा). त्याने आत्मवान व्हावे या इच्छेने मन (निर्माण) केले. तो अर्चन करीत राहिला. तो अर्चन करीत असता ''अर्चन करणाऱ्या मला काय होईल'' असे वाटून उदक उत्पन्न झाले. (अर्चते) म्हणून अग्नीला अर्क हे नाव आहे. याप्रमाणे अर्काचे (अग्नीचे) अर्कत्व जो जाणतो त्याला उदक (अथवा सुख) प्राप्त होते.।।१।। असे चिंतन सृष्टरूपाचे नकारात्मक मृत्यू लक्ष्यी चिंतन उदकापर्यंत अर्थात सुखापर्यंत अर्थात आनंदापर्यंत जाते.

राधाकृष्ण लीलाविग्रहाला मृत्यूची नव्हे तर परस्पर आनंदमग्न समावेशनाची झळाळी आहे. म्हणूनच राधाकृष्णभजनाने कृष्णस्वरूप अर्थात सच्चिदानंदस्वरूप अनुभवता येते.

*सच्चिदानंद रूपाय विश्वोत्पत्यादि हेतवे*
*तापत्रय विमोक्षाय श्रीकृष्णाय वयं नुमः*

असे राधाभावाने समग्र सृष्टरूपे श्रीकृष्णात समावेशन करण्यासाठी उत्कट झाल्याची जाणीव होते.

राधाकृष्ण युगुल चराचराठायीच्या रासलीलेतून कृष्णस्वरूप अशी सच्चिदानंद, अद्वैतानुभूती घडविते. अवघ्या अस्तित्वात गीत गुंजते–

*या ह्रदयातील गीत सनातन*
*प्रेमाचे संगीत गाऊया ।।धृ।।*

*या ह्रदयीची त्या ह्रदयाला*
*अद्वैताची तान निरंतर*
*स्वस्वरूपाचे दर्शन येथे*

*सोहम् भावे करूया रक्षण ।।१।।*

*जीवाजीवांचे अखंड मीलन*
*जीवाशिवांचे अखंड मीलन*
*वस्तुजात हे येथ समर्पित*
*विश्वैक्याचे हे संवेदन ।।२।।*

*अद्वैताचे प्रतीक सृजन*
*जातकर्म हे आनंददायक*
*प्रेमी युगुले अद्वैताची*
*स्फुरवी प्रीत संगीत ।।३।।*

राधाकृष्ण अनंतपणे रासलीलामग्नतेने, सनातनातून अनंताकडे प्रेमस्वरूपा नृत्य धुंद... राधाकृष्ण, राधाकृष्ण, राधाकृष्ण! राधे, राधे! कृष्ण कृष्ण! राधाकृष्ण राधाकृष्ण राधाकृष्ण! होतच राहिले.

●●●

n

। ३ ।

# धारा

काल आणि अवकाशात अवघा व्यापून असलेल्या कृष्णाठायी, ठायीच स्फुरलेले, सृष्टीस्वरूपा, प्रेमरूपा राधेतील सगळे स्वर, नाद लयीत्वे, गुण, रंग, गंध, स्पर्श, रस कृष्णमय होऊ लागले. जणू महाप्रलय लोटला! राधाकृष्ण अद्वैत संगीत कालावकाशात भरून व्यापले. पृथ्वीवरील वैवस्वत मन्वंतरातील, ज्ञानमय अस्तित्वेही जणू त्या राधाकृष्ण अद्वैत स्वरूपात विरघळून जाताहेत, असे वाटू लागले. मात्र वैवस्वत मन्वंतरातली गणपती-सरस्वतींची संवेदना, सरस्वतीसरितेच्या आवेगपूर्ण गतीच्या, घोरप्रगाढ लयस्वरांच्या संगीतमग्न साहचर्याने, अप्रतिहतपणे, संवेदित होतच होती. कालावकाशातील राधाकृष्ण अद्वैत संगीताचे सूर जणू, सरस्वतीच्या प्रवाहातून तीव्रगतिपूर्ण आवेगवशतेने प्रकट होत आहेत!

ब्राह्ममुहूर्ताच्या पूर्वी, अमृतयोगावर, आकाशातून, ज्योतीस्वरूपात, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी, ब्रह्ममाया युगुले, मानससरोवराच्या मध्यात स्नानविधीसाठी उतरली. मानसात त्यांच्या जलक्रीडेने उठणाऱ्या तरंगाचे नृत्य, मात्र राजहंसांना जाणवले नाही. एरवी या जलतरंगांनी ब्राह्ममुहूर्ताची चाहूल हंसपक्ष्यांना लागते. त्यांचा विहार सुरू होतो. काही क्षणांनी तीनही युगुले नित्याच्या तपश्चर्येसाठी, ध्यानधारणेसाठी सिद्ध झाली. मानसाच्या पुढ्यातील महादेवशिव कृष्णजपाने कृष्णस्वरूपात ध्यानमग्न होऊ लागले. माता पार्वती शिवध्यानात गढून जाऊ लागली. विष्णू शिवसमाधिमग्न होऊ लागले तर ब्रह्म विष्णूस्वरूपाचे ध्यान करू लागले. माया, ब्रह्मचिंतन लहरी अनुभवात, एकरूप होण्याचा प्रयत्न करू लागली; तर श्रीलक्ष्मी विष्णुपदी रमण्यात गुंग होऊ लागली. त्रिविध युगुलांना अनंत कृष्णांशी सच्चिदानंदस्वरूप होण्याचा वेध

लागला.

काही केल्या समाधियोग मात्र साधला जाईना. कृष्णस्वरूपाची अनुभूती शिव, विष्णू, ब्रह्म स्वरूपातून शक्तीमत्तेने, संवेदित व्हावी; हा नित्य योग साधता येईना. अंतर्यामीचे कृष्णस्वरूपच कोठेतरी हरवले आहे, असे वाटू लागले. सनक, सनातन, सनत, सनंदन, नारद आणि ब्रह्ममानसपुत्र ऋषींची साधना ही विचलित झाली. सर्वांठायी सरस्वतीच्या प्रवाहावेगाचे स्वरलय संगीत घुमू लागले. ह्या अपूर्व घटनेत, आनंद संवेदना मात्र त्रिविध युगुले आणि ऋषीलोकांच्या ठायी संवेदित होत होती.

परब्रह्म स्वरूपातील, महत्‌तत्त्व आणि महाशक्ती प्राकट्याचा परस्परवेधक आनंदानुभव धुक्यात हरवावा; तसा जाणवत होता. विश्वाधार असलेली ईश्वर-ईश्वरी रूपे आणि ब्रह्ममानसपुत्रांचे ध्यान या आनंदानुभवाचा शोध घेऊ लागले. नित्याच्या ज्ञानमय कर्मापासून दूर जाऊन; या हरवलेपणाचा शोध घेण्याची उर्मी सर्वांठायी प्रकटली. शिवांना कृष्ण हरवला आहे, विष्णूंना शिव हरवला आहे; ब्रह्माला परब्रह्म हरवले आहे, मायेला ब्रह्म हरवले आहे, लक्ष्मीला विष्णू हरवला आहे; तर ब्रह्ममानसपुत्रांना त्रिदेव-त्रिशक्तींचे महत्‌तत्त्व-महाशक्तीपण हरवले आहे, असे वाटत होते. प्रलयातून पुन्हा प्रकटलेल्या मन्वंतराचा, पुन्हा प्रलय होतोसे वाटत होते. अस्वस्थता, हुरहूर, विचलन यांच्या जाणिवेतही आनंदलहरींचा प्रत्यय मात्र येत होता. त्रिदेव आणि त्रिशक्ती या आतूर अवस्थेच्या आनंदकारणाचा शोध घेत निघाले. ब्रह्ममानसपुत्र नारदांना या उन्मनआतुरतेची, तीव्रतर जाणीव झाली. त्यांच्या मुखातून अखंड उमटणारा नारायण मंत्रघोष राधामंत्र घोषात परिवर्तित झाला. हे सारे राधाकृष्ण अद्वैत संवेदनेने घडते आहे हे नारदांना जाणवत होते.

हातीच्या चिपळ्या खळाळल्या, वीणेच्या तारा छेडल्या गेल्या. राधेऽ राधेऽ राधेऽ राधेऽ राधेऽ राधेऽ या मंत्र नामघोषाने अवघा आसमंत सरस्वतीच्या वेगावेगपूर्ण धारा ध्वनींशी संवाद करू लागला. नारदांची पावले राधा-कृष्ण भजनात मग्न होत सरस्वतीच्या दिशेने जाऊ लागली. नारदांचा मंत्रघोष त्रिदेव, त्रिदेवी, गणेश, ऋषीमुनी तथा ब्रह्ममानसपुत्र यांना, राधाकृष्ण-अद्वैत रासक्रीडेचे स्थळ निर्देशित करीत होता. पृथ्वीदेवींना हा अनुभव वैवस्वत मन्वंतरात प्रथमच येत होता. ठायीच रासलीला अनुभवण्यासाठी पृथ्वीमाता अधीर झाली होती.

''हे महादेव, ह्या अधीर, उन्मन आनंदानुभवाचा अर्थ तरी काय?'' पार्वतीमातांनी जिज्ञासापूर्ण पृच्छा केली.

''हे देवी, अवघ्या कृष्णस्वरूपाच्या स्वसंवेद्यतेतून परतत्त्वातील - परामहाशक्ती सृष्टीरूपाने अवकाशव्यापी आहे. या पराशक्तीलाच राधा या नावाने आपण जाणतो. त्या शक्तीला कृष्णस्वरूपाठायीपासूनचा दुरावा विरहार्त करतो. सायुज्यमुक्ती अनुभवण्याच्या सीमेवरील योग्याची अवस्था व्हावी, तशी कृष्णाविना राधेची अवस्था होते. ती आर्तपणाने कृष्ण समाधी साधनेसाठी व्याकूळ असते. म्हणूनच आनंद संवेदनेबरोबरच, आपणास वियोग दुःखाच्या वेदनाही होत आहेत. राधाकृष्ण अद्वैताचा प्रत्यक्ष अनुभव अनुभवण्याचा अमृतयोग प्राप्त झाला आहे. आपला प्रवास त्यासाठीच आहे.'' शिवांनी पार्वतींची जिज्ञासा शमविण्याचा काहीसा प्रयत्न केला.

''हे ईश्वरा, माझ्या मनात एक शंका आहे.'' पार्वतींनी अंतर्मुख होत म्हटले.

''कोणती, प्रिये?'' शिवांनी पार्वतीच्या मनाचा थांग शोधीत विचारले.

''देवाधिदेवा, राधाकृष्ण स्वरूपातूनच अवघे विश्व निर्माण झाले ना? आपण आणि मी स्वरूपता कृष्ण आणि राधा स्वरूपच आहोत ना? मग राधाकृष्णांचे पृथक अस्तित्व कसे?'' महादेवींनी विचारले.

''हे महादेवी, तू विश्वरहस्याविषयीच प्रश्न केला आहेस. मूलतः सारे काही कृष्णस्वरूपच आहे. म्हणजे काल आणि अवकाशव्यापी अशा कृष्णस्वरूपाचे ठायी सत्य, चैतन्य आणि आनंद या अवस्था स्वसंवेद्य आहेत. सत्य हे चैतन्यच असते आणि तेच आनंद असते. हे सच्चिदानंदस्वरूप अद्वैत भावाने श्रीकृष्णस्वरूप आहे. तेच परमात्मन् स्वरूप होय. परमात्मा श्रीकृष्णाच्या ठायी स्वसंवेद्यता स्वभावामुळे सच्चिदानंदस्वरूप अनुभवण्याची संवेदना झाली आहे. त्या संवेदनेनेच श्रीकृष्णांच्या ठायी सच्चिदानंदस्वरूप, अवघ्या राधारूपाने अर्थात समृद्धीस्वभावाने अनुभूत झाले. त्यासाठी श्रीकृष्ण स्वरूपाला राधेचा अनुभव द्वैतभावाने घ्यावा लागतो. तो अनुभव श्रीकृष्ण ठायीच घेऊ लागले. राधास्वरूप म्हणजेच अवघ्या सृष्ट गोष्टी होत. या राधास्वरूपाची स्वसंवेद्य नित्यता अनुभवण्यासाठीच तर चक्रनेमिक्रमाची सिद्धता, सच्चिदानंद स्वरूपात झाली आणि सृष्टीरूपाने राधाकृष्ण रासक्रीडा सुरू झाली!''

''म्हणजे अवघे अस्तित्व ही त्या श्रीकृष्णाची रासक्रीडा आहे?'' पार्वतींनी पुन्हा प्रश्न विचारला.

''होय महादेवी, कारण राधास्वरूप असे अवघ्या सृष्टीचे अस्तित्व, श्रीकृष्णांच्या ठायीच संवेदित होत असते. हे संवेदित अस्तित्व खरेतर श्रीकृष्ण स्वरूपातच अद्वैताने असते. त्याकरिताच तर या संवेदित होणाऱ्या राधेला

श्रीकृष्णाठायी समावेशित होण्याची आवेगपूर्ण ओढ असते. रासलीला ही त्यासाठीचीच भावसमाधीक्रीडा होय.'' महादेवांनी शंका निरसन करण्याचा यत्न केला.

''हे महादेवा, राधेच्या या नित्य संवेदनेत महादेव शिव आणि महादेवी पार्वती यांचे अस्तित्व कशासाठी?'' पार्वतींनी विचारले.

''हे महादेवी, ज्ञानाचे दर्शन विज्ञानात्मक रूपाच्या अनुभवानेच घ्यावे लागते; हा या अद्वैत्व अशा परमात्मतत्त्वाचा स्वभाव आहे. कृष्ण हे ज्ञान आहे तर त्या ज्ञानाठायी राधा हे विज्ञान आहे. या विज्ञानाची त्रिविधतेने नित्य अनुभूती घडावी यासाठीच तर स्वरापासून म्हणजे महत्‌तत्त्वापासून आकाश, वायू, तेज, आप आणि पृथ्वी अशी पंचभौतिक सृष्टी निर्माण झाली. यांतील स्वर स्वरूपात ॐकार अर्थात मी महत्‌तत्त्वस्वरूप सिद्ध झालो. आणि हे महादेवी, ॐकारातील प्रेरक शक्तीस्वरूपात तू सिद्ध झालीस. धारणात्मकतेसाठी विष्णू-वैष्णवी तथा लक्ष्मी आणि निर्मितीसाठी ब्रह्म-माया सिद्ध झाले. ही सर्व रूपे वस्तुतः स्वरूपज्ञानाप्रमाणे राधाकृष्णच होत. म्हणूनच तीही ठायीच एकत्वाने प्रकट होण्यासाठी सतत अभ्यास करीत असतात. परस्पर भक्ती किंवा प्रेमभाव म्हणजेच राधाभाव होय! त्यामुळेच तर या राधाकृष्ण स्वरूपाची ही त्रिविध रूपे विज्ञानात्मक स्वरूपात गणपती आणि सरस्वती रूपाने सृष्टीचे प्रचलन करतात. राधाकृष्ण हे अद्वैतच पितृमातृ चक्रनेमिक्रम अशा द्वैताद्वैत अनुभूतीचे कारण आहे!'' शिव प्रकट होत होते. महादेवी चिन्मयी होत होती.

''महादेवा, अवघ्या काल आणि अवकाशव्यापी सृष्टीअस्तित्वाच्या नित्यचलनाचे रहस्य म्हणजे कृष्ण ठायीच्या सच्चिदानंदस्वरूपाचे राधारूपी सृष्टीस्वरूप अनुभूती आणि या सृष्टीस्वरूपाचे कृष्णस्वरूपाठायी समावेशन हेच, होय ना!'' महादेवींनी खात्री करून घेतली.

''होय महादेवी, अवघ्या काल आणि अवकाशात शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी, ब्रह्म-माया या त्रिविध युगुल तत्त्वाच्या आधारेच ही क्रीडा घडते. या विज्ञानज्ञानाचे अनुभवन गणेश-शारदा स्वरूपात अनुभवत, अवघी सृष्टी पुन्हापुन्हा राधाकृष्ण क्रीडा अवलंबिते.'' महादेवांनी स्पष्ट केले.

''हे महादेवा, ही आनंदानुभूती अनुभवण्यासाठी मी आतूर झाले आहे.'' महादेवी महादेवांठायी स्वतःला अनुभवत म्हणाली.

नारदांचे सरस्वती तीरावरील भजन परमोत्कर्षास पोहोचले होते. स्वतः श्री गणेश राधाकृष्ण भजनात नृत्यमग्न झाले होते. सनक, सनत, सनातन, सनंदन,

भृगु, मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रतु, मनु, दक्ष, वसिष्ठ, शुक्र, बृहस्पती, कश्यप, च्यवन, उतथ्य, वामदेव, अगस्त्य, कौशिक, कर्दम, कपिल, गर्ग, वालाखिल्य, विश्रव, शक्तिवर्धन आणि अनेकानेक ऋषी, सरस्वती तीरावर राधाकृष्ण अद्वैतयोगाचा अनुभव घेण्यासाठी एकवटले होते. नारदांसवे सगळेच राधे, राधे! राधाकृष्ण! भजनात विदेही होऊन; राधाकृष्ण अद्वैत मुग्धावस्था भोगत होते.

कैलासाहून शिवपार्वती, वैकुंठामधून विष्णूलक्ष्मी, ब्रह्मलोकातून ब्रह्ममाया, माता पृथ्वी गोलोकातून गोस्वरूपात, सरस्वती तीरीच्या, गणेश-सरस्वती धामी पोहोचले होते. नारदांच्या चिपळ्या आणि वीणेच्या लयीत शिवपार्वती विष्णूलक्ष्मी, ब्रह्ममाया यांचीही रासलीला ब्रह्मांडात सुरू होऊ पाहात होती. अवघी सृष्टी समावेशनासाठी आतूर झाली होती.

रासलीलेत कृष्णासवे राधा उन्मनी होऊन, समाधिस्त होत होती.

काल आणि अवकाशातील अवघा कृष्ण, अवघ्या सृष्टीत राधारूपात विरघळलेले आपले अस्तित्व, पुन्हा आपल्या अवघेपणात, समावेशित करण्यासाठी जणू काल आणि अवकाशाच्या अनंतकृष्ण बाहूंनी, अवघेपणातील सच्चिदानंदरूप राधेला, हृदयाशी घट्ट घट्ट मिठीत मिटवून राधारूप होण्यासाठी, आसुसलेपण संवेदित करीत होते. परब्रह्मतत्त्वाची स्वसंवेद्य तत्त्वमयता, पुन्हा तत्त्व व्हावी या उत्कट उन्मनीपणाने राधेतून झेपावीत होती.

काल आणि अवकाशव्यापी सृष्टीस्वरूप राधा, आपल्या रोमरोमातून कृष्णगामिनी होत होती. विश्वाची विरहार्त व्याकुळता तिच्या आरक्त नेत्रकमलातून अवकाशात आपल्या सत्त्वाचा शोध घेत होती. अवघ्या अवकाशात, रासमंडनासाठीचा मुरलीस्वर, मंत्रमुग्धतेने आपल्या अनंत लहरींनी, राधेला सर्वांगे लपेटू पाहात होता. राधा या लहरीत स्वतःला गुंफवून वेणूस्वर होण्यासाठी सर्वांगे शृंगाकांत मांडून झेपावत होती. अणुरेणूतून राधेची प्रेमधारा अवकाशव्यापी उसळत होती. पदकमलांची गती या व्यापकतेत मंदावली होती. राधेची स्तनमंडले शिखरे तीक्ष्णपणाने अवकाशात व्यापून, राधेभोवती स्वतःला वेढू पाहणाऱ्या, कृष्णाच्या वक्षाला समावेशनासाठी वेधत होती. सृष्टीव्यापी चैतन्यमयी आनंदधारा, राधेच्या आसक्तीपूर्ण अधरांना, जीवनपूर्णतेने मधूर रसरसलेपण प्रदान करून; कृष्ण सख्याच्या, चुंबनासाठी अधीर करीत होत्या. सत्य आणि प्रेमाच्या समरसतेचे प्रेमस्वरूपा कारुण्य, पुन्हा काल आणि अवकाशव्यापीपणे, सच्चिदानंदस्वरूप, कृष्ण होऊ पाहात होते!

राधेतील प्रेमसागर कृष्णसख्यात महासागरपण अनुभवण्याचा प्रयास करीत होते!

नारदांच्या चिपळ्यांना दृतलय मिळत होती. अधिकाधिक दृत होत होती. राधे राधे! राधाकृष्ण राधाकृष्ण! भजनांच्या दृतगतीतून कृष्णप्रेमाने अवघे अस्तित्व राधा होऊन कृष्णस्वरूप होत होते. ब्रह्ममानसपुत्र या प्रेमलयीत मुग्ध झाले होते. भक्तीच्या उत्सवाने अवघे अवकाश ज्ञानमय होऊन; राधेला सृष्टीमयी आसक्तीतून वैराग्यपूर्ण तूर्येने कृष्णरूपात समाविष्ट करीत होते.

भक्तीची लय दृत दृत अधिक दृत होत गेली. अवघ्या अवकाशात कृष्णव्यापकता कैवल्यानुभूती देऊ लागली. प्रेमधारा राधा देहीच विदेही होऊन; कृष्णस्वरूप झाली. कृष्णही अवघ्या संवेद्यतेसह सच्चिदानंदस्वरूप राधा झाले. सरस्वतीची आवेगपूर्ण लय ऐकू येईनाशी झाली. गणाधिश कृष्णस्वरूप ज्ञानमयी झाले. राधास्वरूपाचा सांभाळ करणारे त्रिदेव त्रिशक्तीस्वरूप राधारूप होऊन सच्चिदानंदाचा अनुभव घेऊ लागले. राधा कृष्ण झाली कृष्णच राधा झाले. आपणही ठायीच राधाकृष्ण स्वरूपातील अवघे एकलेपण काल आणि अवकाशात भोगतो आहोत; असे शिव-शिवा, विष्णू-लक्ष्मी, ब्रह्म-माया या त्रिविध युगुलांसह सृष्टीस्वरूप राधेठायीच्या अणुरेणूंना अनुभूत होऊ लागले. पुरुष-प्रकृती, राधाकृष्ण हे द्वैत सरले. अवघा आनंद सोहळा! चैतन्याची ज्ञानमयता सत्यत्वाने काल आणि अवकाशभर! अवघे सृष्टीमयी कृष्णस्वरूप सच्चिदानंद मग्न झाले.

परब्रह्माला स्वत्व स्वसंवेदित होत राहिले. ॐकारातून अवघ्या कालावकाशात, शब्दब्रह्माठायी स्फुरण झाले.

*जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरीं ।*
*चारूस्थळी येकाहारी । एकांगाची ।।२।।*
*आवडीचेनि वेगें । येकयेकांते गिळितीं आंगें ।*
*कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहाती ।।३।।*
*जें एकचि नव्हे येकसरे । दोघां दोनीपण नाहीं पुरें ।*
*काउ नेणों साकारें । स्वरूपे जियें ।।४।।*
*कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळोनि येकीं ।*
*नेदितीचि कवतिकीं । एकपण फुटों ।।५।।*

परस्पर भक्तिधारा प्रकटली, अनंतपणे!

●●●

। ४ ।

# राधाकृष्ण विवाह

वैवस्वत मन्वंतराच्या आरंभीच, सत्ययुगाच्या प्रथम चरणातून राधाकृष्ण रासलीलेतून अद्वैत झाले.

राधाकृष्ण अद्वैत योगाचा ठायीच माया योगाने आनंदानुभव घेत असतांनाच ब्रह्मदेव काहीसे चिंतीत झाले होते. त्यांनी ठायीची आसक्ती पूर्ण आणि जगदोत्पत्तीकारिणी तथा संस्काररूपिणी सावित्रीची अवघी शक्तिमत्ता नेत्रात एकवटून; आपल्या मानसपुत्रांकडे कटाक्ष टाकला. सनक, सनत, सनातन, सनंदन, भृगु, मरिची, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रतु, दक्ष, वसिष्ठ, शुक्र, बृहस्पती, कश्यप, च्यवन, उतस्थ, वमदेव, अगस्त्य, कौशिक कर्दम, कपिल, गर्ग, वालखिल्य, विश्रव, शक्तिवर्धन अशा अनेकानेक ऋषी व सरस्वती, गणेशांसह नारदांच्या कीर्तनभक्तीच्या लयीत, राधाकृष्ण अद्वैत आनंद सुखसोहळा, अनुभवण्यात गढून होते. ब्रह्मांची चिंता दुणावली. त्यांची राधाकृष्ण अद्वैत अनुभूतीची आनंदमग्नता विचलित झाली. या विचलनाचे संवेदन शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी युगुलांच्या ठायीही जाणवले. स्वयंब्रह्मा, मन्वंतर स्थापनेच्या स्वसंवेद्य कार्यासाठी चिंतीत होते. त्यांनी आपली नजर विष्णूलक्ष्मी आणि शिवपार्वतींकडे वळवली.

''हे ब्रह्मा, आपण श्री सावित्रीमायांसह चिंतामग्न झाला आहात?'' शिवांनी विचारले.

''हे देवाधिदेवा, वैवस्वत मन्वंतराच्या प्रारंभावस्थेत, म्या निर्मिलेला प्रजापतीस्वरूप ऋषी लोक, पुन्हा उर्ध्वगामी झाला आहे. प्रजोत्पादनासाठी सिद्ध होण्याऐवजी ते कृष्णस्वरूप अद्वैत भोगण्यासाठीच समाधीमग्न झाले आहेत. मम मानसपुत्र, प्रजापतीपदाचे कर्तव्यकर्म त्यागून; राधाकृष्ण अद्वैतानंदानुभूतीत गढून

गेले आहेत. ते उर्ध्वगामी झाले तर; मन्वंतराचे काय?'' ब्रह्मदेवांनी चिंता निवेदित केली.

''हे प्रजापिता, म्या काही परामर्श दिला तर चालेल?'' महादेवी पार्वती म्हणाल्या.

''होय होय, त्वाच परामर्श द्यावास. माझ्या ठायी तर केवळ तुझ्यामुळेच प्रजापती होण्याची संवेदना जागते, अन्यथा मलाही उर्ध्वगामी होऊन; कृष्णस्वरूप होण्यासाठी ध्यानमग्नतेचीच आसक्ती असते.'' शिवांनी स्वतःची सोडवणूक करून घेतली.

''देवी महादेवी, आपणच योग्य तो परामर्श करावा; अन्यथा माझे सृष्टीरूप होणेच थांबेल. या चतुरवेद, वेदांगे, छंद, मंत्र, तंत्र, तपतेज प्रसिद्ध करणाऱ्या सर्वसंस्काररुपिणी सावित्री मातांचे कार्यही थांबेल. गणेश-सरस्वती विलासही लुप्त होईल! तेव्हा, आपण त्वरेने काही परामर्श करावा.'' देवीमाया व्याकुळतेने म्हणाली.

''हे, जगत्पिता, या समस्त जगताची धारणा करून तेथे वैभव निर्माण करण्याचे दायित्व विष्णूलक्ष्मींकडे आहे. गोस्वरूप धरणीला त्यांनीच धारण केले आहे. गणेश-सरस्वतीरूपाने त्यांचाच सर्वत्र वात्सल्यपूर्ण विलास असतो. भगवान विष्णू लक्ष्मी हे तर पूर्णतः राधालक्ष्मी स्वरूपाचेच स्वसंवेद्यत्व, पृथ्वीलोकी पुरुष प्रकृती रूपाने, दायित्व स्वीकारून पार पाडीत आहेत. गोस्वरूप धरणीही, राधाकृष्ण अद्वैतात, आनंदमग्न होत आहे! आपण भगवान विष्णूलक्ष्मींना शरण जाणेच योग्य ठरेल.'' महादेवी पार्वतींनी परामर्श दिला. शिवांनी प्रसन्नपणाने मान डोलावली. ब्रह्ममाया आणि शिवपार्वती विष्णूलक्ष्मींकडे अपेक्षेने पाहात होते.

''कमलनयना, आपणच मौन सोडून ब्रह्मांना योग्य मार्ग सुचवावा.'' कमलजा लक्ष्मीमाता विष्णूंना म्हणाल्या. विष्णू भगवंत प्रसन्न झाले. स्नेहाळ नजरेने नाभीकमलापासून प्रकट झालेल्या, ब्रह्ममाया युगुलाकडे वात्सल्याने पाहात, भगवंत परामर्श देऊ लागले.

''हे ब्रह्मा, आपण चिंतामग्न होणे स्वाभाविक आहे. राधाकृष्ण अद्वैताची आनंदानुभूती सर्वांनाच हवीशी वाटली व ती मोक्षदायक असली; तरी युगानुयुगे सृष्टीचलनासाठी कृष्ण आणि राधा यांचे द्वैताद्वैतच कर्मकर्तव्यस्वरूपात अनुभवावे; हीच कृष्णाठायीच्या योगमायेची अर्थात स्वसंवेद्यतेची कर्मलीला आहे! हीच कर्मलीला अनंत ब्रह्मांडांच्या ठायी आपणासारख्या ब्रह्ममाया, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी आणि गणेश-सरस्वती युगुलांच्या माध्यमांतून सुरू आहे. ही

कर्मलीला, पृथ्वीवर, आपणही गत अनेक मन्वंतर भोगत आहोत. वैवस्वत मन्वंतर त्याला अपवाद कसे असेल?'' भगवान विष्णू बोलत होते.

''हे भगवन्, राधाकृष्ण अद्वैत तर काल आणि अवकाश स्वरूप होऊन पुन्हा कृष्णपरमात्मा निर्गुण, निराकार, निर्विकार अनंतकृष्ण स्वरूप झाले तर आपलीही कर्मलीला समाप्त होईल ना?'' ब्रह्म शंका व्यक्त करीत म्हणाले.

''हे ब्रह्मा, परमात्म्याचा आणि त्याच्या विग्रहातून निष्पन्न होणाऱ्या राधास्वरूपाच्या अणुरेणूंचाही अद्वैत होण्यासाठी योगसाधना करण्याचा स्वभाव आहे. म्हणूनच तर पुरुष आणि प्रकृती, ब्रह्ममाया, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मीच नव्हे तर ब्रह्मांडातील पृथ्वीशी निगडित समस्त चर आणि अचर तथा जड आणि चेतन, सूक्ष्मातिसूक्ष्म अस्तित्वांना, केवळ सच्चिदानंद स्वरूपाची ओढ आहे. तथापि ही कर्मतत्पर क्रीडाही कृष्णाठायीच्या राधेसारखीच अविनाशी आहे. म्हणूनच तर तिच्या ठायी प्रकृतीरूपात प्रकट होणारी अस्तित्वे कृष्णवेधाने झपाटलेली दिसली, तरी 'पुनरपि जननम्'च्या द्वैताद्वैत चक्रात अविनाशीपणे गतिमान असतात. समाधीसाधनेने ही गतिमानता नाकारून, कृष्णस्वरूप अद्वैत अनुभवता येत असले तरी; पुन्हा राधारूपाने कर्मतत्पर व्हावेच लागते. कारण राधाकृष्ण द्वैताद्वैत क्रीडेत, खरेतर कोणी जन्मही घेत नाही आणि कोणी मृत्यूही पावत नाही. पृथ्वीलोकवरील मृत्यू क्रीडा ही केवळ द्वैताद्वैत क्रीडा होय.'' भगवंत गुह्य ज्ञान सांगत होते.

''हे भगवंता, म्या आता नेमके करावे तरी काय?'' ब्रह्मदेवांनी पुन्हा प्रश्न विचारला.

''हे ब्रह्मा, आपण या सृष्टीचे नियंते आहात. वैवस्वत मन्वंतरात स्त्री-पुरुष विवाह, अर्थात मैथून संबंधातून पुनर्सृष्टी निर्माण होणार; हे काल आणि अवकाशस्वरूप कृष्णस्वरूपाचे विधीकर्मच आहे. अर्थात विधिलिखित आहे! त्यासाठी हे ब्रह्मा, आपण राधाकृष्ण अद्वैताचे राधा-कृष्ण विवाहरूप संपन्न करावे'' विष्णूभगवंतांनी उपाय सांगितला.

''परंतु भगवन्, हे कसे शक्य आहे?'' ब्रह्मांनी पुनर्प्रश्न केला.

''कृष्णाठायी स्वसंवेद्यता शक्तीस्वरूपिणी योगमाया आहे. या योगमायेच्या धारणेनेच कृष्ण-राधा द्वैत योग घडतो व पुन्हा राधाकृष्ण अद्वैत घडते. शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी, ब्रह्ममाया या त्रिविध अस्तित्वरूपांठायी, स्वरूपाने हाच योगमाया योग घडतो. म्हणूनच राधास्वरूपाचे अर्थात प्रकृतीस्वरूपाचे अविनाशी प्रचलन युगांतापर्यंत सुरू असते. राधाकृष्ण अद्वैताठायी कृष्णस्वरूप पुन्हा प्रकटते.

त्याचक्षणी स्वसंवेद्यता अर्थात सत्य-चैतन्य-आनंदस्वरूप होण्यासाठी, योगमायेची योगक्रीडा सुरू होते. हाच कृष्ण-राधा प्रकृती योग होय.'' श्री विष्णू म्हणाले.

''या योगातून राधा सृष्ट कशी होते?'' ब्रह्मांनी स्वानुभव स्मरणात्मक प्रश्न विचारला.

''हे ब्रह्मा, पंचप्राणांची अधिष्ठात्री, पंचप्राणस्वरूपा, सर्वशक्तिस्वरूपात अतीव सुंदर आणि कृष्णांना सत्तत्त्वापेक्षा अर्थात स्वतःपेक्षाही प्रियतम असलेली सर्वगुणसंपन्न, सौभाग्यमानिनी, गौरवमयी अशी चैतन्यधारा, कृष्णाच्या वामांगार्धस्वरूपात विग्रहित विवर्त होते. गुण आणि तेज दृष्टीने ती कृष्णच असते. ती आद्या परावरा, सारभूता, परमा, आदिरूपा, सनातनी, परमानंदमयी, धन्य व मान्य अशा स्वरूपात प्रकटते. त्या अस्तित्वाबरोबरच ती कृष्णाशी रासक्रीडा करू लागते. म्हणूनच ती अवघ्या सृष्टीची रासक्रीडा अधिष्ठात्री देवी होय. रासलीला हेच तिचे प्रकट अस्तित्व, ती आल्हादरूपा, हर्षरूपा, आत्मस्वरूपा; तरी सृष्टीनिर्लिप्ता आहे. म्हणजे कृष्णच राधास्वरूप प्रकटले आहेत. कृष्ण सत्य आहे तर राधा सत्यमयी आहे. हे ब्रह्मा आपणही स्वरूपता शिव-शिवा, ब्रह्म-ब्रह्मा, विष्णू-वैष्णवी असे राधाकृष्णस्वरूपच कर्मवान आहोत. म्हणूनच राधाकृष्ण आपल्या स्वरूपात कर्मवान राहण्यासाठी राधा-कृष्ण विवाह, मन्वंतराच्या चलनासाठी आवश्यक आहे! राधाकृष्ण विवाहाचे आयोजन करावे!'' भगवंतांनी ब्रह्मांना उपाय सांगितला.

''हे भगवंत, हा विवाह कसा संपन्न करावा?'' ब्रह्मांनी विचारले.

''हे ब्रह्मा, ब्रह्म, विष्णू, महेश यांनी योगमायेच्या योगिक मार्गाने, ठायीच कृष्ण-राधा विवर्त, ब्रह्म-ब्रह्मा, शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी असा अनुभवावा. या करिता त्रिविधपणे लीलायोग करावा.'' भगवान विष्णूंनी सांगितले.

''हे भगवन्, या त्रिविधतेने योगमायेने असा विवाह संपन्न करण्यासाठी प्रत्यक्षात कारक कोण ठरू शकेल?'' ब्रह्मांनी पुन्हा प्रश्न विचारला.

''हे ब्रह्मन्, आपली शंका यथार्थ आहे. विवाह संपन्नता ही ज्ञानाची विज्ञानात्मक घटना आहे. याकरिता विज्ञानरूप गणेश-सरस्वती यांनी पौरोहित्य स्वरूपात, ही घटना घडवावी. यासाठी आपण त्यांना आज्ञा करावी. आपल्या मानसपुत्रांना या योगिक विवाह लीलेचे साक्षी होण्याची आज्ञा द्यावी. मन्वंतरात यानंतर असेच विवाह संवेदनात्मक होतील. त्या युगुलांना विष्णू-लक्ष्मी, ब्रह्म-माया, शिव-पार्वती, गणेश-सरस्वती स्वरूपात पृथ्वीलोक अनुभवेल.'' भगवान

विष्णूंनी सांगितले.

ब्रह्ममाया युगुलाची चिंता वारली. भगवान गणेश-देवी सरस्वती, स्वसंवेद्य योगमाया योग साधण्यासाठी सिद्ध झाले. ब्रह्ममाया, विष्णूलक्ष्मी, शिवपार्वती युगुले योग साधू लागले. योगसाधना परिणत होत गेली. राधाकृष्ण युगुलाठायी वैवस्वत मन्वंतरासाठी, पुरुष-प्रकृती स्वरूपातील विवाहाने, राधाकृष्ण चराचरात अर्थात जडचेतनात परमात्मस्वरूप आणि सगुण साकार राधास्वरूपाने कर्मवान होण्यासाठी वचनबद्ध झाले. पुरुष प्रकृती रूपाने वैवस्वत मन्वंतरातही जीवशिव कर्मयोगाने सृष्टीचक्र निर्माण झाले. ब्रह्ममाया मन्वंतरासाठी विवाह योगक्रीडेत योगमग्न झाली.

*हृदय स्वामिनी श्रीकृष्णाची*
*झाली हो परिणता*
*अखंड धारा प्रितिरसाची*
*लाभे मन्वंतरा*
*प्रणय नव्हे ही भक्ति साधना*
*राधास्वरूपाची*
*पुरुष प्रकृति युगे साधना*
*राधाकृष्णाची*
*निरासक्त हो जीव कर्म साधना*
*युग पुरुषार्थाची*
*त्रिविध देवता प्रेरित करिती*
*विवाह संस्कारा*
*जड चेतन अणुरेणू करिती*
*राधाविष्कारा*
*सृष्टि सृजन वेणू वेणू स्वर गुंजे*
*मुरली राधेतून*
*सृष्टि लीला विज्ञान प्रकाशे*
*राधाकृष्ण ज्ञान*

प्रेमस्वरूपा ज्ञानमयी राधा सृष्टीच्या कणाकणात, जीवमात्रात, वस्तुमात्रात इच्छारहित, आसक्तीरहित, अहंकारशून्य, पराभक्तीची प्रेरणास्वरूपाने नांदते. प्रेमपूर्ण असे ज्ञानवान कर्मतत्पर होऊन; लाभलेल्या, सगुणसाकार देहभावाठायी, अनुग्रहपूर्वक आनंदमग्नतेने जीवन व्यतित करण्याची उर्जा देते. पुरुषार्थसाधनेची

म्हणजे राधास्वरूप होऊन; भक्ती, ज्ञान, वैराग्य या त्रिपदीने जीवन सच्चिदानंदस्वरूप करण्याची प्रेरणा देते. याकरिता शहाण्या अर्थात प्रतिभावान आणि कर्मतत्पर नरदेहाने राधेचे नित्य ध्यान करीत कृष्णस्वरूप व्हावे. राधाकृष्ण युगुलांत स्त्री-पुरुष भेद नाही तसाच स्त्री-पुरुष भाव विसरून कर्मतत्परतेने राधारूप व्हावे. कर्म हीच रासलीला करावी. असे गुह्यातीगुह्य ज्ञान ब्रह्ममाया, विष्णूलक्ष्मी, शिवपार्वती यांच्या योगिक लीलेने गणेश-शारदेच्या मार्गाने जणू स्वसंवेद्य अशा कृष्णस्वरूपाने राधास्वरूप होऊन; वैवस्वत मन्वंतराठायी प्रकाशित केले!

श्रीकृष्णांची हृदयस्वामिनी राधा, राधाराणी, जगत्‌जननी स्वरूपात दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री अशा रूपात प्रकृती होऊन प्रकटली. त्रिविध देवदेवतांचा वैवस्वत मन्वंतर मार्ग प्रशस्त झाला. राधा अशी-

*दृष्टि दृष्टा न सा चैशैः सुरेन्द्रैर्मुनिपुङ्गवैः।*
*वह्निशुद्धांशुकधरा नानालंकारभूषिता ।।*
*कोटिचन्द्रप्रभा पुष्टसर्वश्रीयुक्ताविग्रहा ।*
*श्रीकृष्णभक्तिदास्यैककरा च सर्वसम्पदान ।।*

●●●

। ५ ।

# ब्रह्मांडगोलकातील सृष्टीलीला

राधाकृष्ण विवाहाची दिव्यात्‌भूत अनुभूती घेतांना नारद भजनरंगात रंगले होते. भावसमाधीतून जागृत झाले; तेव्हा त्यांच्या मनात प्रश्नांचे काहूर माजले होते. काल आणि अवकाशव्यापी राधाकृष्ण विवाहबद्ध झाले तरी अगणित ब्रह्मांडांचे राधाकृष्णव्यापी स्वरूप कसे निर्माण झाले; हा प्रश्न त्यांना त्रस्त करीत होता. राधाकृष्ण आणि आविष्कारस्वरूप काल आणि अवकाशव्यापी ब्रह्मांडगोलकाचे रहस्य जाणून घेण्यासाठी नारद आतूर झाले होते. ब्रह्मांड निर्मात्या पिताश्रींकडे जाऊन कुतुहलपूर्ती करण्यासाठी ते सरसावले. स्वयं ब्रह्मदेवांनी हे रहस्य केवळ विष्णूभगवंतच सांगतील, असे म्हटल्यावर नारदांना आनंद झाला. ब्रह्मर्षी नारायण भक्त नारद, भगवंतांकडे गेले. त्यांनी आपली जिज्ञासा प्रकट केली.

''हे भगवन्, काल आणि अवकाशव्यापी अनंतब्रह्मांड गोलक आणि त्यातील सृष्टीलीलेची परंपरा यांविषयी मला प्रश्न पडला आहे. राधाकृष्ण अद्वैत स्वरूपात निर्गुण, निराकार, निर्विकार असूनही त्यांचा द्वैतभावाने सृष्टीचलनासाठी, विशेष आल्हाददायक असा विवाह प्रसंग घडला. या विवाहाचा ब्रह्मांडगोलकाशी कोणता अनुबंध आहे, हे अनंतपणे कसे घडते आहे याविषयी मला कुतुहल आहे. मला ह्या विज्ञानाचे ज्ञान आपणाकडूनच होईल; असे पिताश्री म्हणाले. त्यासाठीच मी आपणाकडे उत्कंठीत मनाने आलो आहे.'' नारदांनी एकदमच आपला हेतू स्पष्ट केला.

''हे वत्स नारदा, काल आणि अवकाशव्यापी अशा परब्रह्मालाच कृष्ण या नावाने वैष्णव ओळखतात. मोरपिसाचा मुकुट, गळ्यात मालती माला दैदीप्यमान अग्नीप्रमाणे विशुद्ध, कटीस पितांबर आणि हाती मुरली धारण केलेले, मनोहारी

असे कृष्णस्वरूप भक्तांना, सर्वाधार, सर्वेश, सर्वशक्तिमान, ऐश्वर्यप्रदायक, सर्वप्रकारे स्वतंत्र आणि सर्वमंगल स्वरूप वाटतात. हे कृष्णस्वरूप 'कृष्' शब्दाने भक्ती आणि 'न' अक्षराने 'दास्य' असा बोध करते किंवा 'कृष्' शब्दाने सर्वार्थ आणि 'न' अक्षराने बीज असा बोध करते. हे श्रीकृष्णस्वरूप सृष्टीचे एकमात्र बीजस्वरूप आहे. 'सृष्टी' होण्याच्या इच्छेने अंशभूत कालाच्या योगाने प्रेरित होऊन, ते स्वेच्छेने दोन रूपात विभक्त झाले. वामांगे स्त्रीरूप आणि दक्षिणांगे पुरुष ही दोन रूपे होत.'' भगवंत सांगत होते.

''वामांगे प्रकट झालेल्या स्त्रीरूपाला महाकामेश्वर अशा दक्षिणांगे प्रकटलेल्या पुरुषाने पाहिले. स्त्रीरूप अति मनोहर होते. कमलपुष्पाप्रमाणे सुंदर, तिचे नितम्बयुगल चंद्रबिंबापेक्षाही उत्तेजक आणि जघन प्रदेशतर कर्दळीस्तंभापेक्षा आकृष्ठ करणारा होता. सुंदरपुष्ट श्रीफलाच्या आकाराचे स्तनयुगुल, पुरुषरूपाला संमोहित करीत होते. मस्तकावर पुष्पमालांनी कुंतल केश, पुरुषाला पाशात गुंतवित होते. कृशकटी अति आवाहक होती. सुहास्यपूर्ण कटाक्षाने ती पुरुषाला आकृष्ट करीत होती. अग्निसमान पवित्र वस्त्राने तिने पुरुषमनाला लपेटले होते.''

स्त्री वामांगी राधा, आपल्या चक्षुचकोरांनी करोडो चंद्रापेक्षाही मनमोहक श्रीकृष्ण मुखमंडलाचे प्रसन्नतापूर्वक पान करीत होती. आपल्या प्रियतम पुरुषाच्या संमोहक मदन मादकतेने, अनुरक्त झालेली प्रिया, आपल्या बाहुपाशात प्रियतमाला बद्ध करीत होती. पुरुषस्वरूप दक्षिणांग कृष्णाने रासोत्सुक होऊन; रासमंडलात उल्हासपूर्वक आवेगाने रासलीला केली. या शृंगभोग क्रीडेने वामांगी दक्षिणांगाशी सुखपूर्वक संभोग क्रीडा करीत होती.'' नारद भगवान विष्णुमुखाने राधाकृष्ण संभोग क्रीडेचे वर्णन ऐकून मुग्ध झाले होते. या संभोग क्रीडेचा वृत्तांत विष्णूभगवंतापेक्षाही समाधीमग्न करणारा होता. श्रीमन् नारायण विश्वोत्पत्तीचे रहस्य सांगत होते.

''ब्रह्मदेवाच्या दिव्य दिवसाच्या कालावधीपर्यंत ही राधाकृष्ण रासक्रीडा सुरू होती. जणू मूर्तिमान शृंगाररस काल आणि अवकाशव्यापी होत होता. दक्षिणांगस्वरूप जगत्पिता श्रीकृष्णांनी वामांगस्वरूप राधास्वरूपात नित्यानंदपूर्णतेने तेजाचे आधान केले. हरि तेजाने परिश्रांत आणि तृप्त अशा स्त्रीरूप राधेच्या शरीरातून स्वेदप्रवाहित झाला. श्वास वेग गतिमान झाला. राधेच्या सर्वांगातून श्रवित श्वेद विश्वगोलक झाला आणि तिचा श्वास जगताच्या प्राणिमात्रांचा जीवनाधार झाला.'' भगवान विश्वात्मक ब्रह्मगोलकाचे राधेठायी झालेले गर्भाधान वर्णन करीत होते.

''त्या जीवनाधार वायूच्या वामांगातून त्यांची प्राणप्रिय पत्नी प्रकटली. तिच्यापासून वायू आणि वायवी अद्वैतातून प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान असे पंचप्राणस्वरूप पाच पुत्र निपजले. स्वेदापासून महान वरुणदेव निर्माण झाले. प्राण आणि विश्वात्मक ब्रह्मगोलक वरुणस्वरूप अशा अवस्थेत राधाकृष्ण रासक्रीडेतून विश्वाधार आणि विश्वनिधानस्वरूप अशा श्रेष्ठ बालकाचा जन्म झाला. निर्गुण, निराकार, निर्विकार सच्चिदानंदस्वरूप अशा श्रीकृष्णांचे वामांगस्वरूप राधारानी आपल्या अद्वैत स्थितीतील सच्चिदानंदस्वरूप स्वभावामुळे, निष्पन्न बालकरूपी, विकारवश सगुण साकार रूपाला पाहून दुःखित झाली. तिने त्या बालकाला काल आणि अवकाशव्यापी ब्रह्मांडगोलकात सोडले. ते पाहून दक्षिणांगस्वरूप श्रीकृष्णाच्या स्वसंवेद्य सच्चिदानंद स्वरूपालाही दुःख झाले. ज्ञानाचे विकारवश विज्ञानरूप ज्ञानापासून दूर जातेसे वाटून श्रीकृष्णांना त्या स्थितीचा क्रोध आला. त्यांनी राधेला निःसंतान राहण्याचा तसेच तिच्या अंशापासून निर्माण होणाऱ्या देवपत्नीही निःसंतान व नित्ययौवना राहण्याचा शाप दिला. राधा अंशस्वरूप सतत विभक्त होत. द्विधारूपाने सरस्वती, लक्ष्मी आदि शक्ती प्रकट झाल्या.'' नारायण सांगत होते.

''ब्रह्मांडगोलकात सोडलेल्या बालकाचे काय झाले?'' नारदांनी अधिरतेने विचारले.

''हे नारदा, हे बालक राधाकृष्णस्वरूपच होते. तेच कृष्णतत्त्वाच्या द्विधास्वरूप पुन्हा पुन्हा प्रकट होत अनेक झाले.'' नारायण म्हणाले.

''म्हणजे वस्तुतः कृष्णाचीच, राधाकृष्णलीला ब्रह्मांडगोलकात स्त्रीपुरुष रूपाने सुरू आहे होय ना?'' नारदांनी विचारले.

''होय नारदा, या ब्रह्मांडगोलकात राधाकृष्णस्वरूप बालकांचाच आविष्कार, ही ब्रह्मांडगोलकरूपी सृष्टी आहे.'' भगवान विष्णूंनी सांगितले.

''हे नारदा, हे तर या सृष्टीचे रहस्य आहे. हे रहस्य ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्चते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।। या शांतीमंत्रात साठविले आहे.'' भगवंतांनी सांगितले.

''राधाकृष्ण स्वरूपातून त्या अपत्याठायी दक्षिणांगातून महाविष्णू अर्थात महत्‌तत्त्व प्रकटले आणि वामांगातून महाशक्तीस्वरूप महालक्ष्मी प्रकटल्या. त्यांच्यापासून शिवशिवा आणि ब्रह्ममाया, विष्णूलक्ष्मी अशी त्रिविध स्वरूपे प्रकटली आणि या त्रिविध स्वरूपाच्या सहाय्याने या बालकापासून स्त्रीपुरुष स्वरूप द्विधा सृष्टीची, पुरुषप्रकृती न्यायाने, समस्त ब्रह्मांडामध्ये विविध प्रकारे

सृष्टी होत गेली. त्या राधाकृष्ण अपत्याचा म्हणजे परमात्म्याचा अंशस्वरूपात विस्तार होत राहिला आहे. ही सर्व अंशरूपे आत्मरूपाने परब्रह्मस्वरूपच असतात.'' भगवंत स्पष्ट करून सांगत होते. तरीसुद्धा नारदांना सृष्टीरहस्याचा पूर्ण उलगडा होईना.

''हे भगवन्, काल आणि अवकाशव्यापी ब्रह्मांडगोलकात आविष्कृत अगणित तेजोमेघ, आकाशगंगा, सूर्यमाला, ग्रह, तारे, नक्षत्रे या सर्व त्या राधास्वरूप कृष्णाचाच, राधा अपत्याच्या अंश अंश स्वरूपातील विस्तार आहे. तरी चराचर जडचेतन सृष्टीतील समस्त जीवमात्र, वस्तुमात्र त्या आत्मरूपाने कृष्णस्वरूप म्हणजे परमात्मस्वरूपच आहे. होय ना?'' नारदांनी शंकानिरसन करून घेण्याचा प्रयत्न केला.

''होय नारदा, आखिल काल आणि अवकाशातील ब्रह्मांडगोलकामध्ये राधाकृष्णप्रितीस्वरूपाने अद्वैत भावे प्रकटलेल्या बालकस्वरूपाचेच हे अवघे जडचेतन चराचर अस्तित्व सगुण साकार सविकार स्वरूपात, स्त्रीपुरुष रूपाने जननचक्राचे कार्य अविलंबित आहे. राधाकृष्ण हेच या समस्त अस्तित्वाचे महाकारण असले तरी; राधाकृष्ण युगुल परमात्मा श्रीकृष्णरूपाने, अद्वैत भावाने काल आणि अवकाशात स्वसंवेद्यतेचा अनुभव, केवळ अलिप्तपणे अनुभवित आहेत. म्हणूनच तो परमात्मा अंशात्मकतेने सर्वांठायी चैतन्यस्वरूपात वास करतो. सर्वाठायी देहभावाने चैतन्यमयी राधेच्या स्वरूपात आत्मस्वरूपाशी पुन्हा अद्वैत होण्यासाठी धडपडतो. मूलतः राधाकृष्ण हेच या समस्त अस्तित्वाचे प्रथम प्रजापती होत. रासक्रीडेतून आविष्कृत झालेले, पंचप्राण आणि वरुणालयात्मक असे हे बालक; त्यांचेच प्रजापतीचे कार्य, त्यापासून आविष्कृत महत्तत्त्व आणि महाशक्तीस्वरूप, द्वैतभावाने प्रेमपूर्वक अद्वैत होण्यासाठी; सतत आविष्कृत होत राहाते. प्रत्येक ब्रह्मांडात हे 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्, पुनरपि जननी जठरे शयनम्' या न्यायाने हे चक्र मन्वंतरापर्यंत सुरू ठेवण्यासाठी; आम्हा त्रिविध तत्त्वांची आणि त्रिविध शक्तींची आविष्कृती झाली आहे. राधादेवींच्या बालकातूनच ही निष्पत्ती असून मन्वंतरावेळी पुन्हा त्याच बालकरूपात अस्तित्वांचा विलय होऊन; पुढच्या मन्वंतरासाठी पुन्हा त्याच बालरूपातून सृष्टीनिर्मिती होते.'' नारायणांनी सांगितले.

''समस्त मन्वंतरात असाच आविष्कार आणि विलय असेल तर ब्रह्ममानसपुत्र सतत भक्तीने मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्न करतात. त्यांना मोक्ष कसा प्राप्त होतो?'' नारदांचा प्रश्न ऐकून विष्णूभगवंत चमकले.

''हे नारदा मोक्ष म्हणजे या मन्वंतर चक्रातून निसटून कृष्णस्वरूपाशी अर्थात सच्चिदानंदस्वरूपाशी अद्वैत अवस्था प्राप्त करणे होय. ही अवस्था म्हणजे पूर्णज्ञानमय अवस्था, आविष्कार राधास्वरूप, सृष्टीस्वरूप असणे हे विज्ञान आहे. त्या विज्ञानाच्या चिंतनाने, त्या पलिकडील ज्ञान होते. त्यासाठीच भक्ती, ज्ञान आणि वैराग्य अशी त्रिपदी साधना मुमुक्षु करतात. ही भक्ती, कर्मात्मक, ध्यानात्मक, चिंतनात्मक अशा अनेक योगमार्गानी करता येते. या योगमार्गाने विज्ञानाच्या अनुभूतीतून, ज्ञानापर्यंत पोचता येते. असे पूर्ण ज्ञान होणे म्हणजेच मोक्ष होय. अन्यथा सर्वथा मोक्ष अर्थात पूर्ण नाहीसे होणे हे साक्षात काल आणि अवकाशमयी कृष्णस्वरूपालाही अशक्य आहे. कृष्ण हेच महाकारण, महाकार्य, महापरिणाम, महाविलय आणि पुन्हा महाकारणस्वरूप होय! त्याचे आविष्कारस्वरूप म्हणजे राधा. राधा म्हणजे त्या कृष्णस्वरूपाचेच विज्ञानात्मक दास्य किंवा भक्ती होय.'' भगवंतांच्या मुखातून राधाकृष्णांचे अपत्य बालक रहस्य प्रकट होतांना अवघे विश्व स्तब्ध झाले होते. प्रत्येक अस्तित्व जणू नारद झाले होते. राधाकृष्णांची ब्रह्मांडगोलकातील अगणित अस्तित्वे ठायीच ज्ञानमय होत होती.

''भगवन्, मी तृप्त झालो. प्राप्तकर्म तत्परतेने करणे, प्रेममयतेने करणे हेच परमात्मस्वरूप जीवाचे सार्थक. सर्वांठायी राधा जागृत करण्यासाठी मला आशीर्वाद द्यावेत.'' नारदांनी भगवंतांना वंदन केले. नारायण मंत्राचा घोष करीत नारद निघाले.

भ्रमंती करीत निघालेल्या नारदांना सर्वांठायी ज्ञान प्रकाशित करण्याची इच्छा होती. वैवस्वत मन्वंतरातील त्रिविध ईश्वर, ईश्वरी स्वरूपाच्या आणि श्रीगणेश-शारदादेवींच्या सान्निध्यात सतत राहून राधाकृष्ण लीलाविग्रह सर्वांपर्यंत पोचविण्यासाठीची भक्तिसाधना नारदांनी अविलंबिली. प्राश्निक होऊन विष्णूलक्ष्मी, शिवपार्वती, ब्रह्मासावित्री तथा माया यांना प्रश्न विचारून सृष्टीव्यापार लीला, कीर्तनरंगातून उलगडण्याचे व्रत घेऊन; ते ब्रह्मांडात भ्रमंती करू लागले.

●●●

। ६ ।

# राधा पंचविधा

योगमायास्वरूप, स्वसंवेद्यता योगाने, राधाकृष्ण विवाह संपन्न झाला. याप्रसंगी ब्रह्मर्षी नारदमुनी राधाकृष्ण भजनात भक्तियोगाने, राधाकृष्ण विवाहाचे, सच्चिदानंदमग्न भावसमाधित्व भोगीत होते. नारदांचा रोमरोम राधाभावाने उन्मन झाला होता. आनंदाच्या सर्वोच्च शिखरावरून राधाकृष्ण भजन गुंजन, काल आणि अवकाशव्यापी होत होते. अवघी धरणी राधाभावाने पुलकित, उत्तेजित झाली होती. अवघ्या अंगे मोहरली होती! उत्स्फूर्तपणे स्फूर्त होत होती. सप्तरंगी रंगात धरणीमाताही रासलीलामग्न झाली होती. सृष्टीचक्रनेमिक्रमासाठी, अंतःकरणातून उमलून बहरत होती. राधाकृष्ण प्रेमरंगात अवघे अस्तित्व कृष्णस्वरूप झाले.

विवाह संपन्न झाला. ब्रह्ममानसपुत्र, राधास्वरूप होऊन; अवघ्या ब्रह्मांडात सृष्टीचक्राचे पंचभौतिक वैज्ञानिक चक्र, नियमितपणे व्यवस्थापित करण्यासाठी, राधाभावाने सरसावले. त्रिकालज्ञ ब्रह्मर्षी नारद मात्र, या क्रीडेनंतर राधाराणीचा शोध घेत, ब्रह्मांडात भ्रमंती करू लागले. सृष्टीतील चराचरातून जडचेतनातून राधा, राधा, नामघोष ध्वनि गुंजत आहे, असे जाणवत होते. राधाकृष्ण मंत्र बाजूला सारून, नारद नारायण मंत्राचा जप करीत भ्रमंती करीत होते. काही केल्या राधाकृष्ण मंत्र मात्र त्यांच्या मनातून जाईना! तो तर आपसूकच अंतःकरणातून उफाळून, नारायणमंत्रावर मात करीत होता. यामुळे नारद काहीसे संभ्रमित होत होते. भूतमात्रांतून प्रकटणारा राधा, राधा नामघोष नारदांना अधिकच अस्वस्थ करीत होता. त्यांच्या मुखीचा नारायण मंत्र, राधाकृष्ण नामघोषात हरवून जाऊ लागला. ब्रह्मांडाची भ्रमंती करून; पूर्णतः विचलित आणि संभ्रमित झालेले नारद, थेट विष्णूलोकी अर्थात वैकुंठलोकी आले.

नित्याप्रमाणेच भगवान विष्णू नारायणपणे शेषनागाच्या शयनासनावर राधास्वरूपाच्या सच्चिदानंदस्वरूपाचे ध्यान, शिवयोगाने साधण्यात, गुंग होते. कमलजा लक्ष्मीदेवी त्यांचे पादसेवन करीत; भगवंतांच्या सच्चिदानंदस्वरूपाशी आत्मसंवाद करीत होती. भगवंतांच्या नाभीकमलातून आत्मपोषण स्वीकारीत अखिल ब्रह्मांडमायास्वरूपाने, राधारूप सगुण साकार करण्यात ध्यानमग्न होते.

''राधाकृष्ण, राधाकृष्ण, राधेऽ राधेऽ!'' हा मंत्रघोष करीत, ब्रह्मर्षी नारद उपस्थित झाले. त्यांच्या ह्या 'राधाकृष्ण' मंत्रघोषाने कमलजा लक्ष्मीदेवींची मग्नता विचलित झाली. चकित होऊन त्यांनी नारदांना प्रश्न केला.

''वत्स नारदा, आज 'राधाकृष्ण' मंत्रघोष कसा? नारायण मंत्र हरवला की काय?'' लक्ष्मीदेवी प्रसन्नपणे हसत, 'राधाकृष्ण' मंत्रामागील मर्मभेद जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होत्या.

''माते, प्रणाम, आपण असे का बरे विचारीत आहात? मी तर नारायण मंत्राचेच अनन्यपणे भजन करतो आहे? म्हणजे माझ्या मुखातून नारायण मंत्राऐवजी राधाकृष्ण मंत्रघोष होत आहे?'' नारदांना संभ्रमित अवस्था लपविता आली नाही.

''होय नारदा, आज 'नारायण' मंत्रघोष झालाच नाही!'' लक्ष्मीदेवी ठामपणे म्हणाल्या. श्रीमन्नारायण भगवान भावसमाधीतून बाहेर आले. त्यांनी नारदांकडे वत्सलभावाने पाहिले. नारदांनी भगवंतांना नारायण मंत्राचा घोष करीत प्रणाम केला. पुढच्याच क्षणी त्यांच्या मुखातून 'राधाकृष्ण' मंत्रघोष निनादला.

''नारदा, तू संभ्रमित दिसतो आहेस. काही समस्या घेऊन येणं केलं आहेस?'' नारायणांनी विचारले.

''नाही, तसं काही नाही, पण....'' नारद पुन्हा संभ्रमित झाले.

''नाही कसं, कमलनयना, आज नारदांना नारायण मंत्राचाच विसर पडला आहे! नारद राधाकृष्ण, राधे, राधे मंत्रघोष करीत आहेत.'' लक्ष्मीदेवी नारदांकडे खट्याळपणे पाहात म्हणाल्या.

''होय? नारदा नारायणांना विसरलात की काय?'' भगवान नारायणांनीही नारदांना प्रेमपूर्वक परंतु मिश्कीलपणे विचारले.

''भगवन्!'' नारद खजिल होत म्हणाले.

''नारदा, काय समस्या आहे, सांग बरं!'' भगवंतांनी विचारले. लक्ष्मीदेवी प्रसन्नपणाने, नारदांकडे सुहास्य करीत वात्सल्याने पाहात होत्या.

''हे भगवन्, ब्रह्मांडाची भ्रमंती करीत, नारायण मंत्राचा घोष करीत होतो.

तो ब्रह्मांडाच्या अणुरेणूतून, चराचरातून, भूतमात्रांमधून, जडचेतनातून नारायण मंत्र राधाकृष्ण, 'राधे राधे' शब्दांनी प्रतिध्वनित होत होता. अवघे ब्रह्मांड राधाकृष्णाने व्यापले आहे. राधारूपाने ध्वनित होत आहे, असे वाटत आहे. नारायण मंत्र माझ्या ओठातून आपसुकच हरवून राधाकृष्ण मंत्रघोष प्रकटतो आहे. राधा, राधा संवेदनांचा प्रकाश अवघ्या ब्रह्मांडात व्यापला आहे!'' नारद सांगत होते. लक्ष्मीदेवी अधिकाधिक प्रसन्न होत्या.

''हे नारदा, यात संभ्रमित होण्यासारखे काहीच नाही. कृष्णाठायीच्या राधास्वरूपाचे आणि राधास्वरूपाच्या प्रकृतीस्वरूपाचे, गुह्यज्ञान तुला होण्याचा क्षण आला आहे! तू नारायणाच्या ठायी अर्थात कृष्णाठायी अनन्यभक्तीने एकरूप झाल्याचे अनुभवत आहेस, म्हणूनच हे गुह्यातिगुह्य ज्ञान तुला अवगत होण्याचा समय आला आहे.'' नारायण म्हणाले. लक्ष्मीदेवी चकित होऊन प्रसन्नपणे नारायण आणि नारदांकडे पाहात होत्या. नारदांच्या संभ्रमित होण्याचा अर्थ त्यांना उमगला होता.

''हे नाथ, मी सुद्धा राधेविषयीचे गुह्यज्ञान ऐकण्यास उत्सुक आहे!'' लक्ष्मीदेवी आतुरतेने म्हणाल्या. नारद आतूर झाले.

''हे भगवन्, मी गुह्यातिगुह्य असे राधातत्त्वाचे ज्ञान ग्रहण करण्यास आतूर झालो आहे. आपण कृपा करून राधाविष्कार रहस्य सांगावे.'' नारद अधिरपणे म्हणाले.

''हे भगवती कमले, हे श्रेष्ठ भगवतभक्त नारदा, निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, केवल, सच्चिदानंदरूप, काल आणि अवकाशव्याप्त परमात्मा, श्रीकृष्णांच्या ठायीची सत्य, चैतन्य, आनंदस्वरूप स्वसंवेद्य अशी, प्रेमस्वरूपा धारा म्हणजे राधा होय. या धारेच्या योगानेच कृष्ण सच्चिदानंदरूप आहेत! त्यांच्या ठायी स्वसंवेद्यता स्वरूपातील योगमायेचा योग घडला आणि श्रीकृष्णांची अर्धांगस्वरूपिणी, हृदयस्वामिनी प्रकृतीस्वरूप राधेने प्राकट्याने, शृंगाराधना केली. श्रीकृष्णाचे 'राधा'रूप प्राकट्य म्हणजेच राधा! राधारूपाने भासमान होणारे द्वैत खरेतर द्वैत नाहीच! कृष्णच राधास्वरूप आहेत! कृष्णांना योगमायायोगात 'राधा' होण्याची स्वसंविती झाली. ते बहू होऊन प्रकटले! प्रकृतीरूप झाले.''

''ही प्रकृतीच, प्रसन्नता, समृद्धता, यशस्विता, प्रेममयता स्वरूपात सतत कृष्णस्वरूपात उत्कर्षित होऊन कृष्णरूप होण्यासाठी आतूर असते. कृष्णस्वरूपाचा राधास्वरूप प्रकृतीआविष्कार अंततः कृष्णच होय! कृष्णच सत्य, चैतन्य आणि

आनंद असे पूर्ण तत्त्व. हे तत्त्वच प्रकृती होऊन प्रकटते तेच सत्यमयी, चैतन्यमयी, आनंदमयी असे राधास्वरूप झाले. म्हणूनच प्रकृतीच्या कणाकणातील सत्यमयता, चैतन्यमयता, आनंदमयता 'राधाकृष्ण' नामघोषाने, आपली कृष्णस्वरूप होण्याची आर्त मीलनोत्सुकता, चराचरात, अणुरेणूत, जडचेतनात; म्हणजेच प्रकृतीच्या राधाविष्कारातून, राधाभावाने उन्मन होण्यासाठी व्याकूळ होते. आकांत मांडते! संघर्ष करते! कर्मवान होते! या तिच्या प्रेमविव्हलतेतून 'राधा' 'राधा' मंत्राचा जागर होतो. हे नारदा 'राधाकृष्ण' 'राधा राधा' हे मंत्र त्रिविधतेने प्रकटलेल्या ब्रह्म-माया, विष्णू-लक्ष्मी, शिव-पार्वती या ज्ञानात्मक ईश्वराचेच भजन करतात. एवढेच नव्हे तर; हे ज्ञान, विज्ञानस्वरूपात सृष्टीठायी प्रकट करणाऱ्या गणेश-सरस्वती शारदा यांचाही अभ्यास करतात.''

''हे नारदा, ब्रह्मांडाचे भ्रमण करतांना, तुझ्या मुखातून 'राधाकृष्ण' मंत्राचे, तसेच 'राधा राधा' मंत्राचे पुरश्चरण होणे; ही ठायीच्या आत्मस्वरूपाची शब्दब्रह्मस्वरूप क्रीडाच होय. नाम हेच राधारूप आहे. तेच प्रेमस्वरूप आहे. एवढेच नव्हे तर सच्चिदानंदस्वरूप आहे! नामस्मरणाने राधाकृष्ण अद्वैताचा अनुभव ठायीच स्वसंवेद्य होतो.'' भगवंतांच्या अमृतवाणीच्या सहस्त्र धारांमध्ये, कमलजा लक्ष्मीमाता आणि नारद, राधाकृष्ण भावमग्न झाले होते!'' भगवंतांच्या मुखातून ज्ञान प्रकटले होते; तरी भगवद्भक्तीसाठी नामभक्तिमार्गाचा प्रचार करणाऱ्या ब्रह्मर्षी नारदमुनींच्या ठायी, अधिकाधिक ज्ञानप्रकाशाची लालसा निर्माण झाली.

''भगवन्, प्रकृतीमयी राधेचे स्वरूप कोणच्या शक्तिप्रकाशाने सर्वांना ज्ञात होते? ते सर्वांठायी कसे प्रकटते? हे कृपा करून अधिक प्रकाशित करून सांगावे. अखिल ब्रह्मांडात ते स्वरूप पूर्ण प्रकाशित होऊन; कर्मभक्ती पूर्ण ज्ञानसाधनेत सर्वांसाठी प्रकाशित करावे असे मला वाटते.'' नारदांनी जिज्ञासा व्यक्त केली.

''हे नारदा, हे लक्ष्मी देवी, नारदांनी व्यक्त केलेली इच्छा सर्वकल्याणात्मकच आहे. याकरिता माझ्याठायी प्रकटलेले प्रकृतीज्ञान मी सर्वांसाठी आपल्या माध्यमातून प्रकाशित करतो.'' भगवन् म्हणाले.

''होय भगवन्, आम्ही आतूर आहोत!'' महालक्ष्मीदेवी अधिरतेने म्हणाल्या. विष्णू भगवंतांच्या मुखातून कृष्णहृदयस्वामिनी, सच्चिदानंद शक्तिरुपिणी, राधेचे प्रकृतीप्राकट्यस्वरूप ज्ञान, शब्दब्रह्मातून प्रकाशित होऊ लागले.

''काल आणि अवकाशव्यापी कृष्णांचे अर्धांगस्वरूप, राधामयी सृष्टीस्वरूप प्रकट झाले. ह्या सृष्टीविधानाची प्रकृती पंचविध शक्तीमयी आहे. ही मूलप्रकृती

या पंचविध शक्तींच्या आविष्कारातून पंचतत्त्वात्मक कृष्णसत्य, कर्मशील करते! ते मूलप्रकृती गणेशजननी दुर्गा, प्रेममयी राधा, उत्कर्षमयी लक्ष्मी, ज्ञानमयी सरस्वती आणि संस्काररुपिणी सावित्री या पाच प्रकाराने सृष्टीकार्य करते. कृष्णस्वरूपातून त्रिविधतेने प्रकटलेल्या पंचविध तत्त्वांधारे ह्या पंचविध शक्ती समस्त प्रकृतीला कार्यान्वित करून; पुन्हा राधाभावाने कृष्णस्वरूप प्रकटविण्यासाठी लीलाविग्रह करतात. हा लीलाविग्रह ज्ञानवान कर्मतत्पर अशा महात्म्यांना सहज दृष्ट होतो. म्हणूनच अशा महात्म्यांना ऋषी असे नाव आहे. या प्रकृतीच्या स्वाभाविक नित्यत्वासाठी, त्रिविधात्मकतेने प्रत्येक ब्रह्मांडात प्रकटलेल्या राधाकृष्णस्वरूप, शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी आणि ब्रह्म-माया युगुलांचे ईश्वरी कार्य सुरू असते. अवघ्या सृष्टीचलनाचे हे रहस्य सर्वांठायी आत्मज्ञानाने उमगते.'' विष्णू भगवंत बोलत होते.

''नारायणा, प्रकृतीचे स्वरूपलक्षण कोणते?'' नारदांनी प्रश्न केला. नारदांच्या औत्सुक्याचे भगवंतांना कौतुक वाटले.

''हे नारदा 'प्र' हे अक्षर प्रकृष्टवाचक तथा प्राकट्यवाचक आहे. कृती म्हणजे सृष्ट होण्याची क्रिया घडणे असा बोध होतो. देवीची शक्ती सृष्टीक्रियेत प्रकृष्ट असते, याकरिता ती देवी प्रकृती म्हणूनच ओळखावी. 'प्रकृती' त्रिगुणात्मक असते, 'प्र' अक्षराने सत्त्वगुणाचे प्राकृत्य ओळखावे, 'कृ' अक्षराने रजोगुण ओळखावा तर 'ति' अक्षर तमोगुणाचे प्राकृष्ट्य होय. असे त्रिगुणात्मक स्वरूपात जे जे प्रकटले ते ते पंचविध शक्तिस्वरूपाने संपन्न असते. ते सर्व सृष्टीकार्यात संलग्न होते. म्हणूनच त्रिगुणात्मकतेला 'प्रकृती' किंवा 'प्रधान स्वरूप' म्हटले जाते. राधा अशी सगुण साकार सृष्टीस्वरूपा होऊन; प्रेमस्वरूपा भक्तीने व्याकूळ होत, कृष्णस्वरूप भोगण्यासाठी कर्मवान होते. या सृष्टीतील साकार अशा स्त्री-पुरुष रुपात्मक, सगुणसाकार, सविकार, अस्तित्वाने राधाभावे कर्मतत्पर होऊन; सच्चिदानंदस्वरूप ठायीच अनुभवावे; हेच राधाकृष्ण स्वरूपाचे प्रकृतीठायीचे रहस्य होय!'' भगवंतांनी प्रकृतीची उकल करून सांगितली.

''सृष्टीचलनासाठी योगमायेच्या योगिक क्रियेने परमात्मा दोन रूपात विभक्त झाले. परमात्म्याचा उजवा भाग पुरुष आणि डावा भाग प्रकृती असे मानले जाते. त्यामुळेच पुरुष दक्षिणभागी, तर स्त्री वामभागी असते. वस्तुतः असे स्त्री-पुरुष युगुल अर्धनारी नटेश्वरासारखे अद्वैतच असते.'' भगवंतांनी अधिक भेद स्पष्ट केला. ''म्हणूनच खरे पाहाता स्त्री-पुरुष असा भेद केवळ तात्कालिक क्रियात्मक परंतु भ्रामक असाच आहे.'' हेही भगवंतांनी स्पष्ट केले.

''हे भगवन्, परमात्म्याचे हे सृष्टीचलनासाठीचे वामांग पंचविध शक्तींनी उपयोजित आहे असेच ना?'' नारदांनी आणखी स्पष्ट असे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला.

''होय, ह्याच पंचविध शक्ती प्राकृतिक असून सृष्टीरूपाला संस्कारित तथा सुशोभित करीत असतात. सृष्टी होण्याच्या कृष्णाच्या इच्छेनेच हे घडले आहे'' हे भगवंतांनी स्पष्ट केले. कृष्णमुखीचे राधास्तोत्र सहजच नारदांच्या मुखी स्फुट झाले.

*गृहे राधा वने राधा राधा पृष्ठे पुरः स्थिता ।*
*यत्र यत्र स्थिता राधा राधा नेत्रे हृदि स्थिता ।।१।।*
*जिह्वा राधा श्रुतौ राधा राधा नेत्रे हृदि स्थिता ।*
*सर्वांगव्यापिनी राधा राधैवाराध्यते मया ।।२।।*
*पूजा राधा जपो राधा राधिका चाभिवन्दने ।*
*स्मृतौ राधा शिरो राधा राधैवाराध्यते मया ।।३।।*
*गाने राधा गुणे राधा राधिका भोजने गतौ ।*
*रात्रौ राधा दिवा राधा राधैवाराध्यते मया ।।४।।*
*माधुर्ये मधुरा राधा महत्त्वे राधिका गुरुः ।*
*सौन्दर्ये सुन्दरी राधा राधैवाराध्यते मया ।।५।।*
*राधा रससुधासिन्धु राधा सौभाग्यमंजरी ।*
*राधा वज्रांगनामुख्या राधैवाराध्यते मया ।।६।।*
*राधा पद्मानना पद्मा पद्मोद्भवसुपूजिता ।*
*पद्मे विवेचिते राधा राधैवाराध्यते मया ।।७।।*
*राधा कृष्णात्मिका नित्यं कृष्णो राधात्मको ध्रुवम् ।*
*वृन्दावनेश्वरी राधा राधैवाराध्यते मया ।।८।।*
*जिह्वाग्रे राधिकानाम नेत्राग्रे राधिकातनुः ।*
*कर्णे च राधिकाकीर्तिमानसे राधिका सदा ।।९।।*
*कृष्णेन पठितं स्तोत्रं राधिकात्रीतये परम् ।*
*यः पठेत प्रयतो नित्यं राधाकृष्णान्तिगो भवेत ।।१०।।*
*आराधितमनाः कृष्णो राधाराधितमानसः ।*
*राधाकृष्णमना राधा राधाकृष्णोति यः पठेत ।।११।।*

''हे कमलनयना, या पंचविध शक्तींचे स्वरूप कोणते हे ऐकण्यास मी उत्सुक झाले आहे.''

''हे प्रिये, त्यातील लक्ष्मी शक्ती तर तू स्वतःच आहेस!'' भगवंत म्हणाले. लक्ष्मी सर्वांगे मोहरल्या, स्त्रीसुलभ प्रसन्नता, लज्जेने अधिक विलोभनीय झाली.

''हे प्रिये, सर्व भक्तांवर अनुग्रह करणारी, स्वामीनिष्ठ पतिव्रता, प्रभुची प्राणेश्वरी, प्रिया, मधुरभाषिणी, सर्व प्रकारच्या धन धान्य समृद्धीची अधिष्ठात्री तथा सतत वृद्धिंगत होणारी, ममआत्ममयी राधास्वरूपिणी, हे देवी सती महालक्ष्मी तू तर माझ्या समवेत अर्थात माझ्या समवेत आणि चिरंतर माझ्या सेवेत तत्पर अशी असते.

तूच आपल्या शक्तीप्रभावाने स्वर्गाची स्वर्गलक्ष्मी, राज्यव्यवहारात राजलक्ष्मी, गृहस्थासमवेत गृहलक्ष्मी आणि सर्व प्राणिमात्रांत आणि वस्तुमात्रात शोभा, प्रसन्नता, वेधकता या शक्तींनी विराजमान असते. तू सर्वांची मनोहारिणी आहेस. पुण्यवंतांची कीर्ती, राजपुरुषांची प्रभा तथा सत्ता, व्यापारी वर्गासाठी अर्थात वाणिज्य व्यवहारासाठी धनस्वरूपात तर पापीजनांमध्ये कलहरूपात स्थापित असतेस. तूच दया व शांती रूप आहेस. वेदांनी तुला सर्वमान्य, सर्वपूज्य, सर्ववंदनीय म्हणून गौरविले आहे.'' विष्णूभगवंत प्रेमभराने लक्ष्मींचे स्तोत्रच जणू गात होते.

''हे कमलनयना, किती गौरव कराल? आपल्याच योगाने मी वैष्णवी तथा भाग्यमयी झाले आहे. हे नाथ माझा गौरव पुरे. नारदांना मध्ये थांबवित देवी म्हणाल्या, वत्सा, पुरे हं आता! त्या भगवंतांना म्हणाल्या. ''अन्य शक्तीरूपांचे ज्ञान आम्हासाठी वितरित करावे.'' माता लक्ष्मी म्हणाल्या. नारदांनी नारायणांचा जोषपूर्ण घोष केला. त्याचक्षणी माता लक्ष्मींचे माता लोपामुद्रा विरचित स्तोत्र नारदांच्या मुखी स्फुरले.

*मातर्नमामि कमले पद्मायतसुलोचने ।*
*श्रीविष्णुहृतकमलस्ये विश्वमातर्नमोऽस्तु ते ।।१।।*
*क्षीरसागरसत्पुत्रि पद्मगर्भाभसुन्दरि ।*
*लक्ष्मि प्रसीद सततं विश्वमातर्नमोऽस्तुते ।।२।।*
*महेन्द्रसदने त्वं श्रीः रुक्मिणि कृष्णभामिनि ।*
*चन्द्रे ज्योत्स्ना, प्रभा सूर्ये, विश्वमातर्नमोऽस्तुते ।।३।।*
*स्मितानने जगद्धात्रि शरण्ये सुखवर्द्धिनि ।*
*जातवेदसि दहने, विश्वमातनमोऽस्तुते ।।४।।*
*ब्रह्माणि त्वं सजर्नऽसि विष्णौ त्वं पोषिका सदा ।*
*शिवौ संहारिका शक्तिः विश्वमातर्नमोऽस्तुते ।।५।।*

''दुर्गा या नावाने प्रसिद्ध असलेली गणेशमाता ही शिवरूपा, शिवप्रिया तथा शिवअर्धांगिनी आहे. हीदेखील परमात्मकृष्ण माया नारायणी तथा पूर्णब्रह्मस्वरूपा आहे. समस्त देवदेवता, ऋषी, मुनि, दानव, मानवादी सर्व तिची आदिमाया म्हणून स्तुती व पूजा करतात. ती सनातनी सर्व ब्रह्मांडाची अधिष्ठात्री देवी शिवस्वरूपा आहे. धर्म, पुण्य, सत्य आणि कीर्तिस्वरूपा अशी दुर्गामाता यश, कल्याण, सुख, प्रसन्नता आणि मोक्षदायिनी आहे. दुर्गास्वरूप हे दुःख आणि सर्व संकटांचा नाश करणारे आहे.'' भगवान विष्णू दुर्गास्तोत्र गात होते.

*जय भगवति देवि नमो वरदे जय पापविनाशिनि बहुफलदे ।*
*जय शुम्भनिशुम्भकपालधरे प्रणमामि तु देवि नरार्तिहरे ।।१।।*
*जय चंद्रदिवाकरनेत्रधरे जय पावक भूषितवक्त्रवरे ।*
*जय भैरवदेहनिलीनपरे जय अन्धकदैत्यविशेष करे ।।२।।*
*जय पहिषविमर्दिनि शूलकरे जय लोकसमस्तकपापहरे ।*
*जय देवि पितामहविष्णुनुते जय भास्कर शक्रशिरोवनते ।।३।।*
*जय षण्मुखसायुधईशनुते जय सागरगामिनि शम्भुनुते ।*
*जय दुःखदरिद्रविनाशकरे जय पुत्रकलत्रविवृद्धिकरे ।।४।।*
*जय देवि समस्तशरीरधरे जय नाकविदर्शिनि दुःखहरे ।*
*जय व्याधिविनाशिनि मोक्ष करे जय वांछितदायिनि सिद्धिवरे ।।५।।*
*एतद्व्यासकृतं दुर्गा स्तोत्रं यः पठेन्नियतः शुचिः ।*
*गृहे वा शुद्धभावेन प्रीता भगवती सदा ।।६।।*

श्री लक्ष्मी आणि नारद

''शरणांगतांची रक्षक, आर्त, पीडित, वंचित, विकल, विव्हल, दिव्यांग अशा सर्व जनांचे सतत वात्सल्याने रक्षण करणारी करुणास्वरुपिणी माता दुर्गा ज्योतिस्वरूप आहे. मातेचा विग्रह परमतेजस्वी असा आहे म्हणून श्रीकृष्णांच्या तेजाची ती अधिष्ठात्री आहे. सर्वशक्तिमान अशी माहेश्वरी ही शाश्वत शक्ती आहे. साधकांनी सर्व प्रकारच्या सिद्धी प्रदान करणारी ही ईश्वरी, बुद्धि, निद्रा, क्षुधा, पिपासा, छाया, तन्द्रा, दया, स्मृती, जाती, क्षान्ती, भ्रान्ती, शांती, कांती, चेतना, तुष्टी, पुष्टी, लक्ष्मी, धृति तथा माया अशा अनेक नावांनी प्रसिद्ध आहे. परमात्मा श्रीकृष्णांच्या ठायी सर्वशक्तिस्वरूपता अशी देवी स्थित आहे. आणि आगमशास्त्रे दुर्गामातेचे नेहमीच वर्णन करतात.'' भगवान विष्णूंच्या स्तोत्र गायनाने दुर्गा साक्षात झाली. प्रसन्नपणे वत्सलभावाने, ती भगवान विष्णू लक्ष्मीदेवी आणि ब्रह्मर्षी नारदांकडे स्नेहकटाक्ष वर्षाव करीत होती.

भगवान विष्णूंनी लक्ष्मीसहित मातेचे पूजन केले. नारदांनी भगवंत मुखीचे स्तोत्र पुनः पठण करून दुर्गामातेला प्रसन्न केले. लडिवाळपणे आशिर्वचन देत दुर्गा अंतर्धान पावली.

''हे भगवन्, आपल्या प्रार्थनेमुळे आणि कृपेमुळे राधामयी दुर्गाशक्तीचे दर्शन घडले. धन्य झालो. आम्ही देवी सरस्वतीचे स्वरूप ऐकण्यास उत्सुक आहोत. कृपया आपण माता सरस्वतींचे गुणवर्णन करून आम्हाला ज्ञान द्यावे.'' नारदांनी भगवंतांकडे प्रार्थना केली.

''हे नारद, हे महालक्ष्मी, शब्दब्रह्म ॐकाराची अधिष्ठात्री, परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी वाणी जिच्यामुळे प्रसिद्ध झाली अशी सरस्वतीदेवी ही वाणी, विद्या, ज्ञान यांची स्वामिनी आहे. सर्व विद्या तिच्या स्वरूपातूनच विग्रहित होतात. बुद्धि, कवित्वशक्ती, मेधा, प्रतिभा, स्मृती अशा मनःशक्ती देवी प्रदान करते. विविध सिद्धांत तिच्यापासूनच स्फुरण पावतात. ज्ञानविज्ञानाच्या व्याख्या आणि बोध प्रदान करणारी ही देवता; सर्व अज्ञान, संदेह नाहीसे करते. विचारांची प्रस्तुती, ग्रंथलेखन यांसाठी ती शक्तिरूपिणी आहे. स्वर, संगीत, संधान, ताल यांची ती कारणरूपा आहे. विषय, ज्ञान आणि वाणीस्वरूपा सरस्वती सर्व प्राण्यांची संजीवनी शक्ती आहे. शांतीस्वरूपिणी शारदा संगीत प्रेरक वीणा आणि ज्ञानप्रसारक ग्रंथ स्वहस्तांत धारण करते. सात्त्विक, सुशील अशी ज्ञानमयी देवी यासाठीच कृष्णाठायी राधारूपात अधिष्ठित असते. तिची कांती शांती प्रदान करणारी आहे म्हणून तिची कांती हिम, चंदन, कुंद, चंद्रमा, कुमुद आणि श्वेत कमलासारखी आहे. रत्नमाला घेऊन ती सतत श्रीकृष्णपरमात्म्याचा जप करीत असते. ती तपःस्वरूपा आहे. तपस्व्यांना तपाचे फळ प्रदान करून; सर्व सिद्धी प्रदान करते. तिच्या कृपेनेच सर्व ब्रह्मज्ञांची वाणी मुखर होते. श्रुती आणि आगम शास्त्रे देवीचे राधास्वरूप अशा गुणांनी निर्देशित करतात.'' भगवंतांनी देवी सरस्वतीचे स्तोत्र गायिले. नारदांच्या ओठावर नकळत महर्षी अगस्तिमुनींनी गायिलेले सरस्वती स्तोत्र प्रकटले–

*या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता*
*या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।*
*या ब्रह्माच्युतशंकर प्रभृतिभिर्देवैः सदा पूजिता*
*सा मां पातु सरस्वति भगवति निःशेष जाड्या पहा ।।१।।*

सौंदर्यमयी, प्रतिभाशालिनी, जगदम्बिका माता सरस्वती कौतुकाने अगस्त्यविरचित स्तोत्र ऐकत प्रसन्नचित्त साक्षात झाली होती. स्तोत्र संपताच

विज्ञानकारिणी साहित्यकलास्वामिनी गणेश सहचारिणी सरस्वती मातेने विष्णूभगवंतांना आणि श्री लक्ष्मीदेवींना वंदन केले. या अपूर्व सोहळ्याचे साक्षी, त्रिकालज्ञ ब्रह्मर्षी नारद मनोमनी हरखून गेले. वेळोवेळी नारदांकडून परामर्श घेणारी जगदम्बिका साक्षात झाली होती. तिच्याठायीच्या कृष्णस्वरूपा राधाराणीची ज्ञानमयी तथा कलामयी शक्तिमत्ता नारदांना नव्याने ज्ञात झाली होती. नारदांनी मनोभावे शारदावंदना केली. जगदम्बिका शारदेच्या आशीर्वादाने नारदांचे अंतःकरण कृतकृत्यतेने भरून गेले. देवींनी निरोप घेताच नारदांची जिज्ञासा तीव्र झाली.

''हे भगवन्, राधादेवींच्या सावित्रीस्वरूपाचे दर्शन घेण्यासाठी मी अतीव उत्सुक झालो आहे.'' नारद म्हणाले.

''हे नारदा, हे श्री लक्ष्मीदेवी, सावित्रीदेवी ब्रह्मांडाला आपल्या शक्तीने संस्कारित करीत असतात. स्वयंब्रह्मांच्या मायामयी स्वरूपात त्या ब्रह्मांडरचनेला आणि चलनाला सारणीस्वरूप देत स्वतःबरोबर सर्वांना व्रतस्थ करीत असतात. हे नारदा, विचक्षण स्वभावाने सावित्रीदेवी चार वर्ण, वेद-वेदांगे, छंद, शास्त्रे तथा दर्शने, तंत्रे या सर्वांची जननी आहे. ऋषीप्रज्ञा रूपाने ती कार्यमग्न असते. जप, तप, ध्यान, अभ्यास यांची तेजस्विता तिच्यारूपाने प्रकट होते. सर्वप्रकारे ती प्रकट ज्ञानाचे संस्कार जगतावर करून; जगताला सुव्यवस्थापित करते. तीच ब्रह्मप्रिया असून गायत्री शक्तीरूपाने ब्रह्माठायी स्थित असते. सर्व तीर्थेही तिच्याच स्पर्शाने पावन होतात. सावित्रीदेवी शुद्धसत्वमयी, गुणमयी, पराशक्तिस्वरूपिणी, परमानंदरूपा स्वरूपात राधारूप होऊन कृष्णांच्या ठायी स्थित असते. त्यामुळेच सावित्रीदेवी शक्तिस्वरूपा आहे. तीच संस्कारकारिणी असल्याने समस्त जगत तिच्या पंचभौतिक शक्तिन्विततेने पवित्र असते.'' भगवान विष्णू ब्रह्मस्वरूपा सावित्री मायारुपिणींचे गायत्रीस्वरूप शक्तीचे स्तोत्र गात होते. पंचमुखी गायत्री तथा सावित्री देवी ब्रह्मांसह प्रकट झाल्या.

पिताश्री ब्रह्मदेवांसमवेत ब्रह्मस्वरूपा सावित्रीदेवी विष्णूभगवंतांच्या पुढ्यात प्रकट होताच ब्रह्मर्षी नारदांच्या आनंदाला भरते आले. त्यांच्या मुखातून साक्षात ब्रह्माकृत सावित्रीदेवी स्तोत्र स्फुट झाले-

**ब्रह्मोवाच**

*नारायणस्वरूपे च नारायणि सनातनि ।*
*नारायणसमद्‌भूते प्रसन्ना भव सुन्दरि ।।१।।*
*तेजःस्वरूपे परमे परमानन्दरूपिणि ।*
*द्विजातींना जातिरूपे प्रसन्ना भव सुन्दरि ।।२।।*

*नित्ये नित्यप्रिये देवि नित्यानन्दस्वरूपिणी ।*
*सर्वमंगलरूपेण प्रसन्ना भव सुन्दरि ।।३।।*
*सर्वस्वरूपे विप्राणां मन्त्रसारे परात्परे ।*
*सुखदे मोक्षदे देवि प्रसन्ना भव सुन्दरि ।।४।।*
*विप्रपापेध्मदाहाय ज्वलदग्निशिखोपमे ।*
*ब्रह्मतेजःप्रदे देवि प्रसन्ना भव सुन्दरि ।।५।।*
*कायेन मनसा वाचा यत्पापं कुरुते द्विजः ।*
*तत् ते स्मरणमात्रेण भस्मीभूतं भविष्यति ।।६।।*

विष्णू भगवंतांना उभयतांनी वंदन केले. लक्ष्मीदेवींना वंदन करण्यासाठी पुढे होताच लक्ष्मीदेवी म्हणाल्या,

''हे ब्रह्मा, हे सावित्री, त्रिविधतेने आपण सारे एकरूपच आहोत!

''होय माता, तथापि जगत कारणासाठी आमचा उद्‌भवाच्या कारक आपण आहात. म्हणूनच आम्हाकडून वंदनपूजन स्वीकारावे.'' ब्रह्मदेव म्हणाले.

विष्णूभगवंतांनी प्रसन्नचित्तपणे त्यांच्याकडून वंदना स्वीकारली. नारदांना मातापित्यांचे दर्शन झाले. सारेकाही ब्रह्ममय आहे याची जाणीव होऊन; त्यांच्या मुखाने नारायणमंत्राचा घोष स्फुरला. ब्रह्ममायासावित्री लक्ष्मी, सारेच त्या मंत्रघोषात उल्हासित होत रंगून गेले. ब्रह्मसावित्रींनी निरोप घेतला, तेव्हा नारद पुन्हा उत्सुकतेने भगवंतांकडे पाहू लागले. त्यांना राधास्वरूपाची चार स्वरूपे अवगत झाली होती. आता त्यांना राधास्वरूपाचे ज्ञान भगवंतांकडून मिळविण्याची आस लागली होती.

''हे महालक्ष्मी, हे नारद, राधा ही तर सर्व शक्तिमत्तांनी युक्त पूर्ण कृष्णस्वरूप आहे. परमात्मा श्रीकृष्णाच्या द्वैतभावे स्वरूपसिद्धीसाठी कृष्णच राधा होतो. निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, सच्चिदानंद कैवल्य निजरूप स्वसंवेद्यतेने अर्थात योगमायायोगाने स्वतःच राधास्वरूपात विवर्त होतात. तरीही राधाकृष्ण अद्वैत विचलित होत नाही. ज्ञानस्वरूप कृष्ण विज्ञानस्वरूप राधारूपाने ठायीच विवर्त होतात.'' भगवान विष्णू सांगत होते. सांगताना त्यांचे कृष्णस्वरूपाशी अद्वैत झाले होते. योगमाया योगानेच ते निवेदन करीत होते.

''हे भगवन् म्हणजे राधादेवींचे पृथक अस्तित्वच नाही असेच ना?'' ब्रह्मर्षी नारदांनी विचारले.

''वत्सा तुझी ज्ञानलालसा अतुलनीय आहे. राधाकृष्ण अद्वैत केवळ स्वसंवेद्यतेने पृथक स्वरूपात भासमान होते. राधेचे हे रूपच सृष्टीरूपाने अर्थात

प्रकृतीरूपाने आपणास ज्ञात होते. ही प्रकृती पंचविधा आहे म्हणूनच ती पंचशक्तिरूपाने सृष्टीचे पृथक संचालन करते असे भासमान होते. अन्यथा या पंचशक्ती परमात्मा श्रीकृष्णांच्या स्वरूपात पराशक्तीस्वरूपाने अर्थात आत्मिय भावाने राधास्वरूपच असतात. अर्थातच त्या श्रीकृष्णस्वरूप असतात. हे गुह्यज्ञान मी आपणास निवेदन करीत आहे.''

''म्हणजे भगवन्, प्रकृतीमधील पंचविधतेत राधादेवींचे अंशात्मक पृथक शक्तीरूप असते असेच ना?'' नारदांनी जिज्ञासेने विचारले.

''नारदा, हेच तर, ज्ञानात्मकतेने विज्ञान समजून घेणे महायोग्यांनाही कठीण जाते. तू भक्तीने या ज्ञानास पात्र झाला आहेस.'' नारायणांनी गौरव करीत सांगितले.

''म्हणजे? मी समजलो नाही!'' नारदांनी प्रांजळपणे कबुली दिली.

''म्हणजे राधा ही प्रकृतीठायी प्रेमस्वरूपा भक्तिरुपिणी आहे. प्रेम, आत्मियता, माया, वात्सल्य या गुणांनी युक्त अशी ही शक्ती प्रकृतीतील चराचराच्या ठायी आत्मभावे निरंतर वास करते. निरासक्त प्रेमासक्ती असे तिच्या भावनेचे स्वरूप आहे. निरपेक्ष प्रेमभावना म्हणजे राधा. निर्गुण, निराकार, निर्विकार परमात्म्याच्या ठायीची निरपेक्षता तरी स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूप प्रेमभावना पृथकपणे भक्तिरूपाने प्रकटली ती ही राधा. चराचरातील जडचेतनातील, परस्परांसाठीची आणि परमात्म्यासाठीची प्रेमशक्ती हीच प्रकृतीतील राधा होय. स्त्रीरूपातील माता, कन्या, भगिनी, पत्नी, प्रिया, कल्याणकारिणी, दासी, सेविका अशा सर्व रूपात राधाशक्ती संवेदित असते. प्रकृतीतून पुन्हा राधास्वरूपाने कृष्णस्वरूप अर्थात सच्चिदानंदस्वरूप होण्यासाठी ती कर्मशील असते. लक्ष्मी, दुर्गा, सावित्री, सरस्वती या चतुर्विध शक्तीचे कर्मशीलतेने प्रकृतीठायी चलन होतांना सर्वांठायी प्रेमस्वरूपा राधा सच्चिदानंदस्वरूपाची अधिष्ठात्री म्हणून कार्यान्वित असते. वरवर आसक्ती असा तिचा स्वभाव वाटला; तरी ती तत्त्वस्वरूप निरासक्त असते. प्रकृतीचे भासमान अस्तित्व तिच्याठायी कृष्णस्वरूप होण्याची आस निर्माण करते. या राधाशक्ती कारणानेच प्रकृतीचे अर्थात सृष्टीचे लक्ष्य परमात्मास्वरूप होण्याचे अर्थात अद्वैत अनुभवण्याचेच असते. म्हणूनच प्रकृतीच्या चलनात भक्तीने ज्ञान प्राप्त होते. ज्ञानामुळे निरासक्त प्रेमभाव प्रकटतो यालाच मोक्ष असे नाव आहे. हीच राधेची रासक्रीडा असते.'' भगवंतांनी स्पष्ट केले.

''हे भगवन्, प्रकृतीठायी राधा ही रासक्रीडेची अधिष्ठात्री शक्ती आहे, असेच ना?'' नारदांनी विचारले.

''होय नारदा, राधेचा मन्वंतरातील प्रमुख आविर्भाव प्रिया असा आहे. राधास्वरूप होऊनच कृष्णस्वरूप होता येते. याकरिता परमात्म्याशी आत्म्याला अद्वैत अनुवण्यासाठी राधाभाव अंगी बाणावा लागतो. राधाभाव म्हणजे अद्वैतसिद्धीयोग घडविणारी निःस्सीम भक्ती. यात स्त्री-पुरुष भेद नाही. पुरुषही राधारूपानेच कृष्णस्वरूप होतो. स्त्रीही राधाभावानेच कृष्णस्वरूप होते. द्वापारयुगात गोलोकात भगवान श्रीकृष्ण आणि कृष्णस्वरूप राधा यांच्या रासलीलेत गोलोकातील सर्वलोक ही राधारुपिणी लीला अनुभवण्याचा योग करतील.'' भगवंतांनी चराचराला राधाकृष्ण ज्ञान प्रेरित करण्यासाठी द्वापारलीलेचे भाकित वर्तविले. राधास्वरूपाची अलौकिक व लौकिक रूपाचे ज्ञान घडत होते. लक्ष्मीदेवींची राधास्वरूपात समाधी लागली होती.

''हे भगवान राधास्वरूपाचे लौकिक प्रकृतीतील स्वरूप ज्ञात करून घेण्यासाठी मी आतुर झालो आहे.'' नारदांनी नारायण मंत्राचा घोष करीत सांगितले. श्रीलक्ष्मीदेवी भानावर आल्या.

''स्वामी राधास्वरूप व्हावे असा भाव दाटून येतो आहे.'' लक्ष्मींनी श्रीविष्णूंच्या अंतरंगाला मनोभावे स्पर्श करीत सांगितले.

''हे महालक्ष्मी सृष्टीरूपा प्रकृतीच्या चलनासाठी पंचविधा शक्तींचे नियमित पृथक व संयोगित असणे आवश्यक आहे. यातील प्रत्येक शक्ती मूलतः राधाकृष्ण अद्वैत स्वरूपातील राधाच आहे. सत्यस्वरूप श्रीकृष्णांच्या कामनेनुसार त्यांच्या ठायीची सत्यमयी सच्चिदानंदस्वरुपिणी राधा स्वतःसह पंचविध प्रकारची प्रकटली आहे. तेव्हा मन्वंतराच्या प्रचलनासाठी आपले पृथक शक्तिस्वरूप तेव्हढेच आवश्यक आहे.'' भगवंतांनी श्रीलक्ष्मीदेवींची समजूत घातली.

''हे नाथ आपण सृष्टीप्रकृतीतील राधास्वरूपाचा महिमा सांगावा. मी ऐकण्यास उत्सुक झाले आहे.'' श्रीलक्ष्मी म्हणाल्या.

''हे श्रीलक्ष्मी विष्णूप्रिया, राधा परमात्म्याच्या रासक्रीडेची अधिष्ठात्री आहे. रासमंडळात अर्थात सृष्टीच्या आविष्कार मंडळात राधा आविर्भूत झाली आहे. रासमंडळानेच ती अधिक सुशोभित आहे. ''रासेश्वरी, सुरसिका, रासरूपी याच क्रीडेत स्थित असते. सृष्टीलीलेत गोलोकात तिचा निवास असणार आहे. ती गोपीवेश धारण करणारी, अतिशय आनंदमयी, आल्हादमयी, हर्षमयी, संतोषमयी अशा स्वभावाने निरपेक्ष प्रेमपूर्णा अशा भावाने कृष्णभक्ती करणारी असणार आहे. या राधेच्या नामस्मरणाने चराचर रासक्रीडेत सहभागी होऊन, श्रीकृष्णस्वरूप होईल. राधा हीच भक्तिस्वरुपिणी असून राधाभावभक्तीने श्रीकृष्णाचे ज्ञान होईल

आणि ठायीच वैराग्य प्रकटून जीवनमुक्त होता येईल. राधा, जीवनमुक्तीचा मार्ग आहे. या मार्गालाच भक्तियोग असे नाव मी प्रदान केले आहे.'' भगवंतांनी लौकिकाठायीच्या राधास्वरूपाचे वर्णन केले. तेव्हा प्रेमस्वरूपा राधेने साक्षात दर्शन देत विष्णूलक्ष्मी आणि नारदांना अचंबित केले. स्त्रीरूपातील शृंगारपूर्ण वेल्हाळ स्वरूपातील राधा कृष्णाचा वेध घेतांना अतिआतूर झाली होती. चराचरात सामावलेल्या राधास्वरूप श्रीकृष्णांना भेटण्यासाठी आतूर राधा दृष्यमान झाली. तिच्यापाठोपाठ तिची सहचरीही आतूर होऊन फिरते आहे.

*वसन्ते वासन्ती – कुसुम – सुकुमारैः अवयवैः*
*भ्रमन्तीम् कान्तारे बहु – विहित – कृष्ण – अनुसरणम् ।।*
*अमन्दम् कन्दर्प – ज्वर – जनित – चिन्ता – आकुलतया*
*चलत् – बाधाम् राधाम् सरसम् उदम् ऊचे सहचरी ।।१।।*

(गीतगोविंद– जयदेव, संपा. डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, प्रबंध तिसरा, पृ. २१)

वसंत ऋतु आहे. वासंतिक सुमने फुललेली आहेत. या सुमनांसारखेच अवयव असलेली राधा वनांत भ्रमण करीत आहे. कृष्णामागून वनांत असे फिरावयाचे तिचे व्रतच आहे. आताही तिची कृष्णाविषयीची ओढ उफाळून आली आहे. कृष्ण कुठे दिसत नाही अशा चिंतेने ती व्याकूळ झाली आहे. तेव्हा तिची सहचरी तिला गोड वाणीने म्हणत आहे....

राधेचे हे उत्कट, उत्कंठित, मीलनोत्सुक दृष्यमान रूप पाहून चराचरात नारायणाचा अनुभव घेण्यासाठी नारदही राधाभावाने उत्कट झाले.

''नारायण, नारायण, हे भगवन्, सृष्टीस्वरूपातील चराचर राधाभावाने आपल्याशी एकरूप होण्यासाठी आतूर आहे. हा सच्चिदानंदस्वरूप अनुभव घेण्यासाठी मीही माझे भ्रमंतीचे व्रत अनुसरण्यास उत्सुक झालो आहे.'' ज्ञानपूर्ण झालेले नारद ज्ञानमयी होण्याकरिता व्रतस्थपणे पुन्हा पुन्हा नारायण मंत्राचा जप करीत भ्रमंतीसाठी निघाले. लक्ष्मीदेवी त्यांच्याकडे वात्सल्यपूर्णतेने डोळे भरून पाहात होत्या.

●●●

। ७ ।

# व्याकूळ राधा !

ब्रह्मांडगोलकातील राधाकृष्ण संयोगातून अद्वैतस्वरूप निपजलेले बालक, महत्‌तत्त्व स्वरूपाने दक्षिणांग आणि महाशक्तीस्वरूपात वामांग असे, द्विधा झाले! ब्रह्मांडगोलकातील अगणित तेजोमेघ, अगणित आकाशगंगा, अगणित सूर्यमाला, ग्रह, तारे, नक्षत्रे या स्वरूपात, महाशक्तीचा सगुण, साकार, सविकार असा आविष्कार झाला. राधा काल आणि अवकाशव्यापी ब्रह्मांडगोलकात समृद्धपणे प्रकट झाली. महत्‌तत्त्व कृष्णस्वरूपातील आत्मरूपात्मक अशा अंशस्वरूपात, राधा अगणित रूपांत प्रकट झाली. ठायीच असलेल्या, आत्मरूप सच्चिदानंदघन श्रीकृष्णाच्या स्वसंवेद्यतेने, अवघे राधारूप जाणवत असले तरी; स्वतःच्या समृद्ध अशा सगुण, साकार, सविकार पार्थिव देहभावाने राधेला कर्मशील केले. विश्वात्मक समृद्धी अवस्थेतही, राधा आत्मस्वरूप कृष्णमग्नतेने, अद्वैत होण्यासाठी, अति व्याकूळ झाली.

तिच्या या व्याकूळ अवस्थेत, कर्मपरतेने प्रकट होतांनाही, ती सृष्टीरुपिणी अविरत कृष्ण भक्तिरत, चिंतनमग्नतेने, अद्वैतसाधना करीत होती! राधा अगणित रूपात्मकतेने सृष्टीरूपात वावरतांना, चैतन्यमयीपणाने अणुरेणूपुंजस्वरूपात विलसित होती. तिचे हे विलसणे अवकाशव्यापी उत्सव मांडलेपणाने तेजस्वी, शोभायमान असले तरी; हे विलसणे; काल आणि अवकाशव्यापी ब्रह्मांडगोलकातील अंधारमय कृष्णस्वरूपाच्या ठायी एकरूप होण्यासाठी आर्त झाल्यामुळे; विरहाचे अतीव दुःख तिच्या अस्तित्वातील समग्र जीवनप्रवासाला दुःखमय करीत होते.

दुःखव्यापी सगुण, साकार, सविकार रूपातून निसटून आत्मरूप श्रीकृष्णाशी अद्वैत पावण्यासाठी, त्रितापयुक्त संघर्ष करीत; अद्वैताच्या दुर्दम्य ओढीने, राधा सैरभैर होऊन, वावरत होती. ब्रह्मगोलकातील महत्‌तत्त्व आणि महाशक्तीच्या या

द्विधा अवस्थेतून निसटून अद्वैत होण्यासाठी आत्मरूपाचे दास्य, भक्ती करण्यापलिकडे तिच्याजवळ दुसरा मार्गही नव्हता.

राधाकृष्ण रास प्रसंगाची स्मृतीचित्रे, अद्वैत होण्यासाठी ठायीची संवेदना तीव्र करीत होती. या तीव्रतेतून राधेठायी असंख्य लोक निर्माण होत होते. ताटस्थ्यभावाने राधेचे हे चैतन्यमयी असे पार्थिवाचे वर्तन, आनंदमग्नतेने पाहण्यात, कृष्ण दंग होता! तिच्या सृष्टस्वरूपाचा विलास ठायीच सच्चिदानंदस्वरूपाने अनुभवण्यासाठी, कृष्ण आतूर होता. राधेच्या आर्त, तरल, स्वैर अशा वर्तनातून, अलिप्तपणे कृष्णस्वरूप होण्यासाठी; सतत सुरू असलेल्या दास्य तथा भक्तिसेवासाधनेचा आतूर शोध घेत कृष्ण अनावर होऊन; राधारूप होण्यासाठी झेपावे.

ही अवस्था मोठी मनोहारी, विव्हल, उत्तान आणि सच्चिदानंदस्वरूप अशा ज्ञानावस्थेवर, प्रश्नचिन्ह प्रकटविणारी होती! राधेचे सृष्ट होणे याच अवस्थेमुळे अविनाशीपणे सुरूच होते. कृष्णाचे राधारूप होऊन; राधेचा अवीट समागम साधण्यासाठी, चिरंतनाचे संगीतमय होणे सुरूच होते. राधाकृष्ण असे त्या बालकाचे रूप, ठायी द्विधा होऊन, स्वसंवेद्यतेने ठायीच, द्वैताद्वैत अनुभव करीत अनंतपणे प्रवासत होते.

भूलोकीच्या मन्वंतरप्रवासात चराचराच्या, भूतमात्राच्या सूक्ष्मातिसूक्ष्म आणि महाकायातिमहाकाय, जडचेतन अवस्थेतील, विविध रूपात, प्रकृतीरुपिणी राधा आविष्कृत होत राहिली. स्त्रीरूपाने, सृष्टीरूपाने अशा समस्त राधारूपांत ठायी, स्वसंवेद्य आत्मरूपस्वरूपात, परमात्मतत्त्व अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, महाशून्य, संवित्ती, अविनाशी, निज, सच्चिदानंदस्वरूप अंशात्मकतेने तरी परिपूर्ण सामर्थ्याने, श्रीकृष्ण चैतन्यस्वरूप नांदत आहे! राधा अशी उर्जामयी, तत्त्वमयी, चैतन्यमयी होऊन; सतत प्रकट कर्मक्रीडा करीत, कृष्णस्वरूप होण्यासाठी आर्तव्याकूळ होऊन; मन्वंतरात प्रवासत आहे. तिचे हे प्रकटणे द्विधावृत्तीतून, एकविधा होत आणि एकविधातून द्विधा होत घडतेच आहे!

वैवस्वत मन्वंतरात, पुरुषप्रकृती अशा द्विधावस्थेचे समागमातून एकविधा आणि एकविधातून परमइच्छेने पुन्हा द्विधा होणे असे नियमितपणे होतांना; चैतन्यमयी राधा विकारवश, भावनावश, वासनावश स्वरूपात पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश अशा पंचतत्त्वात्मक भावाने संभोगवृत्तीने तत्त्वमयी होऊन; प्रवासत असल्याचे ठायीच जाणवत आहे.

जडचेतनाची अगणित रूपे, त्या रूपाठायी चैतन्यमयी राधेचे क्रीडा आविष्कार

असे प्रवाह, लहरी, लाटा, ओघ, जलकुंभ, वरुणालय, पर्वतशिखरे, मैदाने, दऱ्याखोऱ्या, उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज अशी जीवसृष्टी अशा असंख्य रूपांनी, ऋतुचक्रांच्या नेमाने, जन्ममरणाची चक्रनेमिकता अनुभवत, अविनाशीपणे मन्वंतरात प्रवासत होती. वैवस्वत मन्वंतराच्या सत्ययुगपर्वापासूनच राधाकृष्णांच्या त्रिविध आणि पंचविध आविष्कारातून राधाकृष्ण स्वरूपाचे अलौकिक दर्शन, लौकिकात घडविणारी परिपूर्ण अस्तित्वे, ब्रह्ममानसपुत्र, देव, दानव, मानव, राक्षस, यक्ष, किन्नर, गंधर्व, विद्याधर, नाग, गरुड, वानर, जांबुवंत, वृक्ष अशा विविध योनीरूपांत स्त्री आणि पुरुषस्वरूपात प्रकट होऊन; प्रजापतींची कार्ये करीत होती. राधेच्या या परिपूर्ण मानवी अस्तित्वांच्या प्रवासात, राधाकृष्णांचे अगणित अवतार, राधाकृष्णस्वरूपाचा विसर पडून; संघर्षात्मकतेने अवतारित अवस्थेने, स्पर्धा करीत, ऐहिक जीवन प्रवास करू लागले. राधाकृष्णस्वरूप युगुलाचेच जणू विस्मरणच झाले!

या परिपूर्ण मानवी स्वरूपांतील प्रजापतींनी जन्ममृत्यू जीवन प्रवासाची, चक्रनेमिक्रमात्मक चाकोरीच जणू निर्माण केली. स्वकेंद्रिततेने राधेच्या अवघ्या सृष्ट स्वरूपाला मनोमयी आकारविधाने प्रदान करीत; कर्मशैलीने जीवनसारणी सुरू केली. राधाकृष्ण युगुलाच्या या प्रवासात, परमतत्त्व श्रीकृष्णस्वरूप राधा आणि राधास्वरूप श्रीकृष्ण या अद्वैताचे विस्मरण झाले!

केवल तत्त्वस्वरूपात, श्रीकृष्णस्वरूपाचे संवेदन, प्रत्येक अस्तित्वाच्या ठायी अपरिहार्यतेने होत राहिले. ती तात्त्विक श्रीकृष्णस्वरूप अद्वैत अवस्था, सच्चिदानंदस्वरूप होऊन; भोगण्याची दुर्दम्य इच्छा मात्र सर्वांठायी होतच राहिली. मनोस्वरूपाने राधामयी होऊन; भक्तिदास्य करावे; यासाठी साधना करण्याचा मार्ग, मानवाने अनुसरण्यास सुरुवात केली. राधाकृष्णांच्या या सृष्टीस्वरूप विज्ञानात्मक अस्तित्वालाच सत्य मानून; सच्चिदानंदापासून दूर, जन्ममृत्यूच्या फेऱ्यात, सुखदुःखात्मक, संघर्षात्मक, भ्रामक वास्तवाच्या संमोहनात, ऐहिकतेला कवटाळून; वर्तन घडू लागले.

दैनंदिन जीवनात सर्वसत्तात्मक, जीवनसारणी मांडून, तत्त्व आणि तत्त्वमयी वर्तनशैली स्वरूपात, कर्मठपणे जगण्यात, सच्चिदानंद स्वसंवेद्यतेची ठायीच विस्मृतावस्था निर्माण होऊन; कर्मठ व्यवहाराने दुःखमय जीवनाची अनुभूतीच येत गेली. हरेक जीव भवसागरात गटांगळ्या खात, अशांतपणे, अपरिहार्यपणे जन्ममृत्यू भोग भोगू लागला आहे, असे वाटू लागले.

संमोहक, कल्पित संस्कृतीसारणीमध्ये जगतांनाही राधाकृष्ण अद्वैतभावाची

संवेदना, जागृत करण्याचा खटाटोप, ब्रह्ममानसपुत्रांनी आरंभला. राधा वाणीस्वरूपा होऊन; परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी रूपात, ज्ञान संवेद्यता प्रकट करू लागली.

भूलोकी शब्दब्रह्म ॐ स्वरूपातून अवघी वाणीरूपे प्रकट होऊन; अस्तित्वाच्या अवस्थेचा वैज्ञानिक शोध घेत, ज्ञानात्मक अवस्थेपर्यंत जाण्यासाठी; ज्ञानविज्ञानात्मक औपनिषदैक संवाद करू लागली. श्रुती, स्मृती, पुराणांचा, दर्शनांचा एकच विषय दिसू लागला. भूलोकींच्या मानवकेंद्रित सांस्कृतिक समूहसारणी, जीवनप्रणालीत राधाकृष्ण अद्वैताचे; सच्चिदानंदस्वरूप, केवल, निज, अविनाशी, मुक्त, स्वसंवेद्य, निर्गुण, निराकार, निर्विकार श्रीकृष्णरूप ठायीच कसे अनुभवता येईल, ही राधाकृष्ण लीला भक्ती आणि दास्ययोगाने सर्वांठायी कशी अनुभवता येईल; याचा ध्यास घेऊन ब्रह्ममानसपुत्र, ब्रह्मर्षी, देवर्षी, नारदमुनी अखंडपणे श्रीकृष्णांच्या नारायणस्वरूपाचा जपघोष करीत, राधाकृष्णाचा जागर प्रत्येक अस्तित्वात करण्याचा यत्न करीत होते. कृष्णमयी राधा मोठ्या कौतुकाने वत्स नारदांचा हा प्रयत्न अनुभवत होती.

कळत-नकळत नारदच राधाभावाने कृष्णस्वरूप होऊन; कीर्तनमग्नपणे राधाकृष्ण द्वैताचा अनुभव ठायी घेत होते. सत्य तथा कृत युगाच्या प्रवासात, ब्रह्मांडगोलकातील बालकाची महत्तत्त्व आणि महाशक्तीस्वरूप द्विधावस्था, अनेक द्विधा, युगुल रूपातून, सारणीमध्ये प्रवासतांना, नारदांनी अनुभवली होती.

प्रत्येक स्त्रीठायीची चैतन्यमयी राधा नारदांना जाणवत होती. तसेच प्रत्येक पुरुषाठायीचे चैतन्यस्वरूप श्रीकृष्णही नारदांना अवगत होत होते. या लीलाविग्रहाचे एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वांठायीची ही राधाकृष्ण रूपे, पंचभौतिक सृष्टीत, विकारवशतेने द्विधावस्थेलाच सत्य मानून विज्ञाननिष्ठेने, सारणीत प्रपंच मांडून होती.

कुटुंबापासून सर्वप्रकारे परस्परसंबंधांचे, वृत्ती, प्रवृत्ती, व्यवसाय, कर्मधर्ममीमांसेत अडकून, त्रितापयुक्त जीवनभोग भोगत होती. ठायीच्या आत्मरूपात्मक आणि त्यामुळेच चैतन्यमयी देहभावाने राधामयतेला पारखे होऊन; तात्कालिक सुखदुःखांच्या, जन्ममृत्यूपर्यंत भोगाव्या लागणाऱ्या, वासनामयतेत; ठायीच्या ज्ञानात्मक कृष्णस्वरूपाला, विस्मृतीच्या महामेघात ढकलून जगण्याची धडपड करीत होते. हे विश्वाचे आर्त, ठायीच जाणवणाऱ्या नारदांना स्वस्थ बसू देत नव्हते. म्हणूनच भक्ती आणि दास्यरूपाचे महात्म्य कथन करीत; राधाकृष्णभावाचे अखंड जागरण करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले होते. राधाकृष्ण युगुलाला नारदांच्या रूपाने ब्रह्मांडगोलकातील ते राधाकृष्ण द्वैताद्वैतभावातून,

समागमातून निपजलेले बालक अनुभवास येत होते! स्वतः त्या बालकासारखे चैतन्यकिवळा बनून नारद मनामनातील राधाभाव जागवित ठायीच कृष्णस्वरूप होण्याचा मंत्र देत फिरत होते.

वैवस्वत मन्वंतरातील सत्ययुगानंतर त्रेतायुगही आता संपुष्टात येत होते. श्री सीताराम रूपाने मानवी स्वरूपात कैवल्याची राधाकृष्ण लीला नारदांनी अनुभवली होती. समस्त सृष्टीचे स्त्रीरूप प्रतिदिन, कृष्णचैतन्याने गर्भधारणा करून प्रसवत होते. राधेच्या मनात या चक्रनेमिक्रमाने, अनेक प्रश्न निर्माण झाले होते. स्त्री आणि पुरुष ही रूपे म्हणजे केवळ एकविधतेची भासमान द्विधा रूपेच ना? राधाकृष्ण आणि कृष्णराधा हे अद्वैतच माझ्या रूपाने सर्वथा सृष्टीमय होऊन प्रकटले ना? या प्रकट रूपातील पंचविध तत्त्वांच्या साहाय्यानेच तर ही सगुण, साकार, सविकार अशी विज्ञानरूप पार्थिव देहरूपे निर्माण झाली. या सर्व रूपांना आपल्या मूळ कृष्णस्वरूपाची विस्मृती का व्हावी? राधा तर सदैव कृष्णास समर्पित आहे. चैतन्याच्या इच्छेनुसारच चैतन्यमयी राधा प्रकटली? ते चैतन्य स्वतः पुरुषरूप झाले. पुरुष आणि प्रकृतीचे मीलन विधिलिखितच आहे! तसेच मिलनानंतर पुनः प्रकृतीस्वरूप होण्यासाठी विग्रहही विधिलिखितच आहे. असे असताना देहरूपाला वासनापूर्ण देहाहंकार का घडावा?

माता, कन्या, प्रिया, भगिनी, योगिनी, रणगारिणी, अशुभमर्दिनी अशी राधारूपे केवळ सृष्टीचलनासाठी, कृष्णस्वभावाने म्हणजे अतीव कारुण्याने, प्रेममयी आविष्कार घडवितात ना? मन्वंतरात या स्त्रीरूपांची कुल्टा, व्यभिचारिणी, कर्कशा, कलहकृत्तिका, अशुभकारिणी, राक्षसी, वासनामयी अशी रूपे का निर्माण झाली? पराशक्तीची प्रेमभावना अशी अहंकारी कृत्ये करण्यास धजावते तरी कशी? चैतन्यतत्त्वाचे स्वरूप म्हणजे पुरुष. पिता, भ्राता, भ्रतार, सद्‌गुरू, सखा, प्रियकर, पुत्र, लडिवाळ बालक अशी रूपे चैतन्यमयी राधारूपांच्या प्रेममयी भक्ती आणि सेवाभावाशी एकरूप होण्यासाठीच कर्मशील असतात. ही पुरुषरूपे शोषक, भक्षक, व्यभिचारी, सत्तांध, कामांध होऊन प्रेममयी स्त्रीरूपांना अतिक्रूरपणे ओरबडण्याचे भ्रष्ट व्यवहार का करतात? स्त्रीरूपांसह सर्व सृष्टीवर प्रभूसत्ता का गाजवितात? प्रकृतीची पंचतत्त्वात्मक बहुविध, स्वैरप्राकट्यावस्था, सच्चिदानंदाचे स्वरूप अनुभवण्यासाठी स्वसंवेद्यतेने प्रकटली; तर त्यातून सच्चिदानंद स्वरूपाची, ठायीच विस्मृती होऊन; देहाहंकारी वासनाविकारांचे विरूप प्रकृतीचित्र का बरे निर्माण व्हावे?

राधा तर भक्तिरुपिणी, प्रेममयी, समर्पिता दास्यमयी आहे. तिला रणचंडिका,

लक्ष्मी, माया, असूरमर्दिनी अशी रूपे स्वीकारून राधारूपाचे विलोपन का करावे लागते? त्रेतायुगापर्यंतच्या प्रवासातून निर्माण झालेल्या जंजाळात भरच पडते आहे असे राधेला वाटत होते. रामायणातील स्त्रीकेंद्रित संघर्ष प्रधानतेत, स्त्रीरूप हेच समस्त जीवनाचे संमोहन आणि संघर्षकारण आहे असे प्रतीत होते आहे. अविनाशी सच्चिदानंदस्वरूपता येथे कोठेच नाही! ह्या भीषण संघर्षमयी दुःखभोगकारक विकारवशतेचा ब्रह्मगोलक म्हणजे श्रीकृष्ण आणि राधाकृष्ण वा कृष्णराधा असे द्वैताद्वैत अस्तित्व आहे का?

राधेला या प्रश्नांनी विद्ध केले होते. महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, आक्रमकता, सूड, मदांधता, कामांधता, सत्तांधता, प्रस्थापित सर्वकल्याणात्मक संस्कृतीसारणीत, अनाचार, दंभाचार, भ्रष्टाचार, निष्क्रियता, क्रियाभ्रष्टता, खलात्मक व्यवहार, श्रेष्ठकनिष्ठता यांच्या अंधारात; भ्रामकपणे अज्ञानवशपणे भरकटत त्रस्त पिशाच्चवत व्यवहार करणाऱ्या देव, दैत्य, दानव, मानव, गंधर्व, यक्ष, विद्याधर, अप्सरा, वान्नर, गरुड, नाग, जांबुवंत स्वरूपातील सर्व मानवी अस्तित्वे विकारवश का आहेत? राधाकृष्ण युगुलाचे बहु होऊन प्रकटणे, एवढे भीषण कसे?

ब्रह्ममानसपुत्रांनी कृष्णस्वरूपाचे वितरित केलेले ज्ञान प्रकृतीप्राकट्यात ठायीच नष्ट झाले की काय? ही सर्व राधाकृष्णांचीच रूपे आहेत का? मानवेतर जडचेतन सृष्टीला, मानवी स्वार्थासाठी विज्ञानवशस्वरूपात वापरण्याची मानवी बुद्धी सृष्टीच्या राधास्वरूपाला का बरे विकृत करीत आहे? आजवर झालेल्या अगणित मन्वंतरातून प्रवासतांना, वैवस्वत मन्वंतराप्रमाणे, राधेची प्रेममय भक्तिस्वरूप सेवावृत्ती कधीच एवढी बाधित झाली नव्हती! राधेची ही रूपे का झाली असावीत? प्रकृतीतील राधाभावच नष्ट झाला तर कृष्णतत्त्वच अपूर्णावस्थेत जाईल का? अवघा विनाश हेच का काल आणि अवकाशव्यापी कृष्णतत्त्वाचे सत्य? राधा हेच तर कृष्णाठायीचे अविनाशी सच्चिदानंदस्वरूप आहे; ते नष्ट कसे होईल? अविनाशित्वाचा विनाश कसा होईल? राधा प्रश्नजंजाळात गुरफटून गेली! काही क्षण श्रीकृष्णस्वरूपालाच ती वंचित झाली. राधेच्या या प्रश्नोद्रेकाने अवघी प्रकृतीच दुःखमयी झाली. चैतन्यमयी राधेची प्रेमधारा नष्ट होते की काय असे वाटू लागले!

द्वापारयुगाच्या पूर्वसंध्येला, उद्विग्नपणे, रासेश्वरी राधा भूलोकीच्या सर्वोच्च पर्वतशिखरांवर काल आणि अवकाशाच्या कृष्णविवरात आरपार खोल नजर लावून, अस्वस्थपणे कृष्णसख्याचे स्मरण करीत होती. काल आणि अवकाशातून, कृष्णमेघ दाटून राधेभोवती जमा होत होते याचे तिला भान नव्हते. भूलोकीला

प्रकाशमान करणारा सूर्यनारायण, राधादेवींच्या पाठीमागे पश्चिम क्षितिजावर आपली दाहकता स्वतःतच सामावून जणू त्या कृष्णमेघांमध्ये गडप झाला होता.

राधेची अगणित तेजस्वी प्रकाशमान रूपे राधेला पुनर्चैतन्यमयी करण्याचा केविलवाणा प्रयत्न अवकाशातून, कृष्णमेघांना छेदून अट्टाहासाने राधेत स्वतःला सामावून घेण्याचा प्रयत्न करीत होती. राधेला त्यांची चाहूलही लागत नव्हती. कृष्णमेघ दाटतच गेले. अवघे कृष्णमय झाले. 'रात्रकाळी घागर काळी, यमुनाजळही काळे हो माय' याप्रमाणे राधाही कृष्णमय होऊ लागली. राधेचे अस्तित्व तरल झाले. प्रश्नजंजाळातून अलगद निसटून प्रेमपाशात आपण गंधित होऊन विरघळून जातो आहोत, असे वाटू लागले.

*सा विरहे तव दीना*
*माधव मनसिज – विशिख – भयात् इव भावनया त्वयि लीना ।।ध्रु।।*
*निन्दति चन्दनम् इन्दु किणम् अनुविन्दति खेदम अधीरम् ।*
*व्याल – निलय – निलनेन गरलम् इव कलयति मलय – समीरम् ।।१।।*
*अविरल – निपतित – मदन – शरात इव भवत् – अवनाय – विशालम् ।*
*स्व – हृदय – मर्मणि वर्म करोति स – जल – नलिनी – दल जालम् ।।२।।*
*कुसुम – विशिख – शर – तल्पम् अनल्प – विलास कला कमनीयम् ।*
*व्रतम् इव तव परिरम्भ – सुखाय करोति कुसुम – शयनीयम् ।।३।।*
*वहति च चलित – विलोचन – जलधरम् आनन – कमलम् उदारम् ।*
*विधुम इव विकट – विधुंतुद – दन्त – दलन – गलित – अमृत – धारम् ।।४।।*
*विलिखति रहसि कुरङ्ग – मदेन भवन्तम् असन – शर – भूतम् ।*
*प्रणमति मकरम् अधः विनिधाय करे च शरम् नव – चूतम् ।।५।।*
*प्रतिपदम् इदम् अपि निगदति माधव तव चरणे पतिता अहम् ।*
*त्वयि विमुखे मयि सपदि सुधा – निधिः अपि तनुते तनु – दाहम् ।।६।।*
*ध्यान – लयेन पुरः परिकल्प्य भवन्तम् अतीव दुरापम् ।*
*विलपति हसति विषीदति रोदिति चञ्चति मुञ्चति तापम् ।।७।।*
*श्री – जयदेव – भणितम् इदम् अधिकम् यदि मनसा नटनीयम् ।*
*हरि – विरह – आकुल बल्लव – युवति सखी – वचनम् पठनीयम् ।।८।।*

(गीत गोविंद, जयदेव, भावानुवाद- आनंद साधले, संकलक- प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, नगर, ५ जून २०१९, आठवी अष्टपदी, पृ. ४३, राग- कर्नाटकी, ताल- त्रिताल)

कृष्णमीलनाच्या स्वप्नात राधा कृष्ण स्वरूप होण्यासाठी आतुर झाली.

''राधे, राधे, राधेऽऽऽ'' हाका कर्णरंध्रात शिरण्याचा प्रयत्न करीत होत्या. रोम रोम पुलकित होत होता तरी राधेची उद्विग्नता मात्र संपत नव्हती. मुरलीचे मधुर सूर राधेला विळखा घालून तिच्या कानातून मनात शिरले. राधा मुग्ध होत गेली ''कृष्ण!'' राधेच्या मुखातून कैवल्य मुखर झाले.

''होय राधे तुझा कृष्ण!'' कृष्णसख्याच्या या मोहनवाणीने राधा मनोमनी मोहरून कृष्णाच्या हृदयात अलगद शिरली.

''राधे, कसा हा उद्विग्नपणा?'' कृष्णाने विचारले.

''चैतन्यमयी राधेच्या भूलोकी मानवी रूपांत ही विरुपतता कशी?'' राधा कृष्णाच्या अंतरात सच्चिदानंदस्वरूप होतांना उद्गारली.

''राधे, विज्ञानात्मक विवर्ताच्या दर्शनात ही रूपे ज्ञानापासून वियोग अनुभवतात. हा वियोग विवर्त अवस्थेत पंचतत्त्वात्मक संघटन विघटन चक्रात, पार्थिव देह स्वरूपात वासनाविवश होतो. त्या वैज्ञानिक अवस्थेलाच शाश्वत सत्य मानतो. त्यासाठी देहाहंकाराने त्याच्या ठायी विरुपता येते.''

''राधे, कृष्णरूपे काय किंवा राधारूपे काय, विवर्तानि विलग झाली की संयोगासाठी धडपडू लागतात. संघर्ष करू लागतात. वासनेच्या दंभकारी राग, लोभ, मद, मत्सर, असूया, द्वेष, स्पर्धा, वितंड यांच्या कोषात अडकतात. यामुळेच तात्कालिक, अशाश्वत, भ्रामक, मर्त्य, क्षणभंगूर, असत्य अशा अवस्थेला, देहभावाने सत्य मानून भोग भोगू लागतात. या भोगांच्या अतिरेकानेच ती रूपे शाश्वत, अविनाशी, निखळ आनंदासाठी आतूर होतात. मर्त्यतेच्या कचाट्यात क्षणिक उद्दिष्टपूर्तीलाच सुख मानतात. तात्कालिकतेच्या जाणिवेने ती रूपे शाश्वतासाठी अशांत, आतूर, व्याकूळ, आर्त होऊन शाश्वत अशा सच्चिदानंद अनुभूतीसाठी पुन्हा राधाकृष्णस्वरूप होण्यासाठी अतिव्याकूळ होतात. तात्कालिक सुखदुःखे हाच तर पंचतत्त्वात्मक विग्रहपूर्ण पंचविधतेच्या प्रपंचाचा परिपाक असतो! हा भोगणे म्हणजे शाश्वत अशा सच्चिदानंदस्वरूप प्राप्तीसाठीचा विरह भोगणे होय! या भवनदीच्या पलिकडे झेपावण्यासाठी विरहार्त व्हावे लागते.''

''हे राधे, राधाकृष्ण असे द्विविधात्मक विग्रह झाले की वियोगाच्या संवेदनेने विरहार्तता भोगून; असा शाश्वताचा एकविधतेचा अनुभव घेण्यासाठी पुन्हा काल

आणि अवकाशव्यापी श्रीकृष्ण होतात. विरहार्ततेशिवाय सच्चिदानंदस्वरूपाला सोलीव सुख कसे अवगत व्हावे? यासाठीच तर सच्चिदानंदस्वरूपाला राधारूपाने विश्वोत्पत्तिस्वरूप घेऊन; प्रपंचमयी व्हावे लागते!''

सत्य चैतन्यमयी राधेला शाश्वत आनंदमग्न होण्यासाठी, विवर्तातील वियोगानुभूतीच्या विरहार्ततेची महानता श्रीकृष्ण सांगत होते.

काल आणि अवकाशात राधाकृष्ण कृष्णस्वरूप होऊन, अविनाशी परिपूर्ण शाश्वत सच्चिदानंद विग्रहाचे गुह्य ज्ञान, आसमंतात प्रेरित करीत होते. हे गुह्यज्ञान देवर्षी ब्रह्ममानसपुत्र नारद नारायणस्वरूप समाधीमग्नतेने श्रवण करीत होते. ज्ञान प्रकाशले आणि राधाभाव पुन्हा उसळून आला. जगत्कल्याणासाठी सच्चिदानंदाचे सर्वांभूती जागरण करण्यासाठी नारायण मंत्राचा घोष झाला. घोष करीत प्रवास सुरू करतांना चराचरातून राधानाम घोष प्रतिध्वनित होण्याचा अपूर्व अनुभव नारद घेत होते.

नारदांच्या मनी आले वैवस्वत मन्वंतरात ही राधाकृष्णलीला मानवी स्वरूपात सगुण साकार सविकारतेने मानवाला अनुभवता आली तर...! आकाशवाणी झाली ''हे ब्रह्मर्षी नारदमुने, तू राधाकृष्ण प्राकट्याचा सूत्रधार आहेस. तुझ्या माध्यमातून हे सत्य ज्ञान भक्तिमार्गे सर्वांना प्रेरित होणार आहे. द्वापारातही राधाकृष्ण लीला मानवी स्वरूपात यमुनातीरी अनुभूत होईल. गोलोकीची राधा, मानवी पार्षद स्वरूपात गोकुळात प्रकटेल. भक्तिप्रेमरूपा राधा राधाकृष्ण लीलाविग्रहाचे मनमोहक संगीत यमुनातीरी कुंजवनात, वृंदावनात घुमवेल आणि प्रेमस्वरूपा भक्तीचा योगमार्ग तुझ्याच मुखाने अवघ्या भूलोकी मोठ्या रंजक नाट्यमयतेने प्रेषित करील!''

परावाणीने जणू वैखरीला आशिर्वचन उद्गारले. नारदमुनी अतीव आनंदाने नृत्य करीत 'राधाकृष्ण' भजनात समाधीमग्न झाले. काल आणि अवकाशव्यापी कृष्णस्वरूपातून राधेचे प्रेमस्वरूपा, विरहार्त व्याकूळ रूप विश्वव्यापकपणे प्रकट होत गेले.

●●●

। ८ ।

# रासलीला मणिपुरी

काल आणि अवकाशाच्या अथांगतेत, राधाकृष्ण रासलीला मांडली गेली होती. ब्रह्मांडगोलकव्यापी प्राकट्यातून रासलीलेचे लयतालसूर माधुर्यपूर्णतेने ब्रह्मांडगोलकाला शृंगधुंद करीत होते. कैवल्याची, राधाकृष्ण प्रणय लीला अवघ्या ब्रह्मांडगोलकातील भूलोकीही व्यापून होती. अवघे अस्तित्वच जणू प्रणयधुंद झाले होते. राधाकृष्ण रासलीलेच्या संगीत माधुर्याने कृष्णचिंतनात ध्यानमग्न भगवान शिवही संमोहित झाले. रासलीला नाट्य अनुभवण्याची उत्कट प्रेरणा त्यांना ध्यानमग्न होऊ देईना.

''नाथ आज मध्येच समाधी विसर्जित केलीत?'' शक्तिमाता म्हणाल्या.

''प्रिये राधाकृष्ण रासमंडनाचा संगीत ध्वनी तुझ्या कानी येत नाही का?'' शिवांनी विचारले.

''नाही कसं? मी तर केव्हांपासून या संगीत लहरींनी भारावून गेले आहे. नाथ या संगीतलहरींवर आपणासवे प्रणयनृत्य करण्याची उर्मी अनावर होते आहे. पण आपण ध्यानमग्न...'' माता म्हणाल्या.

''प्रिये, त्या संगीतलहरींनी मला विद्ध केले आहे. रोम रोम प्रणयोत्सुक होत आहे. पण, प्रिये...'' शिव अडखळले.

''पण काय नाथ?'' शिवांनी उत्सुकतेने विचारले.

''काल आणि अवकाशव्यापी कृष्णतत्त्वातून विवर्त झालेल्या राधाकृष्ण युगुलाचे हे रासमंडन आजवर प्रत्यक्ष नेत्रांनी का बरे आपल्याला पाहाता आले नाही? त्या नृत्यसंगीतलहरींनी, नर्तन-वादन-गायनासह रासक्रीडेच्या संगीतलहरींनी सृष्टीठायी चैतन्य संचारते हे मात्र मी अनुभवतो आहे. वस्तुतः कृष्णाचे अखंड चिंतन करूनही मला हे का बरे अनुभवता आले नाही?''

शिवांनी पार्वतीदेवींना विचारले.

''हे प्राणेश्वरा, राधाकृष्णस्वरूप असे आपण उभयतां असतांना, त्यांचे नृत्य ठायीच सुरू असतांना, ते पृथकपणे कसे पाहता येईल? आपणच राधाकृष्ण आहोत ना?'' पार्वतींनी ज्ञानात्मक आशय निवेदित केला.

''परंतु प्रिये, आपले अस्तित्व तर पृथकपणे शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी आणि ब्रह्ममाया अशा त्रिविधतेने प्रकट आहे. जर हे प्राकट्य पृथकपणे द्वैत भावाने अनुभवता येते तर राधाकृष्णांचे रासमंडनही पृथकपणे पाहता आलेच पाहिजे!'' शिव विज्ञाननिष्ठेने म्हणाले.

''प्राणेश्वरा, काय हा अल्लडपणा! ठायीच येणाऱ्या अनुभूती राधाकृष्णरूपात पृथकपणे पाहण्याचा अट्टाहास!'' पार्वतींनी समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

''हे प्रिये स्वरूपाला आपले निजरूप प्रकृतीस्वरूपात अनुभवण्याची इच्छा झाली ना? तसेच हे!'' शिव ठामपणे म्हणाले.

''अगदी बालहट्ट असल्यासारखेच हे आहे!'' पार्वतीमाता म्हणाल्या.

''मी आत्ताच तप आरंभितो आणि श्रीकृष्णांकडे हट्ट धरतो.'' शिव तरातरा आपल्या ध्यानआसनावर स्थानापन्न झाले. पार्वतीमातांनी राधालीला मांडावयाचे ठरविले. पाहाता-पाहाता शिव श्रीकृष्ण स्मरणात समाधीमग्न झाले. काळ लोटला. कैवल्यलीलेअंतर्गत द्वापाराच्या पूर्वसंध्येला ही लीला विधिलिखितच होती.

कृष्णभगवंत शिवांसमोर प्रकट झाले.

''वत्सा उठ, मी तुझ्या हट्टाग्रहाने प्रसन्न झालो आहे!'' श्रीकृष्ण म्हणाले.

भगवान शिव परमात्मा श्रीकृष्णांना शरण गेले.

''वत्सा, तुझी इच्छा तरी काय?'' श्रीकृष्णांनी विचारले.

''हे देवाधिदेव, आपल्या गोलोकातील राधाकृष्ण रासलीला संगीतलहरींनी अवघा ब्रह्मांडगोलक व्यापला. रासलीला संगीतलहरींची अनुभूती पुरुष-प्रकृतीस्वरूप शिवपार्वतींनी घेतली. परंतु...'' महादेव निवेदन करू लागले.

''परंतु काय महादेवा?'' श्रीकृष्णांनी विचारले.

''हे परमात्मा, आपण तर सारेच जाणता! माझ्या ठायी संवेदित झालेला हेतू आपणापासून कसा बरे अज्ञात राहील?'' महादेवांनी परमात्म्यांनाच गळ घातली.

''हे महादेवा, वास्तविक प्रत्येक लोकी शिव, विष्णू, ब्रह्मा, महाकाली, महालक्ष्मी महामाया स्वरूपात मीच प्रकट आहे. आपण त्रिविधस्वरूपात राधाकृष्णच आहात. ही रासलीला म्हणूनच आपल्या ठायी स्वाभाविक संवेदित

आहे. मग द्वैतभावाने पृथक रासलीला अनुभवण्याचा तुझा हट्ट का बरे?'' श्रीकृष्णांनी तत्त्व-विवर्त-विग्रहाची स्मृती जागृत केली.

''हे परमात्मा, भूलोकीच्या जीवांना ही रासलीला जीवदशेत अनुभवता आली तर त्यांना सच्चिदानंद ठायीच कर्मशील सारणीत भोगता येईल.'' महादेव म्हणाले.

''भूलोकीच्या जीवांविषयीची ही आसक्ती, जीवांना विज्ञानातच प्रपंचसारणीत अडकविल आणि रासलीलाही तात्कालिक आनंद प्रतीत करणारी ठरेल. परमात्म्याच्या लीलाविग्रहात विक्षेप घडेल. त्याकरिता राधाकृष्ण रासलीलेची अनुभूती राधाभावाने ठायी अनुभवणेच योग्य नव्हे काय?'' परमात्म्यांनी समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

''देवाधिदेवा, प्रकृती प्राकट्याचा अनुभव हा तर राधाप्राकट्याचा वैज्ञानिक अनुभव आहे. जीवदशा हा त्या प्रकृतीचाच भाग आहे. जीव ही द्वैतभावाने राधाकृष्णलीलाच आहे ना! म्हणूनच राधाकृष्ण रासलीलेचा अनुभव जीवदशेलाच भोगता यावा. यासाठी आपण मला, रासलीला प्रत्यक्ष पृथकतः पाहाण्याची इच्छा झाली आहे.'' महादेवांनी हट्टाग्रह धरला.

''हे महादेवा, कृष्णस्वरूपाच्या निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, केवळ, सच्चिदानंदस्वरूप, महाशून्य, आत्मरूप हे तर प्रकटही नाही आणि अप्रकटही नाही. ही विवर्तयोगाने लीलाविग्रहस्वरूप राधाकृष्ण रासलीला केवळ ठायीच संवेदित आहे. अवघी द्वैतभावे प्रकटलेली प्रकृती म्हणून स्पंदने सारखी जन्ममृत्यू फेऱ्यात युगानुयुगे, लीलाविग्रहात आभासात्मक, तरी सच्चिदानंदस्वरूप आहे! या अवस्थेत राधाकृष्ण रासलीलेचा अनुभव म्हणजे केवळ लीलाविग्रह विलास ठरेल. प्रकृती ही वैज्ञानिक सत्य असली तरी अविनाशीस्वरूपातील परिवर्तनामुळे, संघटन-विघटन स्वरूपातील लीला आहे. महालप्रलयसमयी, ही लीला कृष्णस्वरूप शाश्वत अशा राधारूपाने कृष्णा ठायीच सामावेल हे आनंदमय चैतन्यस्वरूप सत्य तू जाणतोस. यासाठीच तर त्रिविध महत्तत्त्व आणि महाशक्तीस्वरूपात माझा विग्रह होऊन, पंचविधतेने जीव, जगत आणि जगदात्मा यांचे नियमन नियतपणे घडत आहे, होय ना?'' श्रीकृष्णाने महादेवांची पुन्हा समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

''हे परमात्मन्, आपल्या ठायीची स्वसंवेद्यता अनुभवण्यासाठीच तर ठायीची सत्य, चैतन्य, आनंदस्वरूप धारा राधामयी होऊन प्रकट आहे. तसेच प्रत्येक जीवाला ठायीचे राधास्वरूप संवेदित होऊन प्रेम आणि सेवाभावाने पुन्हा आत्मरूप

होता यावे यासाठीच हा माझा हट्ट आहे. राधाभावे जीव परमात्म्याशी एकरूप होण्याचा योग साधता यावा, अशा भक्तियोगासाठीच माझा आग्रह आहे.'' महादेवांनी हट्ट धरला. श्रीकृष्णांठायीची वत्सलभावी राधा प्रसन्न झाली.

''तथास्तु! परंतु...'' श्रीकृष्णांना मध्येच थांबवित महादेवांनी विचारले.

''परंतु काय, परमात्मन्?''

''हे वत्सा, मी तुला राधाकृष्ण रासलीला समीप उपस्थित राहून ऐकण्याची परवानगी देतो. तुझ्या ठायीच्या स्वसंवेद्य आत्मरूप योगानेच तुला ही रासक्रीडा अनुभवता येईल. ती तुला पाहाता येणार नाही. तू पाहण्याचा मोह केलास तर आत्मज्ञान स्वरूपात आकलित होईल. अन्यथा...'' श्रीकृष्णांनी अट घातली.

''मी अन्यथा, होऊच देणार नाही!'' महादेव आत्मनिश्चयाने म्हणाले.

''हे वत्सा, अन्यथा तुला अवगत झालेले, नृत्य केवळ नाट्यस्वरूप असे राधाभावे भक्तीचे साधन होईल! राधाकृष्ण ज्ञानमय रासलीला नव्हे! हाच माझा लीलाविग्रह आहे.'' एवढे सांगून श्रीकृष्ण पुन्हा काल आणि अवकाशात सामावले.

श्रीकृष्ण आणि शिवांचा हा संवाद दोन अस्तित्वे लक्षपूर्वक ऐकत होती. एक प्रत्यक्ष महादेवी आणि त्यांच्याच अनुमतीने उपस्थित झालेले देवर्षी नारदमुनी.

''हे महादेवा, आम्ही खरोखरीच भाग्यवान आहोत! पार्वतीमाता म्हणाल्या.

''म्हणजे?'' महादेव गडबडले.

''वत्स नारदही माझ्या सवे हे गुह्यातिगुह्य दिव्य ज्ञान आपल्या सान्निध्यात ग्रहण करीत होते.'' महादेवांनी स्पष्ट केले. शिवांनी विजयी मुद्रेने नारदांकडे पाहिले.

''देवी आता राधाकृष्ण रासलीला मला प्रत्यक्ष अनुभवता येणार! मला अनुभूत झाले की ते ज्ञान मी तुला आणि नारदांना वितरित करील. हे देवी आपणही असे रासनृत्य करू.''

''नारायण, नारायण! हे ईश्वरा, महादेवा मी धन्य झालो. राधाभावाचा प्रचार, प्रसार करण्याचे माझे व्रत अधिक सफल होणार! मला अनुग्रहित करावे.'' नारदांनी प्रार्थना केली.

''तथास्तु!'' महादेवांनी अतीव आनंदाने नारदांना आश्वासित केले.

राधाकृष्ण रासलीला नृत्य सुरू झाले. अगणित कृष्ण अगणित राधा अवकाशात व्यापून, मंडलात नृत्य सुरू झाले. वसंतरास सुरू झाली. कृष्ण राधा प्रणयाराधन करू लागले. नृत्याची लय, गती, माधुर्य आणि पदन्यास यांच्या आवाजाने अवकाश धुंद झाले. श्रीकृष्णाच्या अटीप्रमाणे भगवान शिव रासलीला

नृत्य प्रयोगाकडे पाठ करून रास संगीत ऐकू लागले. प्रणयाराधन नृत्याने काही काळातच शिवांचे भान हरपून गेले. शिव स्वतःच नृत्य देवता नटराज असल्यामुळे त्यांचे रोम रोम रासनृत्य करू लागले. रासमंडळात अगणित राधा अगणित कृष्ण नृत्य करीत होते. निजकृष्ण आणि निजराधा कोणती हे आकलित होत नव्हते. त्यातच श्रीकृष्ण मोठ्या नाट्यमयतेने प्रणयाराधना करीत होते–

*दृश्यसे पुरतः गत – आगतम् एव मे विदधासि ।*
*किन् पुरा इव स – सम्भ्रमम् परिरम्भणम् न ददासि ।।६।।*
*क्षम्यताम् अपरम् कदापि तव ईदृशम् न करोमि ।*
*देहि सुन्दरि दर्शनम् मम मन्मथेन दुनोमि ।।७।।*

–––

*भ्रु–पल्लवम् धनुः अपाङ्ग – तरङ्गितानि*
*बाणाः गुणः श्रवण – पालिः इति स्मरेण ।*
*तस्याम् अनङ्ग – जय जङ्गम – देवतायाम*
*अस्त्राणि निर्जित – जगन्ति किम् अर्पितानि ।।५।।*
*भ्रू–चापे निहितः कटाक्ष – विशिखः निर्मातु मर्म–व्यथाम*
*श्याम– आत्मा कुटिलः करोतु कबरी – भारः अपि मार–उद्यमम् ।।*
*मोहं तावत् अयम च तन्वि तनुताम् बिम्ब–अधर : रागवान्*
*सद्वृत्तः स्तन – मण्डलः तत्र कथम् प्राणैः मम क्रीडति ।।६।।*
*तानि स्पर्श – सुखानि ते च तरलाः स्निग्धाः दृशोः विभ्रमाः*
*तत् वक्त्र – अंबुज – सौरभम् स च सुधा–स्पन्दी गिराम् वक्रिमाः*
*सा बिम्ब–अधर–माधुरी इति विषय – आसङ्गे अपि मत्–मानसम्*
*तस्याम लग्न – समाधि हन्त विरह – व्याधिः कथम् वर्धते ।।७।।*

शिव रासनृत्य संगीत श्रवणात मग्न झाले होते. प्रणयराधनेनंतर, कुंजरास सुरू झाली. राधाकृष्ण लताकुंजात पुष्पशय्येवर बसून प्रणयचेष्टा करू लागली. मध्येच महारास प्रकारातील विप्रलंभ शृंगाराने विरहव्यथांचे उत्कट दर्शन घडू लागले. अखेर नित्यरास प्रकारातील अखंड प्रणयनृत्य रंगले. महादेव समाधीमग्नतेने नृत्य ठायीच अनुभवत होते. नटराजांना नृत्याचे लय, गती, माधुर्य व पदन्यास आकलित झाला होता. परंतु राधाकृष्ण रासलीलेतील वसंतरास, कुंजरास, महारास, नित्यरास अनुभवतांना शिवपार्वतीच रासलीला करीत आहेत असे जाणवू लागले. नृत्यप्रयोगाचे साक्ष दर्शन घ्यावे असा मोह अनावर झाला. मोह अधिकच अनावर झाला. अट विसरून शिव रासलीलेला सामोरे झाले. त्याक्षणी

नृत्य बंद झाले.

''नारायण, नारायण!'' नारदमुनींची स्वारी नेमकी उपस्थित झाली.

''भगवन्, महादेवा, आपण हे काय केले? श्रीकृष्णांची अट विसरलात?'' शिव खजील झाले. तो पार्वतीमाताही समीप आल्या.

''नाथ अहो हे काय? रासच बंद झाली. किती अलौकिक आनंदमय अनुभूती येत होती. आपणच रास मांडली आहे असे वाटत होते!'' महादेवी म्हणाल्या. शिव आणखी खजील झाले. परंतु त्यांनी मनाशी निश्चय केला.

''हे प्रिये, अट पालन झाली नाही हे खरे, परंतु रासलीला नृत्य मला अवगत झाले आहे. ते भक्तिसाधन म्हणून आपण मांडूया. मात्र त्यासाठी तुझी साथ हवी!'' शिवांनी संकल्प केला.

''आपण दोन का आहोत, परंतु...'' देवी बोलत होत्या.

''परंतु काय देवी, आपण रासलीला नृत्य प्रयोग मांडुयाच. विष्णूलक्ष्मी, ब्रह्ममाया यांनाही यात निमंत्रित करूया.'' शिव पार्वतींशी परामर्श करीत होते.

''भगवन्, ही कल्पना उत्तम आहे!'' नारदांनी दुजोरा दिला.

''नाथ, शिव नृत्य अवलंबिणार म्हणजे त्रिविधतेतील सर्वांनाच त्यात स्वाभाविकपणे सहभागी व्हावेच लागणार!'' पार्वतीमाता म्हणाल्या.

''भगवन् महादेवा, आपण श्रीकृष्णांशी संवाद साधला तर...?'' नारदांनी सुचविले.

''नाथ, नारदांचा परामर्श योग्य वाटतो. त्यामुळे निश्चित कल्याणाचा मार्ग निघेल.'' पार्वतीमातांनी दुजोरा दिला.

महादेवांना अपराधी भावना विव्हल करीत होती. त्यांनी दोघांच्या परामर्शाप्रमाणे अपरिहार्यपणे श्रीकृष्णांचे ध्यान केले. श्रीकृष्ण प्रकट झाले.

''वत्सा, तुला घातलेली मर्यादा तू ओलांडली आहेस. त्यामुळे तुला अवगत झालेले नृत्य हे केवळ तात्कालिक मनोरंजक नाट्य म्हणून सादर होईल. मात्र राधाभावे म्हणजे प्रेमपूर्वक सेवा भक्तियोग म्हणून ते सादर केले तर भक्तियोगाने भक्ताला ज्ञान प्राप्त होईल.''

''परमेश्वरा, मी आपणास शरण आलो आहे. माझ्याकडून आगळिक झाली आहे. मला क्षमा करावी. हे भगवन् रासलीला हे भक्तियोगाचे साधन म्हणून सर्वसामान्य माणसालाही अवगत व्हावे, अशी माझी इच्छा आहे. हे भगवन् त्रिविध ईश्वर आणि शक्तिरूपांच्या सहाय्याने भक्तियोग सिद्ध व्हावा आणि सच्चिदानंदस्वरूपाची अनुभूती सर्वांना मिळावी. आपण आपल्या प्रकृती रूपांवर

एवढी कृपा करावी.'' शिवांनी प्रार्थना केली.

''हे शिव महादेव, तू सर्वांच्या सायुज्यमुक्तिसाठी प्रार्थना करीत आहेस म्हणून तुझी इच्छा मी पूर्ण करील. विष्णू-लक्ष्मी, शिव-शक्ती, ब्रह्म-माया यांची भक्ती करतांना हीच राधाकृष्णस्वरूपे मानून अनन्यभक्तीने रासनृत्य केले तरी; अनन्यभक्त माझ्या ठायी येतील. त्रिविध ईश्वरांच्या आणि त्यांच्या अवतारांच्या रूपांना भक्तिभावे प्रसन्न करण्यासाठी रासनृत्याचा उपयोग होईल. भूलोकीच्या जनलोकांसाठी त्वा रासनृत्याची परंपरा शिव-शक्ति स्वरूपात सिद्ध करावी. मानवलोकी त्या नृत्याची परंपरा निर्माण होऊन; ज्ञान आणि मनोरंजनाचा मार्ग प्रशस्त होईल. तथास्तु!'' श्रीकृष्ण उःशाप देऊन कल्याणाचा मार्ग सांगून अंतर्धान पावले.

नृत्याचा सर्व तपशील नटेश्वरांच्या चांगला ध्यानात आला होता. तांडवाच्यापेक्षा वेगळा असा नवा नृत्यप्रकार सिद्ध करण्याचा संकल्प शिवांनी केला. हा नृत्यप्रकार प्रेममय, विलोभनीय आणि चित्तवृत्ती दंग करून प्रेमोत्कर्ष साधणारा असल्यामुळे तो लोकप्रिय होईल, हे पार्वतींचे म्हणणे शिवांनी मान्य केले होते. शिवांनी शक्ती आणि तिच्या सर्व रूपांना व सख्यांना नृत्यप्रकार शिकवून तयार केले. लौकिकात समूहनृत्य करण्यासाठी सपाट समतल भूमीची आवश्यकता होती. कैलासी ते शक्य नव्हते. सपाट भूमी असलेली एक दरी त्यांनी नियोजित केली. परंतु ती पाण्याने भरलेली होती. त्रिशुलाला आज्ञा देऊन त्यांनी ते पाणी इतरत्र वळविले.

नृत्यास योग्य अशी भूमी निमाण झाली. या भूमीवर प्रत्यक्ष ईश्वराने आणि शक्तीने राधाकृष्णाचे अनुकरण करीत समूहाने रासनृत्य मांडले. हे नृत्य प्रकाशमान करण्यासाठी शिवांच्या गळ्याभोवतीच्या मणीधारी नागराजांनी, आपल्या मस्तकीचा मणी प्रकाशमान केला. नृत्य सुरू झाले. स्वाभाविकपणे त्रिदेव आणि त्रिशक्तींची अगणित मानवी रूपे त्यांत सहभागी झाली. नागमण्याच्या तेजस्वी प्रकाशपुरात अभिनव रासलीला रंगली. वसंतरास, कुंजरास, महारास आणि नित्यरास सर्व प्रकार सादर करतांना राधाकृष्णस्वरूप सर्व रूपे राधाभावाने रास करण्यात मग्न झाले. मणीप्रकाशात मणिपुरी नृत्यपरंपरा सुरू झाली. त्रिदेवांच्या आराधनेत रासलीला भक्तिमार्ग सिद्ध झाला.

●●●

। ९ ।

# भूमीकन्या

द्वापाराची सुरुवात होती. गोलोकात वृषभानु राजा राज्य करीत होता. प्रजाहितदक्ष राजा म्हणून त्याची ख्याती होती. धर्मशील श्रद्धावान, सकलशास्त्रकलानिपुण असा वृषभानू, पुण्यश्लोक म्हणून त्रिखंडात कीर्तिमान होता. त्याची पत्नी वृषभानुच्या गुणवैभवाची कीर्ति प्रसिद्ध करणारी पुण्यशालिनी सती होती. कीर्ति हे या सतीचे नाव तिच्यातील पतिव्रता स्त्रीला, शोभा देत होते. आपल्याला कन्यारत्न असावे अशी उभयतांची इच्छा होती. आपली इच्छा भगवंताकडे परोपरीने वेळोवेळी व्यक्तही केली होती. कन्या म्हणजे प्रपंचाचे कीर्तिमान होय; अशी उभयतांची धारणा होती. जणू परमेश्वराची निजशक्ती म्हणजे कन्या अशी उभयतांची मनोभूमिका होती.

वृषभानुपत्नी कीर्तिराज्ञी, कन्येसाठी अति व्याकूळ होती. शक्ती, लक्ष्मी, भूमी, विद्या, कला ही सर्व रूपे कन्येतच अनुभवता येतील असे तिला वाटे. कन्येशिवाय आपल्या जीवनाला पूर्णत्व नाही, असे तिला सतत वाटे. कन्याप्राप्तीसाठी ती आपल्या पतीकडे हट्टाग्रही होती. एके दिवशी कीर्तिराज्ञी कन्येसाठी अति आर्त झाली. राजा वृषभानुने यज्ञद्वारा करुणा भाकण्याचा संकल्प करून; यज्ञभूमी संशोधनासाठी प्रयत्न सुरू केले. गोलोकातील एका रम्यस्थळी, वृक्षराजींच्या सान्निध्यात, पवित्र जलप्रवाह खळाळून प्रवाहित होता. पक्ष्यांचे मधूररव संगीत आसमंतात नादब्रह्म उजळीत होते. शीतल सौम्य वायू आपल्या आनंदलहरींनी वनात रुंजी घालीत होता. पलिकडे हरिणांचे कळप वायुलहरींसवे, जल लाटांपरी वनात झेपावत होते.

''हे प्रिये हे स्थळ यज्ञ करण्यासाठी मला योग्य वाटते. येथे समतल भूमीही आहे.'' वृषभानुने कीर्तिराज्ञींशी परामर्श करण्याचा प्रयत्न केला. कीर्तिराज्ञी त्या

वनात हरवून गेली होती. भावसमाधी लागली होती. पतीचे भाषण ऐकून ती काहीशी भानावर आली.

''हं! आपण काही म्हणालात?'' कीर्तिराज्ञी म्हणाली. राजा वृषभानुने तिची भावावस्था जाणली. कीर्तिराज्ञींची इच्छा येथे सफल होईल, या निश्चयाने वृषभानुने पुन्हा यज्ञ प्रस्ताव पत्नीसमोर मांडला.

इ'होय, नाथ आपले म्हणणे योग्य आहे. सृष्टीचे कन्यारूप मला येथे साक्ष देत आहे. आपण येथेच संकल्प यज्ञ करूया!'' कीर्तिराज्ञी म्हणाली.

''मलाही तुझे म्हणणे योग्यच वाटते. यज्ञासाठी भूमी सिद्ध करूया!'' राजा वृषभानू सरसावला.

वृषभानुने समतल विस्तीर्ण भूमी शोधली. वाहत्या निर्झरातून कीर्तिराज्ञींनी घडा भरून पाणी आणले. प्रोक्षणपूर्वक ती समतल भूमी शुचिर्भूत केली. यज्ञभूमी स्वच्छ करण्यास सुरुवात केली. आवश्यक ती भूमी स्वच्छ झाल्यावर यज्ञवेदीसाठी भूमी सिद्ध करण्यास वृषभानुने सुरुवात केली. तेव्हढ्यात त्याचे लक्ष, त्या भूमीच्या पृष्ठ पदराआड काही हालचाल होते आहे याकडे गेले.

''कीर्तिदेवी हे बघा येथे काही आहे!'' वृषभानुने राज्ञींचे लक्ष वेधले.

''खरंच की काय असावे बरं?'' कीर्तिदेवींनी प्रश्न केला.

राजा वृषभानुंनी अलगद हात पुढे ओढवले. पृष्ठभूमी हळूवारपणे फेडण्याचा प्रयत्न केला. भूमीतून अलगद अंकुर वर यावा तसे कमलपुष्प प्रकाशित झाले. त्या कमलपुष्पात नवजात अतितेजस्वी, संमोहक, आनंदमयी बालक, आतुरतेने कीर्तिदेवींकडे पाहाते आहे असे वाटत होते. कीर्तिदेवींचे वात्सल्य उसळत्या धारेप्रमाणे प्रकटले. अधिरतेने त्या अर्भकाकडे सरसावल्या.

''देवी, कन्या, भूमीकन्या, ही कमलजा! अतीव सुंदर कोठून आणि कशी बरं ही प्रकटली असावी?'' वृषभानु औत्सुक्याने बोलत होता. कीर्तिदेवी जणू भान हरपल्या होत्या. त्यांनी त्या कमलपुष्पातील क्रीडामग्न कन्येला उचलून हृदयाशी धरले.

''राधा, राधा, माझी राधा!'' कीर्तिदेवींच्या मुखातून जणू अध्यात्म स्फुरले. त्यांच्या डोळ्यांना धारा लागल्या. सृष्टीसतीचे अवघे प्रेम डोळ्यातून श्रवणाऱ्या धारांमधून प्रवाहित झाले होते. आनंदमग्न साश्रुनयनांनी कीर्तिदेवी त्या अर्भक कन्येला उराशी धरून पाहात होत्या. त्यांची नयनधारा त्या कन्येवर झेपावली आणि कन्येने अर्भकी टाहो फोडला. प्रेमधारा राधा झाली! पुन्हा कीर्तिदेवींनी तिला उराशी कवटाळले. पान्हा दाटून आला. जणू कीर्तिदेवींच्या अस्तित्वातून

ही प्रेमधारा राधा प्रकटली आहे.

वृषभानू ही सृष्टीसतीची दिव्य प्रेमलीला अनिमिष नेत्रांनी पाहात होता. अंतःकरण भारले होते. नेत्र वाहू लागले होते. अनंत अवकाशातील अवघे प्रेम, वात्सल्यभाव अंतःकरण व्यापून ओसंडत होता. राधारूपाने कितीतरी वेळ वृषभानू आणि कीर्ति युगुल भूमीतून प्रकटलेल्या कमलजा राधारूपात आनंदमग्न झाले होते.

''हे राजा, ही बालिका प्रत्यक्ष शक्तिरुपिणी राधा आहे! द्वापारातील परमात्म्याच्या पूर्ण अवतारस्वरूप श्रीकृष्णांच्या भक्तिस्वरूप शक्तिरुपिणीचे दर्शन घडण्यासाठी तिचे प्राकट्य आहे. या आद्येला तू कन्या म्हणून स्वीकार कर! यज्ञ साक्षीने ती कीर्तिराणींची पुत्री म्हणून प्रकटेल.'' वृषभानू आणि कीर्ति त्या आकाशवाणीने धन्य धन्य झाले. वृषभानुंनी कीर्तिदेवींकडे पाहिले. त्या राधेत हरवल्या होत्या.

''हे प्रिये, कीर्ति!'' वृषभानुच्या हाकेने कीर्ति भानावर आली.

''नाथ!'' कीर्तिदेवींनी पृच्छा केली.

''परमेश्वर श्रीकृष्णांची लीला अगाध आहे! त्यांनी त्यांच्या ठायीची विश्वव्यापक प्रेमधारा शक्ती आपल्या ओटीत सांभाळण्यासाठी घातली. आपले गोकुळ धन्य झाले. चैतन्यमयी राधा भूमीपुत्री कमलजा होऊन; वृषभानू आणि कीर्तिची कीर्ति विश्वात कीर्तिमान करण्यासाठी प्रकटली. परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे आपण तिचा कन्या म्हणून स्वीकार करूया.'' वृषभानू म्हणाला.

''हे नाथ, आपण माझ्या मनीचे गुज बोलत आहात.'' कीर्तिदेवींनी रुकार दिला.

राजा वृषभानुंनी यज्ञ मांडला. अवघे गोकुळवासी प्राणीमात्र आणि वस्तुमात्र यज्ञोत्सवासाठी जमले. गोकुळ धन्य धन्य झाले.

*ऋतुगंध दरवळे अवनिच्या उदरात ।*
*गर्भार ही धरणी फुलवी कमल विषाल ।*
*कृष्णाची करुणा दाटून अवघी येई ।*
*चैतन्या आद्या राधा भक्ति होई ।।१।।*

*गोकुळात पान्हा प्रेमा भरते येते ।*
*भूमि कन्या राधा प्रेमरूपा बागडते ।*
*वृषभानु कीर्तिची वात्सल्य पताका झळके ।*

*ही कमल विकसिनी कन्या प्रौढा मिरवे ।।२।।*

यमुना तटाला नवजात अर्भकाच्या गोरसमादक सुगंधाने गंधित केले. गोलोकातील कृष्णयमुनाजल किनारी स्थित रावलग्राम या गंधाने भारून, आनंदमग्न होते. भाद्रपद शुक्ल अष्टमीच्या पावन कृष्णपर्वात तेजस्विनी, चैतन्यमयी राधेचा जन्म झाला होता. पाहता पाहता आनंद वार्ता यमुना तटीच्या अवघ्या गोलोकात वायुवेगाने वितरित झाली. नंदग्रामात नंद यशोदेच्या महालापर्यंत वार्ता पोहोचते ना पोहचते तोच वृषभानुराजाचा आनंद संदेश घेऊन गोप उपस्थित झाला.

''श्रीमान, गोलोक चक्रवर्ती नंद महाराजांचा विजय असो!'' संदेशवाहकाने नम्र अभिवादन करीत जयघोष केला.

उतावीळपणे महाराणी यशोदाच सरसावली. ''काय संदेश आहे भगिनी कीर्तिराणींचा?'' तिने अधिरतेने विचारले. नंदराजा सानंदाश्चर्याने यशोदेकडे पाहात होता. संदेशवाहकाने नम्रपणाने संदेशपत्र महाराजांच्या स्वाधीन केले. नंदराजानेही मोठ्या औत्सुक्याने पत्र वाचले. सेवकांना आज्ञा केली. ''सत्वर सबंध गोकुळात, घराघरात शर्करा वाटा. सांगा महाराणी यशोदांच्या बंधूंना, महाराज वृषभानू आणि राणी कीर्तिंना कन्यारत्न प्राप्त झाले आहे.''

''हो, खरंच कीर्तिदेवींना कन्यारत्न प्राप्त झाले?'' गगनव्यापी आनंदाने यशोदाराणींनी नंदराजांना पुन्हा पुन्हा विचारले.

''चला, चला या क्षणाला मला कीर्तिदेवींना भेटायचं आहे. त्यांचं कन्यारत्न डोळेभरून पाहायचं आहे.'' यशोदाराणी अधिरपणे म्हणाल्या.

महाराज नंद आणि महाराज्ञी यशोदा रावलग्रामला वृषभानुपुत्री राधेच्या स्वागताला जाताहेत, हे कळताच रायाणकुमार अर्थात अनयकुमारचे मातापिता यांनी भगिनी यशोदांकडे येण्याचा हट्ट केला. नंदराजांची स्वारी हत्ती, घोडे, वृषभ यांच्या रथवैभवासह, रावलग्रामी निघाली. हे वर्तमान वृषभानुला संदेशवाहकाने सांगितले. वृषभानुंनी महाराज नंदजींच्या स्वागताची तयारी केली.

रावलग्रामाच्या वेशीवर नगारे, ताशे, पिपाण्या, तुताऱ्या, चौघडे यांचा गजर करीत स्वतः वृषभानुंनी नंदराजांचे स्वागत केले.

कीर्तिराज्ञींनी, यशोदा आणि अनयमाता यशदांचे स्वागत केले. कीर्तिराज्ञींच्या मांडीवर चैतन्यमयी आनंदमग्न कन्येला पाहतांना यशोदा आणि यशदा देहभान हरपल्या. कितीतरी वेळ त्या दोघी अनिमिषपणाने सुकुमार, लडिवाळ, राधेच्या मुखकमलाकडे समाधीमग्नपणे पाहात होत्या. नवजात असूनही कन्या काहीशी वर्षादीडवर्षाची खेळकर वाटत होती. हातपाय उडवून अवखळपणे ती कीर्तिच्या

गळ्यातील माळा, कानातील झुमके यांशी खेळून, खदखदून हसत होती. जवळ बसून राधेकडे ओडवलेल्या यशोदा आणि यशदांच्या अलंकारांशीही राधा खेळू लागली. तिच्या अवखळपणाने, खदखदून हसण्याने अवघा महाल दुमदुमला. रायाण तर मध्येच तिचे हात आपल्याकडे खेचत होता. रायाणकुमाराला कोणी रायणकुमार तर कोणी त्याच्या अनया या मूळ नावाने हाक मारक असत.

''माते, राधेला आपण आपल्याच राऊळात घेऊन जाऊया.'' पाचसहा वर्षांचा अनया म्हणाला. सगळ्या जणी त्याच्या या हट्टाने अगदी खळखळून हसल्या.

राधेचे डोळे प्रकाशमान झाले आणि साऱ्याच तिच्या तेजाने दीपून गेल्या. तेजस्विनीने नकळत आपल्या चैतन्यमयी अवतारित्वाचे दर्शन घडविले.

या खेळात कितीतरी वेळ कीर्तिराज्ञी, महाराणी यशोदा आणि अनयमाता यशदा गुंगून गेल्या होत्या. तेव्हढ्याच खेळकर राधेने, एकदमच रुदन सुरू केले आणि या ललना भानावर आल्या.

''माता बघ ना राधा माझ्याचकडे बघून रुदन करते आहे.'' अनयकुमार म्हणाला.

''हो हो रे हो! तू काही केलेस का तिला?'' यशदा म्हणाली.

''अगं नाही! तिला क्षुधा लागलेली दिसते!'' कीर्तिमाता म्हणाली. ती राधेला स्तन्य देण्यासाठी सावरली.

''माझ्याजवळ दे ना राधेला, बघ ती लगेच शांत होईल.'' अनयकुमारने हट्ट केला. साऱ्याजणींना हसू आले. राधेचा रुदन स्वर वाढला. ती खरेच अनयकुमारकडे पाहून रडत होती.

''कीर्ति दे बघू राधेला अनयच्या मांडीवर!'' यशोदाराणी म्हणाल्या. कीर्तिंनी राधेला अनयकुमारच्या मांडीवर दिले आणि अहो आश्चर्य! राधेचे रुदन खरोखरीच क्षणात थांबले. राधा अनयाचे डोळे, कान, नाक जोरजोरात ओढून घेण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या अशा खेळण्याने अनयला हसता हसता मुरकुंडी वळाली. पण काही वेळच. मग त्याला त्रास वाटू लागला. तिचा असा खेळ नकोसा झाला.

''मामी, घे राधेला!'' अनयकुमार कीर्तिंना म्हणाला.

''झाली हौस?'' कीर्तिदेवींनी कौतुकाने म्हटले.

आगत-स्वागत, आहेर, भोजन आदि सगळे सोपस्कार झाले. वृषभानू आणि कीर्तिंचा निरोप घेऊन; यशोदादेवी निघाल्या. नंदराजांनी राधेला आपल्या

हातात घेतले. अहो आश्चर्यम्! नंदराजांच्या अवघ्या शरीरात चैतन्य संचारले. दिव्यानुभूतीने ते भारावले. ''वृषभानू कन्या तेजस्वी आहे. तिने तर मला तिच्याकडे खेचून घेतले आहे!'' नंदराज म्हणाले.

''महाराज राधा सर्वांनाच आपल्याकडे खेचून घेते!'' वृषभानू म्हणाला.

''कीर्तिदेवी हिचे राधा नामकरण कधी केलेस?'' यशोदादेवींनी विचारले.

''नव्हे, नव्हे, तिचे नामकरण अद्याप व्हायचे आहे. तिला पाहताच कीर्तिच्या मुखातून राधा शब्द झाला. त्या क्षणापासून आम्ही तिला राधाच संबोधतो आहोत.'' वृषभानुने स्पष्टीकरण केले.

''आता नामकरणाचा सोपस्कार नकोच. हिला राधा हेच नाव शोभते. ही चैतन्यमयी धारा सर्वांना आपल्याकडे ओढते आहे. हिला राधाच संबोधावे! होय ना राधाराणी?'' हातातील राधेला उंच उडवून झेलत नंदराज म्हणाले. पुन्हा पुन्हा उडवत नंदराज राधे, राधे म्हणू लागले. राधा खळखळून हसत होती. अनयकुमार टाळ्या वाजवत होता. नंदराजांनी वृषभानुच्या हाती राधेला सोपवून निरोप घेतला.

''ह्या राधागौळणीने अवघ्या गोकुळात आनंद भरला आहे!'' नंदराजांनी निघतांना अभिप्राय दिला.

पुन्हा पुन्हा राधेचे दर्शन घेत, तिची आलाबला घेत, नंदराजांची स्वारी गोकुळधामी निघाली. अनया मात्र सारखा यशदामातेकडे राधेला आपल्या राऊळी नेण्याचा हट्ट करीतच होता. त्याचा हट्ट ऐकून अखेर नंदराज म्हणाले, ''तिला मोठी होऊ दे, मग आपण आपल्याच राऊळी घेऊन येऊ!'' अनयकुमारांची समजूत पटली. स्वारी निघाली.

●●●

। १० ।

# भक्तिरुपिणी राधा

राधेच्या अवतरणापासूनच राधा भिरीभिरी नजरेने कृष्णाचा शोध घेत होती. वैकुंठलोकीहून ती भूलोकी प्रकटली खरी; मात्र कृष्णस्वरूपापासूनचा असा विग्रह तिला अस्वस्थ करीत होता.

वृषभानुंच्या मागे लागून बाल राधा गायांसोबत गाया वळण्यासाठी जाई. वृषभानुंनी तिला कधीच नको येऊस म्हणून अडवले नाही. भांडीर वनात पोहोचली की, ती वेदीनुमा वृक्षाजवळ आपल्या लाडक्या-गायींसोबत जाई. तेथे काही काळ गायींसोबत बागडण्यात जाई. परंतु काही वेळातच ती त्या वेदीनुमा वृक्षाजवळ, एका शीलाखंडावर आकाशाकडे एकटक बघत राही. वेदीनुमा वृक्ष म्हणजे ज्या वृक्षाच्या समीप यज्ञवेदी करण्यास उपयुक्त योग्य जागा असते असा वृक्ष. या वृक्षाच्या गर्द सावलीत राधा हरवून जाई. ती हरवलेली असतांना तिची मग्नता जणू गायींना स्पर्श होई. गायी मधूनच तिच्याजवळ येत. तिला चाटत, चाटता-चाटता त्या गायीही राधेत हरवून तेथेच जवळ बसकण मारीत. रवंथ करीत. राधेप्रमाणे त्यांचेही जणू ध्यान लागत असे. गर्गस्मृतीमध्ये म्हटल्याप्रमाणे याच ठिकाणी राधाकृष्ण विवाहाचे स्मरण होईल. गर्गमुनींनी भगवान कृष्ण आणि राधेला शिकविलेल्या सात मंत्रांचे प्राकट्य पुन्हा होईल. जणू सृष्टीच्या चक्रनेमीक्रमाची सप्त सूत्री. चैतन्यमयी राधाच तर कृष्णभगवंतांच्या सृष्टीरचना लीलेचे आधारभूत कारण आणि कार्यही आहे. कृष्ण तत्त्व आहे तर राधा तत्त्वमयी आहे. भूलोकी स्त्रीरूपांनी वावरणारी राधा ही केवळ भासमान आहे. नश्वर आहे. वस्तुतः राधा हे कृष्ण अस्तित्वाचे चैतन्य आहे. या चैतन्याचाच संचार भूलोकीच्या चराचराठायी आहे.

असे असूनही राधा केवळ निर्व्याज, निर्गुण भावाने, प्रेममयतेने कृष्णस्वरूपाचा

आविष्कार घडविते. श्रीकृष्णाची स्वसंवेद्यता अर्थात आद्या म्हणजे राधा! यामुळेच विग्रह होऊनही राधा कृष्णस्वरूप होण्यासाठी व्याकूळ होते. तिच्या ठायीची कृष्णस्वरूपासाठीची प्रेममयता, भावभक्तिरूपाने आर्त होते. चराचराला स्वरूपाने आर्त व्हायला भाग पाडून; कृष्णसख्याची ओढ लावते.

राधेची व्याकुळता वायूलहरींवर स्वार होऊन; जवळच्याच वंशीवनात अधिरपणे प्रवेश करते. अवघे वंशीवन त्या व्याकूळ आर्त प्रेमलहरींनी भारावते. वंशी घुमू लागतात. भगवान कृष्णच त्या स्वरलहरीतून राधेला आलिंगन देतात. वंशींचा भावोत्कट स्वर घुमू लागला की भोवतीच्या गायी कानात प्राण आणून, राधा होऊन, त्या मधुरस्वरांचा रोमरोमात आस्वाद घेऊ लागतात. राधा तर देहभान हरपून समाधीमग्न होते.

वृषभानुला आता राधेची ही अवस्था नित्य अनुभूतीचीच झाली होती. तिचे कृष्णस्वरूप होणे अर्थात समाधीमग्न होणे संमोहक असे. भांडीरवनासह अवघा आसमंत वंशीवनातून स्वरमधूर होणाऱ्या लहरींनी भारून जात असे. वृषभानुंनी हा चमत्कार अनेकदा आग्रहपूर्वक कीर्तिदेवींना स्वतःबरोबर नेऊन दाखविला होता. कधी-कधी तर राधेच्या लहानग्या लडिवाळ गोपीकुमारी तिच्याबरोबर येत तेव्हां त्याही अंचबित होऊन राधेच्या मग्न अवस्थेकडे पाहात राहात. राधा त्यांच्यात काहीशी वेगळीच असे.

अनेकदा राधेच्या या मग्न अवस्थेत तिच्या मुखातून कृष्ण, कृष्ण नामोच्चार होई. भांडीरवनात राधाकृष्ण अद्वैत स्वरलहरीतून स्पंदित पाहाता पाहाता राधेच्या जाणिवेने कृष्णवर्णी यमुनेच्या उसळून पांडूर झालेल्या लाटा कृष्णमयी होऊन जात. वृषभानू, कीर्तिमाता, लहानग्या सख्या सोबतींच्या गाया, गोप, गोपी, राधेच्या या भावमग्नतेत डूब घेऊन भावमग्न होत. अशावेळी

*वंशी विभूषित करा नवनीरदाभात ।*
*पीतांबरदरुणा बिंब फुला धरोष्टात ।*
*पूर्णेन्दु सुंदर मुखा फळबिंब नैत्रात ।*
*कृष्णातपरं किमपितत्त्व अहं न जाने ।।*

अशी स्थिती सर्वांची होई.

कधी कधी तर गोकुळातून नंदराज गोपांसह येत त्यांच्यासोबत अनयाही येई. राधेचे हे अद्‌भूत सच्चिदानंद रूप पाहून तेही राधामग्न होऊन जात. अनया राधेचे हे अनोखे रूप पाहून चकित होऊन जाई.

यमुना, भांडीरवन, वंशीवन आसमंत अवघा राधामयी, वृंदावन होऊन

भक्तिरंगात गुंग होई. काय होते आहे हेच कळत नसे-

*रात्री काळी घागर काळी ।*
*यमुनाजळें ही काळी हो माय ।।१।।*
*बुंथ काळी बिलवर काळी ।*
*गळां मोतीं एकावळी काळीं हो माय ।।२।।*
*मी काळी कांचोळी काळी ।*
*कांस कांसिली ते काळी वो माय ।।३।।*
*एकली पाण्याला नचजाय साजणी ।*
*सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ।।४।।*
*विष्णुदास नाम्याची स्वामीणी काळी ।*
*कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ।।५।।*

असे, राधेसवे अवघे एकरंगात रंगून कृष्णस्वरूप अनुभवू लागत.

* * *

राधेची बाल्यावस्थेतील लीला, प्रतिदिन तिच्या सख्यांनाही श्रीकृष्णाच्या वंशीचे वेड लावणाऱ्या होऊ लागल्या. राधा वंशीच्या स्वरलहरींनी मुग्ध झाली की तिच्या तेजस्वी मुखमंडळावर उत्कट प्रेमानुभूतीची आरक्त आभा प्रकाशित होई. तिच्या भोवतीच्या वडीलधाऱ्या गोपगोपींना तर राधालीला पाहात राहावेसे वाटे. त्याचे आणखीही एक कारण होते. त्यांनाही वंशीच्या स्वरलहरींतून अद्‌भूत आनंदमग्ना येई. संसारप्रपंचाच्या अवघ्या काळजीकंथा विस्मणात विरून जात.

राधेसोबत भांडीरवनात गायी चारण्यासाठी जाण्यासाठी बालतरुण गोपींमध्ये स्पर्धा होई. काही सख्या तर राधामयच होऊन गेल्या होत्या. राधेच्या कृष्णमयतेच्या साक्षी होण्यासाठी त्या आसुसलेल्या होत. बालवयातील राधिका अभिसारिकेसारखी वंशीवनात तिच्याभोवती पिंगा घालणाऱ्या स्वरलहरींसाठी आतूर होई. तिची कृष्णभक्ति प्रियकराच्या आराधनेत रुपांतरित होण्याचा अनुभव सख्यांना येऊ लागला होता. गोपींमध्ये राधेच्या या बालवयातील अधीर प्रिया रूपाची कुजबुज भांडीरवनापुरती मर्यादित राहिली नाही. रावलग्रामात आणि नंदग्राम किंवा गोकुळग्रामात ही कुजबुज सुरू झाली होती.

राधेला भांडीरवनातील लता, वृक्ष ही कृष्णाच्या वंशीस्वरांसाठी अधीर झाल्याचा भास होई. वंशीवनातील कदंब आपल्या कृष्णाला आपल्यापासून दूर

नेत आहे असे वाटे. आपल्या सख्या, रावळग्राम आणि गोकुळातल्या गोपीएवढेच नव्हे तर धेनूही आपल्या कृष्णाला आपल्या उराशी कवटाळत आहेत, असे वाटे. आपल्या वंशीस्वरलहरींनी कृष्ण आपल्याला सोडून या सगळ्या स्पर्धकांचेच प्रियाराधन करीत असल्याचा भास तिला होई. ती आपल्या सखीला आपल्या मनातील अधिरता, खंत, विरहार्तता आणि त्यामुळे निर्माण झालेली व्यथा गुपित सांगू लागे तेव्हा ती सखीही कृष्णासाठी आतूर होई. वंशीस्वर राधेचेच नव्हे तर सगळ्यांचेच श्वास झाले होते याची राधिकेला खंत होती. एकदा ती आपल्या अतिप्रिय सखीला थेटच आपली संवेदना निवेदित करत होती–

*''रासे हरिम् इह विहित – विलासम्*
*स्मरति मनः मम कृत – परिहासम् ।।धृ।।*
*सञ्चरत – अधर – सुधा – मधुर – ध्वनि – मुखरित – मोहन वंशम ।*
*चलित – दृक – अञ्चल – चञ्चल – मौलि कपोल – विलोल – वतंसम् ।।१।।*
*चन्द्रक – चारू – मयूर – शिखण्डक – मण्डल – वलयित – केशम् ।*
*प्रचुर – पुरन्दर – धनुः अनुरञ्जित – मेदुर – मुदिर – सुवेशम् ।।२।।*
*गोप – कदम्ब – नितम्बवती – मुख – चुम्बन – लम्भित – लोभम् ।*
*बन्धुजीव – मधुर – अधर – पल्लवम् – उल्लसित – स्मित – शोभम् ।।३।।*
*विपुल – पुलक – भुज – पल्लव – वलयित – बल्लव – युवति – सहस्रम् ।*
*कर – चरण – उरसि मणि – गण – भूषण – किरण – विभिन्न – तस्मिस्रम् ।।४।।*
*जलद – पटल – चलत् – इन्दु – विनिन्दक – चन्दन – तिलक – ललाटम् ।*
*पीन – पयोधर – परिसर – मर्दन – निर्दय – हृदय–कपाटम ।।५।।*
*मणिमय – मकर – मनोहर – कुण्डल – मण्डित – गण्डम् उदारम् ।*
*पति – वसनम् अनुगत – मुनि – मनुज – सुर – असुर – वर – परिवारम् ।।६।।*

*विशद – कदम्ब – तळे मिलितम् कलि – कलुष – भयम् शयनन्तम्*
*।*
*माम् अपि किम् अपि तरङ्गत – अनङ्ग – दृशा मनसा रमयन्तम्*
*।।७।।*
*श्री – जयदेव – भणितम् अतिसुन्दर – मोहन – मधु – रिपु – रूपम्*
*।*
*हरि – चरण – स्मरणम् प्रति संप्रति पुण्यवताम् अनु रूपम् ।।८।।*

''सखे, मला कृष्णाची आठवण येते गं. इथेच रासक्रीडा खेळताना त्याने आपली विलासनिपुणता मला दाखविली होती. इथेच वेणू वाजवून मला मोहिनी घातली होती. स्वर वेणुतून घुमतांना त्याच्या अधरामृताची गोडी स्वरांतून स्रवत होती. नेत्रकटाक्षानेच तो माझ्याशी गुज करीत होता.'' राधा सांगत होती.

''सखे, मोरपिसांचा मुकुट त्याला शोभायमान करीत होता. इंद्रधनुंनी जलदाला वेढावे तसे विलोभनीय कृष्णरूप दिसत होते. गोपीप्रेमाने त्याची प्रेमाभिलाषा अधिक उत्कट झाली होती. दुपारतीच्या फुलाप्रमाणे त्याचे अधरोष्ठ स्मित फुलत होते. गोपींमध्ये त्याला आलंगिण्यासाठी स्पर्धा सुरू होती. त्याच्या ठायीचे अलंकार रात्रीच्या अंधःकाराला उजळत होते. भाळावरील चंदन तिलक चंद्राहूनही सुंदर होता. शोभायमान गोपी त्याच्या वक्षावर मर्दन करून घेण्यासाठी मिठीत धन्यता मानत होत्या. मकरकुंडलांनी त्याचा मुखमंडल अधिक शोभायमान झाला होता. ऋषी, मुनी, देव आणि मानव सारेच त्याच्या दर्शनाला आसुसले होते.'' राधा सांगत होती.

''सखे याच कदंबाच्या छायेत आमचा प्रितीकलह रंगला होता. अनुनयाने त्याच्या बाहुपाशाचे भय नाहीसे होत होते. प्रेमपूर्ण संवादाने मी त्याच्यातच हरवले होते.''

राधेच्या या निवेदनाने सखी चकित आणि भयाकुल झाली होती. राधेचे असे प्रणयिनीचे रूप सखीला अनाकलनीय होते. सखीने मनाशी निश्चय केला. राधेसह राऊळात परतल्यावर सखीने कीर्तिराणींना गाठले. राधेचे गुज तिने राणींच्या कानावर घातले. तेव्हा बाल्यावस्थेतील राधेचे उपवर कन्यका रूप कीर्तिदेवींना संवेदित झाले. राधेचे कौमार्य एवढ्यातच नाहीसे होऊन तिच्या ठायी तारुण्यसुलभ प्रियाभाव दाटल्याचे संवेदित होऊन कीर्तिदेवी चिंतीत झाल्या.

खरंतर राधेची ही कृष्णसमाधी अवस्था कीर्तिदेवी आणि वृषभानुराजांच्या लक्षात आलेली होती. परंतु लहानग्यांच्या भातुकली खेळाचे कौतुक करावे;

तसे तिच्या या वंशीस्वरलहरी छंदाला कृष्ण परमात्मा मानून ध्यानमग्न होण्याचे, त्यांनी कौतुकच केले होते. सखीने केलेल्या वर्णनाला राधाकृष्ण प्रितीसमाधी अथवा शृंगभोग समाधीचा गंध असल्याचे लक्षात आल्याने वृषभानुराज आणि कीर्तिदेवी व्यथित झाल्या होत्या.

'अष्टवर्षात भवेद कन्या', या सूत्राप्रमाणे राधा आता सातवे वर्ष ओलांडून अष्टवर्षीय कन्या होत होती. लडिवाळ राधा कीर्तिदेवींच्या कुशीत कलेकलेने वाढत होती. आठव्या वर्षीच सुकुमार राधा द्वादशवर्षीय कन्या वाटत होती. सख्यांसोबत खेळतांना, फुगड्या करतांना, फेरावरची गाणी म्हणत गौरे खेळतांना उपवर कन्याप्रमाणे सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. अवघ्या आठव्या वर्षीच राधा परिपूर्ण देखणी, सुकुमार, विवाहोत्सुक युवती वाटे. तेव्हां कीर्तिदेवींच्या मनात राधेच्या विवाहाचा विचार येई. गौरवर्णीय, च्युवळ मोहक हनुवटीची, सरळनासिकेने नयनकमलापर्यंत लक्ष वेधून घेणारी, कृषकटी, कुंतलकेशा, चंद्रबिंबासम रम्य मुखड्यातील अधरामृत पाझरणाऱ्या अधरांकडे, राधा सहज आकर्षित करून घेई. अवखळ, अचपळ हरणीसम चंचल राधा हास्यखळाळाने सर्वांना आनंदित करी. असे असले तरी तिचे चित्त वंशीवनात असे. अलिकडे तर कीर्तिदेवींबरोबर डेऱ्यात दह्याचे घुसळण करतांनाही मधेच राधा कृष्णचिंतनात हरवून बसे; तेव्हां कीर्तिदेवींच्या मनात; ह्या गवळणीचे लग्न करावे असेच येई.

कीर्तिदेवींनी एके समयी वृषभानुंना दबक्या घोगऱ्या आवाजात, राधा गवळण झाल्याचे सांगून, तिच्या विवाहाचा विचार करायला हवा, असे काळजीने कथन केले. वृषभानुचा त्यांच्या कानावर विश्वासच बसेना. कालची लडिवाळ राधा गवळण झाली, हे कसे शक्य आहे? त्याने विचार हसण्यावारी नेला. कीर्तिदेवींनी काहीशा गांभीर्याने पुन्हा लकडा लावला तेव्हां वृषभानू काहीसे विचारमग्न झाले. राधेकडे कर्तव्यसिद्ध चिंतामग्नतेने पाहू लागले तेव्हा त्यांनाही राधेच्या उपवरपणाची जाणीव झाली. मातापित्यांच्या या विचारांची राधेला गंधवार्ताही नव्हती. तिची दिनचर्याही आता कृष्णकेंद्री झाली होती.

पहाटे उठून ती गोशाळेत गोदोहनासाठी हट्टाने जाई. तेव्हा मोठ्या प्रेमाने ती गायींशी गुज करी. स्वतः घट घेऊन गोदोहन करतांना वंशीधर यमुनातट अशा कृष्णाचे ध्यान करीत असे. गोदोहन करतांना तिचे ध्यान लागले की, त्या पान्हावल्या गायीचेही ध्यान लागे. मोठ्या लगबगीने गायींच्या कळपासह भांडीरवनाकडे ती प्रयाण करी आणि माध्यानीच्या श्रांत वेळी वंशीवनात गायांना घेऊन जाई. वंशीवनात, गायी रवंथ करीत असतांना राधा मात्र कृष्ण स्वरलहरीत

गुंग होई. कधीतर वंशीस्वरलहरीत राधा गुंग असतांना गायीवासरे राधेकडे प्रेमभराने पाहात कान स्वरांकडे टवकारून स्तब्ध होत. मावळतीला गायी घराकडे येतांनाही राधाचे वनातून पाय निघत नसत. गायी हंबरून तिला घराकडे खेचून नेत. राधेला जणू वंशीवनाने झपाटले होते. दिवे लागणीला देवघरात कीर्तिदेवींबरोबर असतांनाही ती कृष्ण, कृष्ण असा जप करीत राही.

कीर्तिदेवींनी थेट राधेशीच मोठ्या खुबीने विवाहाचा विषय काढला.

''राधे! अगं कुठे हरवलीस?''

''माते, अगं, तुला नाही का ऐकू येत वंशीचा वेणूनाद? अहाहा कृष्णसख्याच्या अधरातून, यमुनेच्या तरंगावरून, वायूलरहीसवे रुंजी घालीत, मुरलीधराचा मुरली रव थेट कानांना भिडतोय आणि मनाला मिठीत घेतोय! ऐक ऐक!''

''राधे, अगं हा कसला नाद खुळा. कुठे वंशीनाद! मला तर बाई काहीच ऐकू येत नाही. तुझं असं नादावणं काही खरं नाही! सारखी आपली गायींबरोबर वनात जायला निघतेस. नि तिथेच काय ते वेणुनादानेच मुग्ध होते. खरं म्हणजे आता तुझं लग्नच केलं पाहिजे!'' कीर्तिदेवी म्हणाल्या.

''काय लग्न? माते अगं माझं लग्न केव्हांच झालंय अनंत जन्मापूर्वीच त्या कृष्णसख्याशी!'' राधा एकदम ध्यानस्थ मुनीच्या मुखातून आकाशवाणी व्हावी तशी बोलली. तिचे बोलणे ऐकून कीर्तिमातेच्या पोटात धस्स झाले.

''राधे, अगं असं काय बडबडतेस तू? कोण कृष्ण, कुठचे लग्न? वेडी आहेस का तू?'' कीर्तिदेवी म्हणाल्या.

''माते!'' राधा एखाद्या प्रौढी संन्यासिनीसारखी बोलू लागली.

''माते, मी आणि कृष्ण वेगळे नाहीच! मी सदैव कृष्णहृदयासाठीच विराजमान आहे. कृष्ण चैतन्य आहे तर; राधा चैतन्यमयी आहे, कृष्ण या विश्वाचे कारणतत्त्व आहे तर राधा तत्त्वमयी आहे. या विश्वाच्या रोमरोमांत चैतन्यमयीपणे मीच वावरते आहे. त्या रोमरोमाठायीच आत्मरूपाने वास करते आहे. कृष्णाचा वंशीस्वर हेच तर माझं अस्तित्व आहे! कृष्ण, कृष्ण, माझे शरीर, मन, कर्म, असणं, वावरणं सारं काही कृष्ण आहे. कृष्णच राधा आहे. राधाच कृष्ण आहे!'' राधा बोलत होती. तिची भावसमाधी लागली होती.

कीर्तिदेवींनी तिला खांदे धरून गदागदा हलवले. राधेची भावसमाधी भंग झाली. ''अगं काय बडबडतेस तू? कृष्ण राधा, राधाकृष्ण, मला काही समजेल असे बोलशील का?'' कीर्तिदेवी चिंतामग्नतेत काहीशा चिडक्या स्वरात म्हणाल्या.

राधा पूर्ण भानावर आली.

''माते! काय म्हणत होतीस तू?'' राधेनं विचारलं.ॉ

''राधे अगं चार मुलींसारखी वाग, असं स्वप्नात असल्यासारखं बरळणं चांगलं नाही. तुझं आता लग्न होईल मग, अशीच का वागणार आहेस?''

''माते! मला मुळी लग्नच करायचं नाही. मला या गोकुळात गोधनाची सेवा करण्यातच आनंद वाटतो. सख्यांशी खेळावं, विहार करावा, गोपगोपींशी मैत्रभावाने बागडावं असं वाटतं.'' राधेने सावधपणे अंतरीचे गुज लपवीत सांगितलं.

''राधे, अगं जगरहाटीच आहे. पुत्री हे परक्याचं धन ते पतिगृहीच शोभून दिसतं. बघ बरं, मी, यशोदाराणी, यशदादेवी साऱ्यांनी विवाह केला की नाही. तुझ्याच वयात आमचाही विवाह झाला होता. विवाह करणं हेच तर प्रपंचकर्तव्य असतं. हे बघ जगव्यवहाराप्रमाणे तुझा विवाह करून देण्यातच आमच्या उभयतांच्या जीवनाचे सार्थक आहे. कीर्तिदेवी सांगत होत्या.

''माते, मला यातलं काही कळत नाही. तुम्ही म्हणाल तसं करा.'' राधेने सहज सांगून टाकलं.

''मग आम्ही आताच वरसंशोधनाला सुरुवात करतो!'' कीर्तिदेवींनी राधेला सांगितले.

''हवं ते करा. मी तुमची कन्या आहे. तुम्ही सांगाल तसं!'' राधा म्हणाली.

''खरंच!''

''हो खरं!''

राधेच्या या बोलण्याने कीर्तिदेवी काहीशा संभ्रमात पडल्या. कृष्णकृष्ण बडबडणारी राधा खरी की एवढ्या समजूतदारपणे सगळ्या गोष्टींना तयार झालेली राधा खरी त्यांना कळेना.

मनात मंथन सुरू होते. कीर्तिदेवींच्या आणि राधेच्याही–

''राधा गौळण करिते मंथन । अविरत हरिचे मनात चिंतन ।''

●●●

। ११ ।

# परिणय लीला

रावल ग्रामात आनंदाला उधाण आलं होतं. भूमिपुत्री, वृषभानू आणि कीर्तिदेवींची कन्या राधा वधू म्हणून शृंगारित झाली होती. रावल ग्रामातील गोपगोपींची लगबग पाहून, अवघे गोधन कौतुकाने सोहळा पाहताना, आनंदाश्रूंनी ओसंडत होते. आम्र कदंबादि वृक्षांच्या फांद्यांनी अवघ्या ग्रामात मंडपांची उभारणी केली होती. ग्रामातील तरुण-तरुणी नित्याचे गोपालन विसरून गर्भानृत्यात रंगून गेली होती. गर्भा खेळण्याला रंगोत्सवांनी अधिकच रंगारंग केले होते. नंदग्रामातील गोपगोपी, आबालवृद्ध रावल ग्रामात वरवऱ्हाड घेऊन पोचले होते. तेही या गर्भारंगोत्सवात आपसूकच रंगून गेले होते.

राऊळाच्या प्रांगणात मंगल परिणयाची तयारी पूर्ण झाली. स्वतः नंदराजमामा आणि यशोदामामींची धावपळ, लगबग अवघ्या विवाहोत्सवाला शतगुणित, आनंदमय करीत होती. यशदा आणि यशोधन आपल्या पुत्राच्या विवाह सोहळ्यात रंगून गेले होते. हत्ती, घोडे, पालख्या, वृषभरथ यांनी अवघ्या परिसरात उत्सव ओसंडत होता.

वाजंत्र्या, सुशोभित मंडपांना दुमदुमून टाकीत होत्या. रंगवल्लीकांची आरास मंडपांचा शृंगार वाढवत होती. मंडपांच्या शेजारी मुहूर्तमेढीजवळ कपिला, हरिणी, नंदिनी, गंगा, सरस्वती, कावेरी, यमुना आदि निवडक आवडत्या दुभत्या गायींची रांग गोकुळातील विवाह सोहळ्याला आशीर्वाद देत उभी होत्या.

राधा गौळण होत होती; तर अनया तथा रायाण गोपवृत्ती स्वीकारीत होता. मथुरेच्या गोधन बाजारात, नंद आणि रावळ ग्रामाची, वंशी, भांडीर, वृंदावन वनांची श्रीमंती घेऊन, अनया आणि राधा मथुरेच्या बाजाराचे वैभव वाढविणार होते. वृषभानू आणि कीर्तिची कन्या आणि यशोधन व यशदाचे पुत्र

ही दोन्ही घराणी बाबा नंदराज आणि यशोदा राणींना अतिप्रिय होती. त्यामुळे आनंदाला उधाण आलेच होते. त्याचबरोबर अवघ्या गोलोकात वैभव विलसत होते. अवघा गोलोक विवाहासाठी एकवटला होता. बहरलेली दरवळलेली वने गोवंशाला आज अधिकच संगीतगंधित करीत होती. बाबा नंदराजांनी विवाहासाठी, खास पढ्यानुपिढ्या मैत्रभाव जपलेले द्वारकाधिश राजकुमार, वसुदेव यादव यांचे अगत्यपूर्वक स्वागत केले होते. मथुरानरेश उग्रसेन आणि राजकुमार कंसराज यांना खास अतिथी म्हणून निमंत्रित केले होते. त्यांच्यासोबत गोलोक राजकुमारी देवकी राधेच्या विवाहासाठी हट्टाने आली होती. सम्राट बाबा नंदराजांच्या भगिनी यशदा आणि यशोधन पुत्र अनयाचा आणि वृषभानू महाराज आणि कीर्तिराणी यांची कन्या भूमिपुत्री राधा यांच्या विवाहाचा थाट भारतवर्षाचे लक्ष वेधीत होता. अनेक चंद्रवंशीय तथा सूर्यवंशीय राजे या गोधन व्यावसायिक वैश्य राजांच्या कडे आपल्या लवाजम्यासह विवाह सोहळ्याला उपस्थित होते.

गोरज मुहूर्तावर विवाह संपन्न होणार होता. मुहूर्तमेढी जवळच्या कामधेनूंनी शुभंकर हंबर दिला. विवाहासाठी मंडपात लगबग सुरू होती. संध्या वायूलहरी गोरजाने सुखवू लागल्या होत्या. त्या वायूलहरीतून वंशीस्वर उमटू लागले. अवघ्या विवाह सोहळ्याला या वंशीस्वरांनी भारून टाकले. अवघे गोधन कान टवकारून, त्या मधुरमुरली स्वरांना आपल्या रोमरोमात सामावत होते. विवाहाची धावपळही मंत्रमुग्ध झाली.

राणी राधेच्या कक्षात गेल्या. त्यांना कक्षात राधा दिसेना. त्यांनी वृषभानू राजांच्या कानी वार्ता घातली. काही क्षणात, राधा राधेच्या कक्षात नसल्याचे वृत्त, कुजबुजत सर्वांच्या कानी गेले. यशोधन आणि यशदाने अनयाच्या कक्षात डोकावले. अनयाही कक्षात नव्हता. अचानक एवढ्या धामधुमीत ऐन विवाह मुहूर्त समीप आलेला असतांना ही मुलं गेली तरी कुठे. गोप-गोपी सख्यांकडून तात्काळ उत्तर मिळाले. मग मात्र सर्वांनाच हासू आवरेना. बालवधूवरांची ही विस्मयचकित करणारी क्रीडालीला आता अवघ्या गोलोकात प्रसिद्ध झाली होती. चिंतामुक्त होऊन वृषभानुचे आमात्य गोपगोपी सख्यांना घेऊन निघाले.

यमुनातटी वंशीवन वृंदावन, यमुनेच्या लाटांसह वंशी स्वरलहरींवर नृत्यमग्न झाले होते. कदंबही त्या लहरींवर मुग्धपणे डोलत होता. मधुर वंशीस्वरांच्या मुरलीरवाने अवघा आसमंत नृत्यरंगोत्सवात भान हरपला होता. यमुनेच्या लाटांवर उचंबळून विहार करणाऱ्या कृष्णसख्याच्या करुणाभावलहरी वंशीवनामधून मधुर

गुंजन करीत आसमंतात, प्रक्षेपित होत होत्या.

राधा-अनया शृंगारित बाल वधूवर, त्या प्रक्षेपित लहरींवर जणू रास नृत्य करीत होते. पदन्यास, हस्तन्यास, भावमुद्रा आपसूक आविष्कृत होत, नृत्यरंग प्रकटवित होते. काल आणि अवकाशव्यापी कृष्ण, राधा अनया मध्ये जणू संचारित होऊन, रासनृत्य क्रीडा करीत होते. त्यांच्या नृत्यमुग्धतेच्या लयीत लेणी आणि मुंडावळ्याही रोमहर्षकपणे झुलत होत्या. गोपगोपी सख्यांनी आजवर अनेकदा राधा-वंशीमुग्धतेचा अनुभव घेतला होता. स्वतः अनयाही या क्रीडेत राधेसोबत, गोधन विसरून अनेकदा मग्न झाला होता. गायींचे कळप आपले अन्नशोधन विसरून; त्या स्वरलहरीत समधात होऊन जात. त्या वेळोवेळीच्या अनुभवापेक्षाही आजही लीला विलक्षण वाटत होती.

राधेभोवती आभावलय निर्माण झाले होते. त्या आभावलयाने यमुनाजल, कदंबवृक्षराजी, एवढेच नव्हे तर यमुनेशी एकरूप होणारे आकाशही गौरवर्णाने उजळले होते. राधा सृष्टी होऊन जणू कृष्णमग्न झाली होती. अनयाही राधास्वरूपाने वंशीस्वरांवर नृत्य करीत होता. राधा-अनयाला, घेऊन जाण्यासाठी आलेले गोपगोपीसख्यावृंद एवढेच काय, अमात्य स्वतःही त्या प्रेमसमाधीमध्ये मुग्ध होऊन स्तंभित झाले.

अवकाश लोटला तरी वधू-वर येत नाहीत, असे पाहून, स्वतः वृषभानू-कीर्ति आणि यशोधन-यशदा वंशीवनात पोचले. दृश्य पाहून विवाहसोहळाही क्षणभर विसरून गेले. इतक्यात कामधेनू गोमातांचा वत्सलआर्त हंबर निनादला आणि सगळेच भानावर आले.

मग मात्र वेळ न घालवता, राधा-अनयाला घेऊन, सारेच परतले. राधा-अनया मात्र अद्यापही भावसमाधीतच गढून होते. अगदी कळसूत्री बाहुल्यांचा विवाह संपन्न करावा तसे विवाह सोहळा संपन्न होतांना दोघे वावरत होते. जीवनमुक्त राधा, अवतार कार्यासाठी पार्षद तथा छायारूप राधा म्हणून वावरत होती. चैतन्यमयी राधा, जेव्हा छायारूपाठायी प्रकटे तेव्हा राधाकृष्ण अद्वैताचा अनुभव अनयासह अवघ्या गोकुळास येई.

विवाह होत असतांनाही निर्गुणांशी भावसमाधी अवस्थाप्राप्तपणाने, विवाहात राधा-अनया वावरत होते. राधा तर हरिची राधा म्हणून आत्ममग्नतेने विधीत सहभागी होती, परंतु अनयासुद्धा राधास्वरूप होऊनच आत्ममग्नपणे बोहल्यावर उभा होता. या भावसमाधीचे विलक्षण तेज राधा-अनयाच्या चेहऱ्यावर विलसत होते. त्यांचे ते दिव्यरूप अवघ्या गोलोकाला दिपवून टाकत होते! जमलेले

वऱ्हाडी भान हरपून अक्षदांचा वर्षाव करीत होते.

वधूवरांच्या चेहऱ्यावर कृष्णभक्तीची प्रसन्नता विलसत होती. मंत्रोच्चार, मंगलवाद्यांच्या गजरात विवाह सोहळा संपन्न होतांना राधेच्या भोवती औत्सुक्याने लगबगीने बागडणारी देवकी, सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. युवराज कंस आणि युवराज वासुदेव यांचा बाबा नंदराजांच्या हस्ते खास सन्मान करण्यात आला. क्षत्रिय राज आणि वैश्य राज यांच्या पारंपरिक मैत्रीला उजाळा मिळत असतांना युवराज कंस आणि युवराज वासुदेव यांची मैत्री गाढ होत होती. युवराज कंसांच्या मनात वेगळाच विचार सुरू झाला होता. मधूनच युवराज कंस वसुदेवाकडे पाहात विचारमग्न होत होता. राधेच्या भोवती लगबगीने, खेळकरपणे लुडबुडणारी देवकी त्या दोघांचे लक्ष वेधून घेत होती. तिच्या लुडबुडीची गंमत वाटून; ते दोघे मधूनच मनमुराद हसत होते. बाबा नंदराजांचे लक्ष या युवराज जोडीने वेधून घेतले होते. द्वारका आणि मथुरा दोन्ही राज्यांशी गोधन व्यवसाय, व्यापार या निमित्ताने बाबा नंदराज यांचा अनेक पिढ्यांचा संबंध होता. प्रसंगी परस्परांसाठी सहाय्यभूत होण्याचीही परंपरा होती.

''युवराज कंस, आपली भगिनी देवकी मोठीच खेळकर आणि खट्याळ दिसते!'' बाबानंदराजांनी मुद्दामच देवकीचा विषय काढला.

''आमचीच भगिनी! ती आमच्यासारखीच असणार!'' कंसांनी हसतच फुशारकी मारली.

''हो ना युवराज! पण तुम्ही युद्धक्रीडेत निपुण आहात. देवकी मात्र राजकुमारी म्हणूनच, खट्याळपणा करते आहे.'' वसुदेवांनी दुजोरा दिला.

''युवराज, मला वाटतं देवकीच्या विवाहाचा विचार करायला हरकत नाही.'' बाबानंदराजांनी अंदाज घेत वक्तव्य केलं.

''होय होय, महाराज पिताश्रींनी आमच्याकडे देवकीच्या लग्नाचा हट्ट धरला आहे. पण देवकी अजून बाल सुकुमार आणि अल्लड आहे म्हणून आम्हीच पिताश्रींना जरा थोपविलं.'' युवराज कंसांनी सांगितलं.

''एक सुचवू?'' बाबानंदराज म्हणाले.

''काय?'' युवराज कंसांनी जिज्ञासेनं विचारलं. युवराज वसुदेवही उत्सुक झाले.

''द्वारका आणि मथुरा एकत्र आले तर?'' बाबानंदराज वैश्यवृत्तीने बोलून मोकळे झाले. युवराज कंस आणि युवराज वसुदेव दोघेही चमकले. असा काही अचानक प्रस्ताव येईल, असे त्यांना वाटलेही नव्हते. दोघेही गंभीर झाले. परंतु

दोघांच्याही मुद्रेवर प्रस्ताव योग्य असल्याचा अभिप्राय स्पष्ट जाणवत होता. तेव्हढ्यात वरातीचे निमंत्रण सर्वांना मिळाले आणि त्यात प्रस्ताव हरवून गेला असे वाटले.

मोठ्या थाटाने वरात थेट बाबानंदराजांच्या राऊळाच्या प्रांगणात आली. विवाहासाठी खास उपस्थित असलेल्या मथुरा आणि द्वारकेच्या राजघराण्यांनी राधा अनयाला आशिर्वचन, शुभेच्छा देत निरोपाचे मानपान स्वीकारले. देवकीच्या विवाहाचा प्रस्ताव युवराज कंसांच्या आणि युवराज वसुदेवांच्या मनात रुजलेला आहे हे बाबानंदराजांना जाणवतच राहिले.

वरात संपली आणि राधाराणी बाबानंदराजमामांच्या शुभाशिर्वादाने यशोधन आणि यशदाच्या, व्यवहारदक्ष कर्तबगार तरी प्रेमळ आणि कृष्णभक्त अनया सोबत, मोठ्या थाटात गृहप्रवेश करीत, गोकुळातली गौळण झाली.

विश्वसुंदरी भूमिपुत्री, कीर्तिवृषभानुकन्या राधा, यशोधन-यशदा पुत्र रायाण तथा रापाण तथा अनयरायांशी विवाहबद्ध होऊन गोलोकीच्या नंदग्रामात बाबानंदराज आणि यशोदेच्या राऊळासमीप, यशोधनांच्या गौळीवाड्यात संसारसारणी झाली. यशदेला राधेला कुठे ठेऊ नि कुठे नको असे झाले. तिला राधा सारखी समीप, तिच्या सवे हवीशी वाटे. गौळीवाड्यातील सर्व कामात यशदा राधेला मोठ्या लाडाकोडाने बरोबर घेऊन, सडासंमार्जनापासून, गोदोहनादी आणि स्वयंपाक घरासमीप डेरा घुसळण, दळण, कांडण येथपर्यंत, राधेला बरोबर घेई. राधेला कीर्तिदेवींची आठवणही येऊ नये याची काळजी घेई. यशोधनांनीही अनयरायाला आपल्या सवे व्यवहारात पारंगत करण्यासाठी सतत बरोबर न्यायला सुरुवात केली होती. गोपालनात राधा आणि अनया अगदी मनापासून सहभागी होत.

यशदेप्रमाणेच यशोदेचेही झाले होते. गोलोकीतील राजाश्वैर्य भोगत असूनही अपत्यप्राप्तीसाठी यशोदा आणि नंदबाबा खंतीनी भरून गेलेले असत. राधा गोलोकी आली आणि दोघेही सुखावले. सुकुमार लडिवाळ, अवखळ, खेळकर, संमोहकभाषिणी, राधेने त्या दोघांना अगदीच लळा लावला होता. यशदेचे मातुल आता राधेचेही मातुल झाले होते. यशदेप्रमाणे यशोदेलाही राधा सतत सवेच असावीशी वाटे. यशदेला तर कधी कधी यशोदेचा मत्सर निर्माण होई. राधा नंदराऊळात विशेष रमून जाई.

राधाअनयाचा संसार सुरू झाला. वृषभानू आणि कीर्तिदेवी यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटे. राधा ही भूमिकन्या आहे. प्रसादस्वरूप ती प्राप्त झाली आहे.

याची आठवणही आठवणींच्या रांजणातून, विस्मरणाच्या कृष्णविवरात केव्हाच अंतर्धान पावली होती. कीर्तिदेवींना एकच काळजी होती. राधा अन्य नवोढा गौळणींप्रमाणे खरंच संसारप्रपंचात रमेल का? अगदी विवाहप्रसंगीही राधा वंशीवनांत हरपली होती. समाधानाची गोष्ट एकच होती. अनयालाही वंशीवनांत रमण्याचा छंद होता.

यशदा, यशोदा यांच्या सवे गोलोकातील कौटुंबिक प्रपंचव्यवहारात दोघींचेही मन न मोडता राधा त्यांच्या भोवती असे खरी; परंतु मृगनयना चपळ चंचल हरिणीसारखी भोवती बागडणारी राधा, मधेच भान हरपून कोठे हरवल्यासारखी ध्यानमग्न होई. यशदा आणि यशोदेच्या हे लक्षात आले होते. गोधने जोगण्यासाठी वनी जाण्याचा राधेचा हट्ट त्यांनी त्यामुळेच दुर्लक्षित केला होता. विवाहाच्या दिवशी वनातून राधेला आणि अनयाला घेऊन यावे लागले होते. हे जगावेगळे वागणे यशदा आणि यशोदेलाही खटकले होते. परंतु अनयाच्याही अशाच लहरीपणामुळे त्या दोघींनीही राधेच्या या मध्येच तंद्रीत हरवण्याकडे दुर्लक्ष केले होते. राधेला तंद्री लागली; की तिला हटकून त्या पुन्हा तिला भानावर आणीत. यशदेने संधी पाहून हे राधेचे असे तंद्रीत हरपणे यशोधनाच्या कानावर घातले होते. यशोधनाने अनयरायाणाचे वागणेही तसेच आहे म्हणून चिंतायुक्तपणे यशदेला सांगितले.

''म्हणजे हे नेमके आहे तरी काय? दोन्ही मुले अशी वनात का हरवतात. आणि 'कृष्ण कृष्ण जय कृष्ण हरि!' असे काही भान हरपून बडबडत राहतात. याचे काय करायचे?'' यशदेने चिंतेने यशोधनांजवळ खंत व्यक्त केली.

मला तर काहीच सुचत नाही. वाटले होते लग्नानंतर अनया आपसुकच जगराहाटीप्रमाणे माझ्या सोबत व्यवहारात लक्ष घालील. पण...'' यशोधनाने चिंता व्यक्त केली.

''म्हणजे... त्याचे व्यवहारात लक्ष नाही?'' यशदेने चिंतेने विचारले.

''नव्हे, नव्हे, व्यवहार करण्यात तर अनयरायाण अतिशय तल्लख आहे. परंतु...'' यशोधन बोलत होते.

''परंतु काय?'' यशदाने अधिरतेने विचारले.

''अनयरायाणालाही मधूनच तंद्री लागते. मग त्याला तंद्रीतून जागे करावे लागते. तंद्रीतून जागे होतांना तो 'कृष्ण कृष्ण जय!' असे काही बडबडतो.'' यशोधन म्हणाले.

''होय? राधाही असेच बडबडते. कृष्ण म्हणजे तरी काय बाई!'' यशदाने

चिंता व्यक्त केली.

''मलाही हाच तर प्रश्न पडला आहे!'' यशोधन म्हणाला.

यशदा आणि यशोधन यांच्या चिंतेत वाढत होत होती. हळूहळू राधेभोवती गोकुळातल्या अनेकानेक सख्या जमू लागल्या होत्या. राधेबरोबर नाचावे, बागडावे वाटे. वंशीवनातील वंशीसंगीताचेही वेड या गोपींना लागले. राधेच्या अगदी जवळच्या सख्या तर राधेला वंशीवनाचे आणि संगीताचे रहस्य विचारून छळत असत आणि तिच्यासवे त्याही मग्न होत असत. भाद्रपद आश्विनात दशहाराच्या उत्सवात फेरनृत्य करता करता राधेला वंशीसंगीत ऐकू येई आणि साऱ्या सख्या, गोपी, गोप, राधेसोबत त्याच संगीताच्या ताललयीत नृत्यमग्न होत. गोकुळातल्या गोपगोपींना राधेचे आणि वंशीसंगीताचे वेडच लागले होते. एव्हढेच नव्हे गोधनेही या संगीतात मंत्रमुग्ध होत.

ह्या संगीतसमाधीत अवघा गोलोक मग्न होई. स्वतः बाबानंदराज, यशोधन, यशोदा आणि यशोदाएव्हढेच नव्हे तर आबालवृद्ध गोपगोपीही यात मग्न होत.

अवघा गोलोक असा संगीतात मग्न होताना यशोधन, यशदा, यशोदा आणि नंदराज यांना 'कृष्ण कृष्ण जय कृष्ण हरी' मंत्राविषयी, प्रश्न त्रास देत असत. जेव्हा अवघा गोलोक मग्न होई त्यावेळी मात्र सर्वांच्या मनातील शंका नि प्रश्न त्या संगीत मुग्धावस्थेत हरवून जात.

राधेच्या संगीतमुग्धतेला आणखी वेगळाच भावसुंदर कंगोरा लाभला आहे, हे यशदेच्या लक्षात आले होते. प्रिय सख्याची, प्रियपतीची वाट पाहात विरहार्त व्हावे तशी राधा मधेच बावरी होऊन; मधुर मुरली स्वराचा आवाहक कानोसा घेई. प्रांगणातील गायींच्या सान्निध्यात जाऊन वासरांना उराशी कवटाळून, त्यांना गोंजारीत, कितीतरी वेळ त्याच क्रीडेत घालवी. गायाही तिच्या सवे येत. वासरांना आणि राधेलाही चाटून वात्सल्याचा वर्षाव करीत तेव्हां तर यशदेला खूपच आश्चर्य वाटे.

काही वेळा तर राधेच्या सख्या तिच्याभोवती जमत आणि त्याही गायीवासरांच्या सवे राधेशी गुज करू लागत. कधी अनयरायाणही या क्रीडेत वेडावून भाग घेई. कधी हट्टाने राधा गायांसवे भांडीरवनी जाई आणि तिच्या प्रिय सख्यांसह भांडीरवनातून यमुनातटी वंशीवनात खेचल्या जात. वंशीच्या स्वरलहरींवर या युवा गोपींचे नर्तन सुरू होई. का कोण जाणे सोबतीच्या गाया चरणे विसरून भोवती येऊन मुग्धपणे, जणू संगीताचा आस्वाद घेत. अशा प्रसंगी अनयासोबती गोपही या नृत्यात सहभागी होऊन; गायी चारण्यासाठी आपण आलो आहोत हे

विसरून जात.

राधा आणि तिची अतिप्रिय सखी यांचा संवाद ऐकून राधेची अधिरता यशदेच्या लक्षात आली होती. राधा प्रियसख्यांसाठी अधीर आहे, हे जाणवून यशदा सुखावे. मात्र अनया आणि राधेत पतीपत्नी प्रेमाचा भाव जाणवण्याऐवजी, उभयतांना त्या संगीत लहरींत रंगून जाण्यातच धन्यता वाटते हे लक्षात आले; की अनया आणि राधेचा प्रपंच कसा होणार; याची चिंता तीव्र होई.

राधा अनयाच्या विवाहाला दोन वर्षे उलटली तरी त्यांच्यात पतीपत्नी भाव विकसितच झाला नाही असे यशदेला जाणवे. जगराहाटीप्रमाणे आता राधेच्या उदरी नवजाताची चाहूल लागावी असे यशदेला वाटे. त्यात राधा चांगली उफाड्या अंगाची. गौळण शोभणारी! दोन वर्षात तिचे नंदराऊळी, यमुनीतीरी, वंशीवनी रमणे, सख्यांसोबत संगीतमग्न होणे बरेच वाढले होते. यशदेने यशोदेकडे आणि प्रसंगी कीर्तिदेवींकडेही याविषयी काहीसा तक्रारीचा सूर लावला. यशोधनाचे लक्ष वेधले. दिवसेंदिवस चिंता वृद्धिंगतच होत गेली. कधी यशोधन स्वतः चिंतीत असूनही यशदेची समजूत घाली. कधी यशदा राधेला मोठ्या वत्सलभावाने समजून सांगण्याचा प्रयत्न करी. राधाही यशदेला कधीच निराश करीत नसे. प्रतिसाद देत यशदेला सुखावे. परंतु राधेच्या प्रत्यक्ष व्यवहारात मात्र काही बदल होत नसे.

यशोधन आणि यशदा यांची चिंता वाढत होती. अनयरायाण आणि राधाराणी प्रपंच करण्यासाठी पुरेसे परिपक्व होऊनही त्यांचे पतीपत्नी म्हणून वर्तन विरक्ती दर्शविणारे होते. असे असले तरी राधा-अनया नेहमी आनंदी, कार्यतत्पर आणि लडिवाळ स्नेहभावाने सर्वांना आपलेसे करीत होते. गोकुळामधील गोपी मात्र अधूनमधून थेट यशदेलाच काही प्रश्न विचारून, यशदेच्या चिंतेत भर टाकीत.

मध्यरात्र उलटून गेली होती. यशोधन यशोदेची समजूत घालून थकून गेला होता. तिकडे बाबानंदराज आणि यशोदेला अद्याप संतान नव्हते. म्हणून त्यांची खंत यशदेला अधिक शंकित करीत होती; तर यशोदा, अनया आणि राधेलाच आपल्या वात्सल्याने लळे पुरविण्यात धन्यता मानीत होती. यशोधनच्या बोलण्याचा परिणाम किंचितही होत नव्हता. उलट यशदा अधिकच चिंतीत आणि त्रस्त झाली होती. तिच्या या अवस्थेने यशोधनही चिंतामग्नपणे रात्र जागवित होता. राधा-अनया मात्र त्यांच्या शयनकक्षात निरागसपणे निद्रावश होते.

''नारायण नारायण!'' नारायण मंत्राचा जप करीत नारदमुनी यशोधन आणि

यशोदेच्या कक्षात प्रकट झाले होते. हा यशोधनाला विस्मयाचा धक्का होता. लगबगीने दोघे उठून उभे राहिले. नारदमुनींना प्रणाम करून यशोधनाने प्रश्न केला.

''मुनीवर आपण, या समयी, आमच्या राऊळात? आम्हाकडून काही आगळिक झाली का?'' यशोधन आणि यशदा भांबावले होते.

''वत्स यशोधना, पुत्रा यशदा, भय नको, आपण काहीही आगळिक केलेली नाही. तथापि...'' ब्रह्मर्षी नारद बोलत होते.

''तथापि काय मुनिवर?'' यशदेने अधिरतेने विचारले.

''आपण उभयता चिंतातूर आहात. ती चिंता वारण्यासाठी, भगवान विष्णूंच्या आज्ञेने मी येथे उपस्थित आहे.'' नारदांनी सांगितले.

''मुनिवर, राधा-अनया यांचा प्रपंच सुखरूप होईल ना?'' यशदेने एकदमच थेट प्रश्न विचारला.

''पुत्री यशदा, वत्स यशोधन मी भगवंतांचा निरोप आपणास कथन करणार आहे.'' महर्षी नारद म्हणाले.

''महर्षी कृपा व्हावी!'' यशोधन हात जोडून म्हणाले.

''हे वत्सा, हे पुत्री, राधा ही असामान्य शक्ती आहे. ती परब्रह्म भगवान कृष्ण यांची ठायीची शक्तिरुपिणी आहे. ती प्रपंच करण्यासाठी नव्हे, तर प्रपंचस्वरूपच आहे. श्रीकृष्ण तत्त्व आहेत; तर राधा तत्त्वमयी आहे! श्रीकृष्ण चैतन्य आहे तर राधा चैतन्यमयी आहे! श्रीकृष्ण पुरुष आहेत तर राधा प्रकृती आहे! श्रीकृष्ण केवळ ज्ञान आहेत तर राधा विज्ञानस्वरूप ज्ञानमयी सृष्टी आहे! या अवघ्या सृष्टीचे अंतिम ध्येय, सच्चिदानंदस्वरूप भगवान श्रीकृष्णस्वरूप होणे हे आहे.''

''हे ज्ञान चराचराला घडविण्यासाठी, भगवंतांच्या पूर्णावतारात भगवंतांनी आपल्या शक्तीची राधास्वरूप लीला रचली आहे. राधा त्या शक्तीची पार्षद आहे तर अनया हा ही पुरुषतत्त्वाचा पार्षद आहे. चराचराठायीच्या वसलेल्या चैतन्यतत्त्वाचे ज्ञान केवळ त्याच्याविषयीच्या छंदाने, अर्थात प्रेमासक्तीने म्हणजेच भक्तीनेच होते. हे सर्वांना ज्ञात करविण्यासाठी भगवंतांनी राधा-अनयाची लीला रचली आहे.''

''त्यांच्या रूपाने भक्तिभावनेने प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूप होता येते; हे भक्तिस्वरुपिणी राधा आपल्या व्यवहारातून दाखवून देते आहे. परमप्रेमभाव हा शारीर भावापलिकडे निर्गुण निराकारतेकडे घेऊन जातो. राधा हे त्याचे प्रतीक

आहे तर अनया हे त्याचे उदाहरण आहे. लवकरच अवघ्या गोकुळात भक्तिसाधनेची अर्थात भक्तियोगाची लीला आकारणार आहे. म्हणूनच वत्सांनो राधेची आणि अनयाची चिंता करू नका. त्यांच्याकडे भक्तिसाधना म्हणूनच पाहा आणि त्यांचा अनुसार करा.'' ब्रह्मर्षी नारदांनी सविस्तर तरी सूत्र रूप लीलाविग्रहाचे वर्णन केले.

''महर्षी, गोलोकीच हा लीलाविग्रह का बरे? कृपया आम्हास स्पष्ट करून सांगावे!'' यशदेने हट्ट केला.

''श्रीकृष्णांच्या वामांगापासून आविर्भूत राधा, सदैव, प्रेमपूर्वक कृष्णांच्या शक्तीस्वरूपाची सेवा करण्याचे व्रत अवलंबिते. त्यामुळेच ती श्रीकृष्ण तत्त्वाचे प्राणतत्त्व स्वरूपात, त्यांच्या ठायीची अधिष्ठात्री देवी रूपात वास करते. त्यामुळेच ती श्रीकृष्णांना सर्वप्रिय आहे. सर्व शक्तीरूपे या आद्या राधेचीच रूपे होत. त्यातील सर्वोत्कृष्ट सेवा, प्रेम, भक्ति, सौभाग्य, सन्मान, स्वरूपता यांचे स्वरूप म्हणजे, हरिप्रिया, अर्धांगी, चेतना म्हणजे राधा– म्हणूनच राधा हीच भगवंत लीलास्वरूप सृष्टी होय.''

''राधा विवर्तानंतर राधेतील प्रिय भावनेला हा विग्रह सहन होईना. या द्वैत भावातून अद्वैत असे कृष्णस्वरूप प्रकटावे म्हणून तिने जो निग्रह केला, जे प्रेमपूर्वक आर्त समर्पण भाव जागृत केले, तीच भक्ति होय! चतुर्युगात या भक्तिसाधनेने पुन्हा श्रीकृष्णाद्वैत साधता येते. प्रियेचे प्रियकरस्वरूप होणे किंवा प्रियुचि प्राणेश्वरी होणे म्हणजे अद्वैत होय! येथेच अविनाशी सच्चिदानंदस्वरूप सिद्धता होते. हे भक्तिस्वरूप नवविधा समजावून देऊन, राधाभावे अद्वैत सिद्धी योगमार्ग, स्पष्ट करण्यासाठी माझी योजना केली आहे.''

''गोमाता हे राधेचेच प्रतीक आहे. गोमाता ही सृष्टीस्वरुपिणी आहे. याकरिताच गोलोकातच ही लीला घडेल असे वरदान राधेला प्रत्यक्ष श्रीकृष्णांनी दिले. म्हणूनच या लीलेचे आपण उभयताही घटक आहात. गोलोकात, वैकुंठस्थित सर्व देवदेवता शक्तीरूपे, गोपगोपी म्हणून पार्षद स्वरूपात प्रकटतील व स्वतः भगवंत श्रीकृष्ण स्वरूपात पूर्णावतार प्रकटून राधाकृष्ण अद्वैत सिद्ध करून; राधाभावयोग मार्ग प्रशस्त करतील असे हे वरदान, राधाकृष्ण अध्यात्मविवाह प्रसंगी राधेला भगवंतांनी दिले.''

''प्रकृतीपुरुष स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रत्यक्ष ब्रह्मदेवांनी हा विवाह घडविला होता. म्हणूनच सर्व शंका दूर सारून गोलोकातील भगवंत लीलेला सहाय्य करा.'' ब्रह्मर्षी नारदांनी सांगितले. यशोधन आणि यशदा यांचा प्रणाम

स्वीकारून 'शुभम् भवतु' असा आशीर्वाद प्रदान करीत यशदा आणि यशोधन निशब्द झाले. नारद अंतर्धान पावले.

●●●

। १२ ।

# चाहूल कृष्णसख्याची

दिवसेंदिवस नंदयशोदेची खंत वाढत होती. राधेच्या सहवासात काही काळ अपत्यहीनतेची खंत बाजूला जाई. परंतु राधा सासुरवाशीण होती. यशदेलादेखील राधा सतत घरात हवी असे. बाबानंद राधेचे कोडकौतुक पुरवी. राधा काही ना काही कारण काढून यशोदेच्या राऊळात जाई. तिथल्या गोधनात रमे. राधेच्या नजरेतूनही मामी यशोदेच्या मनातली खंत लपली नव्हती. राधा सख्यांसोबत नंदबाबाच्या राऊळी आली की यशोदेच्या मनातली ही खंत अधिकच प्रकट होई. आपल्या राऊळात, आपल्या कुशीत जन्मलेलं बाळ बागडावं लाडाकोडानं मोठं व्हावं, असं तिला वाटे.

अशातच देवकीच्या विवाहाप्रसंगी घडलेली भीषण घटना नंदराजा आणि यशोदेच्या मनाला खूपच लागली होती. देवकी ही तर चक्रवर्ती सम्राट उग्रसेनांची कन्या नि युवराज कंसांची लाडकी भगिनी. तिचा विवाह द्वारकेचे युवराज वसुदेवांशी व्हावा हे याच उभयतांनी सुचविले होते. खरंतर युवराज कंसाचा उन्मत्तपणा एवढा वाढला होता की त्यांनी अनेक राज्ये गिळंकृत केली होती. हजारो स्त्रियांना बंदीशाळेत डांबले होते. उग्रसेनांनाही बंदीशाळेत पाठवून स्वतः चक्रवर्ती सम्राट झाला होता. अशा परिस्थितीत आपण देवकी वसुदेव विवाहाचा मांडलेला विचार चुकलाच असे नंदयशोदेला वाटे. आता माघारही घेता येत नव्हती. या विवाहानिमित्ताने मथुरा द्वारका एकत्र आले; तर परिस्थितीला काही वेगळे वळण लागेल असे वाटत होते.

विवाह संपन्न होऊन वरातीच्या प्रसंगी अचानक झालेल्या आकाशवाणीने सारे चित्रच बदलले होते. ''वसुदेव-देवकीचा आठवा पुत्र कंसाचा वध करील!'' या आकाशवाणीने कंस भयचकित होऊन खूपच क्रोधित झाला. त्याने वसुदेव

देवकीलाही बंदीखान्यात टाकले. आठव्या अपत्यापर्यंत सर्वच अपत्यांना ठार करण्याच्या कंसाच्या निर्णयाने, बाबानंदराज आणि यशोदा हतबल झाले होते. दोघेही उदास होऊन कर्तव्यकर्म केवळ करीत होते. राधेला हा सगळा वृत्तांत ज्ञात झाला होता. राधा मात्र किंचितही विचलित झाली नव्हती. कधी कधी नित्याप्रमाणे लडिवाळपणे वावरतांना, ती यशदेला, यशोधनाला, नंदबाबाला आणि यशोदेला पटकन म्हणे, ''तुम्ही उगा काळजी करू नका, सारे ठीक होईल!'' ती खट्याळपणाने सख्यांसोबत काही गमतीजमती करून या दोन्ही युगुलांचा उदासपणा नाहीसा करी. त्यांना हसायला लावी. माहेरी वृषभानू आणि कीर्तिदेवींची अवस्थाही अशी भयभीत आणि उदासवाणी झाली होती. कंसराजाशी संबंध तोडताही येत नव्हते आणि पूर्वीप्रमाणे त्यात सौहार्द्रताही नव्हती.

या उदासीन आणि भयाकुल अवस्थेत राधा-अनया आणि त्यांचे सारे सवंगडीच काय तो आनंद निर्माण करीत होते. वर्षे उलटत होती. दुर्दैवानं एक, दोन, सहा अपत्ये कंसांनी दगडावर आपटून नाहिशी केली. सातव्या अपत्याच्या वेळी तर कन्यारत्न उपजले होते. कन्येलाही कंसाने सोडले नाही. परंतु कन्येला दगडावर आपटतानाच कन्या हातातून निसटून आकाशात उडाली. तेथून जणू तिने दरडावूनच भाकित केले. ''आठवा पुत्र तुझा विनाश केल्याशिवाय राहणार नाही!'' कंस अतिक्रोधित झाला. तो वाट पाहात होता. गत सात वर्षात सात अपत्ये नाहिशी केली होती. गोकुळात नंदयशोदा, यशोधन यशदा आणि रावलग्रामी वृषभानू-कीर्ति भय आणि घुसमट यांनी व्याप्त अवस्थेत जगत होते. द्वारकेतही मथुरेचा पाडाव कसा करता येईल याच्या विचारात सात वर्षे उलटून गेली होती. या सात वर्षांत राधा आता चांगली प्रौढा वाटू लागली होती. बाळाची अपेक्षा सर्वांचीच मावळली होती. दुष्काळ आणि उन्हाळा यांनी त्रस्त व्हावे तसे गोकुळ आणि द्वारका त्रस्त होती.

मध्यरात्र उलटत होती. यशोदा मंचकावर तळमळत होती. नंदराजांना हे जाणवत होते. तिच्या मनातली अपत्यतृष्णा त्यांनाही जाणवत होती. दैवगतीपुढे त्यांचे तरी काय चालणार होते? गोधनामध्ये रममाण होऊन उभयता काळ कंठीत होते. वसुदेव आणि कंस यांच्यातील विनाकारण निर्माण झालेले वैर अनेकदा कंसमहाराजांना समजावूनही संपण्याचे नाव घेत नव्हते. उलट कंसाच्या अत्याचारांनी अवघे राज्य त्राही त्राही करीत होते. त्यातून कशी सुटका होणार; या विचाराने नंदराजांना निद्रा येत नसे. त्यातच आज यशोदेची मनःस्थिती खूपच

आर्त झाली होती.

''प्रिये, किती त्रस्त होशील. निद्रा न येणं बरं नव्हे!'' मंचकावर उठून बसत नंदराजांनी यशोदेची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

''नाथ, आपण कोणतं बरं असं पाप केलं? मी अपत्य विन्मुख राहिले!''

यशोदाच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. श्रांत, कापऱ्या आवाजात यशोदेने विचारले.

''महाराणी, आपण वैद्यराजांचे उपाय, व्रतवैकल्ये कमी का केली? कामधेनू व्रतही आचरले!'' नंदराजांनी पुन्हा समजूत काढली.

''नाथ, त्या देवाला माझी कणव कशी येत नाही? हे गोलोकीचे राज्ञी वैभव मला केवळ निरर्थक वाटते.'' यशोदा रडवेली होऊन बोलत होती.

''आपल्या हातात का आहे ते! परमेश्वराची लीला असेल तसे घडेल!'' नंदराज हताशपणे बोलले.

''त्या देवकीच्या बंदीखान्यात प्रतिवर्षी पाळणा हलतो आहे आणि त्याच क्षणी रिता होतो आहे आणि मी मात्र माझी कूस उजळण्याची प्रतीक्षा करते आहे. ती माता अपत्य वियोगाने तळमळते आहे आणि मी अपत्य वांछेने आर्त झाले आहे. आम्ही दोघीही अभागीच म्हटल्या पाहिजेत. नुसत्या विचाराने मन मृत्यूसमीप धावते!'' यशोदा बोलत होती.

''प्रिये नको असा विचार करूस! रात्रीनंतर सूर्योदय होतोच!'' नंदराज म्हणाले.

''आपल्या आयुष्यात केवळ कृष्णपक्षच आहे. दिवसेंदिवस अंधारच दाटतो आहे!'' यशोदा निराशपणे बोलत होती. मिणमिणत्या पीतवर्णी अंधुक प्रकाशात तिची निराशा अधिकच तीव्रतेने समयाला भेदीत अज्ञाताचा वेध घेत होती.

एवढ्यात शयनागारात सहस्त्ररश्मी एकदम प्रखरतेने प्रकाशावेत, तसा प्रकाश दाटला. दोघे अगदी दीपून गेले. हे काय घडते ते कळेना त्या प्रकाशात तेजस्वी आभेसह राधा प्रकटली असे भासमान होत होते.

''राधा अशी? आपल्या शयनगृहात?'' मनात थक्क होत नंदराज पुटपुटले.

त्या प्रखर प्रकाशात प्रकटलेल्या चैतन्यमयीने त्यांची अवस्था जाणली.

''हे गोलोक राज नंद, राज्ञी यशोदा, मी राधा नव्हे, मी आद्या, चैतन्यमयी! प्रत्यक्ष परतत्त्व श्रीकृष्णांचा संदेश घेऊन आपणापुढे प्रकट झाले आहे. मला तशी आज्ञाच आहे. राज्ञी यशोदा, तुझी प्रार्थना परब्रह्मापर्यंत पोचली आहे. भगवान परमात्मा श्रीकृष्णाच्या द्वापार लीलेला केव्हांच सुरुवात झाली आहे. तुम्ही

उभयताही त्या लीलेतील महत्त्वाचे सहभागी देव आहात. मी सांगते ते लक्षपूर्वक ऐका. हे राजन, राज्ञी, मी स्वतः चित्कला यशोदेच्या उदरी प्रकट होणार आहे. श्रावण कृष्ण अष्टमीला मध्यरात्री मी यशोदेच्या उदरी प्रकट होईल. मात्र हे लक्षात ठेवा. त्याच वेळी परब्रह्म पूर्णावतार भगवान श्रीकृष्णही अर्भक रूपात प्रकट होतील. त्यांना घेऊन एक धर्मात्मा तुमच्या राऊळी येईल. त्याच्याकडून श्रीकृष्णाला, प्रत्यक्ष भगवंताला यशोदेच्या ओटीत स्वीकारा आणि मला त्या धर्मात्म्याच्या स्वाधीन करा. हे परमात्मास्वरूप बालक द्वापारयुगाचा उद्धार करण्यासाठी, सर्व दुरिते नाहिसे करून; कलियुगाचा मार्ग प्रशस्त करील. याच लीलेसाठी तुम्हा उभयतांची योजना या लीलेत केली आहे. तसेच करण्याचे अभिवचन द्या!'' चित्कला देवी म्हणाल्या.

''होय देवी, आपण सांगता तसेच आम्ही करू!'' एकदमच नंदयशोदेच्या मुखातून आश्वासन प्रकटले.

''तथास्तु!'' आद्या चैतन्यमयीने आशीर्वाद दिला आणि क्षणात पुन्हा शयनगृह मिणमिणत्या प्रकाशात नंदयशोदेकडे पाहू लागले. आता त्या उभयतांच्या चेहऱ्यावर जणू तीच आभा पसरली होती. आपण स्वप्नात तर नाही ना, असे उभयतांना वाटत होते!

''नाथ, नाथ, मी माता होणार, माझी कुस धन्य होणार!'' यशोदा अतीव आनंदाने म्हणाली.

''होय प्रिये आजची रात्र साक्षात अमृतदायिनी आहे. प्रत्यक्ष आद्या चित्शक्तीनेच दर्शन देऊन; आश्वासित केले.''

''रात्रीचा समय सरूनी येत उषःकाल हा!

प्रिये पहा'' नंदमुखातून आनंदशब्द स्फुरत होते. दोघांनी प्रेमभराने परस्परांना मिठीत गच्च मिटून घेतले. द्वापारयुग कृतार्थ होत होते.

रात्र सरली. यशोदेच्या मनात आनंदकंद स्फुरला. नंदराजही उत्साहाने प्रातःसमयीच्या गोधन संगोपन कार्यात गढले. यशोदा राऊळात वावरू लागली. राऊळातील कामाठी स्त्रीपुरुष विस्मयाने दोघांच्या हालचाली टिपत होते. यशोदा मंगलगान गुणगुणत वावरत होती. मधूनच तिच्या मनात शंकांचे काहूर उठे.

''खरंच, आद्या चित्कला प्रत्यक्ष परमेश्वराचा निरोप सांगण्यासाठी आपल्या राऊळात आली होती?'' नित्यचिंतनाचा स्वप्न साक्षात्कार तर नव्हता ना?'', ''असा साक्षात्कार उभयतांना एकाच वेळी कसा?'', ''नक्की काही घडणार असेल!'', ''मला तर त्या क्षणापासूनच मातृत्वाच्या संवेदना दाटत आहेत!'',

''नक्कीच ते सत्य असावे!'' यशोदा स्वतःशीच संवाद करीत होती.

गोशाळेमध्ये गोदोहनादी सुरू असतांना नंदराजाला मध्येच रात्रीचा मनोहारी, आश्वासक प्रसंग आठवे आणि नंदराजा मोठ्या उत्साहाने गायांना थोपटी, कुरवाळी. गोशाळेतील गायीवासरेही नंदराजाचे हे आनंदमग्न वावरणे नव्यानेच अनुभवत होते. मधूनच नंदराजाला त्या प्रसंगात राधा का समोर आली असावी; असा प्रश्न मनात प्रकटे. राधेतच अवघा आनंद आपण उभयता पाहात असल्याने, त्या आद्येला पाहून, राधेचाच भास झाला असावा. नंदराजा स्वतःचीच समजूत घाली. गोलोकातील सगळेच परमात्म्याच्या द्वापार लीलेतील पार्षद आहेत, असे ती आद्या म्हणाल्याचे स्मरत होते. ''याचा अथ सारेच विधिलिखित परमात्मा श्रीकृष्णाची लीला! यशोदा उगाचच चिंतीत! पण मीही सारखा तोच तर विचार करीत होतो!'' नंदराजा स्वतःशीच संवाद करीत होता.

नंदयशोदेला अपत्यांची अदलाबदल करण्याची लीला मात्र उमगत नव्हती. असे असले तरी; आपल्याला तर अपत्य होणार, वांझपणाचा कलंक नाहीसा करण्यासाठीच ही लीला घडली असावी, काही असले तरी राऊळाचा वारसदार प्रकटणार याचाच आनंद उभयतांना झाला होता. मनोमनी ते स्वतःला धन्य मानीत होते.

राधा गाढ निद्रेतून एकदम दचकून उठली. तिच्या ठायीची चैतन्यमयी प्रकटली. राधेला आद्या चैतन्यमयी यशोदेच्या कुशीत प्रकट होते आहे हे जाणवले.

''कृष्ण सख्या किती रे वाट पाहायला लावलीस! तुझ्या वंशीवनातील मुरलीरवाने तू गात्र गात्र नित्य चेतवून माझी विरहार्तता नाहीशी करण्याचा प्रयत्न करीत होतास. मला सृष्टीस्वरूप होण्यास भाग पाडून स्वतः मात्र मुग्ध करणाऱ्या मुरलीरवाने भारून टाकीत, माझ्या पार्षद अवस्थेचा साक्षी झालास. आता मी तिळमात्रही तुला विसंबणार नाही!'' राधेने श्रीकृष्णाच्या अनंत-अविनाशी स्वरूपाचा वेध घेत मनोमनी बजावले.

''राधे, ही सृष्टीलीला स्वसंवेद्यतेने अनुभवण्यासाठीच तर आपण उभयतां विग्रहपूर्वक ही क्रीडा करीत आहोत ना? मीच राधा आणि मीच कृष्ण, तूच कृष्ण आणि तूच राधा हे ठायीचे अद्वैत विस्मरणात जाऊन, विरहार्त होणे किती विलक्षण असते नाही!'' श्रीकृष्णांचे संवेदन अनंतात घुमले.

''हे प्रिया, ही विरहार्तताच असह्य करते. तुझ्यात ठायीच्या मिलनासाठी तडफड होते. तुला प्रेमार्ततेने किती बरें बहावे. तुझ्या संगीतमयतेत हरवून जाणे अवीट असले; तरी भवव्यवहार चुकत नाही! ओढ दुणावते! विरहव्यथेने व्याकूळ

भक्ताचे तडफडणे तुला बघवते तरी कसे? प्रपंचात राहून तुझ्याठायी एकरूप होणे किती कठीण आहे! देह सांभाळून विदेही होणे तुला कसे कळणार? तू आपला नित्य निर्गुण, निराकार, निर्विकार होऊनही स्वसंवेद्यतेने सारे अनुभवतोस. आमच्या ठायी मात्र ही स्वसंवेद्यता भोगलोलूप होऊन आम्हाला चडफडविते. ही लीला हवीशी आणि नकोशी होते!'' राधा कळवळून म्हणाली.

''राधे, हेच तर आपल्या अद्वैत अवस्थेचे गुह्यातिगुह्य आहे! विवर्तातील स्मृती आणि विस्मृती यांचा संघर्ष हीच तर ठायीची स्वसंवेद्यता आहे. प्राकृतिक जीवनातून पुन्हा पारमार्थिक अस्तित्व भोगता येऊ शकेल ना! या उर्मीतून तर आपणही चतुर्दश मन्वंतराची ब्रह्मलीला मांडली ना? तू अधीर होणेही अटळ आणि माझ्याठायी जीवनमुक्त होणेही अटळ. 'यज्ञात भवति पर्जन्य', सूर्याचे आग ओकणे तीव्र झाल्याशिवाय वरुणाची करुणा अनुभवता येत नाही! हेच अनुभवण्यासाठी आपण ही क्रीडा मांडली ना?''

''अनंताच्या व्यापक आलिंगनातील सच्चिदानंदस्वरूपता, अनुभवताना प्रकृतीमयी राधेचा रोम रोम प्रकृतीस्वरूपाची यज्ञदाहकता सोसत सच्चिदानंदस्वरूप होऊ शकतो. हेच या रोम रोमाला, तुझ्यातील जडजीवाला उमगावे, त्याच्यातील सच्चिदानंदस्वरूपाची प्रेमलालसा, देहलालसेपेक्षाही शतगुणित व्हावी; यासाठीच तर, हे आद्या, राधे, तुझी प्रेरणा भूमीपुत्री म्हणून केली ना? रोम रोम राधा होण्यासाठी आर्त झाला की राधाकृष्ण द्वैत कसे बरे राहील? हीच परमार्थाची गुह्यातिगुह्य लीला! राधायोगाने ही लीला अनुभवता यावी म्हणूनच तर कृष्णापासून राधेची विवर्तता ना! राधे तू तर माझ्याठायीचे प्रेम, करुणा, भक्ती, ज्ञान आणि आनंद! हे स्वसंवेद्यतेने ठायी अनुभवण्यासाठीच तर ही पुरुष-प्रकृती लीला होय ना?'' भगवान अनंत श्रीकृष्ण आर्तभक्तीने ठायीच श्रीकृष्ण अनुभवणाऱ्या राधेला समजावीत होते. हा अद्वैताचा द्वैत संवाद राधेच्या शयनगृहात, राधेच्या निद्राभग्न अवस्थेत, अनंतातून घुमत होता.

प्रकृती नव्या दिवसाचे स्वागत करीत होती. अनंत होण्यासाठी अनंतात प्रवास करण्यासाठी सिद्ध झाली होती.

●●●

। १३ ।

# राधेचा कृष्ण प्रकटला

षोडषशृंगार करून राधा नंदराजाच्या राऊळात आली, नि थेट यशोदेच्या कक्षात गेली. यशोदेने राधेकडे पाहिले आणि ती पाहातच राहिली. राधेच्या चैतन्यमयी शृंगारपूर्ण नवयौवन स्वरूपात यशोदा हरवून गेली. तिच्या ठायी राधेविषयी अपूर्व वत्सलभाव दाटून आले. राधा जणू तिच्या रोमरोमात नवजात पाडसाप्रमाणे बागडत होती. यशोदेने आवेगाने राधेला जवळ ओढले. उराशी कवटाळून ती अधीर आवेगपूर्णतेने राधेची चुंबने घेऊ लागली. राधेला काय होते आहे; हे अंतरमनात संवेदित होत होते. तरी लौकिकात ती एकदम झालेल्या यशोदेच्या वात्सल्यभावाच्या आक्रमणाने बावरली.

''मामी, मामी, आपण हे काय करताय?'' राधा भांबावून म्हणाली.

''राधे, किती गं सुंदर दिसतेस तू. अवघ्या सृष्टीतला बहर आज तुझ्या ठायी विलसत आहे. आमची राधा खरंच तेजोमयी आहे! लावण्याची सीमा झालीये तुझ्या ठायी!'' असं म्हणत यशोदेनं तिला पुन्हा उराशी कवटाळले.

''मामी, अहो, गायी हंबरताहेत. तुम्हाला हाक मारताहेत. चला आपण जाऊया ना गोशाळेत!'' राधेने यशोदेला भानावर आणले.

''अगं बाई खरंच की, तुला पाहिलं आणि तुझ्या नादात सगळंच विसरले.'' यशोदा म्हणाली.

गोशाळेत, यशोदेला पाहून, गायींनी हंबरून, जणू तिचे स्वागत केले. राधेला सोबत घेऊन, यशोदा प्रेमभराने गायींच्या कपाळावरून हात फिरवित थोपटत जात होत्या. गायांनाही नव्या बहराची जणू जाणीव झाली होती. त्या माना वेळावून वेळावून यशोदेला आणि राधेला चाटण्याचा प्रयत्न करीत होत्या. त्यांच्या जिभांच्या स्पर्शात काही वेगळीच ओढ यशोदेला जाणवत होती. त्यांच्या

भोवतीची वासरे चौखुर उड्या मारून यशोदेला आणि राधेला ढुशा मारीत होती. कितीतरी वेळ गोशाळेत ही क्रीडा सुरू होती. गोशाळा सांभाळणारे गोप गोपी त्यांची ही क्रीडा सानंदसाश्चर्याने पाहात होते. त्यांच्या चेहऱ्यावर गूढ विस्मयकारक आनंद पसरला होता. गोपी आपापसात कुजबुजत कौतुकभरल्या नजरेने यशोदा आणि राधेला पाहून खुदखुदत होत्या.

यशोदेत अवघ्या गोकुळाला अंतरबाह्य तेजोमयी संमोहक बदल जाणवत होता. तिच्याभोवती घुटमळणारी राधा जणू यशोदेच्या अंगप्रत्यंगाभोवतीची विलसणारी आभा वाटत होती. या दोघींचा विलास नंदराजाच्या दृष्टीस पडला नि त्याचे भानच हरपले. त्याने यशोदेठायी एवढा सौंदर्यसोहळा कधीच अनुभवला नव्हता. जणू अवघी सृष्टी यशोदेभोवती, राधेच्या स्पर्शाने रंगसंगीत लहरींच्या लयीत गर्भानृत्य करीत होती.

दिवस कसे सरताहेत हे कळत नव्हते. बरसाना प्रदेश, भांडीरवन, वंशीवन, वृंदावन, रावलग्राम, अवघा गोलोक, नंदग्राम स्वागतसंगीतानी सतत निनादतो आहे असे वाटत होते. वासरांच्या बागडण्याने नवजाताच्या लय लहरी खट्याळ उत्शृंखल नृत्य करीत होत्या. पाहाता पाहाता वसंत ग्रीष्महीं या आल्हाददायी संगीत लहरीत आनंदमग्नतेने सरले. राव्यांनी या आनंदमग्नतेलाही आपल्या मधूनरव लहरींनी मुग्ध केले. वर्षाकाल लोटला. गर्भवती यशोदेच्या वावराने गोलोक नवजाताच्या स्वागतासाठी सिद्ध झाला. श्रावण सरींनी धारानृत्य केले. सूर्यतेजानेही श्रावण मेघांसह लपंडाव मांडून नवजाताच्या स्वागतासाठी तेजोमयी तोरणांची उधळण केली. सृष्टीचा सुस्नात होऊन फलनोत्सुकतेचा विलोभनीय उत्सव सुरू झाला. इंद्रधनुष्यांनी नवजाताला झुलविण्यासाठी जणू अवकाशात पाळणे टांगून रंगछटांच्या विविध खेळण्यांनी शृंगारित केले. यशोदेला लखलखीत तेजोमयी विद्युलतांची झळाळक्रीडेची प्रकाश शोभा पाहावीशी वाटू लागली. प्रतिक्षणी यशोदेला राधा समीप हवीशी वाटे. यशोधन, यशदा आणि राधापती अनयरायाण यांनी राधेला कधीच रोखले नाही. राधेसारख्या तेजोमयी कन्येची चाहूलही यशोदेला लागली.

मध्येच यशोदेला घडल्या साक्षात्काराचा आठव होई आणि ती गूढ विषण्णतेत गढून जाई. पण काही क्षणातच तिचे डोळे अवकाशाचा वेध घेण्यासाठी प्रकाशत. अशावेळी ती राधेला उराशी कवटाळी. यशोदेचे हे वागणे दिवसेंदिवस वाढतच होते. भोवतीच्या गोपी, यशदा तिला कितीतरी सूचना करीत, तिचे कोड पुरविण्यासाठी लगबग करीत. राधेच्या मनोवृत्तीला मात्र गुढाद्भूत दिव्यतेने

व्यापले होते. श्रावण कृष्ण सप्तमी उलटली आणि नवजाताने प्राकट्यासाठीची हालचाल सुरू केली. सृजनयोगीनी गोपी सावधपणे भोवती जमल्या. उत्कंठा, उत्सुकता, आतुरता, उत्सवता यांनी गोलोकाला व्यापून टाकले.

रात्र झाली. गोलोक निद्राधीन झाला. रात्रीच्या पहिल्याच प्रहरात अचानक झंजावात सुरू झाला. मेघांमध्ये वर्षावासाठीची स्पर्धा सुरू झाली. विद्युलतेचे कडकडा प्रकाशतांडव सुरू झाले. मेघांना राहवेना. ते विक्राळपणाने गर्जना करू लागले. निद्रावश गोलोक भयचकित जागृत झाला. रात्रीचा प्रहर उलटत असतांना, गोलोक गायीवासरे वृषभांच्या आर्त हंबरांनी दणाणून गेला. अवघे आभाळच जणू धरणीला कवटाळण्यासाठी आतूर झाले. राधेला निद्रा आलीच होती कोठे! अंगणात येऊन, ती आनंदोत्सवाने विक्राळ मुसळाधारांमध्ये चिंब होत त्यांच्यासवे नृत्य करीत होती. तिच्या या उसळण्याने अनयाही पिसावला होता. राऊळाच्या पायऱ्यावरून भयव्याकूळ होऊन, राधेला हाका मारीत होता.

''राधा, राधे अगं आत ये! विजा कोसळताहेत! पाऊस बघ ना कदाचित सगळ्यांनाच वाहून नेईल! राऊळात ये! गवाक्षातूनही पाऊस पाहाता येईल.'' अनया अतीव प्रेमाने काळजीने नाजूक सुकुमार राधेला असे कोसळत्या धारांसह विजांच्या कडकडाटात बेभानपणे नृत्य करतांना पाहात होता. पाहाता-पाहाता विजेचा एक महा लोळ थेट नंदराजाच्या राऊळाकडे झेपावला. तो दिसेनासा होतो तोच राधेच्या नृत्यमग्नतेतूनही तेव्हढाच लखलखता तेजोगोल थेट अवकाशात झेपावला. अनया थक्क झाला. भयाने त्याने डोळे झाकले. त्याची जीभ आत वळू लागली. मुख शुष्क झाले. तोंडातून राधाऽऽ राधाऽऽ हाक मारण्याचा निकराचा प्रयत्न अनया करीत होता. आवाज उमटत नव्हता. प्रलय लोटतोसे वाटत होते.

काही क्षणात गोलोक जलमय झाला नि तेव्हढ्यातच पाणी थेट यमुनेत सामावले. मेघ नाहीसे झाले. कोटी कोटी तेजोराशी डोळे विस्फारून धरणीचे अवलोकन, सानंद विस्मयतेने करताहेत असे वाटू लागले. खडबडून जाग्या झालेल्या गोकुळाने रोखलेला श्वास सोडला. पुन्हा गोकुळ निद्रावश झाले. अनयाने धावत जाऊन राधेला जवळ जवळ खेचतच राऊळात आणले. राधा चिंब झाली होती. यशोधन आणि यशदा तिच्या ओलेत्या रूपाकडे, अनिमिष नेत्रांनी पाहात होते. तिचे ओलेते रूप लकाकत होते. तिची आभा राऊळभर पसरली. अनया बावरला. राधेचे रूप न्याहाळत होता. ओलेतीचे सौंदर्य आकंठ प्राशन करावे, अशी उत्तान तृषाही हरपली! दिव्य देवतेचे दर्शन घ्यावे, असे तो

प्रसन्न मुद्रेने तिचे दर्शन घेत होता.

यशोधन आणि यशदेने परस्परांकडे पाहिले. प्रसन्न मंद स्मित करीत यशोधन राधेला म्हणाले,

''वत्स राधे, पर्जन्य थांबलाय आता. मध्यरात्र उलटते आहे. झोपा आता उद्ईक, नंदराऊळात जायचंय ना?''

राधा लौकिकात आली. तिने स्वतःला सावरले. ''होय होय!'' म्हणत ती अनया-राधेच्या शयनगृहात गेली. अर्धघटिकेत अवघे गोकुळ गाढ निद्रावश झाले. राऊळांमधल्या समयांच्या प्रशांत ज्योती काळोखाला चिरीत थेट यमुनेच्या उफान पाण्यावर लकाकत होत्या.

रात्र प्रगाढ होती. मथुरेतील कारागृहात, प्रत्यक्ष परब्रह्म, भगवान विष्णूंचा पूर्णावतार, राधाप्रिय श्रीकृष्ण प्रकटले. प्रकटताच श्रीकृष्णांनी लीलारंभ केला.

*नंदाच्या घराला । मज नेई गोकुळाला ।।१।।*
*माया उपजली तेथे । ठेवी मज आणि येथे ।।२।।*
*म्हणसी असे रक्षपाळ । ते म्या मोहिले सकळ ।।३।।*
*आच्छादित रूप । नामा म्हणे माझा बाप ।।४।।*
*उचलीला कमळापति । पायीची बंधने गळती ।।१।।*
*त्रैलोक्यांत जो न माय । त्यासी बंधन करील काय ।।२।।*
*कवाडें उघडती । देखतांची देवाप्रती ।।३।।*
*मंद मंद पडे पाऊस । शिरी छाया करी शेष ।।४।।*
*पूर चढला अचाट । त्यासी लाविला अंगुष्ट ।।५।।*
*त्वरें आला नंदाघरी । निद्रिस्त त्या नरनारी ।।६।।*
*ठेवी तेथें कृष्णाजीला । माया घेऊनि निघाला ।।७।।*
*रडे माया करी आकांत । नामा म्हणे उठती दूत ।।८।।*

यशोदेच्या पुढ्यात श्रीकृष्ण नवजात अर्भकरूपात आक्रोश करू लागले. सुप्रजननयोगीजीने बाळकृष्ण जन्मल्याचे घोषित केले! नंदराजाचे राऊळ पुन्हा तेजाने लखाकले. यशोदेने भगवंत श्रीकृष्णांना पाहिले आणि तिचे डोळे कृतार्थ झाले. नंदबाबांनी सुप्रजननयोगीनीला अमूल्य सुवर्ण हार भेट केला. राऊळातील जननप्रक्रिया कक्षात येऊन, त्यांनी डोळे भरून परब्रह्माला पाहिले. यशोदेच्या मुखावरील मातृत्वाचे तेज पाहून कृतार्थ झाला. यशोदेने नंदराजाकडे पाहिले आणि तिच्या नेत्रांतून अवकाशाचा गहिवर ओसंडला. चौघडे नगारे मंगल सूरवाद्ये वाजविण्याची आज्ञा केली. गोकुळ आनंदाने ओसंडू लागले.

राधा आवेगाने धावतच नंदराजांच्या राऊळाकडे निघाली. तिचे नेत्र कृष्णसख्याला, अंतरात्म्याला पाहायला उत्सुक झाले. यशदाही पाठोपाठ लगबगीने निघाली. राधाने थेट कृष्णजननी यशोदाकक्ष गाठला. राधेला पाहताच यशोदेचे डोळे लकाकले. राधेला मिठी मारावी असे वाटू लागले. ''राधेऽ राधेऽऽ बघ, बघ!'' यशोदेने राधेला हाकारले. राधा यशोदेच्या कुशीतल्या प्रियसख्याला पाहून समाधीमग्न झाली. तिचे नेत्र कृष्णसख्याच्या अलौकिक नवजात रूपात ध्यानस्त झाले होते. कृष्णसख्याच्या मुखकमलासमीप ओढवलेल्या राधेच्या मुखमंडलाला कृष्णसख्याचा हस्तस्पर्श झाला. राधा भानावर आली. यशोदेचा हात कृष्णसख्याच्या गोपवेशावर विसावला होता. कृष्णाचे नेत्र विस्फारले होते. यशोदेच्या कुशीतील श्रीकृष्ण एकदम हात पाय हालवून राधेला स्वतःकडे खेचीत होते. राधेच्या मुखमंडलाकडे पाहून नवजात श्रीकृष्ण खुदकन् हसले. यशोदा चमकलीच. राधा आणि कृष्ण परस्परात मग्न झाले. राधेला पाहून नवजात श्रीकृष्णाचे रूपच पालटले. यशोदा पाहून भयविस्मित झाली. पाच महिन्यांचा बालक खुदुखुदु हसून, हातपाय उडवून, खोडकरपणे खेळण्याशी खेळावा तसा कृष्ण राधेशी खेळत होता.

''राधे, अगं हा तुझ्याशी एकदम कसा गं खेळू लागला?'' तिने राधेला हलवून विचारले. राधा भानावर आली.

''अगं, असं काय बोलतेस मामी, तो तर झोपी जातोय!'' राधा म्हणाली. मग मात्र यशोदा आणखीच चमकली. तिने श्रीकृष्णाकडे पाहिले. तो तिचा हात तसाच त्या गुंडाळलेल्या गोपावर विसावलेला आणि नवजात अर्भकाचे नेत्र निद्राधीन होते गेले.

''अगं बाई, खरंच की!'' तिने कृष्णाला हळूवारपणे जवळ घेतले. तेव्हढ्यात यशदाही पोचली. राऊळातील गोपींचीही लगबग सुरू झाली. नंदराजांनी जातक वर्तविण्यासाठी शास्त्र्यांना निमंत्रण केले. अलौकिक पुत्र जन्मोत्सव सोहळा सुरू झाला.

*शुक म्हणे राया ऐक परिक्षिती । श्रवण करितां तृप्ति नाही तुज ।।१।।*
*माया जाता मथुरे सावध निद्रिस्त । देखिला भगवंत यशोदेनें ।।२।।*
*ब्रह्मांडे उदरीं न कळे कोणाला । वाजविती थाळा जन्मकाळी ।।३।।*
*यज्ञभोक्ता कृष्ण त्यासी देती बोळा । ध्यानीं ध्याय भोळा सदाशिव ।।४।।*
*गौळणी वाहाती नंदालागी तेव्हा । पुत्रमुख पाहा नामा म्हणे ।।५।।*

*विश्वाचा जो बाप हाती ज्याच्या सूत्र । म्हणवितो पुत्र नंदजींचा ।।१।।*
*तीर्थे ज्याच्या चरणीं करीताती न्हाणी । यशोदा जननी म्हणताती ।।२।।*
*वेडावला शेष शिणले वेद चारी । निजे मांडीवरी यशोदेच्या ।।३।।*
*शरणागता देत क्षीरसिंधु जाण । चोखितसे स्तन आवडीनें ।।४।।*
*करी पुण्याहवाचनें । नामा म्हणे आनंदाने ।।५।।*

नंदराजाच्या राऊळी आनंद सोहळा सुरू झाला. नंदराज यशोदा, यशोधन, यशदा, अनया आणि राधा एकत्र असतांना यशोदा श्रीकृष्णाला लडिवाळपणे कुरवाळीत, स्तन्य देत म्हणाली, ''यशदे तुला अनया तसा माझा कन्हय्या!'' यशोदेचे शब्द ऐकून अनया सुखावला. तेव्हढ्यात राधा म्हणाली, ''कृष्ण कन्हय्या!'' आणि यशोदेने खळखळून हसत दाद दिली. ''होय बरं राधे, कृष्ण कन्हय्या!'' नामकरण विधीच्या उत्सवात अवघे गोकुळ रंगले. यशदेने नवजात अर्भकाच्या कानात 'कृष्ण कन्हय्या' नाव सांगितले आणि टाळ्यांचा गजर होऊ लागला. पाळणा गीते गायिली जाऊ लागली. राधेने धावतच जाऊन सर्वांना नामघोष करीत राजपुत्राचे नाव कळविले 'कृष्ण कन्हय्या!'

राऊळाबाहेर मंगलवाद्यांच्या गजरात कन्हय्यालालाचे स्वागत नृत्य सुरू झाले.

*हाथी घोडा पालखी । जय कन्हय्या लालकी*
*नंद के घर आनंद भयो । जय कन्हय्या लालकी*
*हाथी घोडा पालखी । जय कन्हय्या लालकी।।*

गोप, गोपी, आबालवृद्ध भजननृत्यात दंग होऊन गेले. राधा आणि अनयाही त्या नृत्यात रंगून गेले. नंदराज मोठ्या कौतुकाने हे जन्मोत्सव नृत्य पाहात होते. त्यांचे सारे लक्ष राधेने वेधून घेतले होते. राधेचे नृत्य अनोखे होते. जणू बाळकृष्णाच्या हातात हात गुंफून राधाकृष्ण नृत्य करीत आहेत. यशोधन आणि यशदेलाही असाच भास होत होता.

गोपींच्या घोळक्यात इवल्याशा कृष्णाला घेऊन मोठ्या आनंदविभोरतेने यशोदा हे आनंद नृत्य पाहावयास बाहेर आली होती. तिच्या हातीचे कृष्णकन्हय्या बाळ नंदराजांनी हातात घेतले. ते पाहताच आनंदाला उधाण आले. या रंगातच नंदराजांनी थेट राधेला गाठले आणि राधेच्या हातात कृष्णकन्हय्यांना सोपविले.

''अहो, अहो, हे काय?'' यशोदा नंदांना म्हणाली.

''खेळूदे राधेला!'' नंद म्हणाले.

राधेच्या हातात हात गुंफून श्रीकृष्ण आपल्या बालरूपात नाचत होते. नंदराजाला मात्र भावसमाधी लागली होती. त्यांच्या डोळ्यासमोर अचानक सोसाट्याचे वारे वाहू लागले. विजा चमकू लागल्या. सगळीकडे अंधार पसरला. या अंधारात दिव्य तेजोमयी आकृती आकाशातून पृथ्वीवर झेपावते आणि राधेतच सामावते आहे असे वाटले. कृष्णासह नृत्यमग्न राधा तेजोमयी प्रकाशली. नंदराजांचे डोळे दिपून गेले. त्यांना परब्रह्म लीलेचे स्मरण होते. कृष्णाची तत्त्वमयी राधा कृष्णासाठी या गोलोक वनांमध्ये प्रत्यक्ष अवतीर्ण झाली आहे! नंदराजांनी राधेकडे सार्थकतेने पाहून प्रणाम केला. तेव्हा यशोदेने हरखून भान हरपून तिनेही त्या तेजोमयीला वंदन केले. काही क्षणातच परब्रह्म लीलेचा उलगडा नंद यशोदेला झाला.

राधेच्या हातात श्रीकृष्ण कन्हय्या आले मात्र ती त्यांना घेऊन बेभानपणे नृत्य करू लागली. यशोदा, नंद, यशदा, यशोधन आणि अनया पाहात होते. पाहाता-पाहाता श्रीकृष्ण लडिवाळ बाळरूप झाले. राधेच्या हातात हात गुंफवून राधाकृष्णांचे नृत्य सुरू झाले. गोपगोपी नृत्यात दंग होत्या. मात्र राधेसवे कृष्ण बालरूप होऊन नृत्य करताहेत ह्याचे भासदर्शन केवळ यशोदा, नंद, यशदा, यशोधन, अनया यांनाच होत होते.

''यशदे, घेऊन ये बाई बाळाला राधेच्या हातातून. ती बघ कशी अनावरपणे नाचते आहे!'' यशोदा म्हणाली. यशदा धावली आणि तिने राधेच्या हातातून कृष्णकन्हय्याला जवळजवळ ओढूनच घेतले. तिने श्रीकृष्णाला यशोदेच्या हातात सोपविले. राधा भानावर आली. हिरमुसली. कृष्णाचा दुरावा तिला सहन होत नव्हता. ती यशोदेकडे धावली. तिने कृष्णासह यशोदेला मिठी मारली. श्रीकृष्णांच्या गालाला स्पर्श करीत म्हणाली, 'माझा कृष्ण कन्हय्या!'

राधेला अंतरीची स्वसंवेद्यता रोमांचित करीत होती-

*कंस - अरिः अपि संसार - वासना - बद्ध - शृंखलाम् ।*
*राधाम् आधाय हृदये तत्याज व्रज - सुन्दरी ।।१।।*

लोखंडाच्या साखळीने अतूट भक्कम बांधलेल्या बंदिस्ताप्रमाणे कृष्णाचे मनसुद्धा जीवनातील आनंदाच्या प्रगाढ ओढीने राधेशी बांधलेले आहे. राधेची आठवण होताच अन्य सुंदर गोपींचा, गोष्टींचा त्याग करून कृष्ण राधेकडेच झेपावतो. राधाकृष्ण हेच सत्य. अन्य सारी विस्मयकारक भगवंत लीला होय.

●●●

। १४ ।

# राधाकृष्ण! गोपाळकृष्ण!

यशोदेच्या कुशीत मांडीवर पाळण्यात, अचपळ खेळकर कृष्णाला पाहण्यासाठी गोलोक लोटला. पाहाता-पाहाता वार्ता मथुरेला पोचली. त्यातच पुतनामावशीही आली. पुतनामावशीला मायारूपात कंसमामाने श्रीकृष्णाचा वध करण्यास पाठविले. बाळकृष्णाने लीला केली.

*कृष्णा लावितसे स्तनीं । तिसी मारी चक्रपाणी ।।१।।*
*भयाभीत प्रेत । जन विस्मय करीत ।।२।।*
*रडें तेव्हां माया । वांचलासी बा तान्हया ।।३।।*

यशोदेला श्रीकृष्णाचे अवतारित्व माहीत असूनही, तिचे मातृत्व भयाकुल झाले होते. राधा समीपच उभी असूनही ती या लीलेचा आनंद घेत होती. तिने पुतना गतप्राण होताच धावत जाऊन श्रीकृष्णाला हृदयाशी कवटाळून, यशोदेकडे आणले.

हळूहळू कृष्णाचे अवतारित्व गोकुळाला ज्ञात झाले. राजपुत्र त्यात प्रत्यक्ष भगवंताचा अवतार, त्यातच कोवळे सुकुमार बाळरूप, गोलोकीच्या गोपींना कृष्णाला कोठे ठेवू असे झाले! कृष्ण पालथा पडू लागला, रांगू लागला आणि चालीचाली करू लागला, दुडुदुडु धावू लागला. गोपींमध्ये त्याचे लळे पुरविण्याची स्पर्धा लागली. लडिवाळ खोड्यांनी गोपीच काय पण गोपही सुखावत! गोपी कधी लटक्या रागाने तक्रारही करीत. नंदयशोदा लहानग्या श्रीकृष्णाला वनात घेऊन जात. तेव्हां तर कृष्णलीलात गायीही रमून जात.

भोजनसमयीतर श्रीकृष्णाच्या बाललीलांना उधाण येई. प्रातःसमयीच्या गोदोहनापासूनच राऊळात, गोशाळेत, अंगणात, नंदग्रामात श्रीकृष्णाचे दुडुदुडु धावणे आणि वाटेल तशा खोड्या करणे सुरू होई. तीन-चार-पाच-सात वर्षांची गोपमुले जणू त्यांचे खेळणे, म्हणूनच श्रीकृष्णाला सवे नेण्याचा प्रयत्न

करीत. अवघ्या शैशवावस्थेतील कृष्णाने गोपींना परोपरीने त्रास द्यावा. त्यांचे अंग अंग ओढावे, डोळ्यांत बोटे घालावीत. गोदोहन करू देऊ नये, लोण्याचे बकाणे भरावेत काय अन् काय! त्यातच वनात त्याच्या सवंगड्यांकडून वंशी खेळायला मिळाली आणि अहो आश्चर्य. मुरली अधरांना लावून मुरलीधराने अशी लीला केली की, अवघा गोलक त्या मंजुळ मुरलीरवाने आकर्षित झाला. गायी गुरेही मुग्ध झाली. राधा तर धावतच आली. गोपींनी राधासवे कृष्णाभोवती फेर धरला. मग गोपही सरसावले. कृष्ण सवंगड्यांसह गोपही नृत्य करू लागले. अवघे वन कुंजवन झाले. मुरलीरवाने मुग्ध होऊन कृष्ण रंगात रंगून गेले. हा अद्‌भूत अनुभव केवळ गोलोकी राधेसवेच शक्य होता!

यशोदेचे मातृत्व ओसंडून वाहे. गोकुळातले नर-नारीही कृष्णाच्या बाललीलांनी आनंदमग्न होऊन सगळी कामे सोडून देत. राधेला मात्र कृष्णसख्याची अनादिअनंत आगळी ओढ असे. कृष्ण आणि राधा हे द्वैत तिला असह्य होई. ती हातातली कामे टाकून, श्रीकृष्णाकडे धावत येई. मग मात्र कृष्ण आणि राधा एकमेकात दंग होत. कधी गोपी कृष्णाचे लटक्या रागाने गाऱ्हाणे गात. यशोदेलाही लटक्या रागाने कृष्णाला ओरडावे लागे. श्रीकृष्णाच्या शैशवावस्थेतील बाललीलांनी गोलोकधाम आनंदोत्सवात दंग असायचे.

एके दिवशी गोपींनी गाऱ्हाणे आणले आणि कृष्णाने त्या गोपींनाच खोटे ठरवित त्यांची फजिती केली. गोपी चिडल्या. यशोदेला काय उपाय करावा सुचेना. एकीकडे बालमुकुंदाच्या खोड्यांचे हसू अनावर झाले.

''राधे, जा बरं कृष्णाला तुझ्या राऊळात घेऊन आणि चांगला कोंडून ठेव!'' यशोदा लटक्या फणकाऱ्याने गोपींना सुखावत म्हणाली.

''नको गं राधे, जाऊदे पोराचं काय मनावर घ्यायचं?'' त्यातील गौळण म्हणाली. पण तोपर्यंत राधेने पडत्या फळाची आज्ञा घेऊन, पोबारा केला होता. तिने थेट आपले राऊळ गाठले आणि ती कृष्णाला घेऊन आपल्या शयनगृहात गेली. त्याला मंचकावर उभे केले. द्विवर्षीय, कृष्ण सखा माथ्यावरील मयूर पंखाचा मुकुट हलवित, हातीची मुरली नाचवित, गोबऱ्या गालातील अधरांतून, दंतपंक्ति नाचवित, खुदुखुदु हसत, राधेच्या नयनांमध्ये मिश्किलपणे, खट्याळपणे नजर रोखीत म्हणाला, ''राधे, पळवून आणलेस ना मला! का? कशाला. मला तर तुझ्याकडे यायचेच होते!''

''कृष्ण कन्हय्या!'' म्हणत राधेने कृष्णाला उराशी कवटाळले आणि श्रीकृष्णाच्या सगुण आनंदमय रूपाचे आवेगाने चुंबने घेण्यात ती मग्न झाली.

यशदा, यशोधन आणि अनया राधेचे हे कृष्णलळीत पाहण्यासाठी आले. कौतुकभरल्या नजरेने राधेचे ओसंडणारे वात्सल्य पाहाता-पाहाता तिघेही पाहातच राहिले.

बाळकृष्ण वर्धिष्णू होत पूर्ण पुरुष झाला. राधाही अनिवार्यपणे भान हरपून कृष्णसख्याला बिलगली. दोघे परस्परांच्या आलिंगनात, अधरामृत प्राशनात अगदी गढून गेले. या तिघांनाही, त्यातली राधा कोण नि कृष्ण कोण कळेना! मायाजाल पसरावा, संमोहनात सारेच भ्रमित व्हावेत, इंद्रजालात हरवावे, तसे झाले! अवघे राऊळच नव्हे, अवघा गोलोक दिव्य तेजाने झळाळला. कधी दोघेही कृष्ण.

कधी दोघेही राधा, तर कधी यशदा, यशोधन राधाकृष्ण तर कधी अनया राधा, राधाकृष्ण, तर क्षणात सारेच कृष्ण तर क्षणात सारेच राधा तर क्षणात सारेच अर्धनारी स्वरूपात, ठायीच राधाकृष्ण! असे जाणवू लागले. ही लीला अगम्य आणि उत्तुंग आनंददायी होती. राऊळ आणि गोलोक यांचाही विसर पडला होता. कैवल्याचे निरागस आनंद लास्य अवघ्या गोकुळावर पसरले होते.

ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र आणि सर्वच देवदेवता हा अनुपम्य अद्वैत सोहळा अनुभवण्यासाठी, गोलोकाच्या अंतरिक्षात दाटीने जमले. योगी, ऋषी, मुनी, संत सगळेच आपली साधना सोडून गोकुळात पोहोचले. या सर्वांना राधाकृष्ण अद्वैताचा आनंद घ्यायचा होता. पूर्णावतार श्रीकृष्णाने हे जाणले होते. सर्वांचीच तपश्चर्या फळाला आली होती. क्षणात सर्व देवदेवतांना आणि ऋषीमुनींनादेखील ठायीच राधाकृष्ण असल्याचे जाणवू लागले. कधी आपणच राधा आहोत आणि कृष्णसख्याला आलिंगन देत आहोत असे वाटे; तर कधी आपण कृष्ण आहोत असे वाटे. कधीतर राधाकृष्ण दोन्ही आपणच आहोत असे वाटे.

आपले अस्तित्व राधास्वरूप झाले आहे, कृष्णस्वरूपाच्या ठायीच अनुभव येत आहे, असे वाटू लागले. आपले स्थान, काम आणि अवस्था सारेच, त्या राधाकृष्ण प्रलयात विरून गेले होते. सर्वांच्या मुखातून 'राधाकृष्ण गोपालकृष्ण!' घोष निनादला. अवघे अवकाश कृष्णराधा संवेदनेने व्यापून गेले. काळाला काळाचे अस्तित्वही राधाकृष्णस्वरूप हरवलेसे वाटू लागले. अवघे विश्व राधाकृष्णस्वरूप झाले. भूलोकीला हा अद्वितीय अनुभव घेतांना, पुन्हा पुन्हा अर्धनारी राधाकृष्णस्वरूप व्हावेसे वाटू लागले. राधाभावाने, प्रेमस्वरूपाने, भक्तिउत्कटतेने आपणच राधाकृष्ण, सच्चिदानंदस्वरूप आहोत, याचा अनुभव येत होता. द्वापारातील ही पूर्णावतार लीला सर्वांना, सच्चिदानंदस्वरूप स्थितीचा,

आपसूकच आनंद, राधेच्या निमित्ताने सहज घडवित होती.

काही क्षणात नंदग्रामातील गोधने, गोपगोपी हातातली सारी कामे टाकून अनयाच्या राऊळाकडे झेपावले. अधीर, अनावरपणे, जमेल तेथून, राधाकृष्णाची लीला पाहू लागले. पाहाता-पाहाता साऱ्यांना ठायीच राधाकृष्णलीला जाणवू लागली. मुखातून 'गोपालकृष्ण, राधाकृष्ण' घोष सुरू झाला. नंदराऊळातील गोधने ही यशोधनाच्या राऊळाकडे झेपावली. सेवक गोपगोपी हातातली कामे टाकून धावत सुटल्या आणि क्षणात राधाकृष्ण भजनात हरपून गेल्या. नंदयशोदेला काहीच कळेना. ती दोघे मात्र पूर्ण भानावर होती.

''काय झालंय कुणास ठावूक? सगळे वेड्यासारखे अनयाच्या राऊळाकडे धावताहेत!'' नंद काळजीने म्हणाले.

''अहो, कृष्ण खोड्या करीत असेल. खूप छळतो सगळ्यांना. गोपी त्रागा करीत आल्या होत्या. मीच कान्हाला घेऊन जा म्हणून राधेला सांगितले.'' यशोदा म्हणाली.

इंद्रजाळात राधाकृष्ण लीलेत गोकुळातले जणू चराचर चैतन्यमयी होऊन, हरवले होते. नंदयशोदेला मात्र उगाच गर्दी केलीये असे वाटत होते. गोधने हंबर करीत होती. वासरे शेपट्या उडवून बागडत होती. गोपगोपींना काही विचारण्याची सोय नव्हती. सर्वांमुखी 'राधाकृष्ण गोपालकृष्ण' घोष निनादत होता. आत्ममग्नतेने सगळे नाचत होते. पुतनामावशी आदि दुष्टांचा कृष्णाने दिव्यत्वाने वध केला होता. तेव्हा असेच अवघे गोकुळ कृष्णकन्हय्याच्या जयघोषाने निनादले होते. पण आत्ता तर 'राधाकृष्ण, गोपालकृष्ण!' असा घोष सुरू होता. वाट काढीत नंदयशोदा थेट राऊळात आले. विस्मयाने थक्क होत ते पुढे जात होते. यशदा, यशोधन, अनया कोणीच त्यांच्याकडे लक्षही देत नव्हते. नंदयशोदा थेट राधेच्या कक्षापाशी पोचले. बालकृष्ण राधेशी खेळण्याशी खेळावा तसा खेळत होता. राधाही त्याचे कोड पुरवित होती. कृष्ण खळखळून हसतांना राधा त्याला उराशी कवटाळून त्याचे चुंबन घेई.

''राधे, राधेऽ'' यशोदेने हाक मारली.

''माई, ही राधा मला त्रास देते!'' कृष्णानेच तक्रार केली.

''हो, का?'' लटक्या रागाने यशोदा म्हणाली. यशोदेने श्रीकृष्णाला राधेकडून सोडवून घेतले.

''मला वाटलं तू थोड्या वेळात घेऊन येशील, तू तर खेळत बसलीस कन्हय्याशी, कन्हय्याशी खेळायला लागलं की तुला भानच राहात नाही!''

त्यांचा हा संवाद होत असतांना क्षणात अवघे वातावरण पूर्ववत झाले.

''हो ना! राधाला संसाराचे भानच नसते. उठली की चालली कन्हय्याकडे!'' यशदा म्हणाली, कृष्णाने यशोदेकडे खट्याळपणे पाहिले. यशोदेला जाणवले.

''राधेलाच कशाला म्हणायला हवे, तू काय, सगळ्या गोपी काय, सगळेच कृष्णाच्या मागे लागतात!'' यशोदा म्हणाली. मग मात्र दोघी खळखळून हसल्या. यशोदा श्रीकृष्णाला राऊळाकडे घेऊन येतांना तिला सारेच चित्र स्वप्नवत नाहिसे झाल्याचे जाणवले. ती नंदराजाला म्हणालीसुद्धा. ''आता सगळेच कसे ज्याच्यात्याच्या कामात गुंग आहेत. मग मघाशी पाहिले ते?''

''नको विचार करूस! कृष्णलीला आहे, दुसरे काय! यशोदे आपण केव्हढे भाग्यवान आहोत! प्रत्यक्ष परब्रह्म आपल्या अंगाखांद्यावर, राऊळात नि अवघ्या गोकुळात बागडतो आहे. महातपस्वी योग्यांना, ऋषीमुनींना अनंतकाळ तपःश्चर्या करूनदेखील जे साधत नाही; ते आपल्याला श्रीकृष्णाने दिले!'' नंदराज म्हणाले. यशोदेचे डोळे आनंदसागर झाले. गोधनातून श्रीकृष्ण सख्यासाठी हंबर निनादला. कृष्ण पटकन खाली उतरून गोधनाकडे पळाला.

''नाही हं कृष्णा, आता मी भरवते ते खाऊनच मग खेळायला जा!'' यशोदेने धावत जाऊन पकडण्याचा प्रयत्न केला.

''नको खायला, मी कपिलेकडे जातो. तिचं बाळ मला खेळायला बोलावित आहे.'' लुटूलुटू धावत्या श्रीकृष्णाने त्याच्या शेल्यात हातातली बासरी खोचत म्हटले.

''नाही नाही, अगोदर चल बघू!'' यशोदेने कृष्णाचा दंड धरून ओढले.

''मला लोणी देशील?'' कृष्ण म्हणाला.

''हो देईन चल'' यशोदा म्हणाली.

''मला हवे तेव्हढे! सगळेच्या सगळे?'' कृष्णाने चिडवत विचारले.

''हो रे बाबा, चल आता!'' यशोदेने ओढले. तेव्हढ्यात कपिला पुन्हा हंबरली. श्रीकृष्ण पुन्हा ओढू लागला. आता मात्र यशोदेने त्याला अगदी खमाटलेच. राऊळात नेऊन तिने त्याला खायला म्हणून मोदक आणला. तोवर कृष्ण डेऱ्याजवळ जाऊन लोण्याचे गोळे मुखात घालत होता. मुळातच आनंदकिवळा कृष्णाचा मुखडा अवघ्या लोण्याने माखला होता. अवघा विश्वातला आनंद जणू कृष्ण मुखावर विलसत होता. यशोदेला राहवले नाही. तिने श्रीकृष्णाला जवळ ओढले. मायलेकरे लोण्याने माखली. तेव्हढ्यात पाठोपाठ आलेल्या राधेने ते पाहिले. तिला हसू आवरेना.

''मामी अगं तुझ्या सगळ्या वस्त्रांना नि अंगाला श्रीकृष्णानं लोणी माखलंय.'' तिने कृष्णाला जरा दूर लोटले.

''लाव तुझ्या राधेला'' यशोदा गमतीने म्हणाली.

कन्हय्याने डेऱ्यातले लोण्याचे गोळे दोन्ही हातात घेतले आणि राधेच्या मुखमंडलाला लावण्यात कृष्ण गर्क झाला.

''बघ कसा खट्याळ आहे तो. सगळं लोणी नासवलं!'' यशोदा म्हणाली.

नंदबाबा हे सारं पाहात होते. त्यांना हसू आवरेना. ते हसताहेतसे पाहून कृष्ण लोण्यासह नंदबाबांकडे धावला आणि नंदबाबांनीही त्याच्याकडून स्वतःला मोठ्या लडिवाळपणाने लोणी फासून घेतले. बाळकृष्ण लीलेत सूर्य डोईवर आल्याचेही कळले नाही. दिवसाची सारी कामे थांबली होती. गोधने वनात घेऊन जाण्यासाठी हंबरत होती.

●●●

। १५ ।

# आतूर मिलना

सवंगड्यांसोबत यमुनीतीरीच्या वनावनात खेळायला गेलेला कान्हा, गायी घराकडे येतांना सवंगड्यांसोबत हुंदडत येत होता. दिवसभराच्या कान्हाच्या दुराव्याने राधेची दुरावस्था झाली होती. गायी सूर्यास्ताला जातांना गोरज अवकाशभर करीत गोकुळात येत होत्या. त्या गोरज गंधाने राधा सुखावली. तिच्या मुखकमलाचा कोमेज नाहिसा झाला. चंद्रविकासी कमलाप्रमाणे तिचा मुखचंद्रमा उमलला, तेजोमयी झाला. कृष्णाच्या भेटीने आतूर झालेल्या राधेने कान्हाला खेळायला आवडणारी कुंडले परिधान केली. ओसंडणाऱ्या केशसंभारात सुगंधित पुष्पमाला माळल्या. कृष्णाला गुंतवून ठेवणारी भुरभुरती वस्त्रे परिधान केली. गोरजमुहूर्ताच्या शीतल वायूलहरींवर आरूढ होऊन; ती वेगाने नंदयशोदेच्या गोशाळांकडेच थेट धावली. तिची भिरभिरती नजर कावरीबावरी होऊन, कान्हाला शोधीत होती. राधा इथं, तिथं, गायी वासरांत, श्रीकृष्णाचा वेध घेता व्याकूळ झाली. कान्हा गवसेना. गायी वासरांचा परस्पर वत्सल गोपगोपींना गोदोहनासाठी साद घालू लागला. राधाही कृष्णसखा सापडेपर्यंत गोदोहनासाठी सरसावली. गोदोहनाकडे लक्ष होतेच कुठे?

कृष्णही राधेची ही मौज पाहून मनोमनी आनंदमग्न झाला होता. राधेला, जाऊन मिठीत मिटून घ्यावे, असे कान्हालाही मोठ्या उत्कटतेने वाटत होते. खट्याळ कान्हा राधेला आर्त आर्त करीत होता. राधेच्या मनात कृष्णलय ओतप्रोत झाली. तिची भिरभिरती नजर अगदी व्याकूळ झाली आणि तेव्हढ्यात कपिला गायीच्या बासरीची चुंबने घेत न राहून हळूच नकळत राधेला खिजविणारा कान्हा राधेला दिसला आणि राधा कृष्ण परस्परांत भुलून गेले.

राधा एकीकडे दोहन व्यंग करीत होती, तर कृष्ण कपिलेच्या वासराच्या

मानेवर उगा कुरवाळत राधेकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होता. कृष्णाने दोन्ही हात पसरले आणि राधा अधिकच अधीर झाली. गोदोहनही विसरली.

*वारियाने कुंडल हाले, डोळे मोडित राधा चाले ।।*
*राधा पाहून भुलले हरी, बैल दुभवी नंदा घरी ।।*
*फणस जंबिर कर्दळी दाटा, हाति घेऊन नारंगी फाटा ।।*
*हरि पाहून भुलली चित्ता, राधा घुसळी डेरा रिता ।।*
*ऐसी आवडी भिनली दोघा, एकरूप झाले अंगा ।।*
*मन मिळालेसे मना, एका भुलला जनार्दना ।।*

राधा कृष्णाशी एवढी एकरूप झाली होती की, कृष्णाला पाहताच ती संभ्रमित होई. कृष्णाशिवाय तिला काहीच दिसत नसे. नको ते वर्तन, हालचाली तिच्याकडून घडत. कृष्णभक्तीने जगाचे भान हरपे. विदेही होऊन ती कृष्णसख्यात एकरूप होई. राधेप्रमाणे कृष्णाची स्थितीही तशीच राधामय होऊन जात असे. राधाकृष्णाचा हा अद्वैत प्रेमभाव पाहून गोकुळातील सर्वांनाच अशा आनंदाची ओढ लागे. अशा अनन्यभक्तीची लीला सर्वांना ज्ञात करण्यासाठीच जणू राधेची प्रेरणा गोकुळात झाली होती.

अवघ्या पाचसात वर्षीय बालगोपवेषातील बालकृष्णाला जणू वंशी–मुरली, वादनाचा छंदच लागला. गोपसवंगड्यांबरोबर वनात खेळण्यासाठी हट्टाने श्रीकृष्णाने जावे. खेळण्याच्या नादात गोपसवंगड्यांनी आणि गोपगोपींनी आपली गोधने चरायला रानोमाळ सोडावीत आणि खुशाल बालगोपाळांच्या सूरपारंब्या, आट्यापाट्या, विटीदांडू, चेंडूफळी, अबाधबी, लगोऱ्या असे खेळ पाहात मुराद वनात वेळ घालवावा. हे नित्याचेच झाले. मधेच श्रीकृष्णाला कोणी तरी मुरली वाजवण्याचा आग्रह करी. हातातली मुरली अधराला लावून कृष्ण पायांची घडी घालून मुरलीधर होई, कधी वृक्षातळवटी बसावे, कधी गर्दवनाने वेढलेल्या वनात एखाद्या फांदीला पाठ टेकून उभे राहावे, कधी कपिलेला टेकून उभे राहावे, वेणूवादन सुरू करावे. वेणूवादनाने यमुना काठीच भांडीरवन, वंशीवन, कुंजवन, अवघे वन वृंदावन होई. वेणूचे मधुर सूर, थेट नंदग्रामापर्यंत जात आणि थोड्याच वेळात गोलोकातील अवघा गोपी, गोपाल, बालगोपाल, गोधने, मोरादि पक्षी कुंजवनात कृष्णाभोवती संगीत सभेत मुग्ध होऊन; कृष्णसख्याला हृदयात साठवू लागत. भक्तिभाव समाधीत स्वरानंदात आनंदमग्न होऊन; सच्चिदानंदाचा अनुभव घेऊ लागत. कामधाम, प्रपंचव्यवहार स्तब्ध होई. शारीर व्यवहारांच्या पलिकडे, स्वरलहरींवर स्वार होऊन; चराचर कृष्णरंगी रंगून जाई.

गोलोक अद्‌भूत, अपूर्व चैतन्याने विलसू लागे. राधा त्यात कृष्णासमीप जाई. कृष्णाच्या सान्निध्यात तिला कोणतेच भान राहात नसे. परंतु हीच अवस्था प्रत्येकाची होई. जणू प्रत्येकजण राधाच होई. प्रत्येकाला श्रीकृष्ण आपल्या अवघ्या अंगप्रत्यंगात, स्वरलहरींनी संचारला आहे, असे वाटे. आपणच आपल्या अधरांशी मुरली लावून, मुरलीधर झालो आहोत, एवढी स्वरमग्नता येई.

राधा मात्र कुंजवनीच्या या गोकुळमय संगीतमग्नतेतूनही कृष्णाला केवळ आपल्याच ठायी अनुभवावे अशी कांक्षा करी. प्रत्येकजण राधाच होऊन श्रीकृष्णसख्याला अनुभवणे, असे हे सृष्टीस्वरूप होणे राधेला असह्य होई. केवळ राधा, केवळ कृष्ण व्हावे! अशी तिची कांक्षा तीव्र होई.

आर्त राधा एकटीच राऊळाच्या पुढ्यातील वाटिकेत फुले निवडीत होती. सुगंधी फुलांची मालिका केशसंभारात माळावी. श्रीकृष्णाला पुष्पांजुली समर्पित करावी, असा मानस होता खरा, परंतु मनीची कृष्णसख्याशी एकांती एकरूप होण्याच्या तीव्र कांक्षेने, मन व्यापून टाकले! राधेची प्रिय सखी अनुराधा तिच्या समीप येऊन केव्हां तिला एकटक न्याहाळीत उभी राहिली, कळलेच नाही! अखेर अनुराधानेच तिला हलविले.

''राधाराणी अगं ध्यान कुठे आहे? आपण वंशीवनात श्रीकृष्णाला भेटायला जायचंय असं तूच ना म्हणालीस? हे बघ मी तय्यार होऊन आले सुद्धा!''

''हं, जाऊया'' राधा थंडपणाने म्हणाली.

''अगं काय झालंय, स्वारीचं चित्त व्यथित झालेलं दिसतंय!'' यशदामावशी काही म्हणाल्या का?'' अनुराधेने खोदून खोदून विचारलं.

''नाही गं बाई, त्या काही म्हणाल्या नाहीत.'' राधा तुटकपणे स्वतःच्याच तंद्रीत असल्यासारखी म्हणाली.

''अगं मग झालंय तरी काय? मलाही नाही का सांगायचं?'' अनुराधानं पुन्हा विचारलं.

''सखे अनुराधे, कृष्णसख्याला एकांती भेटावे. त्याच्या मिठीत एकरूप व्हावे असं वाटतंय! कृष्णसख्यालाही मला भेटावं असं वाटत असेल?'

''नक्कीच, कान्हा, तुझ्यासाठीच तर वृंदावनात, कुंजवनात वेणूनाद करतो! हे का आता लपून राहिलंय. तू भेटलीस की श्रीकृष्णाचं रूपच पालटतं त्याचं बालरूपच विश्वंभर मदनपुतळ्यासारखं मिलनोत्सुक होतं. आपण सारेच त्या चैतन्याच्या किवळ्याशी मनमोहक मुरलीच्या नादात कसे गुंग होऊन जातो! अवघं गोकुळ त्यासाठीच तर आसुसलेलं असतं. सगळ्याच गोपगोपींनी,

कृष्णसखा अगदी आपल्यासमीप आहेस वाटतं! राधे अगं गोप गोपी. गाईवासरंही अगदी राधाच झाले आहेत, असं वाटतं. मनमोहन मुरलीधराच्या मधुरस्वरलहरींच्या मिठीत सारं गोकुळच संमोहित मुग्ध होतं. हे तर रोजच आपण अनुभवतोय. मग आजच असं वेगळं काय बरं तुझ्या मनी येतंय!'' अनुराधा जणू कृष्णाच्या मुरलीरवांत हरवून बोलत होती.

''अनुराधे हेच मला असह्य होतंय. कृष्णसख्याच्या समीप मीच सर्वरूपात नटले आहे, असे वाटून कृष्णसखा सर्वांशीच एकरूप होतो. माझं असं, केवळ कृष्णमय होणं, हवंय गं मला!' राधा विषण्णपणे म्हणाली.

''म्हणजे मी नाही बाई समजले.'' अनुराधा संभ्रमात पडली. प्रिय सखीचं मनही आपल्याला कळू नये यामुळे तिचं मन खट्टू झालं.

''सखे अनुराधे, कसं सांगू तुला? मला कृष्णसख्याशी प्रणयाची भावना आर्त करते आहे! कृष्णसखा आणि मी एकच आहोत असं जाणवतं. त्याशी असं एकरूप होऊन जावं. प्रणयक्रीडेत अद्वैत घडावं असं मला वाटतं!'' राधेने मनातली खंत व्यक्त केली.

''अगं बाई हो का? मग मी तरी कशाला येऊ तुझ्या सवे!'' अनुराधा लटकेपणाने म्हणाली.

''तसं नाही गं अनुराधे, तुला गुपित माहीतच आहे ना! परमतत्त्व श्रीकृष्णांची पराशक्ती म्हणजेच तत्त्वमयी राधा. मी तर चराचराच्या ठायी तत्त्वमयी, चैतन्यमयी रूपाने प्रकटले आहे. हीच तर श्रीकृष्णांची, सच्चिदानंदाची विश्वोत्पत्ती लीला. या द्वैतभावातून निसटून तत्त्वमयीला ठायीच तत्त्वस्वरूप अनुभवावे हीच तर नित्य परतत्त्व स्थिती होय ना? या सृष्टीलीलेसाठी या आद्या स्वरूपाला सृष्टीरूपाने विलसावे लागले!'' राधेने शून्याचा वेध घेत अनुराधेचे हात हाती घेत, अनुराधेला लीलाविग्रहाची आठवण करून दिली.

''होय गं म्हणूनच ते आत्मरूप आद्या रूपाने सर्वांठायी प्रकाशते!''

अनुराधेने ज्ञान प्रकाशित केले. ''परंतु राधिके तूच जर तत्त्वरूप झालीस तर ह्या चराचराचा महाप्रलयच होईल ना?'' अनुराधेने राधेला शंका विचारली.

''नव्हे गं अनु, द्वापारातील या लीलेत सगुण रूपात श्रीकृष्णाशी मिलन व्हावे अशी ही उत्कट कांक्षा आहे. अन्यथा सर्वांठायीच्या चैत्यमयीला भक्तिमयी राधास्वरूप होऊन, कृष्णस्वरूपाची सायुज्य अनुभूती घडावी यासाठीच तर ही लीला ना?'' म्हणूनच गोपकृष्णस्वरूपाशी समागम लीला घडावी, ही या राधेची कांक्षा आहे! तसे वचनही अवतार धारण करतांना लीलाविग्रह प्रसंगी मला दिले

आहे.

त्या वचनाची पूर्ती गोपकृष्णाने करावी अशी उत्कट इच्छा आहे. गोपींसवे रासक्रीडेची लीला त्यासाठी श्रीकृष्णांनी केली ना! त्याच रासलीलेच्या एकांतातील राधाकृष्ण अद्वैत लीलेसाठी माझी तगमग सुरू आहे.'' राधा बोलत होती.

''राधाराणी होईल गं बाई तुझी इच्छा फलदुप! चल बघू...'' अनुराधेने राधेला अधिकच उत्सुक करीत म्हटले.

कुंजवनात अनुराधा राधेला घेऊन आली. पाहाते तो काय विस्मयकारी दृश्य. बाळकृष्ण, मुरलीधर, कृष्णसखा होऊन रासक्रीडा करीत होते. अष्टपदीतून ही रासक्रीडा, अनुपम्य क्रीडा रसिकांच्या मनातील गोपीरूप, राधास्वरूप होऊन संवेदना प्रकट करीत होती–

*हरिः मुग्ध – वधू – निकरे । विलासिनि विलसित केलि परे ।।धृ।।*

*विश्वेषाम् अनुरञ्जनेन जनयन् आनन्दम् इन्दीवर*
*श्रेणी – शामल – कौमलैः अङ्गैः अनङ्ग – उत्सवम् ।।*
*स्वच्छन्दं ब्रज – सुन्दरीभिः अभितः प्रति – अङ्गम् आलिङ्गितः ।*
*श्रृङ्गारः सखि मूर्तिमान इव मधौ मुग्धो हरिः क्रीडति ।।२।।*

*अद्य उत्सङ्ग – वसत् – भुजङ्ग – कवळ – क्लेशात् इव ईशाचलम्*
*प्रालेय – प्लवन – इच्छया अनुसरति श्रीखण्ड – शैल – अनिलः ।।*
*किंच – स्निग्ध – रसाळ – मौलि – मुकुलानि आलोक्य हर्ष–*
*उदयात ।*
*उन्मीलन्ति कुहूः कुहूः इति कल – उत्तालाः पिकानाम् गिरः ।।३।।*

*रास–उल्लास – भरेण विभ्रम – भृताम् आभीर – वामभ्रुवाम्*
*अभ्यर्णेपरिरभ्य निर्भरम् उरः प्रेम – अन्धया राधया ।।*
*साधु तत्त्व – वदनम् सुधामयम् इति व्याहृन्यगीत – स्तुति –*
*व्याजात उद्भट – च्युम्बित – स्मित – मनोहारी हरिः पातु वः*
*।।४।।*

''राधाराणी, हे बघ येथे मोठा गोपींचा समुदाय अतिउत्सुकतेने गोपीकृष्णाबरोबर रतिक्रीडा करीत आहे. कृष्णसख्या रतिविलास करीत आहे.'' अनुराधेने राधेचे लक्ष वेधले. अनुराधा बोलत होती. राधा मात्र कृष्णाला पाहून

केव्हाच ध्यानमग्न झाली होती.

''राधे, अगं, गोपीच्या मिळेल त्या अंगप्रत्यंगास कृष्ण गाढ आलिंगन देत आहे. कृष्ण जणू त्यांच्या नीलकमलनांच्या ताटव्यात विलसत आहे, असे वाटते आहे. त्याच्या हास्याने गोपींच्या ठायी मदनभाव उसळला आहे. भोवतीचे वृक्षवेलीही त्यात रंगून गेले आहेत. सखे राधाराणी, कृष्ण तर येथे मूर्तिमंत शृंगार शोभतो आहे.''

''राधे अगं, गंधधुंद सर्प मलयगिरीवर भ्रमण करीत आहेत. त्यांच्या फुत्काराने मस्त झालेला मलय वायू शांतविण्यासाठी हिमालयाकडे झेपावतो आहे. चंदनगंध लहरीही येथे दरवळत आहेत. रसाळ आम्रवृक्ष पुन्हा पुन्हा भर वेगाने मोहरत आहे. हर्षोन्मादक कोकीळ आपल्या प्रणयसखींना उंचरवाने मधूर हाक मारत आहेत. बघ ना!'' अनुराधेने राधेला भानावर आणले.

अनुराधेची ही प्रणयोत्सुक वचने ऐकून राधा अधिकच प्रेमव्याकूळ झाली. गोपी रासक्रीडेत रंगून गेल्या होत्या. राधेने श्रीकृष्णाकडे धाव घेतली. कृष्णाला गाढ आलिंगन देत राधा हळूच त्याच्या कानात कुजबुजली. ''कृष्णा किती रे गोड हे गीत! या तुझ्या अधराला लागलेल्या मुरलीतून जणू अमृतच श्रवते आहे. तुझ्या अधरामृतासाठी मी व्याकूळ आहे.'' कृष्णाच्या मुरलीरवाच्या मिषाने अधरामृताचे कौतुक करीत राधा कृष्णाच्या ओठांचे कसून दीर्घप्रदीर्घ चुंबन घेऊ लागली. राधेच्या चतुराईने राधेला ठायीच सामावण्यासाठी कृष्णाने राधेला गाढ आलिंगनात कृष्णमय केले. या राधाकृष्ण आलिंगनाने अवघे चराचर, संमोहित होऊन अद्वैतरंगात रंगून गेले!

●●●

। १६ ।

# समावेशन योग !

खेळकर, खट्याळ, द्वाड गोपसवंगड्यांसवे, बालगोपकृष्णाने अवघ्या गोलोकांस वेड लावले. संमोहकाने भोवताल संमोहित करून, आपल्या क्रीडेत हव्या त्या, हव्या तशा, हवा तितका वेळ संमोहन क्रीडेत, स्वप्नक्रीडेसम, समाधिस्त करावे; तसे अवघ्या गोपी, कुमारी, बाला, युवती, गृहिणी, प्रौढा, नवोढा, लेकुरवाळ्या, वृद्धा अशा साऱ्या गोकुळच्या नारी, आपला संसारप्रपंच, मुलेबाळे, मित्रमैत्रिणी, भ्राता, पती, पिता सारे काही विसरून, प्रपंचात असून नसल्यासारख्या कृष्णलीलांमध्येच रमून गेल्या! कृष्णाने आपल्याशीच खोड्या कराव्यात, खट्याळपणा करावा, खूप-खूप त्रास द्यावा, आपल्याशीच क्रीडा करावी असे प्रत्येकीला वाटे. स्पर्धा शिगेला पोचली. यशोदेकडे तक्रारींचा कळस झाला. तक्रारीतील लटकेपणाने, कृष्णसखा अधिक प्रसन्न होतो हे जाणले. हातातली असलेली कामे तशीच टाकून गोपी मुरलीधराशी रास करण्यासाठी, खेचल्या जात. हे आकर्षण गोपींना संसारप्रपंचातील सुखदुःखाचा, दुखण्याबाण्याचा, शारीरअवस्थांचा विसर पाडे.

कर्त्याधर्त्या गोपांची अवस्था गोपींसारखीच झाली होती. बाळकृष्णाने लीलया, पुतना, अघ, बक, कालियादि बलाढ्य विकटांचा अद्‌भूत सामर्थ्याने नाश केलेला पाहून तर; आपल्या जीवनातल्या अवघ्या चिंता काळजी कथा, आयव्ययादि सारे काही ,श्रीकृष्णावर विसंबून; श्रीकृष्णाच्या मुरलीरवाने मुग्ध होऊन; श्रीकृष्णलीलेत गोप स्वतःला स्वतःला झोकून देत होते.

राधाकृष्ण प्रेमक्रीडेच्या, रासलीलेच्या कथा प्रत्येक गोपगोपीला आपल्या आहेतसे वाटू लागले. यशोदा, यशदासह सर्वच आबालवृद्ध, गोपी राधा होऊन, कृष्णाला हृदयात साठवून; बन्सीरवात मुग्ध होऊन, कृष्णस्वरूप होण्यासाठी,

धडपडू लागल्या. एवढेच नव्हे तर राधेचे कृष्णस्वरूप होण्याचे भाग्य आपल्याला लाभावे असे गोपांनाही वाटू लागले. तेही जणू राधा होऊन अवघ्या बरसाना प्रदेशात, वंशीवनात, कुंजवनात, भांडीरवनात, वृंदावनात, यमुनातीरी वटवृक्षांतळी, कदंबाच्या खोडी, आम्रवनी, केतकीवनी, ओढून नेल्याप्रमाणे ओढले जात. गोलोकीच्या नंदराज्यात आणि गोलोकात जणू राधाकृष्ण धाम विकसित झाले होते.

श्रीकृष्णाची आपल्याशीच मैत्री असावी, असे बालतरुण गोपांना वाटे. कृष्णासवे खेळ खेळण्यात ते गोधने चारणेही विसरून जात. जणू त्यांच्या ठायीची राधाही श्रीकृष्णाकडे झेपावे. यशोधन, यशदा, अनया यांचीही अवस्था अशीच झाली होती. बरसाना, वृंदावन, ब्रज, गोलोक, वैकुंठ, रावलग्राम, भांडीरवन, वंशीवन असा स्थानभेद कृष्णाच्या लीलांनी नाहिसा झाला होता. रत्नगर्भा तथा कीर्तिदेवी आणि वृषभानू यांच्या परिवाराची अवस्थाही तशीच झाली होती. राधाकृष्ण प्रिती, आपल्याला भोगता यावी एवढीच उत्कट इच्छा प्रत्येकाच्या ठायी प्रेरित होऊन; अवघी सृष्टी, अवघे जीवन राधारूप झाले होते.

सवत्सधेनू, वासरे, लहानथोर वृषभ आणि लहान-थोर धेनू, यमुनातटीचे, श्वान, मार्जार, व्याघ्र, सिंहादि सर्व प्राणी, मयुर, शुक, गरुड आदि सर्वपक्षीही मुरलीरवाने मोहून राधास्वरूप होऊन; कृष्णाभोवती जमत अवघ्या क्षुधा, तृषा, प्राणीक्रीडाही विसरून जात.

भगवान परमात्मा, निर्गुण, निराकार, निर्विकार, आद्य, केवल, अविनाशी, अनंत, निज, स्वसंवेत्ती अशा आत्मरूपाची द्वापाराची भक्तियोग प्रेरक राधा लीला सफल होत होती. श्रीकृष्ण अशा आत्मरूपाशी, सच्चिदानंदस्वरूपाची अनुभूती घेण्यासाठी श्रीकृष्णांशी राधायोगानेच साधना करावी लागेल हे चराचराला उमगले होते. राधेचे अवतार लीला कार्य सफल होत होते.

गोवर्धन प्रसंगी तर तत्त्वमयी, चैतन्यमयी राधा ही गोपकाठी आणि कृष्णकरांगुली होऊन प्रकटल्याचे संवेदित झाले होते.

वृंदावनी, कुंजवनी, वंशीवनी अशा यमुनातटीच्या वनावनात गोपांसवे श्रीकृष्ण, बागडता बागडता किंवा 'वंशीविभूषित करा' होऊन मुरली स्वरलहरींनी वातावरण केव्हा भारून टाकी, हे कळायचे नाही. हे बहुधा राधेच्या उत्कट मीलनाच्या संवेदनेनेच सुरू होई. राधेच्या सखीला ते जाणवे. अवघा यमुना परिसर, राधाकृष्ण समागम, समावेशन, क्रीडेस सिद्ध होई. राधामीलनासाठी व्याकूळ झाली की हे घडे.

''अनुराधे, कस समजावू या कृष्ण सख्याला; की माझीच भक्ती कमी पडते?''

राधेने अनुराधेला अगदी आर्त होऊन विचारले. खरे तर राधेला सारे काही ठायीच संवेदित होत होते. परंतु राधाकृष्ण लीलेच्या माध्यमातून राधेला राधायोगे अद्वैत साधना मार्ग प्रशस्त करण्यासाठीच अवतारित होण्याची आज्ञा परमात्म्याने केली होती.

''नाही गं राधे, तुझी भक्ती तर अद्वितीय आहे. तुझेच तर अनुकरण हा गोलोक करतो आहे. तुझी बरोबरी करू शकत नाहीत, म्हणून तर प्रत्येकजण अधीर आणि आर्त होत आहे. मग या गोपींचे तर विचारूच नकोस, तू दिसलीस की श्रीकृष्ण कोणाचाच राहात नाही. फक्त आणि फक्त तुझाच होतो; याचाच तर या गोपींना मत्सर वाटतो!'' अनुराधाने राधेला सुखावले.

''खरंच का गं सखे, श्रीकृष्ण फक्त माझेच होतात? मग हे बघ ना, मी नसतांना हा गोपींशी विहार करतो आहे. त्याची इतर स्त्रियांविषयीची अभिलाषा तर वाढत नाही ना? माझंच चुकतंय चंचलतेसारख्या त्याच्या स्वभावाकडे माझे लक्षच नाही. मी आपली वेड्यासारखी तो केवळ माझाच समजते. कध्धी म्हणून मी रुसत नाही. माझं हे एकांगी प्रेम तर नाही ना? पण मेलं माझं मन आवरतच नाही.'' राधा बोलत होती.

*गणयति गुण - ग्रामम् भामम् भ्रमात् अपि न ईहते*
*वहति च परितोषं दोषम् विमुञ्चति दूरतः ।।*
*युवतिषु चलत् - तृष्णे कृष्णे विहारिणि माम् विना*
*पुनः अपि मनो वाम कामम् करोति करोमि किम् ।।१।।*
*(अष्टपदी सहावी - राग- मालव : ताल- एकताल)*
*सखि हे केशि- मथनम् उदारम्*
*रमय मया सह मदन - मनोरथ - भावितया सविकारम् ।।धृ।।*
*निभृज - निकुञ्ज - गृहम् गतया निशि रहसि निलीप वसन्तम् ।*
*चकित - विलोकित - सकल-दिशा रति - रभस भरेण हसन्तम्*
*।।१।।*
*प्रथम - समागम - लज्जितया पटु-चाटु-शतैः अनुकुलम् ।*
*मृदु - मधुर - स्मित - भाषितया शिथिलीकृत - जघन - दुकूलम्*
*।।२।।*
*किसलय - शयन - निवेशितया चिरम् उरसि मम एव शयानम् ।*

*कृत - परिरम्भण - चुम्बनया परिरभ्य कृत - अधर - पानम् ।।३।।*
*अलस - निमीलित - लोचनया पुलक - आवलि - ललित- कपोलम् ।*
*श्रम-जल-सिक्त-कलेवरया वर - मदन - मदात् अति लोलम् ।।४।।*
*कोकिल-कल-रव-कूजितया जित - मनसिज-तन्त्रं - विचारम् ।*
*श्लय-कुसुम-आकुल-कुन्तलया नख-लिखित-धन-स्तन-भारम् ।।५।।*
*चरण-रणित-मणि-नुपुरया परिपूरित-सुरत-वितानम् ।*
*मुखर-विश्रृङ्खल-मेखलया स-कच-ग्रह-चुम्बन-दानम् ।।६।।*
*रति-सुख-समय-रस-अलसया दर-मुकुलित-नयन-सरोजम् ।*
*निःसह-निपतित-तनु-लतया मधुसूदनम् उदित-मनोजम् ।।७।।*
*श्री-जयदेव-भणितम् इदम् अतिशय-मधु-रिपु-निधुवन-शीलम् ।*
*सुखम् उत्कण्ठित-राधिकया कथितम् वितनोतु सलिलम् ।।८।।*

''नाही गं राधे, नको असा खंतीभरला विचार करूस!'' अनुराधा म्हणाली.

''अनु, अगं मी समागम करण्यासाठी व्याकूळ झाले आहे. तो चंचल कृष्ण आता माझ्याशी रतिक्रीडा करायला येईल असे काही तूच कर बाई!'' राधा काकुळतीला आली.

''तू मला संकेत करशील तेव्हा मी अगदी अभिसारिणी होऊन जाईन. रात्रसमयी तू सांगितलेल्या लताकुंजात आडोशाला जाईन. वसंत माझ्या मनाला कृष्णगंधाने भूल पाडेल. कृष्ण येईल. मी घाबरल्यासारखे करून बावरेपणाने चोहीकडे पाहीन. तो प्रितीभराने आतूर होऊन मला साद घालील.'' राधा प्रितीस्वप्नात रंगून गेली होती.

''होय गं होय, अगदी तसेच होईल!'' अनुराधेने प्रतिसाद दिला.

''पहिल्या भेटीत लाजावे तशी मी लाजेन. तो गोडगोड बोलून माझे मन वळवेल. मग मी लाडाने त्याला जवळ घेईन. श्रीकृष्ण, माझी रेशमी वस्त्रे सैल करीत मला अधिकच जवळ घेईल.'' राधा प्रणयक्रीडेत समाधिस्त होत होती.

कोवळ्या लुसलुशीत पानांच्या शय्येवर मी संगमोत्सुक पहुडेन. माझ्या वक्षावर कृष्णसख्याची भरदार छाती झेपावेल. मी गाढ अलिंगन देत त्याच्या अमृतश्रावी अधराचे चुंबन घेईन; कृष्णसखाही आलिंगनात माझ्या अधरांचा

आस्वाद घेईल. आणि सखे अद्वैताच्या अनुभूतीत मी सायुज्य होईन.'' राधा समाधिमग्न होत होती.

''राधे राधे, अगं किती स्वप्नमग्न होशील.'' अनुराधेने राधेला सावध करण्याचा यत्न केला.

''संभोगतृप्तमनाने मी आळसावलेपणे ग्लानी अनुभवीन. त्याचे गाल सुखाच्या रोमांचांनी बहरून फुलतील. प्रितीच्या उन्मादाने उसळलेल्या धर्मधारांनी मी ओलेती सुंदर दिसेन.''

''कोकिळमधूर स्वरांनी मी सख्याच्या कानी कुजबुजेल. प्रितिसाफल्याच्या अनुभूतीने आणि कृष्ण सच्चिदानंदस्वरूप होऊन प्रकटेल! माझ्या विशाल वक्षांवर त्याच्या उन्मादक्रीडेच्या खुणा विलसतील. केशसंभार स्वैरपणे आवेगाची अनुभूती घेईल. माळलेली फुले, पर्णशय्येला मादकतेने सुगंधित करतील.''

''कृष्णसख्याची रतिक्रीडा उत्कृष्ट आनंदशिखर गाठेल आणि अवघे अवकाश सृष्टीप्राकट्याच्या आनंदाने भरून ओसंडेल. या रतिक्रीडेत कधी मीच कृष्ण आणि कृष्णच राधा, अशी रतिक्रीडा घडेल. नुपुरांचा नाद कटिमेखलांची किणकिण सारे काही, त्या रासक्रीडेत वाढवून, विसरून पर्णशय्या सुशोभित करील.''

राधा राधाकृष्ण रतिक्रीडेचे स्वप्नचित्र अनुराधेला निवेदित करीत असतांना अनुराधेचीही श्रीकृष्ण रतिक्रीडेसाठी भावसमाधी लागली होती. तिचे अंग शहारून फुलून येत होते.

''सुखाच्या उत्कट क्षणात मी स्वतःला जखडून जडावून जाईन! कृष्णसख्याची नयनकमलेही निद्रावश अर्धामिलित होतील. अनावर सुखाच्या शिखरावर मी शारीर मूर्च्छता अनुभवत, पर्णशय्येवर कृष्णस्वरूपाचा ठायीच आस्वाद घेत असतांनाच, कृष्णसख्याच्या ठायी रतिवासना उसळून येईल आणि पुन्ही रतिक्रीडा सुरू होईल!'' राधा उत्कंठित मनाने पुन्हापुन्हा राधाकृष्ण समावेशन क्रीडेच्या चित्र चिंतनात मग्न होती.

''राधे, राधे, तुझे हे स्वप्न किती मधुर आणि अवीट आहे!'' अनुराधा स्वप्नील नजरेने पाहात म्हणाली.

''अनुराधे, याच लीलाविग्रहासाठी कृष्णसख्याने मला ठायीहून विलग करून सृष्टीस्वरूप प्रकट होण्याची आज्ञा केली. मी सृष्टीस्वरूप झाले. जडचेतन चराचरा ठायी या कृष्णसख्याने मला चैतन्यमयीपणाने जखडून टाकले. हे सखे, या जखडलेपणाचे सच्चिदानंदस्वरूप अनुभवावे असेही अनावर होते. या सगळ्यातून निसटून कृष्णस्वरूपाचे सुख भोगावे असे मनी येते आणि मी अनावर

होते.'' राधा विग्रहावस्था सांगत होती.

''सखे, किती दिव्य आणि आनंदमय आहे हे. हे सत्य, हे चैतन्य, हे आनंदस्वरूप अनुभवण्यासाठीच तर राधेचा कृष्णप्रितियोग आहे ना!'' अनुराधेने ध्यानमग्न होत विचारले.

''होय सृष्टीचे हे रहस्य राधारूपाने द्वापारात सिद्ध व्हावे अशी त्या कृष्णतत्त्वाची इच्छा आहे. हा रतियोग म्हणजेच ठायीच्या आत्मरूपाशी राधाकृष्ण योग अनुभवणे होय!' राधा अध्यात्मचिंतन करीत होती.

''होय गं राधाराणी, राधा म्हणजेच प्रेम, माया, वात्सल्य, भक्ती आणि रति देखील! ठायीची ही भक्तिभावना जागृत करीत समीपता, सलोकता, सरूपता, सायुज्यता अनुभवत राधाकृष्ण अद्वैत अनुभवायचे. राधे, असे असतांना गोलोकातील आबालवृद्ध नरनारी, पशुपक्षी यांच्या कृष्णासक्तीविषयी तू का बरे चिंता करावीस?'' अनुराधेने छद्मीपणाने विचारले.

''अनुराधे, खट्याळ आहेस अगदी. सखे मी कृष्णमयी असूनही ठायीच्या सृष्टी होण्याच्या वासनेने द्वैत भोगते आहे. युगायुगांच्या या द्वैतक्रीडेतून अद्वैत भोगण्याची वासना राधाकृष्णाठायी उचंबळून येते. महाप्रलयांती पुन्हा प्रकट होणारे, सच्चिदानंदस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, निज, स्वसंवेद्य, आद्य आत्मरूप युगायुगात, चराचररूपांना ठायी सशारीर अनुभवता यावे, यासाठीच हा राधायोग!'' सखे, अनुराधे, मी असाच राधाकृष्ण समागम, समावेशन योग भोगण्यासाठी व्याकूळ झाले आहे. या साधनेत, करशील ना मला सहाय्य?''

●●●

। १७ ।

# गर्गसंहिता

बालकृष्णांच्या अवतारित्वातील अति महत्त्वाचे कार्य करण्याची वेळ समीप येऊन ठेपली होती. मथुरानरेश सम्राट कंसाने हिंस्रपणे शोषणाचा कळस गाठला होता. गोलोकातील आक्राळ राक्षसांचे प्रयोग शैशवावस्थेपासूनच श्रीकृष्णांनी लीलया उद्ध्वस्त केले होते.

नंदराजांचे नंदग्राम, वृषभानू, कीर्तिंच्या, अवघ्या बरसाना प्रदेशात रावळ ग्राम, भांडीरवन, वंशीवन, कुंजवन तथा वृंदावन आणि यमुना तीर, असा अवघा गोलोक कृष्णभक्तीत दंग होता. सच्चिदानंदरूपाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची राधाभावशैली, प्रेमस्वरूपा भक्ती, गोलोकीच्या आबाल गोपगोपींना, गायीगुरांना, भोवतीच्या हिंस्र श्वापदांनाही राधेच्या लीलांमुळे अवगतच नव्हे स्वभाववृत्ती झाली होती.

या भक्तिरंगात, अनन्यभक्तीसाठी अर्थात ठायीच्या राधास्वरूप चैतन्यशक्ती विना अस्तित्वशून्य अनुभवणारे परमतत्त्व भगवान श्रीकृष्ण अगदी भक्तिमयी, प्रेमस्वरूप, आनंदमयी साक्षात राधा होऊन विहारलीला करीत होते. गोलोकातील प्रत्येक जडचेतन अस्तित्व राधास्वरूपाची अनुभूती देत होते. या सच्चिदानंदस्वरूप मग्न गोकुळधामी हा सायुज्य असा सच्चिदानंद सोहळा अनुभवण्यासाठी, ऋषी, मुनी, तपस्वी, भक्त, साधक सारेच, एव्हढेच नव्हे तर सर्व देवदेवतादेखील स्वतःठायी राधाभावाची साधना करीत अंतरिक्षात, वनावनात विविध रूपात प्रकट होत असत.

या भक्तिरंगातून प्रत्यक्ष भगवंतांना आणि त्यांच्या ठायीच्या शक्तिस्वरूपिणीला कर्तव्यतत्पर करण्यासाठी कोणीतरी जातक सांगणे आवश्यक होते. हे कार्य ब्रह्मदेवांनी गर्गमुनींवर सोपविले होते.

महर्षी गर्गमुनी नंदराजाच्या राऊळी आले तेव्हा राधा यशोदेसह गोशाळेत गोधनांशी संवाद करीत होती. गर्गमुनी आल्याची सूचना मिळताच, मोठ्या लगबगीने दोघी नंदराजांच्या राजदरबारी आल्या. श्रीकृष्ण सवंगड्यांसह यमुनातीरी खेळण्यासाठी जाण्याच्या तयारीत होते.

गोशाळेतून यशोदा नि राधेच्या पाठोपाठ श्रीकृष्णासह सारे सवंगडी दरबारात आले. ते पाहाताच गर्गमुनी अवघा राजशिष्टाचार विसरून; मोठ्या गतीने श्रीकृष्णांकडे धावले. त्यांनी बालकृष्णाच्या चरणकमलावर आपले महातपस्वी मस्तक ठेवले. त्यांच्या नेत्रातून अवघा प्रेमरस कृष्णसख्याच्या चरणकमलावरून धरणीपर्यंत श्रवला. गोधाम पावन झाले! कृष्णसखा गर्गमुनींना बिलगला. नंदयशोदा नि राधा गहिवरले. बालकृष्णाने बालपणाची लीला दूर करीत, गर्गमुनींना सावरले.

''मुनीवर आम्ही सर्व सवंगडी यमुनातीरी क्रीडेसाठी जात आहोत, चालेलना?'' भावविवशता दूर करीत, बालकृष्णाने लडिवाळपणे विचारले.

''परंतु....'' गर्गमुनींना बोलवेना.

''मुनीवर आपण पिताश्री आणि माताश्रींशी संवाद करा. त्यांच्या व आपल्या आज्ञेबाहेर आम्ही नाही. जाऊ आम्ही?'' श्रीकृष्णांनी एवढ्या लडिवाळपणे विचारले की गर्गमुनींसह नंदयशोदेला हात उंचावून अनुज्ञा देण्याशिवाय पर्यायच राहिला नाही.

श्रीकृष्ण पसार झाले. नंदराजांनी गर्गमुनींचे राजऔपचारिक स्वागतादि उपचार पूर्ण केले.

''मुनिवर, काय आज्ञा आहे?'' नतमस्तक नंदराजाने नम्रतापूर्वक विचारले.

''राजन, आम्ही पितामह ब्रह्मदेवांच्या आज्ञेनुसार, श्रीकृष्णांचे जातक सांगण्यासाठी उपस्थित झालो आहोत. आपली अनुमती...'' गर्गमुनींनी थेट विषयालाच सुरुवात केली.

''मुनिवर आमची अनुमती? मुनिवर कृपा करावी...'' नंदराज म्हणाले.

यशोदे समीप राधाही कृष्णसख्याचे जातक ऐकण्यास उत्सुक झाली.

''राजन, श्रीकृष्ण हे परमतत्त्व, श्रीकृष्णांचे अर्थात साक्षात परतत्त्वांचे पूर्णावतार आहेत! राधाराणी या त्यांच्या तत्त्वमयी अशा मुळातच अर्धांगिनीच नव्हे; तर परिपूर्ण शक्ती आहेत! कृष्णअवतारात द्विविध उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी हा पूर्णावतार धारण केला आहे.

त्यातील पहिला मार्ग सर्व चराचर जडचेतनाला अद्वैत अनुभूतीपर्यंत घेऊन

जाणारा भक्तिमार्ग अर्थात भक्तियोग होय. या भक्तियोगाचा प्रेमस्वरूपा मार्ग सर्वांसाठी प्रशस्त करण्याचे कार्य तत्त्वमयी राधाअवताराने घडते आहे. मुळात साक्षात परब्रह्माने ब्रह्मदेवांकरवी कृष्ण-राधा विवाह, युगधर्मासाठी संपन्न केला आहे. अनया तथा रायाण तथा रापाण यांची पत्नी राधा, ही केवळ अवतार आभास लीला आहे. प्रापंचिकांना प्रेमस्वरूपाने अवघे विश्व ठायीचे जिंकता यावे आणि आसक्ति तथा वासनामुक्त स्वरूपात सगुणभक्तीचा अनुभव घेता यावा, यासाठीची ही अवतार लीला आहे. या अवतारकार्यात राधाकृष्ण, गोपीकृष्ण अनैतिक संबंधांची घडणारी चर्चा व्यर्थ ठरेल! भक्तीचे कल्पतरू बहरून येतील.

केवळ राधाभजनानेही राधास्वरूप होऊन कृष्णतत्त्वाशी अद्वैत अनुभवता येते; हे या भक्तियोगाचे वैशिष्ट्य होय. आपण व अवघे गोकुळ या भक्तियोगाने सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव घेत आहात. राधेची अवतार लीला केवळ भक्तियोग प्रशस्त करण्यासाठीच आहे. ब्रह्मपुत्र नारदांचे नियोजन परब्रह्माने याच भक्तिमार्गाचा प्रचार करण्यासाठी केले आहे. या भक्तियोगाचे साक्षात दर्शन घडावे; यासाठी बालकृष्णांची राधाकृष्ण लीला घडते.'' गर्गमुनींनी हे सांगताच राधेचे नयन अमृतधारांनी ओसंडून वाहू लागले. तिच्या ठायीची निर्गुणावस्था तिला स्पर्श होऊ लागली. ती गर्गमुनींच्या चरणांवर मस्तक ठेवून अद्वैताच्या आकांताने अश्रुअभिषेक करू लागली.

''देवी, महाशक्तिस्वरुपिणी राधाराणी, आपले अवतारकार्य सफल होत आहे. केवळ राधानामाने भक्तिमार्गाची चिरंतन ओळख होईल. केवळ 'राधा' नामस्मरणाने जीवनमुक्त होईल.'' गर्गमुनींनी भाकित वर्तविले.

''हे नंदराज, यशोदा राणी-वसुदेव देवकीचा पुत्र म्हणून प्रत्यक्ष परब्रह्म परमात्मा श्रीकृष्ण अवतारित आहे. आपल्या पूर्वपुण्याईने आणि सम्राट कंसांचे शंभर अपराध पूर्ण होऊन; विनाशाचा क्षण येण्यासाठी परमात्मा गोलोकात आले. गोलोकात येण्याचे महत्त्वाचे आणि आद्यकारण म्हणजे श्रीकृष्णाठायीची आद्या, तत्त्वमयी राधा गोलोकी भूमीपुत्री, वृषभानू आणि रत्नगर्भा तथा देवी पुत्री म्हणून अवतारित झाली. तिच्या योगाने कृष्णमयी अशा यमुना तीरीच्या, गोलोकधामी भक्तियोगाचे अधिष्ठान मांडावे अशी लीला होती.''

''तान्हुल्यापासून बालगोप वयापर्यंतचे अष्टवर्षीय गोपरूपातील कृष्ण गोपगोपींना आपला प्राणसखा वाटेल. परमात्म्याचे अवघे कारुण्य या वृंदावन तथा वंशीवनी तसेच भांडारवनी प्रकटेल. लौकिकदृष्ट्या गोपीकृष्ण रासक्रीडा, बालकृष्णक्रीडा, राधाकृष्णक्रीडा शृंगभोगकारी अनैतिक वाटेलही; तथापि त्यातूनच

भक्तियागोचा मार्ग प्रशस्त होईल. शैशवावस्थेपासून बालरूपापर्यंत लडिवाळ श्रीकृष्णाला सर्वस्व मानून क्रीडा आणि गोलोकीचा प्रपंच करणाऱ्या गोपी आपले वात्सल्य आवरून धर्मग्लानी निवारण्यासाठी, श्रीकृष्णाला लोकव्यवहारासाठी मुक्त करतील असे झाले तरी राधाकृष्ण, गोपीकृष्ण, गोपालकृष्ण, लडिवाळकृष्णांचे दर्शन आणि रासक्रीडा तथा बाललीला या लोकी अनुभूत होत राहतील. वैष्णवांची देवता म्हणून राधा प्रसिद्ध होईल. कोणी तिला कान्होदेवी म्हणूनही जाणेल.'' जातकातील गर्भज्ञान गर्गमुनी सांगत होते.

''हे राजन, हे श्रीकृष्ण स्वतः परमात्मा असून, उन्मादपूर्वक डांबून ठेवलेल्या सहस्त्रावधी स्त्रियांची बंदीतून मुक्तता करण्याचे आणि त्यांना शक्तिस्वरुपिणींची प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य श्रीकृष्ण करतील! कंसासह साऱ्या दुष्टांचे निर्दालन करून सत्यनिष्ठांचे, परमभक्तांचे रक्षण करून; हे जग कलियुगाच्या प्रारंभापर्यंत, सत्वनिष्ठांचे जीवन प्रपंचातच परमार्थपूर्ण करण्यासाठीचे ज्ञान, महाभारताच्या रूपाने महर्षी व्यासमुखे प्रकटवितील. बंधुभावाच्या विस्मरणाने विनाश होईल याचे यादवीलीलेने मूर्तिमंत उदाहरण मांडून अवतार कार्याची परिपूर्ती करतांना कलियुगासाठी राधाभावे भक्तियोगाने, सायुज्यमुक्ती देण्यासाठी, भूवैकुंठांचे मंडन करून; अवतार कार्य संपवील.'' गर्गमुनींनी जणू श्रीकृष्णांचे अवघे चरित्रच नंदराजांना सांगितले. संयमाचा आणि लीलाविग्रहाचा संदेश दिला.

*आदौ देवकी देवगर्भ जननम् गोपिगृहेवर्धनम्*
*माया पुतन जीव ताप हरनम् गोवर्धनो धारणम्*
*कंसछेदन कौरवादिहननम् कुंतिसुता पालनम्*
*एतद भागवत पुराण कथितम् श्रीकृष्ण लीलामृतम् ।।*

अशा मोजक्या शब्दात गर्गमुनींनी श्रीकृष्ण लीलामृत कथन करून श्रीकृष्ण परमात्म्याची प्रार्थना आरंभिली.

*वंशीविभूषितकरान्न वनीरदाभात*
*पीताम्बराद्वरुण बिम्बफलाधरोष्ठात् ।*
*पूर्णेन्दुसुन्दरमुखादरविन्दनेत्रात्*
*कृष्णात् परं किमपि तत्त्वमह् न जाने ।।*

गर्गमुनींच्या या भक्तिरंगात नंदयशोदा आणि कृष्णमयी राधाराणी रंगून गेले. गर्गमुनींच्या या जातकातील राधाकृष्ण लीलामृताने कलियुगात भक्तिरंगी रंगलेल्या संतांनाही मोहिनी घातली. गर्गमुनींचे जातक मनात कोरले गेले.

*आला गोकुळवासी । हर्ष न माये मानसीं ।।१।।*

*नंदे गर्गातें देखिलें । भूजा स्तवनी तोषविले ।।२।।*
*भूतभविष्यवर्तमान । तुम्हा कळे हो संपूर्ण ।।३।।*
*पाहा सामुद्रिक लक्षण । याचे काय सांगा चिन्ह ।।४।।*
*बोले तेव्हां गर्गऋषि । झणी कळेल कंसासी ।।५।।*
*रोहिणीनंदादि बैसती । गर्ग घेऊनी एकांती ।।६।।*
*घालुनिया मंगल स्नान । आरंभी पुण्याहवाचन ।।७।।*
*ऐसी वदे शुकवाणी । नामा म्हणे ऐका कानी ।।८।।*

*जन्मजन्मांतरी झाला तुज श्रम । म्हणोनिया ब्रह्म आले येथे ।।१।।*
*राखतील गाई मारतील दुष्ट । न करी बोभाट जनामध्ये ।।२।।*
*द्वादश गांव अग्नि करील प्राशन । वाचवील प्राण सकळांचे ।।३।।*
*चोरोनियां गाई नेईल सौंगडे । लावील हा वेड ब्रह्मयासी ।।४।।*
*उचलील पर्वत हरील हा गर्व । तारील हा सर्व नाममात्रे ।।५।।*
*समुद्री हा नगरी रचील क्षणांत । चरित्र अद्‌भूत करील हा ।।६।।*
*सोळा सहस्त्र शत अष्ट त्या नायका । कली बायका तुझा कृष्ण ।।७।।*
*त्रैलोक्यात हाची उदाराचा राणा । देईल ब्राह्मणा हेमपुरी ।।८।।*
*सांगुनिया ऐसें आशिर्वाद देऊनि । नामा म्हणे मुनि जाता झाला ।।९।।*

'लावील हा वेड ब्रह्मयासी' असे म्हणून राधेसह अवघ्या गोलोकांस कृष्णभक्तीचा छंद लागेल असे जातक सांगितले. जातकातून गोपीकृष्ण संबंधाविषयी अनैतिक समजुती कशा पसरतील हे सांगून भक्तिरंगातील संसारप्रपंचात विदेहत्व कसे निर्माण होते हे सांगून तत्त्वमयी राधाराणीचे राधाभावे प्रेमस्वरूपा भक्तियोगाचे सूत्र सांगितले–

*व्रजांत कोणे एक वेळेशी । आले गर्गाचार्य ऋषी ।*
*त्यासी दाखवितां कृष्णासी । चिन्हे बोलता झाला ।।१।।*
*यशोदा बाई ऐक पुत्राची लक्षणे ।।धृ।।*
*मध्ये मुख्य यशोदा बाळा । सन्मुख रोहिणी वेल्हाळा ।*
*भोवता गोपिकांचा पाळा । त्या गोपाळा दाखविती ।।२।।*
*करील दह्या दुधाची चोरी । भोगिल गौळियांच्या पोरी ।*
*सकळ सिंदळात चौधरी । निवडेल निलाजरा ।।३।।*
*चोरूनी नेईल त्यांची लुगडीं । त्यांचे संगे घेईल फुगडी ।*

*मेळवुनी गोवळ गडी । सुगडी फोडी शिंकीचीं ।।४।।*
*पांडव राजियाचे वेळीं । काढील उष्ट्या पत्रावळी ।*
*ढोरें तुमच्या घरची वळी । निवडेल निलाजरा ।।५।।*
*यावरी काळवंडतील झाडें । लत्ता खळाळ हाणील घोडे ।*
*महाहत्ती धरील सोंडे । परी ती विघ्ने मावळतीं ।।६।।*
*घावरी गाडा एक पवाडा । अथवा डोहामाजी बुडवा ।*
*वावुटुळींने उडुनी जावा । सांपडावा वैरियाला ।।७।।*
*कारण सच्चिदानंदाचें । बीज नोहे हे नंदाचें ।*
*जन्मांतर गोविंदाचे । नव्ह कथिल्या मथिल्याचें ।।८।।*
*हृदयीं श्रीवत्सलांछन । ब्राह्मण लत्तेचे भूषण ।*
*हा होईल ब्राह्मण जन । एका जनार्दनी घरींचा ।।९।।*

जातक सांगताना लौकिकदृष्ट्या जी शिंदळीची लांछने गोपीकृष्ण चरित्रावर लावली जातात त्यांतील संभ्रम दूर केला आहे. गोपीकृष्ण संबंध हा राधाभावे भक्तियोग साधनेचा मार्ग आहे याचा निर्वाळा देत गर्गाचार्यांच्या जातकातील उल्लेखांचे अध्यात्मिक स्पष्टीकरणही झाले. गर्गाचार्यांच्या जातककथनाने गोलोकी वात्सल्यलीलेत संयम निर्माण झाला होता.

●●●

। १८ ।

# शोधा शोधा राधा

ब्रह्मदेवांनी राधाकृष्णांचा विवाह घडविला तेव्हापासून राधा सृष्टीस्वरूप झाली. सृष्टीतील जडचेतन, सूक्ष्मातिसूक्ष्म अंश राधास्वरूप होऊन; पुन्हा कृष्णस्वरूपात एकरूप होण्यासाठी धडपडू लागला. सृष्टीतील प्रत्येक अंशाचे अस्तित्व राधास्वरूप असूनही, दुःखपूर्ण, संघर्षमयी जीवनानुभूती घेत आहे! सच्चिदानंदस्वरूपाशी अद्वैत प्राप्त करून घेण्यासाठी, आर्त आर्त होत जातो आहे. राधेप्रमाणेच!

महर्षी गर्गमुनींनी राधेला जातक कथनाच्या निमित्ताने या विवाह प्रसंगाची आठवण करून दिली. राधा अंतर्मुख झाली. भक्तियोगाची प्रस्थापना करण्याचे तिचे गोलोकातील कार्य सफल झाले होते. भज्य, भक्त आणि भक्तिभावना यांचे साधनारूप राधेने सिद्ध केले होते.

परमेश्वर श्रीकृष्ण यांच्या लीलेचा एक भाग म्हणून; गोकुळातील एक पार्षद रूपाने राधा अवतीर्ण झाली होती. परंतु स्वतःचे तत्त्वमयीत्त्व संवेदित होऊन; ती जणू श्रीकृष्णाची अभिसारिका होऊन; रासरंगात गढून गेली. स्वतः कृष्णभगवंतही या रासक्रीडेत रंगून जाऊ लागले होते. कदाचित कृष्णअवतारातील लीलेची आठवण करून देण्यासाठीच गर्गमुनींचा गोकुळात संचार घडला होता. राधा कर्तव्यतत्पर झाली. असे होऊनही राधेला श्रीकृष्णांशी अद्वैत होण्याची ओढ, प्रत्यक्ष अनंतकृष्णांना तरी कशी थांबविता येणार?

तत्त्व तेथे तत्त्वमयी, चैतन्य तेथे चैतन्यमयी, वायू आणि संचारवृत्ती, जल आणि प्रवाहिता, सूर्य आणि प्रकाशमयता, वेगळे कसे करता येणार? असे विग्रह करण्याची क्रीडा केवळ आभासच असणार! परमात्म्यानेच स्वसंवेद्यतेने आद्येच्या सृष्टीरूप होण्याची वासना व्यक्त केली. म्हणूनच सृष्टीचा आभास

पसारा आविष्कृत झाला आहे. असे वाटूनही वास्तव केवळ आभासात्मक! आभासाला मूळ वास्तवाची ओढ; हाच तर प्रकृतीपुरुषाचा अन्योन्य संबंध अनादि आणि सनातन! भातुकलीच्या खेळासारखी ही लीलाही आनंदप्रद! तरी लीलेतीलही विरहाचे दुःख अनावर! म्हणूनच अवघा संसारच असार! दुःखमय! तरी राधेचे द्वापार आणि कलियुगाच्या अंतापर्यंत या लीलेत, समावेशनही अपरिहार्यच! श्री शिवांनी पार्वतीला हे राधारहस्य समजून सांगितले –

*आब्रह्मस्तम्भपर्यंतं सर्व मिथ्यैव पार्वती ।*
*भज सत्यं परं ब्रह्म राधेषं त्रिगुणात्परम् ।।*

ज्ञानीजनांना हे जाणवते. अवतारस्वरूप मिथ्या; तर राधाकृष्णस्वरूप सत्य त्यातील श्रीकृष्ण कैवल्यरूप हेच केवळ सत्य! राधा हीच सत्यस्वरूप चित्शक्ती होय. म्हणूनच राधावंदनेने ज्ञानीजन श्रीकृष्ण परब्रह्म प्राप्ती करून घेतात.

राधाकृष्ण अद्वैत हेच तर शाश्वत सत्य! ते कसं विसरता येणार?

*राधा भजति श्रीकृष्णं स च तां च परस्परम् ।*
*उभयोः सर्वसाम्यं च सदा सन्तो वदन्तिच ।।*

श्रीकृष्ण रासक्रीडेसाठी, प्रिया राधेच्या धावत येण्याचे, नित्य स्मरण करतात. म्हणूनच ते तिला रा–धा म्हणतात. रा ही प्राप्ती आणि धा ही मुक्ती. राधा ही तर 'प्राणाधिष्ठतृतदेवी च तस्यैव परमात्मनः' हे राधेचे स्वरूप आभास क्रीडेतही राधेला कसे विसरता येणार? तरी तिने निश्चय केला. राधा अनावर असली तरी अवतारातील आभास क्रीडेसाठी तिला श्रीकृष्णांपासून दूर जाणेच आवश्यक होते. ठायीच श्रीकृष्णस्वरूप होण्यासाठी राधेने वृंदावन गाठले. वृंदावनात राधा सृष्टीमयी झाली. पत्र, पुरुष, लता, वेली, वृक्षराजीसह अवघे वृंदावन राधामय झाले. कृष्णसख्याचा घोष कणाकणातून वायूलहरींसवे रुंजी घालू लागला. राधेची कृष्णाराधना अशी सृष्टीस्वरूपातून घडू लागली.

यमुनातीरी खेळगड्यांसवे खेळायला गेलेल्या श्रीकृष्णांना राधेची ओढ जाणवू लागली. त्यांनी कमरेची बासुरी अधरी लावली. रासआवाहन स्वर उमटू लागले. यमुनातीराहून श्रीकृष्ण राधेचा शोध घेत निघाले. राधेच्या या लीलेची अनंतश्रीकृष्णांना खूपच मौज वाटली. तेही त्या लीलेत सहभागी झाले.

''गड्या पेंद्या, राधाराणींना बासुरीचे स्वर ऐकू जात नसतील? एरवी नंदग्रामातून थेट कुंजवनात राधाराणी धावत येतात?'' श्रीकृष्णांनी चिंता व्यक्त केली.

''कान्हा राधाराणी कदाचित मथुरेच्या बाजाराला गोपींसवे जात असतील!''

पेंद्यानं अन्य खेळगड्यांकडे पाहात उत्तर दिले. खेळगड्यांनी चटकन या गोष्टीला दुजोरा दिला.

श्रीकृष्णांसह खेळगड्यांची सेना राधाशोधासाठी मथुरेच्या मार्गावर ठेप्यावर पोचली. त्यांनी वेळ अगदी बरोबर गाठली होती. गोपींचा हा घोळका दही, दूध, ताक, लोणी, खवा, तूप घेऊन लगबगीनं गतीनं मथुरेच्या बाजाराला निघाला होत्या. आज अमळ उशीरच झाला होता.

खेळगड्यांच्या सेनेने या गोपींना अडवले. खेळगड्यांसह श्रीकृष्णाला पाहून गोपी भेदरल्या. आता दह्यादुधाचे लोण्याखव्याचे काही खरं नाही! हे गोपगडी इथेच सारे लुटून नेणार; अशी शंका त्यांच्या मनाला स्पर्श झाली.

''अरे कान्हा आधीच वाढवेळ झालाय. आम्हाला मथुरेला जाऊन बाजार करून परतायचं आहे. आम्हाला जाऊदे बरं!'' यशोदादेवींची आवडती सखी श्रीकृष्णाला जरा दरडावतच म्हणाली.

''हवं तर, उद्याचं सारं गव्य तुम्हालाच देऊ, आता जाऊद्या!'' एक सासूरवाशीण म्हणाली.

''हो हो, ए बायांनो थांबा तरी! आम्ही काही लोणी, खवा खाण्यासाठी येथे आलो नाही!'' घाबरलेल्या गोपींकडे पाहात पेंद्या म्हणाला आणि सारे खळखळून हसले.

''मग तुम्हाला हवंय तरी काय?'' ज्येष्ठ गोपीने विचारले.

''तुमच्या सवे राधा कशी नाही? तिला घेऊन या मगच पुढे जाऊ देऊ!'' पेंद्या हट्ट करीत म्हणाला.

''अगं बाई, कृष्णकान्ह्याला सकाळपासून राधा दिसलीच नाही वाटतं! पण, ती तर बाई, आम्हालाही नाही दिसली! यशदेच्या राऊळी हाळी घातली; तर राधा सकाळीच कुठे गेली कळेना. अनया नंदराऊळातही पाहून आला!'' गोपीनं सांगितलं.

''ते आम्हाला माहीत नाही. तिला घेऊन या. ती गवसत नाहीये!'' पेंद्यासह सर्वच खेळगडी एकदम म्हणाले.

''अरे कान्हा तुझी शपथ, कसं सांगू? आम्हाला खरंच ती कुठं गेली माहीत नाही!'' गोपी एकदम काकुळतीने म्हणाल्या.

''पेंद्या, जाऊ दे त्यांना. आता माझ्या लक्षात आलंय!'' कृष्ण म्हणाले. तसं गोपिकांचा जीव भांड्यात पडला. खेळगड्यांसह श्रीकृष्ण मग वंशीवनाच्या दिशेने निघाले.

''कुठे गेली असेल गं राधा?'' गोपींत परस्परांत चर्चा सुरू झाली. लगबगीने साऱ्याजणी मथुरेच्या बाजाराला निघाल्या.

श्रीकृष्ण सेना वंशीवनात आली. वंशीवन कृष्णसख्याचे स्तवन करीत होते. वायूने वंशी मैत्री करीत हे स्तवन सुरू केले होते. श्रीकृष्णांनी वंशीवनात निनादणाऱ्या कृष्णस्तुतीला वेणूनादाने साद घालीत, रासक्रीडेचे आवाहन आळवण्यास प्रारंभ केला. खेळगड्यांनी ताल धरला. मुरली आर्त झाली. राधेचे प्रियाराधन सुरू झाले. श्रीकृष्ण राधाराणींसवे रतिक्रीडेचे स्वप्न गीत घुमवू लागले. सारे गोपगडी वेडावले. मादक स्वरलहरींनी वंशीवन उन्मादक झाले. यमुनेच्या प्रवाहात धारानृत्य करू लागले. राधा मात्र श्रीकृष्णाकडे धावत येईना. श्रीकृष्णांच्या मनोमनी राधाकृष्ण रतिक्रीडेचे चित्र संमोहकतेने प्रकट होऊ लागले.

*भ्रू-पल्लवम् धनुः अपाङ्-तरङ्गितानि*
*बाणाः गुणः श्रवण - पालिः इति स्मरेण ।*
*तस्याम् अनङ्ग - जय जङ्गम देवतायाम्*
*अस्त्राणि निर्जित - जगन्ति किम् अर्पितानि ।।५।।*
*भ्रू-चापे निहितः कटाक्ष - विशिखः निर्मातुमर्म-व्यथाम्*
*शाम-आत्मा कुटिलः करोतु कबरी - भारः अपिमार उद्यमम् ।।*
*मोहं तावत् अयम् च तन्वि तनुताम बिम्ब-अधरः रागवान्*
*सद्वृत्तः स्तन-मण्डलः तत्र कथम् प्राणैः मम क्रीडति ।।६।।*
*तानि स्पर्श-सुखानि ते च तरलाः स्निग्धाः दृशोः विभ्रमाः*
*तत् वक्त्र अंबुज - सौरभम् स च सुधा-स्पन्दी गिराम् वक्रिमा ।।*
*सा बिम्ब-अधर-माधुरी इतिविषय - आसङ्गे अपि मत्-मानसम्*
*तस्याम् लग्न-समाधि हन्त विरह - व्याधिः कथम् वर्धते ।।७।।*

''भिवयांच्या धनुष्यातून सुटणारे राधे तुझे कटाक्षबाण माझे अपरिहार्य मर्मछेदन करीत आहेत. कानांच्या पाळ्या जणू धनुष्याच्या दोरीप्रमाणे कार्य करीत आहेत. हे राधे, प्रेमदेवते, जगच जिंकून घेणारी आपली सारी आयुधे प्रेमदेव मदनाने जणू तुलाच समर्पित केली आहे.

राधे, तुझा नील कुरळकुंतलकलाप अनावरपणे माझ्या शृंगभावना चेतवित आहे. हे राधे, तुझे संमोहक रसाळ आरक्त अधरोष्ठ मला मोहित करीत आहेत. रेखीव आकर्षक गोलाकारात फुललेले तुझे स्तनमंडळ माझ्या प्राणांशी का बरे खेळत आहेत? प्रेममयी राधेकडून अशी अपेक्षा कशी करावी?

राधे, मनोमन मी तुझ्या सर्वांगेस्पर्शाचा अनुभव घेत आहे. तुझ्या प्रेममय

नयनविभ्रमात मी गुंतलो आहे. तुझ्या हृदयातून उमटणाऱ्या प्रेमगीतांची कंपने सुमधुरतेने मला वेड लावीत आहेत. मुखकमलाचा मादक गंध मला धुंद करीत आहे. माझी जिव्हा आणि ओष्ठ तुझ्या अधरामृताची माधुरी मनोमनी सेवन करीत आहेत. मनोमनी, हे राधे, मी त्द्रूप झालो आहे! तरीसुद्धा तू का बरं मला साक्षीभूत होत नाहीस?'' श्रीकृष्णांची राधाकृष्ण अद्वैतसमाधी मुरलीस्वरातून वंशीवनाला भारून टाकीत होती. तरी राधा मात्र प्रकट होईना. अनंत बाळकृष्ण अधीर आर्त झाले. ते वृंदावनाकडे निघाले.

वास्तविक सप्तशृंग पर्वतावर शक्तिस्वरुपिणी राधेच्या घोर तपःश्चर्येने प्रसन्न होऊन; चराचराच्या कल्याणासाठी राधाभावे भक्तीचे महत्त्व सांगून श्रीकृष्णांनी राधेला वरदान दिले–

*मम वक्षःस्थले तिष्ठ मम भक्ताच शाश्वती ।*
*सौभाग्येन च मानेन प्रेम्णाथो गौरवेण च ।।९७।।*
*त्वं मे श्रेष्ठा च ज्येष्ठा च प्रेयसी सर्वयोषिताम् ।*
*वरिष्ठाच गर्विष्ठा च संस्तुता पूजिता मया ।।९८।।*
*सततं तव साध्यो हं व श्यश्च प्राणवल्लभे ।*
*इत्युकत्वा च जगन्नाथश्चकार ललनां तता ।।९९।।*
*सपत्नी रहितां तां च चकार प्राणवल्लभाम् ।*
*अन्या या याश्च ता देव्यः पूजिताः शक्तिसेवया ।।१००।।*

''हे राधे, तू माझ्या वक्षस्थळी नित्य वास करशील. माझी शाश्वत भक्त अर्थात प्रत्यक्ष भक्तिस्वरुपिणी म्हणून सौभाग्य, मान, प्रेम आणि गौरवपूर्णतेने विराजमान असशील. सर्वश्रेष्ठ भार्या, सर्वश्रेष्ठ प्रेयसीरूपाने, तुझी मी सतत पूजा करेन! हे प्राणवल्लभे मी सर्वथा तुझ्या अधीन राहीन. तुला मी, पत्नीव्रतभावातून मुक्त करून; सदैव परमभक्त, परमप्रिया म्हणून तुझे पूजन करीन! तुझ्या वृत्तीने जे कोणी माझी भक्ती करतील त्यांच्यासाठी मी तात्काळ पूजनार्थ धावून जाईन.'' असे वरदान दिलेले असतांनाही, राधा माझ्यापासून का बरं दूर गेली असावी या चिंतेने विरहार्त होऊन, श्रीकृष्ण वृंदावनात आले होते.

वृंदावनात राधा, अनया पत्नी स्वरूपातील राधा नव्हतीच. ती तर सृष्टीच्या पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाशाच्या अंशाअंशात, कणाकणात, चराचरात चेतनाशक्तीरूपाने सामावली होती. श्रीकृष्णांना द्वापारातील अवतार कार्य संपन्न करण्यासाठी ती केव्हाच भावात्मकतेने लक्ष्मी रुक्मिणीदेवी म्हणून प्रकटली होती. वृंदावनातील कणाकणाला, रोमरोमाला राधेचं अस्तित्वरूप प्राप्त झालं होतं.

उत्कट भक्तीने, प्रेमाने राधास्वरूप अवघी सृष्टी कृष्णसख्याच्या आगमनाने पुलकित झाली होती.

श्रीकृष्णांच्या हृदयाला हे जाणवले. त्यांच्या जवळची मुरलीही राधास्वरूप होऊ लागली होती. श्रीकृष्णांनी आवेगानाने माधवरूप होऊन मुरली अधरी धरली. रासप्रियेसाठी मुरलीधरांचे मुरलीस्वर घुमू लागले. सारे खेळगडी त्या स्वरांनी मंत्रमुग्ध होऊन माधव मुरलीधर श्रीकृष्णरूपात ध्यानमग्न झाले. श्रीकृष्णांचे संमोहक रूप त्यांच्या हृदयी ठसावू लागले –

*वंशीविभूशितकरान्नवनीरदाभात्*
*पीताम्बरदरुणबिम्बफलाधरोष्ठात्*
*पूर्णेन्दुसुन्दरमुखादरविन्दनेत्रात्*
*कृष्णात् परं किमपि तत्त्वमहं न जाने ।।०।।*

सारे खेळगडी मनोमनी श्रीकृष्ण तत्त्वांत तल्लीन होऊन गेले. मुरलीरव अवघ्या वृंदावनात दुमदुमला. वृंदावनीच्या वेणूनादाने संमोहित, प्रिया राधा यमुनेच्या प्रवाहातून, वाऱ्याच्या लहरीतून, वृक्ष, लतावेलींच्या पानापानातून, फुलाफुलातून, फांद्याफांद्यातून, आकाशाच्या प्रकाशकणाकणातून, भूमीच्या रजःकणातून असंख्य राधारूपाने प्रकट होऊन; श्रीकृष्णांच्या भोवती मुग्धपणे रास रचू लागली. पाहाता पाहाता राधा थेट श्रीकृष्णांच्या वक्षस्थलाला बिलगली. मुरलीरवात अवघे द्वैत विरून गेले. राधाकृष्ण, कृष्णराधा रूपाने अवघ्या अस्तित्वाला संवेदित झाले. रासपरमोत्कर्षास पोहोचली!

*व्यालोलः केश-पाशः तरतिलम् अलकैः स्वेद-लोलौ कपोलौ*
*स्पष्टा द्रष्टा अधर - श्रीः कुच-कलश - रूचा हारिता हार-यष्टिः ?*
*काश्री काश्चित गत - आशा स्तन- जघन - पदम् पाणिना आच्छाद्य सद्यः*
*पश्यन्ती स-त्रपा सा तत् अपि वि- लुलिता मुग्ध - कान्तिः धिनोति ।।७।।*
*ईषतू - मीलित - दृष्टि - मुग्ध विलनत् - सीत्कार - धारावशात्*
*अव्यक्त-आकुल-केलि-काकु-विकसत्-दन्त-अंशु-धौत-अधरम् ।*
*शान्त - स्तब्ध - पयोधरम् भृश - परिष्वङ्गात कुरङ्गी - दृशः*
*हर्ष - उत्कर्ष - विमुक्त - निःसह - तनोः धन्यः धयति आननम् ।।८।।*

वेणीची वीण विसकटली. केश वाऱ्यावर भुरभुरू लागले. गाल घामाने भिजले. अंगराग वितळला. ओठावरचा श्रृंगार फरफटला. विवस्त्र स्तनांच्या संमोहकतेपुढे गळ्यातले हार निस्तेज वाटू लागले. वस्त्र ठायीचे विलग झाले. संयमाने कंचुकी हताश झाली. लज्जेने चूर समर्पित यौवन सावरण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागली. आपले नग्न रूप पाहून तिचे चित्त कृष्णमय झाले. तिचे ह्या रूपाने श्रीकृष्णाला अधिकच वेडावले!

नयन तृप्तीने अर्धोमिलित झाले. तृप्तीचे हास्यलास्य मुखमंडलावर विलसले. सुखाच्या सर्वोच्च शिखरांवरील रतिकेळीच्या उन्मादपूर्णतेची चिन्हे परस्परांच्या कानी कुजबुजली. अधर दंतपक्तीसह प्रभापूर्ण झळाळले. अविट आलिंगनात चुरडलेले पयोधर शांत झाले. उत्कट सुखाने हर्षभरीत मनतनू अन्य विचारांचा स्पर्शही होऊ देत नव्हती. गोपी बालकृष्ण आनंदाच्या शिखरावरून तिची चुंबने घेतच होता!

राधाकृष्णाच्या रासक्रीडेच्या परिपूर्तीने अवघे वृंदावन पुलकित झाले.

''सख्या, कृष्णा, मी तर सतत तुझ्या वक्षीच असते ना! तरी अधीर होऊन माझा शोध घेत येतोस? मला हवेसे वाटले तरी अवतार कार्यांपासून आपण परावृत्त होणे विधीमान्य कसे बरे होईल?'' राधा कानी कुजबुजली.

''स्वामिनी!'' कृष्णमुखातून आवेगपूर्ण शब्द घुमला.

''सखया, तुझ्याच वांच्छेचा अनुसार करीत, तुझी अर्धांगी रुक्मिणी होऊन मी प्रकट आहे, हे का तुला ठावूक नाही।'' राधेने कुतुहलाने विचारले.

''हे प्रिये, पत्नीव्रतापेक्षा प्रियावृत्ती परिपूर्ण विशुद्ध असते. यासाठीच ना पत्नीवशातून पृथकपणे प्रियापदी तुला, हृदयस्वामिनी, चैतन्यमयी पदी राहण्याचे, वरदान प्राप्त आहे ना?'' श्रीकृष्णांनी सप्तशृंग गडावर राधेला दिलेल्या वचनाची आठवण करून दिली.

''सख्या निर्व्याज देही विदेहीपणाने प्रेमपूर्णा होऊन कृष्णस्वरूप होण्याचे मला लाभलेले भाग्य अद्वितीय आहे. तरी लीलाविग्रह अटळ आहे ना?'' राधेने लीलाविग्रहाची अनिवार्यता स्मरण करून दिली.

''प्रिये तू खरोखरीच धन्य आहेस! या वृंदावनात ही रासक्रीडा जगताला प्रेमस्वरूपाचे ज्ञान घडविल. राधावृत्तीने निखळ भक्तिपूर्ण होऊन जो माझे स्मरण करील तो तात्काळ मद्रूप होईल, असे वरदान मी तुला देतो.'' कृष्णाने राधेला सांगितले. शिवशक्ती, ब्रह्ममाया, विष्णूलक्ष्मी हे भक्तिसूत्र निवेदन ऐकून धन्य झाले. अद्वैताचे दर्शन आणि अनुभवन घेणारे, दाटीने आकाशात राधाकृष्ण मग्न

असलेले ऋषी, मुनी, सिद्ध, धर्मात्मे आश्वस्त झाले!

''हे सख्या, वृंदावन या रासप्रियेसाठी आपले हृदय बनून विलसावे. एवढेच माझे मागणे आहे.'' राधा म्हणाली.

''सखे, राधाभावाने रास दर्शनाला जो वृंदावनात येईल त्या चराचराला जीवमात्राला राधामाधव अद्वैताचा साक्षात्कार येथे घडेल. येथे नित्य रासक्रीडेचा अनुभव येईल!'' श्रीकृष्णाने अभिवचन दिले.

राधा सृष्टीरूपात अंतर्धान पावली. खेळगडी भानावर आले. बासरीचे बोल थांबले. राधाकृष्ण भेटीचा अनुभव, खेळगड्यांनाही आला. सारे मुग्ध अबोल होऊन; कन्हय्यासह गोकुळी निघाले.

दिवे लागणीसमयी, गोधने ग्रामी परतली. समवेत राधाराणी गोकुळात परतली.

जणू अवकाशात केवळ आद्याचे चैतन्य आत्मरूपाने स्वयंप्रकाशले आणि पुन्हा सृष्टीस्वरूप झाले!

●●●

। १९ ।

# शोधित राधा अनया

गेले काही दिवस अनया अस्वस्थ होता. राधा थेट वृंदावनच गाठे. रात्री गोधनाबरोबर घरी परते. यशदा आणि यशोधन यांनाही राधेचे वावरणे काहीसे विचार करायला लावणारे होते. राधाकृष्ण अद्वैत-अनुभूती राधेच्या माध्यमातून भक्तिभावाने त्या तिघांनीही घेतली. नारदमुनी, गर्गमुनी आणि प्रत्यक्ष घडणाऱ्या लीला यांच्या माध्यमातून राधाकृष्ण अवतार लीला त्यांना ज्ञात होती. तरीसुद्धा अनया-राधा पतीपत्नी म्हणून लौकिकातील लीलाही निभावत होते. राधाभावाने सर्वच श्रीकृष्णाला शरण गेले होते; तरी आपणही अवताररूपाने या लीलेचे घटक आहोत, याची धन्यता वाटत होती! मात्र गेल्या काही दिवसात; म्हणजे गर्गमुनी नंदग्रामी येऊन गेल्यानंतर राधा केवळ आत्ममग्नतेने वागत होती. त्यामुळेच तर तिच्याविषयी तिघेही चिंतीत होते.

निश्चय करून, अनया राधेपाठोपाठ, राधेचाच विचार करीत निघाला. गोधनाचा कळप केवळ निमित्तमात्र होता. भांडीरवन, यमुनातट, वंशीवन सारं बाजूला सारून अनया थेट वृंदावनाकडे निघाला होता. राधावायूलहरीप्रमाणे, वायवीपणे वृंदावनाकडे झेपावत होती. तिच्या गतीने जाणेही अनयाला शक्य होत नव्हते. तरी आपल्या नजरेच्या टप्प्यात राधेवर नजर केंद्रित करून; अनया पुढे-पुढे जात होता.

राधा वृंदावनात पोहोचली. क्षणात झंजावात सुरू झाला. आकाशात मेघांनी गर्दी करायला सुरुवात केली. वृंदावन अंधेरून आले. गाई वृक्षांच्या आश्रयाने जाऊन उभ्या राहिल्या. त्या गोधनाच्या नजरा राधेच्या नित्य लीलेस्थळी स्थिरावल्या. वृक्षवेलीच नव्हे तर अवघी सृष्टी आवेगपूर्ण होऊन; जणू बाहू पसरून राधेकडे झेपावली. यमुनेच्या लाटा उंच उंच उसळून, विक्राळपणे, सृष्टीला

जणू कवेत घेण्यासाठी झेपावल्या. राधेची वस्त्रे वायूंना साथ देत, विलग होऊ लागली. वृंदावनात बन्सीरव स्फुरला, त्याने राधेला साद घातली. अनया डोळे विस्फारून पाहात होता. एकाएकी विद्युलतेचा भला लोळ लकाकला. अनयाचे डोळे दिपून गेले. पण काही क्षणच. अवघे वृंदावन शांत झाले. जणू क्षणांपूर्वी काहीच घडले नव्हते. अनयाने डोळे उघडून राधेचा वेध घेतला. दृष्टीच्या क्षेपातली राधा दिसत नव्हती.

श्रीकृष्णांनी वेणुवादन सुरू केला की अवघे गोकुळ गोपी आणि गाया श्रीकृष्णाच्या वेणुरवात मुग्ध होऊन श्रीकृष्णाभोवती जमत. कधी श्रीकृष्णाच्या वेणुगीतातून रासआवाहक सूर सुरू होत आणि राधाकृष्ण रासक्रीडेत मग्न होत. साऱ्या सृष्टीत असंख्य राधाकृष्ण युगुले आहेत. आपणही त्यातीलच एक आहोत असे अनयाने अनुभवले होते.

आज राधा तर दिसेनाशीच झाली. अनया राधेला हाका मारू लागला. ''राधाऽऽ, राधाऽऽ, राधेऽऽ, राधेऽऽ,'' अनयाच्या हाकांनी अवघे वृंदावन दुमदमून गेले. डोळ्यासमोरची राधा एकाएकी विजेच्या झगमगाटात कोठे नाहिशी झाली या विचाराने अनया पिसा झाला. अनयाने इकडे-तिकडे धावत जाऊन राधेला हाका मारायला सुरुवात केली. 'राधा' हाकांचे प्रतिध्वनी वृंदावनात घुमू लागले. क्षणाक्षणाला अनया अधिकच अधिर आणि भयभीत होत होता. गोकुळात नित्य घडणारे राधाकृष्ण दर्शन आज एवढ्या हाका मारूनदेखील घडत नव्हते.

अनया कासावीस झाला. 'राधाकृष्ण' भजनाऐवजी त्याच्या मुखातून केवळ हाकांचाच बढीमार होत होता. ''राधाऽऽ, राधाऽऽ, कुठे आहेस तू? कुठे लपलीस? यमुनेच्या प्रवाहात? घनशाममेघात? झाडात? वेलीत? या तृणांकुरात, या वंशीरवात? वायुलहरीत? त्या विजेच्या लोळात? कुठे कसं शोधू तुला?'' अनया व्याकूळ झाला.

''राधेऽऽ, कशी बरे वृंदावनातून दूर गेलीस? तुझ्या कृष्णसख्याचे दर्शनही आज का बरे होत नाही? काय केलं म्हणजे तुझं दर्शन होईल? हे राधे, तुझ्याविना हे जीवन म्हणजे केवळ निरर्थक आहे. मी त्या कृष्णकान्हाला तरी कसा हाक मारू? त्याच्याशी कसा क्रीडा करू? तो कान्हा आहे का तुझ्या सवे? आज मला का बरे राधा झाल्यासारखे वाटत नाही? राधेऽऽ माझा अंत नको गं पाहू? आपण पतीपत्नी म्हणून प्रपंचक्रीडा करण्याचे अभिवचन दिलेले असतांनाही तू अशी माझ्या समोरून कशी बरे नाहिशी झाली? राधेऽऽ राधाकृष्ण होऊन आम्ही गोकुळवासी कशी बरे क्रीडा करणार? की आज मी, लपत-छपत तुला

पाहण्यासाठी आलो; म्हणून तू नाहिशी झालीस? श्रीकृष्णतरी या वृंदावनात का दिसत नाही? मी नंदग्रामात काय सांगू? की, तू रुसून नाहिशी झालीस? राधेऽऽ, राधेऽऽ, राधेऽऽ'' अनया अति आर्त व्याकूळ झाला होता. त्याच्या हाका आर्त आर्त होत गेल्या. वृंदावन दणाणले.

एकाएकी पुन्हा तसाच झंजावात सुरू झाला. ढगांचा विक्राळ गडगडाट, विजांचा भयंकर कडकडाट. अवघे वृंदावन उन्मळून पडते की काय असे वाटू लागले. अनया भयभीत झालेल्या पाडसासारखा आणखी जीवाच्या आकांताने राधेला हाका मारू लागला. क्षणार्धात मुसळधार पाऊस सुरू झाला, गोवर्धन प्रलयंकारी! पाण्याचे हे लोट वृंदावनातून थेट यमुनेच्या प्रवाहापर्यंत झेपाऊ लागले. अनयाला प्रलयात आपणही गडप होतो आहोत असे वाटू लागले. आता अगदी प्राणांतिक संकटसमयीची आर्तता त्याच्या आवाजात आली, ''राधाऽऽ राधाऽऽ राधाऽऽऽऽ'' त्याने आकांत मांडला. पुन्हा विश्व दिपवून टाकणारा झगझगीत प्रकाश झळाळला. जणू सहस्त्र सूर्य एकाचवेळी प्रकाशमान व्हावेत. त्याचवेळी मरुत आणि पर्जन्याचे तांडव थांबले. अनयाने डोळे गच्च मिटून घेत जणू अखेरची साद घातली, ''राधाऽऽऽऽ'' आणि अनया भान हरपला.

''अनया उठ, मी प्रसन्न आहे, तुझे निस्सीम राधा प्रेम पाहून! उठ!'' प्रत्यक्ष मुरलीधर कृष्ण, त्याच्या पुढ्यात साक्षात झाले होते.

''श्रीकृष्ण!'' भानावर येत अनया म्हणाला.

''अनया, होय मीच आलो आहे. बाळकृष्ण!'' अष्टवर्षीय गोपवेषातील मनमोहनाने राधालाघवी स्मित करीत उत्तर दिले.

''हे कृष्णा! अं, राधा?'' अनयाने क्षीण तरी उत्कट स्वरात प्रश्न केला.

''अनया हे बघ, मी तुझ्याच समोर उभी आहे!'' श्रीकृष्ण म्हणाले. राधास्वरूपात श्रीकृष्ण प्रकटले. त्यांनी अनयाकडे हात ओडवून अनयाला सावध केले. राधेला समोर पाहून हरवल्या पाडसाने हरिणीला बिलगावे तसा अनया राधेला बिलगला. त्याच्या नेत्रातून आनंदाचे लोट वाहू लागले. ''राधेऽऽ राधेऽऽ आलीस तू?'' त्याने राधेला हृदयाशी कटवाळले.

''अनया, भानावर ये!'' श्रीकृष्ण म्हणाले. अनयाने राधेला तसेच बाहुपाशात ठेवत डोळे उघडले. अनया चमकला आणि त्वरित बाजूला होत, खाली वाकला. त्याने माधवाच्या पायावर डोके ठेवले. डोळ्यातील अश्रूंनी, कन्हय्याच्या चरणकमलावर अभिषेक होत होता. श्री चरणावर अनयाची अवस्था विदेही झाली. त्याचे अवघे शरीर वायवी झाले. थेट सच्चिदानंदस्वरूपात आपण सामावत

आहोत असे वाटू लागले. तोच श्रीकृष्णांनी अनयाच्या खांद्यावर हात ठेवले.

''स्वामी, हा काय बरं वेडेपणा! पतीने का पत्नीच्या पायावर लोळण घ्यावी?'' श्रीकृष्ण राधास्वरूप होऊन म्हणाले. अनयाने चरणकमल घट्ट घट्ट धरले. हे कन्हय्या, मी चुकलो. मी राधेचा शोध घेत तिच्या मागे मागे आलो. ती येथे नाही म्हणून भयभीत झालो. कन्हय्या तूच राधा आहेस. याचा विसर पडला. द्वापारात आपण लीला करीत आहात याचाही विसर पडला. राधेचे अनुगमन करीत, आपणासवे रासलीलेत क्रीडा करण्याचे भाग्य लाभले, हेही विसरलो. हे परमेश्वरा आपणच अनंत आहात. आपण मला सच्चिदानंदपदी घेऊन चला.'' अनया वेडापिसा होऊन बोलत होता.

आता वृंदावनातील अवघे चराचर प्रसन्न, नितळ, आनंदमय झाले होते. गोधनांनी भोवती फेर धरला होता. वनातील अन्य सर्व गोपही तेथेच पोचले होते. अनयाच्या भक्तिसंवादात सारेच भावूक आणि आर्त झाले होते. समोरची क्षणात बदलणारी दृश्ये त्यांना इंद्रजालासारखी संमोहित करीत होती.

''अनया, उठा, मी श्रीकृष्ण नाही, मी आपली राधा!'' श्रीकृष्णाने पुन्हा राधालाघवाने कन्हय्याला हाक मारली. आता मात्र कन्हय्या भयचकित होत उठू लागला. राधेने त्याला समोर उभे केले. ''का बरे आपण आकांताने हाका मारीत होता? मी तर येथेच वृंदावनात होते. अगदी नेहमीप्रमाणे. गोपालकृष्णाच्या चिंतनात मग्न होते!'' राधास्वरूपाने विचारले.

''राधेऽ तू... तू... खरोखरीच राधा आहेस? आणि गोपालकृष्ण, कन्हय्या? तो... तो... तर आत्ता इथेच होता. मी त्याला वंदन केले.'' अनया व्याकूळ होऊन म्हणाला.

''नाही नाही, अनया तूच माझ्यासाठी वेडापिसा होऊन आलास आणि मलाच गोपालकृष्ण समजून वंदन करू लागलास!'' राधास्वरूपाने कन्हय्याला पुरते संभ्रमात टाकले.

''राधाऽऽ तू दिसेचना, मला दिसला तो कन्हय्याच! पण, आता तो कुठे आहे? आज राधाकृष्ण युगुलाचे दर्शन का बरे घडत नाही? राधेऽऽ तू माझी चेष्टा तर करीत नाहीस? तू नव्हतीसच, मी तुलाच साद घालत, त्या झंजावातात बेभान झालो. मला श्रीकृष्णांनीच भानावर आणले. मग आता, कोठे बरे ते नाहिसे झाले?'' अनया काकुळतीला येऊन, बोलत होता.

परमात्म्याच्या पूर्णावतार गोपालकृष्णांची ही कैवल्य क्रीडा पाहाण्यासाठी अवघ्या पार्षद गोपगोपींनी, त्रिदेव तथा त्रिशक्तींनी, चौवदाभूवनांतील चराचरांनी

अवकाशात दाटी केली होती.

राधास्वरूप श्रीकृष्ण साक्षात झाले! प्रत्यक्ष कृष्णमुखातून कैवल्य क्रीडेचे गुह्य असे सच्चिदानंदस्वरूप उमलले जात होते.

''अनया, मदस्वरूपाशी एकरूप झालेल्या तुला या गोलोकी राधापती म्हणून अवतरित केले. हे अनया, द्वापारातील या अवतारात अवघे गोकुळच अर्थात गोलोकच यमुनातीरी अवतरित झाले आहे. श्रीराधेच्या रोमकुपांतून गोपींचे समुदाय प्रकट झाले आहेत. श्रीकृष्णांच्या रोमकुपांतून गोप प्रकट झाले आहेत. कृष्ण तत्त्व आहे तर राधा हे त्या तत्त्वाचे तत्त्वमयी प्राकट्य आहे! त्यामुळे राधाकृष्ण दोन नाहीतच तसेच गोपगोपीही दोन नाहीत. या लोकीची अवघी अस्तित्वे ही वस्तुतः राधाकृष्ण अद्वैताचे पार्षद आहेत. नंदग्रामी आणि यमुनातीरी ही केवळ आभास लीला आहे याचे भान सर्वांना यावे, याकरिताच ही विस्मयकारक क्रीडा करावी लागली. वास्तविक कोणी राधाही नाही आणि कोणी कृष्णही नाही. एकाच पूर्णत्वाची ही अंशस्वरूप प्राकट्यलीला आहे! तत्त्व पंचविधच नव्हे तर अनेकविधपणे प्रकटले आहे. तत्त्व असे श्रीकृष्णपरमात्म्याच्या ठिकाणी तत्त्वसंवेदनस्वरूप आद्या अर्थात राधा चिरंतन वास करते. तीच श्रीकृष्णांच्या प्राणांची अधिष्ठात्री आहे.''

''प्राणाधिष्ठातृदेवी च तस्यैव परमात्मनः'' राधावल्लभ श्रीकृष्णच परमसत्य आहे. अवतारस्वरूप मिथ्या; तर राधाकृष्णस्वरूप सत्य. श्रीकृष्ण कैवल्यरूप हेच सत्य! ''राधा हीच सत्यस्वरूप चित्शक्ती होय! तिच्यामुळेच सत्चिदानंद श्रीकृष्णांचे अनुभूतीपूर्ण ज्ञान होते. हे अनया याची अनुभूती सर्वांना यावी म्हणूनच ही क्रीडा केली आहे! भूलोकीच्या ज्ञानीजनांना राधावंदनेने अर्थात भक्तिसाधनेनेच श्रीकृष्ण परब्रह्म प्राप्ती होते. हे अनया, तुझ्या राधारूप होण्यानेच तुला माझ्या अनुभूतीचा लाभ मिळाला. राधा हीच श्रीकृष्णांच्या ठिकाणी असलेली चित्स्वरुपिणी करुणा होय. त्यासाठी राधारूप होणेच आवश्यक. हे अनया, तुझ्याप्रमाणे आणि गोकुळवासी गोपगोपींप्रमाणे जे राधारूप होतील, त्यांना मद्रूप होणे सहज शक्य होईल. द्वापार आणि कलियुगासाठी राधारूप होण्याचा भक्तियोग साधणेच श्रेयस्कर.'' श्रीकृष्णांनी गुह्य ज्ञानाचा स्फोट केला. वृंदावनात वंशीचा वेणूनाद घुमू लागला. अवघे वृंदावन राधास्वरूप झाले. चराचराला राधाकृष्ण अद्वैताचे अनुभवन अनयाच्या निमित्ताने घडले आणि काही क्षणातच वृंदावनात अवघे गोपगोपी राधाकृष्णस्वरूपात रासरंगी रंगून गेले.

''हे भगवन्, माझा सर्व प्रकारचा संदेह नाहिसा झाला. तथापि माझ्या एका

इच्छेची पूर्तता व्हावी एवढीच कांक्षा आहे!'' अनया अतीव काकुळतीने म्हणाला.

''सांग तुझी काय वांच्छा आहे?'' श्रीकृष्णांनी विचारले.

''मला अवतारकार्य करून परमात्म्याच्या लीलेत सहभागी होता आलं. मी कृतार्थ झालो. माझे अवतारकार्य संपवून मला आपल्या ठायी चिरस्थान मिळावे अशी कांक्षा आहे.'' अनयाने साष्टांग दंडवत घालीत सांगितले.

''अनया ती वेळ समीप आली आहे. राधेच्या लौकिक अवतारकार्य समाप्तीबरोबरच तुझ्या अवतारकार्याची समाप्ती होईल. तुझ्या अवतारलीलेचे स्मरण सतत सर्वांना राहील. राधाकृष्णांची नवविधा भक्ती करतांना माझ्यानिमित्ताने सर्वांना चिरंतन तुझे स्मरण राहील, असे अभिवचन मी तुला देतो.'' श्रीकृष्णाच्या अभिवचनाने अनया तृप्त झाला. त्याच्या मुखातून ''राधाकृष्ण, गोपालकृष्ण!'' असे भजन सुरू झाले. वृंदावनात वेणूनाद भरून गेला. यमुनेसह वृंदावनीचे जडजीव राधाकृष्णस्वरूप झाले. वृंदावनी रास सुरू झाली.

रासरंजनात अद्‌भूत रंग उधळले गेले. राधा पंचविधा, अनेकविधा, चैतन्यरूपा, शक्तिरूपा, लक्ष्मीरूपा, वात्सल्यरूपा होऊन परोपरीने श्रीकृष्णाशी रत होऊन रासरंजन करीत होती. लक्ष्मी, सरस्वती, सावित्री, माया, पार्वती अशी कितीतरी रूपे प्रकट होती. विष्णू, गणेश, ब्रह्मा, शिव अशा अनेक रूपांतून कृष्णरंग भरत होता. त्यातील भूलोकाला संमोहित करणारी लक्ष्मीरूपा राधा कृष्णसख्याला संमोहित करीत होती. तरी राधारूपाचा अनेकविध विलास अनुभवण्यासाठी जणू श्रीकृष्ण उत्सुक झाला होता. श्रीभोज आणि रमादेवी यांचे पुत्र जयदेव या रासरंजनाचे नादमयी वर्णन करतांना म्हणतात–

*रचय कुचयोः पत्रम् चित्रम् करुष्व कपोलयोः*
*घटय जघने काञ्चीम् मुग्ध – स्रज – कबरी – भरम् ।*
*कलय वलय – श्रेणीम् पाणौ पदे कुरु नुपुरौ*
*इति निगदितः प्रीतः – अम्बरः अपि तथा अकरोत ।।२।।*
*पर्यङ्कीकृत – नाग – नायक – फणा – श्रेणी – मणीनाम् गणे*
*सङ्क्रान्त – प्रतिबिम्ब – सङ्कलनया विभ्रत् विभुः विक्रियाम् ।*
*पाद – अम्भः – रुह – धारि – वारिधि – सुताम् अक्ष्णाम दिदृक्षुः शतैः*
*काय – व्यूहम इव आचरन् उपचित – आकूतः हरिः पोतु वः ।।३।।*

''हे कृष्णा तू माझी स्तनमंडले तुझ्या प्रेमात, सुंदर आकृत्यांनी सुशोभित व्हावीत. माझे गोल वेलींच्या उत्स्फूर्त आवेगांनी मोहरावेत. माझी कटीवस्त्रे

तुझ्या भावनांनी बंधयुक्त व्हावीत. माझा केशसंभार, बहुपेडी वीणेसह, तुझ्या हस्तस्पर्शाने पुष्पमालिकांनी माळला जावा. माझ्या हाती कंकणांची किणकिण पुन्हा तुला साद घालणारी होवो.'' राधेने प्रेमतृप्तीने विनविले. ह्या प्रेमभाव तृप्त करणाऱ्या लाघवाने राधेला कृष्णसख्याची लक्ष्मी रुक्मिणी स्वरूपात सेवा करण्याची इच्छा झाली. एवढा वेळ श्रीकृष्ण अर्धांगिनी राधेची प्रेमपूजा बांधीत होते. आता राधालक्ष्मी स्वरूपात श्रीकृष्ण पूजा बांधताना कृष्णस्वरूपात लीन होऊ लागली. ह्या दिव्य प्रसंगाचा अनुभव चराचर घेत होते. कृष्णाठायीच्या सृष्टीस्वरूप होऊन प्रपंच लीला करण्याची वासना; राधेच्या मिलनामुळे तिच्या कृष्णाठायी लीन होणाऱ्या लक्ष्मीभावामुळे बाधित होऊ लागली.

आपले पाय मांडीवर घेऊन चुरत, आपल्याला निद्रावश करविणाऱ्या लक्ष्मीदर्शनाने श्रीकृष्णाचे समाधान होईना. त्याकरिता भगवंतांनी सहस्त्रफणीधर नागनायकाला अर्थात ठायीच्या 'बहुस्याम' होण्याच्या वासनेला, आपले पर्यंक बनविले. त्यामुळे सहस्त्रफणीधराच्या सहस्त्र रत्नमण्यांत भगवंतांचे प्रतिबिंब पसरले. सहस्त्रबिंबांच्या द्विसहस्त्र नेत्रमण्यांनी भगवंत राधास्वरूप लक्ष्मींचे सौंदर्य न्याहाळू लागले. त्या सृष्टीव्यापी राधालक्ष्मीस्वरूपाने श्रीकृष्ण पुन्हा मदनमोहित झाले आणि सृष्टी पुन्हा पुन्हा अनेकविधा राधास्वरूपाने रासरंजन होऊ लागले. राधाकृष्ण अद्वैताची, पुरुष आणि प्रकृती, ब्रह्म आणि माया, विष्णू लक्ष्मी, शिव शिवा स्वरूप द्वैताद्वैत लीला, वृंदावनातील चराचराला अनुभूत झाली.

अवघी सृष्टी म्हणजे श्रीकृष्णाची राधामयी प्रेमलीला, कारुण्यलीला आहे; याची जाणीव रासक्रीडेने झाली! प्रेमाच्या अनेक कलांचे, विभ्रमांचे, आर्त भक्तिभावाचे लक्ष सच्चिदानंदस्वरूप व्हायचे; असेच या दिव्य लीलाविग्रहातून चराचराला अवगत होत होते. अवघ्या सृष्टीलीलेचे रहस्य कृष्ण तत्त्वाठायीची चित्शक्ती तत्त्वमयी राधेचे प्रकृती सृष्टीस्वरूप होऊन प्रकटणे आणि पुन्हा पुन्हा प्रकट होत श्रीकृष्णसायुज्यतेसाठी उत्कट प्रेमभराने त्या तत्त्वांकडे झेपावणे; कृष्णसख्याला सृष्टीकडे खेचून घेत तत्त्वमयी अवस्थेतील सच्चिदानंद तत्त्वाची अनुभूती घेत राहणे हाच सनातन लीलाविग्रह होय!

या सायुज्यतेसाठी राधाभावाने प्रपंचाच्या संघर्षमयी देहव्यापी व्यवहार पेलत; त्या व्यापाराला भक्तीने आनंदमग्न करीत; लीला करणे आवश्यक असते. अत्यंत गूढ, परमसत्य राधामयतेचे कृष्णतत्त्वातील अस्तित्व राधाकृष्णरूपाने, वृंदावनात प्रकृतीठायी अनुभूत होत गेले!

सायंकाळपर्यंत ही क्रीडा संमोहक इंद्रजाळाप्रमाणे वृंदावनाला मंत्रमुग्ध करीत

होती. सायंकाळी गोरज व्यवहाराने सारे विश्व सायंवंदनेसाठी नगराकडे निघाले. राधा, अनया आणि गोप गोपी, अवघी गोधनेही पुन्हा नगराकडे आली. सृष्टीव्यवहारील प्रकाश आणि काळोख, यांच्या द्वैताद्वैत अनुभूतीत अवघा गोलोक अनया-राधेसह मग्न झाला!

●●●

। २० ।

# राधे राधे !

श्री बालकृष्ण नंदराऊळी प्रकटले तेव्हा अवघे गोकुळधाम आनंदाने कान्हामग्न होऊन नृत्य करीत होते. ''नंदके घर आनंद भयो । जय कन्हय्या लालकी । हाथी घोडा पालकी । जय कन्हय्या लालकी ।।'' या आनंदघोषात अवघा गोलोक आनंदोत्सव करीत होता. वृषभानू, कीर्तिदेवी, यशदा, यशोधन आणि नंदयशोदा यांच्या ठायी आनंद मावत नव्हता. चैतन्यमयी राधेला आपले कैवल्यधाम गवसल्याचा आनंद होता. तिचे स्वत्च, तिचे असलेपण, तिचे निजधाम तिला गवसले होते. प्रेमोत्कटतेने ती छायास्वरूप पार्षदपणाचे भान विसरून, बाळकृष्णाभोवती पिंगा घालत होती.

आजचा प्रसंग या अगदी उलट होता. पाळण्यातला श्रीरंग, रांगणारा बाळकृष्ण, यशोदेच्या आईपणाला आर्तपणे चेतविणारा बाळकृष्ण, अवघ्या सवंगड्यांचा कान्हा, गोकुळात आपल्या खोडकर बाललीलांनी सच्चिदानंदपूर्णतेने गोपगोपींना, सवंगड्यांसह सळो की पळो करणारा श्रीकृष्ण; आपल्या अद्भूत प्राकट्याने गोकुळात राधेशी अद्वैत होणारा श्रीकृष्ण, राधेशी स्पर्धा करावयास भाग पाडून; गोपगोपींना राधाप्रेमस्वरूपा होऊन उत्कट भक्तिभावाने जीवनमुक्तीची अनुभूती घडविणारा कन्हय्या, भांडीरवन, वंशीवन, वृंदावन, यमुनाजल, अवघा बरसाणा परिसर, आपल्या लीलांनी आणि वेणुनादाने भारून टाकणारा श्रीकृष्ण, अवघ्या गोधनासह जडचेतन सृष्टीरूपाला राधाभावाने आलिंगन देणारा माधव; अघ, बक, पुतना, कालिया मर्दन करणारा गोलोक तारक कृष्णकन्हय्या, प्रलयंकारी पर्जन्यवृष्टीमध्ये गोलोकधामाचे रक्षण करणारा गोवर्धनधारी, गोकुळातील चैतन्याचा पुतळा, आनंदाचा किवळा, मेघशाम, मुरलीधर, बाळकृष्ण. आपल्या संमोहक, निरागस बालरूपाने गोकुळाचे वात्सल्य मूर्त करणारा कान्हा, राधाकृष्ण परमात्मा,

पूर्णावतार श्रीकृष्ण; आज अगदीच वेगळ्या रूपात प्रकटला होता.

अवतारकार्यासाठी दिग्विजय करण्यासाठी, दुःखितांना, शोषितांना, पीडितांना, बंदिवानांना, त्रस्त प्रजेला संकटमुक्त करीत; धर्मरक्षण करून; धर्मप्रतिष्ठा पुनः प्रस्थापित करण्यासाठी; सिद्ध झाला होता! अवघे यादवकुळ, गोकुळ, सूर्यवंश, चांद्रवंश त्याच्याभोवती एकवटून धर्मराष्ट्ररक्षणार्थ सिद्ध झाले होते. पण यासाठी गोकुळाचा त्याग करून जाणे भाग होते. गोकुळाचे सच्चिदानंदपूर्ण जीवनच गोकुळ सोडून जाणार होते!

गोकुळ गहिवरले, हिरमुसले, कष्टी झाले! प्राण उडून जातो आहे असे वाटू लागले. वियोगाच्या कल्पनेने अवघे गोकुळ दुःखसागरात बुडून जात असल्याचा अनुभव अपरिहार्यपणे घेऊ लागले. अश्रूंचे पाट वाहू लागले. परमात्मा श्रीकृष्णही गोकुळाच्या प्रेमाने पान्हावला. वृषभानू व कीर्ति, नंद-यशोदा, यशदा-यशोधन यांची समजूत घालण्याचा प्रयत्न गर्गमुनी, गालवमुनी, व्यास आदि ऋषीमुनी करीत होते. राधाकृष्णांच्या रोमकुपातून गोकुळात पार्षदस्वरूपातील गोपीगोप कृष्णावताराचा गोकुळातील परिपूर्तीचा अनुभव घेत होते. भक्तियोगाची प्रतिष्ठा प्रेमस्वरूपा राधेच्या राधाकृष्ण लीलेने स्थापित केल्यानंतर, लौकिक जीवनातील दुरिते वारण्यासाठी श्रीकृष्ण सिद्ध झाले होते.

अनया अंतर्मुख झाला होता. राधेच्या सहवासात कृष्णभक्तीचा दिव्य अनुभव घेत कृष्णसायुज्याचा लाभ अनुभवत होता. एकाएकी राधेचा हात धरून अनया बालकृष्णाजवळ गेला. बालकृष्णाला दोघांनीही आलिंगन दिले. कृष्णाच्या आलिंगनात अनयाला कृतकृत्यता वाटली. त्याच्या नयनांनी बालकृष्णाच्या चरणकमलांना अभिषेक केला. बालकृष्णांच्या नयनात राधा समाधीमग्न झाली. गोकुळाने या दिव्यलीलेचे मनोभावे दर्शन घेतले.

श्री बलराम, यादवसेना, श्रीकृष्ण यांच्यासह, यादवस्वारी देवकींच्या मातुलगृही महाराज कंस यांच्या मथुरा नगरीकडे निघाली. गहिवरल्या हृदयाने, साश्रुनयनांनी दूर जाणाऱ्या बालकृष्णांना निरोप देत गोकुळधाम थकून गेले. राधा अनया वृंदावनधामी निघाले. पाठोपाठ गोपगोपीही निघाल्या.

वृंदावनधामीचे आजचे चित्र अगदीच भिन्न होते. अवघे वृंदावनधाम गहिवरले होते. श्वास रोखून राधेच्या आगमनाकडे आतुरतेने लक्ष लावून होते. आज वृंदावनी महाप्रलय लोटणार होता. या प्रलयासाठी वृंदावन सज्ज झाले होते. वृंदावनी राधा अनया गोपगोपी पोहोचल्या. राधाकृष्णांच्या रोमकुपातून निर्माण झालेले गोपगोपी आपल्या मूळ स्वरूपात पंचविध देवस्वरूप झाले. वृंदावनात

चक्रवात अवतरला. या चक्रवातात, ही समस्त देवमंडळी, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्त्वात क्षणार्धात समावेशित झाली! त्यांच्यासमवेत अनया आकाशस्वरूपात विलीन झाला.

धरित्रीपुत्री राधा धरतीत समावेशनासाठी सिद्ध झाली. तोच चक्रवात शांत झाला. वृंदावनात सुगंध दरवळला. पलिकडला यमुना प्रवाह शांत झाला. एवढा वेळ प्रलयासाठी सिद्ध वृंदावन पुन्हा, पुलकित होऊन सहस्त्रपटीने बहरले. बालकृष्ण, माधव, कन्हय्याचा, रास आवाहक मुरलीरव अवघ्या वृंदावनी घुमला. क्षणात वृंदावनात पंचतत्त्वस्वरूपात समावेशित झालेले गोपगोपी पार्षद स्वरूपातील देव आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण कलांसह आविष्कृत झाले. राधा बावरली.

तिच्या रोमरोमातून रासवृत्ती उसळली. रासमग्न होण्यासाठी ती श्रीकृष्ण सख्याला शोधू लागली. पृथ्वीदेवी औत्सुक्याने ही सृष्टीलीला पाहात वात्सल्यपूर्णतेने राधेचे मनमोहनमग्न रूप न्याहाळत होती. वृंदावनाच्या कणाकणातून श्रीकृष्णतत्त्व स्फुरले! राधा अधीर झाली. तिचे अंगअंग श्रीकृष्ण सख्याशी मीलनासाठी अतिआतूर झाले! परंतु... श्रीकृष्णेतर अवतारकार्यासाठी मथुरेकडे प्रयाण केले आहे; तरी येथे या गोपीमेळ्यात गोपांच्यासह मुरलीधर श्रीकृष्ण कसे बरे असतील; या भयशंकेने राधा अधिकच संभ्रमित होऊन गेली.

''हा गंध, हा स्वर, ही क्रीडा तर कृष्णसख्याचीच आहे!'' राधा मनोमनी म्हणाली. ती अवतीभोवती श्रीकृष्णांचा शोध घेऊ लागली. कृष्णसखा गोपरूपाने सर्वत्र सर्व गोपींसह रासमग्न होत होते. तरीदेखील अधरी मुरलीस्वर छेडीत श्रीकृष्ण त्या रासमंडळात राधेसाठी आतूर झाले होते!

राधा रा...धा झाली. ती आवेगाने धावतच श्रीकृष्णाच्या वक्षस्थळी बिलगली. मुरलीरव, वृंदावन शृंगारपूर्णतेने मीलनोत्सुक झाले. राधामाधव परस्परांत समावेशित होत होती. समावेशनाच्या उत्तुंग शिखरी राधाकृष्ण अद्वैत घडले. राधाच कृष्ण आणि कृष्णच राधा अशा अनुभूतीने अवघे वृंदावन शृंगसमाधीमग्न झाले!

शिव, पार्वतींना मोठ्या कौतुकाने हा समावेश प्रसंग दाखवित होते. पार्वतीमाता विदेही होऊन शिवस्वरूप होत होत्या. शंभुमहादेव अंबिकास्वरूप होत होते. अवघे द्वित्त हरपले. चराचर कृष्णतत्त्वात समावेशित होत होते. प्रकृतीने पुरुषावर विजय मिळविला की प्रकृतीवर पुरुषाने? खरे तर परस्परविजयी होण्याने अद्वैत सिद्धी होत होती.

*प्रत्यूहः पुलक – अङ्कुरेण निबिड – आश्लेषे निमेषेण च*

*क्रीडा – आकूत – विलोकिते अधर – सुधा – पाने कथा – केलिभिः ।*
*आनन्द – अधिगमेन मन्मथ – कला – युद्धे अपि यस्मिन् अभूत्*
*अद्‌भूतः स तयोः बभूव सुरत – आरम्भः प्रियं भावुकः ।।२।।*
*दौर्भ्याम् संयमितः पयोधर – भरेण आपीडितः पाणि – जैः*
*आविद्धः दशनेः क्षत – अधर – पुटः श्रोणीतटेन आहतः ।*
*हस्तेन आनमितः कचे अधर – मधु – स्पन्देन सम्मोहितः*
*कान्तः काम् अपि तृप्तिम् आपतत् अहो कामस्य वामा गति ।।३।।*
*वाम–अङ्गेरति – केलि – सङ्कुल – रण – आरम्भे तया साहस–*
*प्रायम् कान्त – जयाय किञ्चित् उपरि प्रारम्भि यत् सम्भ्रात् ।*
*निष्पन्दा जघन – स्थळी शिथिलता दोः – वल्लि उत्कम्पितम्*
*वक्षः मीलितम् अक्षि पौरुष – रसः स्त्रीणाम् कृतः सिध्यति ।।४।।*

उत्कंठित भावविवश राधाकृष्णांची प्रितीलीला सुरू झाली. जणू प्रणयाचे समर! रतिकलांची कसोटी! उभय अंगे आनंदोत्सवात भिडली. अमृतपानासाठी जुळलेले ओठ, क्वचित अस्फुट गुजगोष्टींसाठी विलग होत. कृष्ण राधेच्या आलिंगनात बद्ध! जणू तिच्या उरोजसंभाराने तिच्यात सामावताना, राधेच्या नखांनी, दातांनी, मांड्यांनी आक्रमित झालेल्या, श्रीकृष्णांचे केस मुखमंडलाकडे खेचले जात होते. माधवाच्या आणि राधेच्या ओठातील शृंगविष परस्परात भिनू लागले! प्रणयसमरात मात खाणारा श्रीकृष्ण, समावेशन सुखतृप्तीचा अनुभव घेत होता!

सुरुवातीला कृष्णावर विजय मिळविण्याच्या इर्षेने पेटलेली राधा आक्रमक नि वरचढ झाली खरी. परंतु तिच्या शृंगभोगशौर्याचा आवेग कृष्णसख्याच्या पाशात शिथिल झाला. ऊर धपापले, नेत्र श्रमले आणि राधा कृष्णात समावेशित झाली.

या समावेशन आनंदोत्सवी क्रीडेने अवघे विश्व पुलकित झाले. शिव–शक्ती शृंगसमाधीतून भानावर आल्या. त्याचवेळी राधाकृष्ण गुज स्फोट होत होते. विश्वाने कानात प्राण आणले.

''हे सखया तुझ्या वियोगाचे दुःख मी कशी सहन करणार? पृथ्वीमातेच्या उदरात समावेशित होणेच श्रेयस्कर!'' राधा कृष्णाच्या कानी कुजबुजत होती.

''राधे अशी निर्वाणीची गोष्ट कशी बरं करता येणार? मन्वंतरापर्यंतही राधाकृष्ण भावोन्मिलन क्रीडा सुरू राहाणे आवश्यक आहे. नव्हे का? हेच तर

मदहृदयातून तत्त्वमयी राधेचे सृष्टीरूप प्राकट्य नव्हे का? राधा तू माझी चित्शक्ती, चेतना स्वसंवेद्यता, आद्या, भावना आहेस. तुझे सृष्टीरूप होणे हीच तर माझी 'बहुस्याम' होण्याची वांच्छा, तुझ्या प्राकट्याने सिद्ध होते, होय ना?'' कृष्णाने राधेला तिच्या अस्तित्वाचे स्मरण करविले.

''हे सख्या, परंतु द्वापारातील अवतारकार्यात, माझे समावेशन असणार ना?'' राधेने शंका व्यक्त केली.

''प्रकृतीची क्रीडा ही तर वस्तुतः तुझीच क्रीडा आहे. पंचतत्त्वांच्या स्वाभाविक पृथवक्त्वासह, स्वाभाविक भावनातून त्रिगुणात्मकता उद्‌भवते, हे का तू जाणत नाहीस? हीच तर श्रीकृष्ण तत्त्वाची लीला आहे. यांची प्रपंचलीला घडविण्यासाठीच तर आपले द्वैत! या द्वैताच्या पलिकडे केवळ राधाभावानेच समावेशन होऊन अद्वैत साधता येते! होय ना? म्हणूनच हे राधे, तू या तत्त्वातील अपरंपार करुणा, प्रेम, भक्ती, वात्सल्य, सात्त्विकता यांची वाहिनी, सरिता, नव्हे काय?'' कृष्णाने आद्याला जाणीव करून दिली.

''सख्या, मन्वतरापर्यंत तुझी लीला घडविणे हेच माझे व्रत! परंतु सखया हे ज्ञान संपादन करून; राधाभावे तुझ्यात समावेशन करण्याची साधना सिद्ध करता यावी अशी माझी कांक्षा आहे. राधाकृष्ण समावेशन हेच अंतिम सत्य ज्ञान आहे. हेच तुझे सच्चिदानंदरूप आहे, नव्हे का?''

''होय, सखये होय!'' श्रीकृष्णाने पुन्हा आलिंगन देत राधेला रुकार दिला.

''हे सखया, त्यासाठी मला एक अभिवचन हवे आहे!'' राधेने श्रीकृष्णाकडे ठाम निश्चयाने कटाक्ष रोखून सांगितले. शिव-शिवा, विष्णू-लक्ष्मी, ब्रह्म-माया आणि समस्त विश्व वृंदावनातील राधेची ही वचन याचना श्वास रोखून ऐकू लागले.

''बोल सखे, मी वचनबद्ध आहे.'' श्रीकृष्णाने वचन दिले.

''हे प्राणनाथ, मन्वंतरापर्यंत माझे अस्तित्व या वृंदावन भूमीतच असेल. येथे नित्य ही अद्वैताची रासलीला घडविण्यासाठी तू प्रकटावेस. जो भक्त राधाभावाने तुझे नित्य स्मरण करील, त्याला हे अद्वैताचे शाश्वत ज्ञान या वृंदावनात दृश्यमान व्हावे!'' राधेने वचन मागितले.

''तथास्तु!'' श्रीकृष्ण म्हणाले. ''परंतु....'' कान्हा काही सांगणार तोच

''हे श्रीकृष्णा आता परंतु का बरे?'' राधेने प्रश्न केला.

''हे राधे, ही मन्वंतर क्रीडा हे तुझे रूप आहे. ही क्रीडा रात्रंदिन सुरूच राहणार आहे. तेव्हा दिनरजनीच्या संधिकाली म्हणजे मध्यरात्री उलटल्यानंतर,

ही समावेशन रासक्रीडा करण्यासाठी मी वृंदावनात नित्य प्रकट होईन!'' श्रीकृष्णाने स्पष्ट केले.

राधा आनंदाने मोहरली. श्रीकृष्णाच्या साक्षीने तिने वृंदावनाकडे हात ओडवले. वृंदावन, मोहरून हे सारे अनुभवत होते. राधेला मन्वतरापर्यंत आपल्यात सामावून घेऊन कृष्णस्वरूप होण्यासाठी भक्तिमग्न झाले. क्षणात राधा अवघ्या वृंदावनाच्या कणाकणात समावेशित झाली.

ही लीला मोठ्या औत्सुक्याने अनुभवणाऱ्या पार्वतीमातेने शिवांना विचारले, ''हे महादेवा, ही क्रीडा पाहण्यासाठी राधाभावाने जायचे म्हणजे काय? हे आपणच सांगू शकाल!''

''हे देवी, राधाभाव म्हणणे अनन्यभक्ती होय. ही भक्ती अनेक प्रकाराने करता येते. श्रीमद् नारद याच भक्तिसाधनेचा प्रचार त्रैलोक्यात करीत आहेत. मी ही राधाभावाने श्रीकृष्णांचे ध्यान करीत आहे. तुझ्या ठायीही तोच भाव माझ्यासाठी प्रकट आहे. ह्यामुळेच शिवाद्वैत घडते.

''द्वापार आणि कलियुगाच्या अंतापर्यंत भक्तिसाधनेनेच सायुज्यमुक्ती प्राप्त होते. सच्चिदानंदस्वरूप होता येते. म्हणूनच हे अंबिके जो जो साधक ज्या ज्या देवतेची भक्तिसाधना करील, तो तो तद्रुप होईल. अंततोगत्वा सारेच राधाकृष्ण अद्वैतच अनुभवतात.'' श्री भवानाशंकरांनी गुह्य ज्ञान सर्वांसाठी प्रसारित केले.

''नारायण, नारायण, हे प्रकृतीपुरुषा, प्रणाम!'' नारदांनी प्रकट होत प्रणाम केला.

''ब्रह्मर्षी नारदा आपण?'' पार्वतीमातांनी पृच्छा केली.

''माते, आपणच माझी आठवण केलीत ना?'' नारद म्हणाले.

''होय, नारदमुने आपल्या भक्तियोगप्रसाराचे गूढ आत्ताच शिवांनी कथन केले. खरोखरीच जगत्कल्याणासाठीची आपली साधना धन्य आहे!''

''हे जगन मातर, शिव-शिवा, ब्रह्म-माया, विष्णू-लक्ष्मी ही सारीच रूपे राधाकृष्णस्वरूपेच होत याचेच स्मरण नारायण मंत्राने मी करत आहे. हीच राधाभावाची नारायण सरिता आहे. आपल्या स्मरणाने मी धन्य झालो! हे ज्ञान वृंदावनात प्रकटले, म्हणूनच वृंदावनधाम हे भक्तिसाधनेचे सर्वोच्च धाम होय! गोलोकीची, गोकुळातली राधा अर्थात परमेश्वराची परमेश्वरी येथे नित्य वास करते. येथे राधाकृष्ण समावेशन, रासमंडल नित्य सजते! त्याचे स्मरण करीतच आपणास प्रणाम करतो. आज्ञा असावी!' नारदांनी निरोप घेतला. नित्य रासक्रीडेच्या अवीट अनुभूतीसाठी विश्व सिद्ध झाले.

साक्षात श्री लक्ष्मीस्वरूपा रुक्मिणीमातांनाही वृंदावनात राधाकृष्ण अद्वैताचे दर्शन घडले. मथुरा, वृंदावन, कुंजवन, भांडीरवन, गोवर्धन, रावलग्राम, नंदग्राम एवढेच नव्हे अवघे बरसाना मंडळ राधाभावे भक्तिधाम झाले. राधाकृष्ण, गोपालकृष्ण, राधा राधा, राधे राधे यांचे भजन या अद्वैत दर्शनाची साक्ष देत गुंजू लागले! गुंजते आहे! गुंजत राहील! राधाभावे भक्त नित्य अद्वैताची प्रचिती घेतील.

जय वृंदावन, जय जय राधे! जय राधाकृष्ण! जय गोपालकृष्ण! जय जय श्री राधे!

●●●

# संदर्भ सूची


१. *श्री ज्ञानेश्वरी पारायण प्रत,* श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी, २२ वी आवृत्ती, २००१.
१. *राधा भजति,* प्रकृतीखंड ब्रह्मवैवर्तपुराण ४८-३८.
२. *दपणी भरले पिसे,* अनिल सहस्रबुद्धे (१२/७/२०२३).
३. *'प्रिया',* प्रेमस्वरूप राधा, हेमंत प्रकाशन, नगर, मार्च २००६, अनिल सहस्रबुद्धे.
४. *तत्रैव,* 'गीत सनातन'.
५. *अमृतानुभव,* शिवशक्ति समावेशन, श्री संत ज्ञानेश्वर महाराज.
६. *हृदय स्वामिनी,* अनिल सहस्रबुद्धे (२४/४/२०२३).
७. *दृष्टी दृष्टा,* श्रीमद् देवी भागवत महापुराण नवम स्कंध, श्लोक ५१, ५२.
८. *राधास्तोत्र,* ब्रह्मांड पुराणातील श्री व्यास विरचित राधा स्तोत्र.
९. *श्री लक्ष्मी स्तोत्र,* लोपामुद्रा विरचित लक्ष्मी स्तोत्र (सौ. उषा सहस्रबुद्धे संपा.)
१०. *श्री दुर्गा स्तोत्र,* श्री वेदव्यास विरचित दुर्गा स्तोत्र.
११. *सरस्वतीस्तोत्र,* महर्षी अगस्ति विरचित (सौ. उषा सहस्रबुद्धे संपादित) सरस्वती स्तोत्र.
१२. *श्री सावित्रीदेवी स्तोत्र,* ब्रह्मवैवर्तपुराण, प्रकृतिखंड, श्रीब्रह्मदेवकृत अ. २३, श्लोक ७९ ते ८४.
१३. *वसन्ते वासन्ती,* गीतगोविंद, जयदेव. संपा. डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, प्रबंध तिसरा.
१४. *तत्रैव,* सा विरहे तव दीना, आठवी अष्टपदी - राग - कर्नाटकी, ताल

त्रिताल.

१५. *तत्रैव,* दृश्यसे पुरतः अष्टपदी ७ वी ६ व ७, अष्टपदी आठवी ५, ६, ७.
१६. *ऋतुगंध दरवळे,* अनिल सहस्रबुद्धे (१३/५/२०२३).
१७. *वंशी विभूषित कर,* श्रीकृष्णवर्णन.
१८. *रात्री काळी,* संत नामदेव.
१९. *रासे हरिम् उह विहीत,* उनि. गीतगोविंद, सर्ग दुसरा, प्रबंध पाचवा, अष्टपदी पाचवी.
२०. *नंदाच्या घराला,* संत नामदेवांच्या अभंगगाथा.
२१. *तत्रैव,* शुक म्हणे राया.
२२. *तत्रैव,* विश्वाचा तो बाप.
२३. *कंस, अरिः,* उनि.– गीतगोविंद, सर्ग तिसरा, प्रबंध सातवा सुरुवात.
२४. *कृष्णा लावितसे,* उनि., नामदेव.
२५. *वारियाने कुंडल,* संत एकनाथ गाथा.
२६. *हरिः मुग्ध,* जयदेव, सर्ग पहिला समारोप.
२७. *गणयति गुण,* उनि., जयदेव, प्रबंध सहावा, अष्टपदी सहावी.
२८. *आदौ देवकी गर्भ,* एक श्लोकी श्रीकृष्ण लीलामृत.
२९. *वंशीविभूषित,* श्रीकृष्ण तत्त्व महती.
३०. *आला गोकुळवासी,* उनि., नामदेव गाथा.
३१. *जन्मजन्मातरी,* तत्रैव.
३२. *व्रजांत कोणे एकवेळेशी,* संत एकनाथ गाथा.
३३. *आब्रह्मस्तम्भ,* ब्रह्मवैवर्तपुराण प्रकृतिखंड ४८–४७.
३४. *तत्रैव,* ४८–३८.
३५. *तत्रैव,* ४८–४७.
३६. *उनि.,* गीतगोविंद, सर्ग तिसरा, प्रबंध सातवा, पद ५, ६, ७.
३७. *श्रीमद्देवीभागवत, नवमस्कंध* अ. ८ (९७ ते १००) श्री व्यास.
३८. *उनि.,* वंशीविभूषित.
३९. *उनि.,* गीतगोविंद, सर्ग बारा, प्रबंध २३, पद ७ व ८.
४०. *प्राणाधिष्ठित देवी,* ब्रह्मवैवर्तपुराण ४८–४७.
४१. *रचय कुचयो,* उनि.– जयदेव, प्रबंध २४, सर्ग १२ समाप्त.
४२. *प्रत्युहः पुलक,* तत्रैव जयदेव, प्रबंध २३, सर्ग १२ समारोप.

●●●